सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

४० वा वर्धापन दिन

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७७ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## दै. सोलापूर 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...




# जरांगे-पाटलांची उद्या १२ वाजता एंट्री

## पोवाड्याच्या माध्यमातून जरांगेंचा संघर्ष सादर होणार; लाखोंची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

मराठा आरक्षण व कुणबीमध्ये सग्या सोयऱ्यांचा समावेश करावा या मागणीसाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलन अंतर्गत शांतता रॅलीच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात बुधवार ७ ऑगस्ट रोजी सोलापुरातून होणार असून या शांतता रॅलीसाठी जरांगे-पाटील यांचे दुपारी बारा वाजता येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात आगमन होणार आहे.

छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर तेथून ते रॅलीने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करणार आहेत. त्यानंतर तेथेच उभारण्यात आलेल्या भव्य व्यासपीठावरून ते मराठा समाज बांधवांना संबोधीत करणार आहेत.




दरम्यान सकाळपासून जरांगे पाटील यांचे आगमन होईपर्यंत शिवशाहीर यांची तोफ धडाडणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात अरविंद घोगरे हे शिवशाहीर विविध पोवाड्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज, तसेच मराठ्यांचा इतिहास सादर करणार आहेत. याशिवाय मनोज जरांगे-पाटील यांच्या संघर्षाची कहाणीही ते ऐकवणार आहेत. तसेच छत्रपती संभाजी महाराज चौकात सकाळच्या सत्रामध्ये सोलापूरचे तरुण शिवशाहीर यांचे पोवाडे ऐकायला मिळणार आहेत.

सभेनंतर जरांगे-पाटील हे आपल्या निवडक समर्थकांसह पार्क चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि अहिल्यादेवी होळकर आदी महामानवांना अभिवादन करणार आहेत. सोलापूरचे चार हुतात्मे या महामानवांना अभिवादन देखील करणार आहेत ही शांतता रॅली यशस्वी करण्यासाठी मराठा क्रांती मोर्चाचे अमोल शिंदे, दास शेळके, अनंत जाधव, रवी मोहिते, श्रीकांत घाडगे, शेखर फंड, विजय पोखरकर, महेश सावंत, बाळासाहेब गायकवाड, दिलीप कोल्हे परिश्रम घेत आहेत.

मनोज जरांगे यांच्या सभेसाठी छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य गोलाकार पद्धतीचे व्यासपीठ उभारणीचे काम पूर्ण झाले असून त्याला अंतिम स्वरूप देण्यात येत आहे. या व्यासपीठावर लेजर शोची व्यवस्था करण्यात आली असून जरांगे-पाटलांच्या आगमनाच्या वेळी या लेझर शोचा आणि आतिषबाजी केली जाणार आहे.

सभेनंतर जरांगे-पाटील यांचा सोलापुरात रात्री मुक्काम राहणार आहे. मुक्कामाला त्यांच्या समवेत आलेले शंभर सहकारी विजापूर रोडवरील मयूर वन मंगल कार्यालयात मुक्कामास असणार आहेत. तर जरांगे-पाटील यांच्यासाठी खास एक बंगलो राखीव ठेवण्यात आला आहे. त्या बंगल्यामध्ये ते मोजक्या समर्थकांसह मुक्काम करणार आहेत . दुसऱ्या दिवशी सकाळी कामती मार्गे मंगळवेढा कडे रवाना होणार आहेत.




## संक्षिप्त वृत्त



### पद्मशाली सखी संघमच्या वतीने दीपाराधना, मैत्री दिवस साजरा

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

पद्मशाली सखी संघमच्या वतीने आषाढ महिन्यात शेवटच्या दिवशी असणा-या दीप अमावास्या व मैत्री दिवस साजरा करण्यात आला आहे. प्रारंभी रविवारी संध्याकाळी शहराच्या पूर्व भागातील श्रीराम मंदिरात दीपाराधना करुन मंत्र पठण व आरती करण्यात आले. त्यानंतर जागतिक मैत्री दिवसाचे औचित्य साधून आलेल्या सखींनी एकमेकींना मैत्री दिनाच्या शुभेच्छा दिल्या, मैत्री धागा (फ्रेंडशिप बँड) बांधून, तोंड गोड केल्या. याप्रसंगी सखी संघमच्या सल्लागार सीमा यलगुलवार व माजी नगरसेविका रामेश्वरी बिर्रु यांनी नूतन अध्यक्ष मेघा इट्टम यांचा शाल व बुके देउन सत्कार केला.यावेळी सखी संघम च्या पूजा चिप्पा, कला चन्नापट्टण, गीता भूदत्त, पद्मा मेडपल्ली, ड. मेघना मलपेद्दी, आरती आडम, मंजुळा आडम, वैशाली व्यंकटगिरी, अरुणा पोटाबत्ती, पल्लवी संगा, लक्ष्मी कोडम, हेमा मैलारी, अनुराधा बुरा, नम्रता दुडम, श्वेता वल्लाल, राजेश्वरी बल्ला, श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनचे सल्लागार दयानंद कोंडाबत्तीनी, किशोर व्यंकटगिरी, श्रीनिवास पोटाबत्ती उपस्थित होते.



### इनटॅकच्या प्रादेशिक फेरीसाठी अनुष्का गायकवाड, सुजय हजारे पात्र

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

इनटॅक सोलापूर विभागाने - २०२४ या स्पर्धेची विभागीय पातळीवरील स्पर्धा हरिभाई प्रशालेच्या प्रांगणातील एसपीएम इंग्लिश मिडीयम स्कूल येथे पार पाडली. स्पर्धेसाठी १७ शाळेतील ६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यातील चार गट पुढील पातळी साठी पात्र ठरले व त्यातून कै. वि. मो. मेहता शाळेच्या अनुष्का गायकवाड व सुजय हजारे या विद्यार्थ्यांच्या गटाने पहिला क्रमांक मिळवीत महाराष्ट्राच्या प्रादेशिक फेरीसाठी आपले स्थान निश्चित केले. याच कार्यक्रमात मुलांना प्रेरणा देण्याच्या उद्देशाने सोलापूरचे धावपटू बहीण भाऊ श्रद्धा व साईश्वर गुंटुक यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी इनटॅकने या दोघांचा मानपत्र देवून सन्मान केला. याच कार्यक्रमात इनटॅकने जानेवारी २०२४ मध्ये घेतलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेच्या विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार दिले. सूत्रसंचलन संस्थेच्या समन्वयिका आर्किटेक्चर सीमंतिनी चाफळकर यांनी केलें. स्पर्धेच्या प्रश्नपत्रिकेच्या मूल्यमापनाचे काम डॉ. किरण पाटणकर, आर्क. सविता दीपाली, प्रिती श्रीराम, अॅड. मोनिका टीमके, अनुजा दुस्तकर, रोहिणी जोकरे यांनी केलें. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेच्या सहसमनव्ययिका आर्किटेक्चर श्वेता कोठावळे व आर्किटेक्चर पुष्पांजली काटीकर यांनी प्रयत्न केले. एसपीएमचे मुख्याध्यापक शिरगावे व स्थानिक संस्था विश्वस्त राजेश पटवर्धन यांनी प्रशस्त जागा उपलब्ध करून दिली.



### विडी कंपनीच्या व्यवस्थापकांना कामगार सेनेचे निवेदन

**सोलापूर दि. ५ ऑगस्ट-**

सोलापुरातील महिला विडी कामगारांना प्रा. फंड व पेन्शन लाभार्थी कामगारांचे खासगी दलालामार्फत होत असलेल्या फसवणूक व आर्थिक लूट थांबविण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने सोलापुरातील सर्व विडी कंपनी व्यवस्थापकांना निवेदन देण्याचे मोहीम सुरू आहे. त्या अंतर्गत लंगर विडी कंपनी व्यवस्थापकांना वरील विषयी निवेदन देण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र कामगार सेनेचे प्रदेश अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी प्रसिद्धीस दिली आहे. विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात रेखा आडकी, विठ्ठल कुऱ्हाडकर, गुरुनाथ कोळी, गणेश म्हंता, श्रीधर आडकी, पप्पू शेख उपस्थित होते.




### महापालिकेवर हालगी नाद मोर्चा

**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

दिपक गवळी, पृथ्वीराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेवर भव्य हालगी नाद मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशाल सोनवणे, दविद जगले, समीर शेख, मुज्जू शेख, नबीलाला माळी, दत्ता डोलारे, गणेश लोंढे, वैभव शिंदे, सलमान शेख, चंद्रकांत मोरे, खलीपा माढेकर, सुजित उपलाकर, आदित्य वाघमारे, रवी नाईयक आदी उपस्थित होते.

# भारतीय कराराचा कायदा ब्रिटिशांनी बनवला

### विधी व्याख्यानमालेत अॅड. गणेश माशाळ यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

भारतीय कराराचा कायदा हा ब्रिटिशांनी अत्यंत सखोल अभ्यास करून बनवला आहे. या कायद्यातील करारासंबंधी आवश्यक बाबी उदाहरणाद्वारे उलघडून सांगितल्या. कायदेशीर करार अथवा बेकायदेशीर करार आणि कोणता दस्त करार होऊ शकतो अथवा कोणता दस्त करार होऊ शकत नाही, असे प्रतिपादन अॅड. गणेश माशाळ यांनी केले.

सोलापूर बार असोसिएशनने वकिलांसाठी विधी व्याख्यानमालेची सुरुवात केली. व्याख्यानमालेचे सहावे पुष्प जिल्ह्यातील नामवंत युवा विधीज्ञ तथा प्रसिद्ध अॅड. गणेश माशाळ यांच्या हस्ते गुंफण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



कार्यक्रमास अॅड. आर. ए. बागवान, अॅड. खतीब वकील, अॅड. राजेंद्र फताटे, अॅड. अशोक जालादी, अॅड. शकील नदाफ, अॅड. झुलेखा पीरजादे आणि अॅड. सरोजिनी तमशेट्टी या ज्येष्ठ विधीज्ञांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विविध न्यायालयीन निवाड्यांचे उहापोह करून उत्कृष्ट मार्गदर्शन पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे समजावून सांगितले.

सहव्या पुष्पातील व्याख्यानाचा विषय 'द इंडियन कॉन्ट्रॅक्ट अॅक्ट १८७२ - यूजेस अॅन्ड इटस अॅप्लिकेशन' असा होता. या व्याख्यानमालेचे उद्घाटन सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने झाली व कार्यक्रमाची प्रस्तावना सोलापूर बारचे अध्यक्ष अॅड. अमित आळंगे यांनी केली व वक्त्यांचा परिचय सहसचिवा अॅड. निदा सैफन यांनी करून दिली. या कार्यक्रमावेळी सोलापूर बार असो अध्यक्ष अॅड. अमित आळंगे, उपाध्यक्ष अॅड. व्ही. पी. शिंदे, सचिव अॅड. मनोज नागेश पामूल, सहसचिव अॅड. निदा सैफन, खजिनदार अॅड. विनयकुमार कटारे सह सोलापूर बार असोसिएशन बहुसंख्य विधिज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिव अॅड. मनोज पामुल व आभार खजिनदार अॅड. विनयकुमार कटारे यांनी केले.



## वीज मंडळ पतसंस्थेच्या कोषाध्यक्षपदी सुनील काळे

**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

वीज मंडळ तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. यावेळी सन २०२३-२४ ते २०२८-२९ या कालावधी करीता नूतन संचालकांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नूतन संचालक व संघटनेचे सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनील काळे यांची पतसंस्थेच्या कोषाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष मयुर गवते व महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालयातील सहकारी जनमित्र व यंत्रचालक यांच्यावतीने कोषाध्यक्ष सुनील काळे यांचा सत्कार करुन अभिनंदन करण्यात आले. यावेळी मयुर गवते, धुळप्पा टेळे, निलकंठ कांबळे, गुंडप्पा बनसोडे, नितीन कोळी, अपेक्षा बहादुरे, हिना बागवान आदी उपस्थित होते.

# ऑलिंपिक डिस्टन्स ट्रायथलॉन स्पर्धेत डॉ. अभिजीत वाघचवरे यांचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

हरियाणा राज्यातील गुरगॉव मध्ये पार पडलेल्या ऑलिंपिक डिस्टन्स ट्रायथॉन स्पर्धेत सोलापूरचे प्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ. अभिजित वाघचवरे यांनी अवघ्या तीन तास ३० मिनिटात ही स्पर्धा पार पाडून यश संपादन केले.

रविवार दि. ४ ऑगस्ट रोजी भारताची ऑलिंपिक मेडल्स पंढरी म्हणून ओळखल्या लाणाऱ्या हरियाणा राज्यातील गुरगॉव मध्ये ही स्पर्धा एचआर २६ या नावाने आयोजित करण्यात आलेली होती. ऑलिंपिकच्या धर्तीवर स्विमिंग, रनिंग आणि सायकलिंग अशी स्पर्धा घेण्यात आली. देशभरातील विविध राज्यातील या स्पर्धेसाठी १०० स्पर्धक सहभागी झालेले होते. त्यामध्ये सोलापूरचे सुपुत्र अस्थिरोग तज्ञ अभिजित वाघचवरे हे महाराष्ट्रातून एकमेव या स्पर्धेत यश संपादन करणारे ठरले. या



स्पर्धेत दीड किलोमीटर स्विमिंग, ४० किलोमीटर सायकलींग आणि दहा किलोमीटर रनिंग या तीन्ही स्पर्धा अवघ्या तीन तास तीन मिनिटात डॉ. अभिजित वाघचवरे यांनी पूर्ण करीत पहिल्या १० मध्ये येण्याचा मान मिळवला. सध्या सुरू असलेल्या पॅरिस ऑलिंपिक २०२४ मण्से ऑलिंपिक डिस्टन्स ट्रायथॉन स्पर्धेत जे मापदंड लावले जातात त्याचनुसार ही स्पर्धा घेण्यात येते. डॉ. अभिजित वाघचवरे हे नेहमी आपल्या स्पर्धेसाठी सराव कायम करीत असतात तसेच इतर स्पर्धकांनाही सायकलींग, स्विमिंग आणि रनिंगसाठी प्रोत्साहन देवून मार्गदर्शन करीत असतात.

### सरावातील सातत्य महत्वाचे : डॉ. वाघचवरे

अशा स्पर्धामध्ये यश मिळवण्यासाठी सरावामध्ये सातत्य असणे आवश्यक आहे तसेच माझ्या यशात पिताश्री सत्यवान वाघचवरे, मातोश्री शीला वाघचवरे यांचा नेहमीच पाठींबा असतो तसेच डब्लू एस स्पोटर्स आणि इको चे डॉ. सत्यजित वाघचवरे (अल्ट्रा मॅरेथॉन रनर) हे नेहमी सोबत असतात तर मॅरेथॉन रनर डॉ. राजश्री वाघचवरे आणि डॉ. शुभांगी वाघचवरे या त्यांच्या आहारावर विशेष लक्ष देतात त्यामुळे आगामी काळातील स्पर्धांसाठी मी नेहमी सज्ज राहीन. असेही डॉ. अभिजित वाघचवरे यांनी सांगितले.



## गुरव समाज महासंघाच्या वतीने गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

राष्ट्रीय गुरव समाज महासंघाच्या वतीने गुरव समाजातील कर्मवीर योगाचार्य प्रा. डॉ. प्रल्हाद वडगावकर संस्थापक अध्यक्ष राष्ट्रीय (ओबीसी) महासंघ व राष्ट्रीय सल्लागार राष्ट्रीय गुरव समाज महासंघ पुरस्कृत पारितोषिक वितरण समारंभ व राष्ट्रीय गुरव समाज महासंघ जिल्हा सोलापूरच्या वतीने ८० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ झाला.

बुलढाण्याचे माजी आमदार राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या हस्ते जुळे सोलापूर येथील सुरभी हॉल येथे झाला. कार्यक्रमास प्रमुख म्हणून राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे कार्याध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव, उपाध्यक्ष शशिकांत जिड्डीमनी, कोषाध्यक्ष गणपती फुलारी हे उपस्थित होते. पुरस्कृत्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. सोलापूर जिल्ह्यातील दहावी व बारावीमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे जिल्हाध्यक्ष निंगराज विंचुरे यांच्या पत्नी कै. साधना विंचुरे यांच्या स्मरणार्थ सन्मानचिन्हे प्रमाणपत्र शाल व श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर व राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे राष्ट्रीय युवाध्यक्ष मिलिंद कहाळे यांनी केले. कार्यक्रमामध्ये डॉ. सुहास पुजारी यांचा उपप्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. स्वागत निंगराज विंचुरे यांनी केले. प्रास्ताविक मल्लिकार्जुन गुरव यांनी केले. श्रावणी पाटील हिच्या कथक नृत्यांने आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमांची सुरूवात करण्यात आले. मल्लिकार्जुन गुरव परिवार यांच्या सौजन्याने स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. सूत्रसंचालन संगीता स्वामी यांनी केले. शिवशंकर विजापुरे यांनी आभार मानले.

# जिल्ह्यात तंत्रज्ञानयुक्त बनविणारे शिक्षण देणार

## माजी खासदार डॉ. प्रभाकर कोरे यांचे प्रतिपादन, नवीन शाळेच्या इमारतीचे भूमिपूजन

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

कर्नाटक लिंगायत एज्युकेशन सोसायटी संस्था देश पातळीवर कार्यरत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यामध्ये ही संस्था जगात अग्रेसर आहे. शिक्षणाबरोबरच आम्ही आज वैद्यकीय, कृषी, आरोग्यसेवा, तंत्रशिक्षण या क्षेत्रामध्येही के एल ई संस्थेने स्वतःचा एक उत्कृष्ठतेचा ठसा निर्माण केला आहे सोलापूर जिल्ह्यात तंत्रज्ञान युक्त व नवनवीन गुणवत्तापूर्ण तसेच स्वावलंबी बनविणारे शिक्षण देण्यासाठी आपल्या शैक्षणिक संस्थेचा विस्तार करत आहोत. के. एल. ई. संस्था ही भारतातील शैक्षणिक, सामाजिक आणि



वैद्यकीय सेवा देणारी अग्रगण्य संस्था आहे. संस्थेच्या भारत व भारताबाहेरील शाखांच्या माध्यमातून आम्ही जगभरात शिक्षणप्रसाराचा व आरोग्यसेवेचा वटवृक्ष वाढविला आहे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष व माजी खासदार डॉ. प्रभाकर कोरे यांनी केले.

जुना कारंबा नाका कळके वस्तीजवळ संस्थेच्या नवीन शाळेच्या भूमिपूजनाच्या वेळी ते बोलत होते. यावेळी आशा कोरे, के एल ई संस्था बोर्ड ऑफ डायरेक्टर श्रीशैलप्पा मेटकूट, शंकरप्पा मुनाळी, अनिल बागेवाडी, महांतेश कवटगीमठ, बी.आर पाटील, जयानंद मुनोळी, व्ही. आय. पाटील, अनिल पट्टेद, प्रीती दोडवाड, दीपा मेटगुड, डॉ. सतीश, निज्जप्पनवरु, बी. जी. देसाई, सुनिल जलालपुरे, महादेव बळीगार, प्रकाश कडकोळ, सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, पुष्कराज काडादी, सुरेखा बावी, किणगी, शिरीष व श्वेता कोठावळे, मल्लिनाथ विभूते, डॉ. राजेंद्र घुळी, विजयकुमार काडादी, सुनील रिक्के, उमेश डूमने, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, बसवराज शास्त्री हिरेमठ, अॅड. बसवराज सलगर, अँड अनिल मंगरुळे, सुदीप चाकोते, सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, बहवण्णप्पा जम्मा, चिट्टे, . घुगरे, धैर्यशील साळुंखे,अँड. शिवशंकर बिराजदार, प्रवीण तळे, मुख्याध्यापक अनिल पाटील, प्रशांत कोल्हे, एन. एस. कदम, सतिश हिरेमठ आदी उपस्थित होते. सुरवातीस महात्मा बसवेश्वर व सिद्धेश्वर महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून भूमिपूजन प्रभाकर कोरे यांच्या हस्ते झाले.

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३८ वे अंक २७७ ।
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## ▶▶ महत्त्वाचे...

### लाडकी बहीण योजना महिलांच्या हिताची

**मुंबई** : महाराष्ट्र सरकारने सुरू केलेली लाडकी बहीण योजना ही पूर्णपणे महिलांच्या हिताची आहे. त्यामुळे ती भेदभाव करणारी आहे, असे कदापि म्हणता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा देत मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी या योजनेच्या विरोधात दाखल याचिका फेटाळली. मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. सरकारची ही योजना भेदभाव करणारी असून विधानसभा निवडणूक डोळ्यापुढे ठेवून ती सुरू करण्यात आली, त्यामुळे ही योजना रद्द करण्यात यावी, अशी विनंती करणारी जनहित याचिका मुंबईतील चार्टर्ड अकाऊंटंट नावीद अब्दुल यांनी दाखल केली होती. ही योजना सरकारचा धोरणात्मक निर्णय आहे आणि यात आम्ही हस्तक्षेप करू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या निर्णयामुळे राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला असून १४ ऑगस्टला योजनेतील पहिला हप्ता लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### राज ठाकरे थांबलेल्या हॉटेलात मराठा आंदोलक घुसले

**धाराशिव** : राज ठाकरे थांबलेल्या हॉटेलमध्ये मराठा आंदोलक घुसल्याची घटना सोवारी सायंकाळी धाराशिवमध्ये घडली. राज ठाकरे यांनी आम्हाला भेटीची वेळ द्यावी. त्यांनी मराठा आरक्षणाबद्दल आपली भूमिका



स्पष्ट करावी, अशी मागणी करीत या आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलकांचा वाढता संताप पाहता राज ठाकरे यांनी त्यांना चर्चेशी बोलावले. मात्र, त्यांनी अरेरावीची भाषा केल्याचा आरोप करीत आंदोलनकर्ते हॉटेल बाहेर पडले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत.

### ७० व्या वर्षी अध्यक्षपद सोडणार अदानी

**मुंबई** : अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी वयाच्या ७० व्या वर्षी पद सोडण्याची योजना आखली आहे. सध्या त्यांचे वय ६२ वर्षे आहे. २०३० च्या सुरुवातीला अदानी कंपनीची कमान आपली मुले आणि चुलत भावांकडे सोपवू शकतात.



अदानी त्यांच्या उत्तराधिकाऱ्याबद्दल पहिल्यांदाच बोलले आहेत. अहवालानुसार, जेव्हा अदानी निवृत्त होतील, तेव्हा त्यांचे चार उत्तराधिकारी मुले करण आणि जीत, चुलत भाऊ प्रणव आणि सागर एका फॅमिली ट्रस्टप्रमाणे लाभार्थी होतील.

### केजरीवालांना केलेली अटक योग्यच : हायकोर्ट

**नवी दिल्ली** : कोट्यवधी रुपयांच्या मद्य घोटाळाप्रकरणी सीबीआयने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना केलेली अटक कायद्यानुसार योग्यच असल्याचा निर्वाळा देत दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी केजरीवाल यांना जबरदस्त धक्का दिला. केजरीवाल यांनी सीबीआयकडून झालेल्या अटकेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्या. नीना कृष्णा म्हणाल्या की, सीबीआयने अटक करताना कुठलेही न्यायसंगत कारण दिले नाही, असे कदापि म्हणता येणार नाही, असे न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले. न्यायालयाने केजरीवाल यांच्या याचिकेवरील निकाल १७ जुलै रोजी राखून ठेवला होता. तुम्हाला जामीन हवा असल्यास तुम्ही विशेष न्यायालयात अर्ज सादर करा, असा सल्लाही न्या. कृष्णा यांनी केजरीवाल यांना दिला. सीबीआयने केजरीवाल यांना २६ जून रोजी तिहार कारागृहातून अटक केली होती.

# बांगलादेशात सत्तांतर, शेख हसीनांचे पलायन

## लष्कराने हातात घेतली सत्तेची सूत्रे; विरोधकांकडून आंदोलकांचे आभार

## पंतप्रधानांच्या निवासस्थानी घुसले आंदोलक, प्रचंड तोडफोड

◆ **ढाका, ५ ऑगस्ट**

**बांगलादेशात गेल्या एक महिन्यापासून सुरू असलेल्या हिंसक आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान शेख हसीना यांनी सोमवारी पदाचा राजीनामा दिला असून देशही सोडला. १०९ लोकांचे बळी घेणारे हे आंदोलन आज सकाळी अधिकच हिंसक झाले. शेकडो आंदोलनकर्ते शेख हसीना यांच्या शासकीय निवासस्थानी घुसले आणि प्रचंड तोडफोड केली. बंगबंधू शेख मुजीब यांच्या पुतळ्यावरही हातोड्याने वार केले. या सर्व घडामोडींमध्ये लष्करप्रमुख जनरल वकार यांनी देशाच्या सत्तेची सूत्रे आपल्या हातात घेतली आहे.**



### क्षणातच दिला राजीनामा

इंटरनेट सेवा बंद करूनही मोठ्या संख्येत आंदोलक ढाक्याजवळ पोहोचले असल्याची माहिती मिळाल्यानंतर शेख हसीना यांनी तातडीने राजीनामा दिला आणि गुप्त पद्धतीने विमानतळ गाठून विशेष विमानाने देशही सोडला. त्यांच्यासोबत त्यांची लहान बहीण शेख रेहाना असल्याची माहिती एका खाजगी वृत्तवाहिनीने दिली आहे. ■



धोक्याची चाहूल लागताच पंतप्रधान शेख हसीना यांनी पळ काढला. वृत्त छायाचित्रकारांनी मात्र त्यांना आपल्या कॅमेरात कैद केलेच



शेख हसीना यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत असंख्य कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानाबाहेर प्रचंड धुडगूस घातला होता

पंतप्रधान हसीना यांनी ढाका सोडल्याच्या वृत्ताला पुष्टी मिळाली असली, तरी त्या नेमक्या कुठे गेल्या, याबाबतची माहिती अद्याप मिळाली नाही. अन्य एका सूत्रानुसार, त्या भारताकडे रवाना झाल्याची माहिती आहे. एजेएक्स १४३१ या क्रमांकाच्या विमानाने त्यांनी देश सोडला असल्याची माहिती आहे.

**भारतातून लंडनला जाणार**

अन्य एका माहितीनुसार, शेख हसीना भारताकडेच निघाल्या असून नवी दिल्लीतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्यानंतर त्या तिथूनच थेट लंडनला विमानाने रवाना होणार आहेत.

**इंटरनेट सेवा बंद**

तत्पूर्वी, आज सकाळी देशभरातील इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली होती. हजारो आंदोलकांनी ढाक्यापर्यंत 'लाँग मार्च' काढण्याची घोषणा केल्यानंतर हिंसाचाराचे लोण आणखी पसरू नये, यासाठी सरकारने हे पाऊल उचलले होते. या हिंसाचारात आतापर्यंत १०९ लोकांचा बळी आणि शेकडो लोक जखमी झाले आहेत.

हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी हजारो आंदोलक ढाक्याकडे निघाले होते. प्रचंड हिंसाचार घडणार, हे लक्षात घेऊन देशभरातील इंटरनेट सेवा बंद करण्याचा आदेश देण्यात आला होता.

**बंगाल-त्रिपुरा सीमा सील**

बांगलादेशातील हिंसक घडामोडींचे पडसाद भारतातही उमटण्याची शक्यता लक्षात घेऊन पश्चिम बंगाल आणि त्रिपुरा सीमा सील करण्यात आल्या असून तिथे मोठ्या संख्येत सुरक्षा जवान तैनात करण्यात आले आहेत. ◀(वृत्तसंस्था)

### गरुड कमांडोंची नजर



»» शेख हसीना विमानाने उत्तरप्रदेशातील हिंडन विमानतळावर दाखल झाल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी त्यांची भेट घेतली. त्यांच्यात सुमारे दीड तास चर्चा झाली. या भेटीत शेख हसीना यांनी बांगलादेशातील स्थितीची सविस्तर माहिती डोवाल यांना दिली. यानंतर परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी संपूर्ण स्थितीची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिली. हिंडन विमानतळावरील सेफ हाऊसमध्ये सध्या शेख हसीना यांचा मुक्काम असून, या परिसराच्या सभोवताल गरुड कमांडो तैनात करण्यात आले आहेत. ■

### एअर इंडिया, इंडिगोने रद्द केली विमाने



◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

बांगलादेशातील राजकीय अस्थिरता लक्षात घेऊन एअर इंडिया आणि इंडिगो या हवाई कंपन्यांनी ढाक्याला जाणाऱ्या आपल्या सर्व विमानसेवा रद्द करण्याचा निर्णय सोमवारी जाहीर केला. विस्तारा एअरलाईन्सने मात्र आज सकाळी ढाक्यापर्यंत सेवा दिली. आम्ही तेथील परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

एअर इंडियाकडून ढाक्यापर्यंत दररोज दोन विमानांची सेवा दिली जात होती. विस्तारा मुंबई येथून दररोज सेवा देते. इंडिगो देखील दिल्ली, मुंबई, चेन्नई आणि कोलकाता येथून ढाक्यापर्यंत सेवा देते. मात्र, या देशातील हिंसक स्थिती आणि राजकीय अस्थिरतेमुळे एअर इंडिया व इंडिगोने आपल्या सेवा तूर्तास रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

**भारत-बांगलादेशमधील व्यापार थांबविला**

**कोलकाता** : बांगलादेशातील हिंसक स्थिती आणि अस्थिर राजकीय घडामोडींच्या पृष्ठभूमीवर भारताने आज या देशासोबतचा व्यापार तात्पुरता थांबविला आहे. रविवारी शेख हसीना यांच्या सरकारने अत्यावश्यक सेवांसह भारतासोबतचा व्यापार तीन दिवसांसाठी थांबविण्याची घोषणा केली होती. त्यानंतर आज सोमवारी या देशात सत्तांतर झाले आणि हसीना यांना देशातून पळ काढावा लागला. सकाळी काही प्रमाणात सीमाव्यापार सुरू होता. त्यानंतर मात्र तो थांबविण्यात आला, अशी माहिती सूत्रांनी दिली. या देशातील स्थिती शांत झाल्यानंतर सीमावर्ती व्यापार पुन्हा सुरू करण्याबाबत विचार करण्यात येईल, असे सूत्रांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# उजनीतून भीमा नदीत सव्वा लाख, वीरमधून ३३ हजार क्युसेक विसर्ग

## नागरिकांनी सतर्कता बाळगावी; प्रांताधिकाऱ्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

उजनी धरण व वीर पाणलोट क्षेत्रात सतत सुरु असलेल्या पावसाने धरणे शंभर टक्के भरली आहेत. त्यामुळे धरणांमधून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. उजनी धरणातून सायं.५ वा. १ लाख २५ हजार क्युसेकचा तर वीरधरणातून ३३ हजार ६०९ क्युसेकचा विसर्ग सुरु आहे.

संगम येथून दुपारी ३. वाजेपर्यंत १ लाख ३७ हजार ८६० क्युसेक पाणी भीमा नदीत मिसळत असल्याने भीमा नदी पात्राच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. भीमा नदी पात्रातील वाढती पाणी पातळी लक्षात घेता नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे. मागील काही दिवसांपासून उजनी व वीर धरण



क्षेत्र परिसरात सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. नदी पात्रातील पाणी पातळीत वाढ झाल्याने दगडी पूल तसेच नदीवरील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर मुंढेवाडी, पूळूज हे ६ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. चंद्रभागा नदी पात्रात सध्या ५९ हजार २२२ क्युसेक पाणी वहात आहे. संगम येथून येणाऱ्या पाण्यामुळे चंद्रभागा नदी पात्रात रात्री ८ वाजल्यानंतर सुमारे १ लाख ३७ हजार क्युसेकने पाणी वाहणार आहे. भीमा नदीपात्रात १ लाख ३० हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (४४३.६०० पाणी पातळी मीटर) नदीकाठी असणाऱ्या व्यास नारायण झोपडपट्टीमध्ये पाणी शिरते. १ लाख ६० हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (४४४.५०० पाणी पातळी मीटर) गोपाळपूर येथील नवीन पुलावर पाणी येते. तर २ लाख क्युसेक विसर्ग आल्यावर (४४५.५०० पाणी पातळी मीटर) संतपेठ झोपडपट्टीतील सखल भागात पाणी येते तर २ लाख २५ हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (४४६.३०० पाणी पातळी मीटर) गोविंदपुरा येथे पाणी येते. ३ क्युसेक विसर्ग आल्यावर (४४७.८५० पाणी पातळी मीटर) कबीर मठ पायथा, जुनी नगरपालिका इमारत या ठिकाणी सुमारे १ ते १.५ फुट पाणी येते. ३ लाख २५ हजार क्युसेक विसर्ग आल्यावर (४४८.२०० पाणी पातळी मीटर) दत्तघाट, माहेश्वरी धर्मशाळा, महाव्दार घाट, कालिका मंदिर चौक या भागात सुमारे १ फुट पाणी येण्यास सुरुवात होते. असे भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस. के हरसुरे यांनी सांगितले.

### कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याखाली

भीमा नदीवरील पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर, मुंढेवाडी, पुळूज हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पाण्याखाली गेल्याने बंधाऱ्यावरुन होणारी वाहतूक बंद राहणार आहे. चंद्रभागा दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कता बाळगावी. नदीपात्रात कोणीही उतरु नये. स्थानिक ग्रापंचायतीचे ग्रामसेवक, तलाठी, मंडलाधिकारी, पोलीस पाटील पुरस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. नागरिकांनी काळजी घ्यावी. प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# मंत्रिमंडळाचा सल्ला नायब राज्यपालांना बंधनकारक नाही

**एमसीडी प्रकरणी आपला 'सर्वोच्च' झटका**

**नवी दिल्ली** : दिल्लीतील सत्तारूढ आम आदमी पार्टीला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी जोरदार झटका दिला. महापालिकेवर 'एल्डरमन' नियुक्त करण्याचा अधिकार कायद्याने नायब राज्यपालांना दिलेला आहे आणि यासाठी मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला मानणे त्यांना बंधनकारक नाही, असा महत्त्वाचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. जे. बी. पार्डीवाला यांच्या तीन सदस्यीय न्यायासनाने या प्रकरणी दाखल दिल्ली सरकारची याचिका फेटाळून लावली. मंत्रिमंडळाचा सल्ला न घेता नायब राज्यपालांनी महापालिकेवर १० एल्डरमनची नियुक्ती केली होती. याला आप सरकारने आव्हान दिले होते. दिल्ली सरकार आणि नायब राज्यपालांमध्ये आधीपासूनच तणावाचे संबंध असताना न्यायालयाने हा निकाल दिला. १९९३ मधील संशोधित दिल्ली मनपा कायद्याने महापालिका प्रशासनाबाबतची विशेष माहिती असलेल्या व्यक्तीला एल्डरमन या पदावर नियुक्त करण्याचा अधिकार नायब राज्यपालांना दिले आहेत.






## अग्रलेख...

# संस्कृतीचे सुरुंग

एकमेकांवर मनसोक्त चिखलफेक करून व्यक्तिगत अस्तित्वाची आव्हाने थेट राजकारणाच्या ऐरणीवर आणून जनतेच्या विवंचना, समस्यांना खुंटीवर टांगत निवडणुकांना सामोरे जाण्याची महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीस कधीच न शोभणारी नवी राजनीती संथपणाने राज्यात उदयास आली असून, गेल्या जेमतेम तीन वर्षांच्या अल्पावधीतच ती फोफावली आहे. या नीतीने राज्याच्या नैतिकतेच्या व सभ्यतेच्या संस्कृतीस केव्हाच गिळंकृत करून टाकले. सूडभावना आणि एकमेकांस संपविण्याची आसुरी इच्छा यामुळे राज्याचे राजकारण केवळ गढूळच नव्हे, तर गलिच्छपणाकडे वाटचाल करू लागल्याने, सत्तेच्या साठमारीत सामान्य जनतेचा कोणी वाली असेल किंवा नाही, हा प्रश्न यापुढे दिवसेंदिवस उग्र होत जाणार आहे. कोणे एकेकाळी महाराष्ट्राच्या राजकारणास सभ्यतेची आणि आदराची परंपरा होती, असे म्हटले जात असे. राजकीय क्षेत्रातील नेत्यांचे मतभेद कितीही टोकाचे असले, तरी वैयक्तिक व्यंग्य किंवा व्यक्तिमत्त्वाच्या उणिवांची चिरफाड या राज्याच्या राजकारणाने कधीच केली नव्हती. त्या दृष्टीने महाराष्ट्र हे राजनीतीचे एक राष्ट्रीय आदर्श केंद्र होते. यशवंतराव चव्हाणांपासून ही राजकीय सभ्यतेची नीती जन्माला आली आणि अगदी कालपरवापर्यंतच्या राजकारणाने संस्कृतीचा वारसा म्हणून ती जमेल तशी जपली. याआधी राज्याच्या राजकारणात काही व्यक्तिगत संघर्षाचे प्रसंग घडले नाहीत असे नाही. १९६४ मध्ये तेव्हाचे विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांच्या अंगावर जांबुवंतराव धोटे यांनी पेपरवेट फेकून मारला, तेव्हा त्यांची आमदारकी रद्द करून सभ्यतेच्या मर्यादा ओलांडण्याची शिक्षा त्यांना दिली गेली होती. त्यानंतर व्यक्तिगत स्वरूपातील शारीरिक हल्ल्यांची कृती किंवा उक्तीदेखील नोंदली गेलेली आढळत नाही. १९८० च्या दशकात राजकारणातील व्यक्तींच्या शुद्धीकरणाचा एक नवाच सोवळेपणा सुरू झाला होता, त्याची आजच्या तरुण पिढीला फारशी कल्पनादेखील नसेल. तेव्हा शिवसेनेत असलेल्या आणि आता महायुती सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री म्हणून सामील झालेले छगन भुजबळ यांनी मुंबईतील हुतात्मा चौकाचे शुद्धीकरण केले आणि तेव्हापासून सुरू झालेली शुद्धीकरणाची परंपरा अगदी कालपरवापर्यंत नारायण राणे यांनी शिवाजी पार्कवरील बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळास वंदन केल्यानंतर ठाकरे गटाने केलेल्या शुद्धीकरणापर्यंत येऊन पोहोचली. २००३ मध्ये शिवसेनेचे नेतृत्व उद्धव ठाकरे यांच्या पदरात अलगद चालून आल्यानंतर त्या संघटनेत जी धुसफूस सुरू झाली, तेव्हापासून राज्याच्या त्या संस्कृतीनेही नवे रूप धारण करण्यास सुरुवात केली असावी. वांद्रे येथील रंगशारदा हॉटेलमध्ये झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्या विरोधात व्यक्तिगत संघर्षाचे शड्डू ठोकले. त्यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आणि त्या संघर्षाला अधिक धार चढली. पण आता, अलिकडच्या काळात या संघर्षाचे हातपाय पसरले असून, उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीचा यामध्ये मोठा वाटा मानावा लागेल. कारण अलिकडच्या काळात जे काही संघर्ष पेटले आहेत, त्यापैकी जवळपास प्रत्येक संघर्षात उद्धव ठाकरे यांचे अस्तित्व उमटलेले दिसत आहे. म्हणजे, उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीतून हे संघर्ष सुरू होऊन फोफावले, असे मानण्यास वाव आहे. छगन भुजबळ, राज ठाकरे, गणेश नाईक, नारायण राणे आणि अगदी अलिकडे एकनाथ शिंदे व त्यांच्यासोबत शिवसेनेला सोडचिठ्ठी देणाऱ्या अनेक आमदार-खासदारांनी उद्धव ठाकरे यांच्याशीच थेट संघर्ष पुकारला. तेव्हापासून राजकारणाच्या संस्कृतीचे बीभत्स रूप राज्यात उफाळून येत राहिले. २०१९ मध्ये युतीला मिळालेला सत्तास्थापनेचा जनादेश नाकारून उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या तंबूत प्रवेश करून मुख्यमंत्रिपद मिळविले, तेव्हापासून या संघर्षाने बीभत्स टोक गाठण्यास सुरुवात केली, हे गेल्या पाच वर्षांच्या इतिहासाकडे नजर टाकल्यास सहज स्पष्ट होऊ शकते. या संघर्षात शिवसेनेतील राजकारण एका बाजूला ठाकरे यांच्या विरोधात एकवटत असताना, ठाकरे यांनी मात्र, भारतीय जनता पार्टी आणि व्यक्तिगतरीत्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर असभ्य टिप्पणी करत सभ्यतेच्या संकेतांना खुंटीवर टांगण्यास सुरुवात केल्याची अनेक उदाहरणे दिसतात. फडणवीस यांच्या देहयष्टीवरून केलेली असभ्य टिप्पणी, त्यांच्या नेतृत्वावर केलेली 'फडतूस' या असभ्य शब्दाची टीका येथपासून अगदी कालपरवा कुठल्याशा सभेत पायाशी टरबूज ठेवून केलेली अपरिपक्व संभावना, ढेकणाची उपमा देत मिळविलेल्या टाळ्या आणि अस्तित्वासच आव्हान देऊन केलेला अतिरेकी भावनांचा खेळ या सगळ्या बाबी महाराष्ट्राच्या त्या संस्कृतीस लाजेने तोंड लपविण्यास भाग पाडणाऱ्या ठरल्या आहेत.

एका बाजूला अशा असभ्य टीकेला आणि खोटेपणा पसरविण्याच्या एककल्ली कार्यक्रमातून सुरू झालेल्या प्रतिमाभंजनाच्या मोहिमेला संयमाने आणि संयतपणे सामोरे जात देवेंद्र फडणवीस हे राज्याच्या राजकारणाची सभ्यतेची परंपरा जपण्याचा प्रयत्न करत असताना, ज्या काही अन्य नेत्यांनी या परंपरेचा वारसा राज्यासमोर सातत्याने मांडला, ती जपण्याची आणि जोपासण्याची जबाबदारी खांद्यावर घेतली, ते नेते मात्र उद्धव ठाकरे यांच्या राजकारणातून या संस्कृतीला मिळणाऱ्या कलाटणीकडे मूकपणे पाहात आहेत, हे अधिक क्लेशदायक आणि आश्चर्यकारकही आहे. एकमेकांवर गलिच्छ आरोपांची राळ उठविणे, शिवराळ भाषेचा प्रच्छन्न वापर करणे, प्रतिस्पर्ध्याचे अस्तित्व संपविण्याच्या धमक्या किंवा इशारे देणे असे प्रकार सुरू असताना, गेल्या अनेक दशकांपासूनच्या महाराष्ट्राच्या सभ्य संस्कृतीचे साक्षीदार असलेले, स्वतःस जाणते म्हणवून घेणारे नेते मात्र गंमत पाहात मौन धारण करून बसतात, तेव्हा त्यांच्या राजकीय हेतूविषयी शंका निर्माण होणे अपरिहार्य ठरते. एका बाजूला सामाजिक संघर्ष उफाळला आहे. आरक्षणासारख्या संवेदनशील मुद्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक कटुता वाढीस लागली आहे. जाती-जातींमध्ये परस्परांविरोधातील संशयाची बीजे रुजण्याची भीती बळावत आहे. धार्मिक सलोख्याच्या वातावरणात ठिणगी पडेल असे प्रसंग अचानक कोठे डोकी वर काढत आहेत आणि अशा काळात राजकारणात मात्र चिखलफेक, चारित्र्यहनन, प्रतिमाभंजन आणि सभ्यतेचे संकेत खुंटीवर टांगून जनतेलाही त्यामध्ये सहभागी करून घेण्याचा गलिच्छ डाव खेळविला जात आहे. राज्यासमोरचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय पक्षांमध्ये, विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये सामंजस्य असणे आवश्यक असते. कारण तशी भूमिका जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी गरजेची असते. ते दूरच राहिले, उलट, जनतेलाच समोर बसवून त्यांच्या साक्षीने आपले व्यक्तिगत हेवेदाव्यांचे हिशेब चुकते करण्याकरिता सभ्यतेची पातळी सोडून जिभा सैल सोडण्याचे घातक खेळ राज्याच्या स्वास्थ्याला रसातळाला नेऊन ठेवू शकतात, याची जाणीव या नेत्यांना वेळीच व्हायला हवी. अन्यथा, कोणी कोणास चिरडण्याच्या भाषा कराव्यात, कोणी पायाखाली टरबुजे फोडावीत किंवा कोणी कोणाचे अस्तित्व संपविण्याची आव्हाने देत जनतेला या खेळाचे साक्षीदार बनविण्याचे डाव आखले, तर सुटकेच्या प्रतीक्षेत कधीपासून ताटकळत राहिलेल्या समस्यांच्या संयमाचा विस्फोट होऊन त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. उद्धव ठाकरे यांनी वा त्यांच्या गटाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमाभंजनाचा एककलमी कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले स्पष्ट दिसत आहे. राजकारणात असे घडू शकते. पंतप्रधान मोदी यांची लोकप्रियता आणि जनमानसातील प्रतिमा हेच त्यांचे बळ असून त्यांचे प्रतिमाहनन करणे हाच काँग्रेसचा कार्यक्रम राहील, असे काही वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या राहुल गांधी यांनी तो कार्यक्रम सातत्याने राबविला. आता काँग्रेसच्या सावलीत विसावलेल्या उद्धव ठाकरे यांनी त्याचा कित्ता गिरवत तसा कार्यक्रम देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी सुरू केला आहे. अशा वेळी जनतेने समंजसपणाने न्याय करायचा असतो. महाराष्ट्राची जनता तेवढी सुज्ञ निश्चितच आहे. ▮

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# इराण कूस बदलेल?

आज सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनी यांच्या हाती इराणची सर्व सूत्रे आहेत, अध्यक्षाच्या हाती नाहीत. खामेनी सर्वोच्चपदी आरूढ झाले तेव्हापासून इराणचे सुरू झालेले नष्टचर्य संपायचे नाव घेत नाही. २८ जून २०२४ रोजी इराणमध्ये राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत सहा उमेदवार रिंगणात होते. यावेळी मुळात निवडणुकीसाठी सुमारे ८० इच्छुक उमेदवार होते; पण पडताळणी करणाऱ्या गार्डियन काऊन्सिलने फक्त सहा उमेदवारांना निवडणूक लढण्यासाठी पात्र ठरवले होते. याचा अर्थ असा होतो की, कुणाही पात्र नागरिकाला उमेदवार होण्याचे स्वातंत्र्य इराणमध्ये नाही. तरीही मसूद फेझेश्कियन या सुधारणावादी नेत्याला उभे राहण्याची अनुमती मिळते आणि तो निवडूनही येतो, हे विशेषच म्हटले पाहिजे. या निवडणुकीत मतदारांनी प्रगती आणि मानवाधिकार यांना प्राधान्य दिलेले स्पष्टपणे जाणवते. या निवडणुकीच्या पहिल्या फेरीतच सुधारणावादी उमेदवार मसूद फेझेश्कियन आणि अतिपुराणमतवादी बसीद जलिली यांच्यातच थोडीफार चुरस दिसून येत होती. मसूद फेझेश्कियन यांना १०.४ मिलियन मते किंवा ४२.४ टक्के मते मिळाली, तर बसीद जलिली यांना ९.४ मिलियन मते किंवा ३८.६ टक्के मते मिळाली. इतर सर्व आणखी खाली राहिले होते. कुणालाच ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते न मिळाल्यामुळे मतदानाची दुसरी फेरी पहिल्या दोन उमेदवारांत घेण्यात आली. मतदानाच्या दुसऱ्या फेरीत मसूद फेझेश्कियन यांना माजी अध्यक्ष मोहम्मद खतामी आणि माजी मवाळ अध्यक्ष हसन रोहानी यांनी आपला पाठिंबा जाहीर केला. यामुळे सुधारणावादी मतदारांचा उत्साह वाढला आणि त्यांनी काहीशा हिरिरीने मतदान केले. पुराणमतवाद्यांजवळ साधनसामग्री भरपूर होती, पण तरीही जलिली यांना १२.८ मिलियन मतेच मिळाली तर मसूद फेझेश्कियन यांना १६.३ मिलियन मते मिळाली आणि ते विजयी झाले. एकूण मतदार संख्या ६१ मिलियन होती. फक्त ४० टक्के मतदारच मतदानात सहभागी झाले. जगभरात खुलेपणाचे वारे वाहत असताना, इराणमध्ये मात्र गेली काही वर्षे पुराणमतवादाचा पगडा वाढत चालला आहे. यामुळेही मतदारांचा निवडणुकीवरचा विश्वास फार मोठ्या प्रमाणात कमी झाला असावा, असे दिसते. इराणमध्ये खरी सत्ता सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनी यांच्याच हाती असते, म्हणून तर ही उदासीनता मतदारांमध्ये आली नसेल ना?

**अध्यक्षांचे मर्यादित अधिकार** : मसूद फेझेश्कियन हे इराणमधील सुधारणावादी आणि भ्रष्टाचाराचा आरोपही नसलेले नेते आहेत. त्यांनी हिजाब सक्तीचा विरोध केलेला नसला, तरी महिलांवर पोलिसांनी देखरेख (मॉरल पोलिसिंग) ठेवण्याचे बाबतीत आपला विरोध नोंदविला होता. सईद जलिली कट्टरपुराणमतवादी म्हणून कुख्यात आहेत. कुटुंबव्यवस्थेचे पावित्र्य अबाधित राहावे, ती आणखी सुदृढ व्हावी यासाठी महिलांवरील बंधने आणखी कडक केली पाहिजेत, या मताचा पुरस्कार निवडणूक प्रचार करताना जलिली हिरिरीने करीत होते. मतदान आजवरच्या तुलनेत कितीही कमी झाले असले, तरी इराणच्या जनतेने सुधारणावाद्यांना अनुकूल असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत, ही बाब लपून राहिलेली नाही. तसेच जनता हेही जाणून आहे की, मसूद फेझेश्कियन यांच्या हाती काही जादूची कांडी नाही की, जिचा वापर करून ते परिस्थितीत झटपट सुधारणा घडवून आणू शकतील. पण ते इराणच्या सध्या सुरू असलेल्या राजकीय, आर्थिक व सामाजिक घसरणीला काही प्रमाणात तरी आवर घालू शकतील, अशी जनतेची अपेक्षा आहे. अमेरिका आणि इस्रायलशी शत्रुत्व आणि हमास आणि हिजबुल्लाह या दहशतवादी चळवळींना पाठिंबा हे इराणचे परराष्ट्र धोरणाबाबतचे सूत्र राहिले आहे. आंतरराष्ट्रीय बंधनांमुळे इराणची सध्या अक्षरशः कोंडी झालेली आहे. महागाई गगनाला भिडली आहे. बेरोजगारीने कळस गाठला आहे. इराणच्या 'रिअल' या चलनाची पत डॉलरच्या तुलनेत पार रसातळाला पोहोचली आहे. इराणमधील महिला वर्ग हिजाबादी बंधनांच्या सक्तीमुळे दडपला गेला असून प्रस्थापितांविरुद्ध चिडून नुसता धुमसतो आहे. मध्येच त्याचा काही ना काही कारणांमुळे स्फोट होतो आणि दडपण्याचे सर्व मार्ग स्वीकारून प्रशासन आपली मगरमिठी आणखी बळकट करून आंदोलन चिरडून टाकते, असा प्रकार इराणमध्ये घडताना दिसतो आहे.

**सहृदयी हृदयचिकित्सक** : मसूद फेझेश्कियन हे व्यवसायाने हृदय शल्यचिकित्सक आहेत. त्यांचे सार्वजनिक चारित्र्य उत्तम असल्यामुळे त्यांचा जनमतावर प्रभाव आहे. त्यांना अमेरिकेबरोबर इराणने घेतलेली संघर्षाची भूमिका मान्य नाही. युरोप आणि अमेरिकेबरोबरचा संघर्ष इराणने थांबवावा आणि कोंडीतून बाहेर पडावे, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. इस्रायलशी सुरू असलेल्या वैराला आवर घालण्याबाबत मात्र मसूद फेझेश्कियन यांनी मतप्रदर्शन केलेले नाही. अमेरिकेबरोबरच्या न्यूक्लिअर कराराचे पुनरुज्जीवन करावे या मताचे मसूद फेझेश्कियन आहेत. म्हणजेच इराणने आपल्या अण्वस्त्र निर्मितीच्या भूमिकेवर पुनर्विचार करावा, हा मुद्दा ओघानेच पुढे येणार आहे. अमेरिकेच्या विरोधामुळे भारताने इराणकडून खनिज तेल घेणे थांबवले आहे. सध्या इराण खनिज तेलाची निर्यात प्रामुख्याने चीनला करतो आहे. इराण व अमेरिकेत सख्य निर्माण झाले तर ते भारताच्या फायद्याचेच ठरेल. पण अमेरिकेत ट्रम्प यांची अध्यक्षपदी निवड झाली तर सगळीच समीकरणे बदलतील. कारण ट्रम्प इराणशी दोस्ती करण्याची सुतराम शक्यता नाही. निवडणूक प्रचार करताना मसूद फेझेश्कियनही महिलांबाबतची भूमिका निर्भीडपणे मांडत असत. इराणमध्ये आंदोलनकारी महिलांना सरळ मार्गावर आणण्यासाठी पोलिसांना दिलेले अमाप अधिकार त्यांना सपशेल अमान्य आहेत. महसा अमिनीच्या अत्यंत निर्दयपणे झालेल्या हत्येनंतर तर ते पोलिसांचे दमनचक्र थांबलेच पाहिजे, या भूमिकेवर ठाम आहेत. महिलांना बरोबरीची भूमिका द्यावी त्यांना राष्ट्रोत्थानाच्या कार्यात सहभागी करून घ्यावे तसेच कुर्द आणि बलूच या वांशिक अल्पसंख्यकांनाही कोणताही भेदभाव न करता शासन-प्रशासनात सहभागी करून घ्यावे, ही त्यांची सर्वश्रुत भूमिका आहे.

इराणमध्ये अंतिम सत्ता सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हाती आहे. त्यामुळे आपली महिलांबाबतची भूमिका मसूद फेझेश्कियन पुढे रेटू शकण्यात किती यशस्वी होतील, हा प्रश्नच आहे. पण सर्वाधिकार नसले तरी ते इराणमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे नेते नक्कीच असणार आहेत. देशांतर्गत आणि परराष्ट्र व्यवहारासंबंधात ते बरेच सुधार घडवून आणू शकतील, अशी जगाचीही त्यांच्यापासून अपेक्षा आहे. पण आपल्यावर बरखास्तीची कुऱ्हाड कोसळणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतच त्यांना इराणमध्ये कारभार करावा लागणार आहे. या कसोटीला ते कितपत उतरतात ते भविष्यवेत्तेही आज सांगू शकणार नाहीत.

**कुणाला किती व कोणते अधिकार** : इराणमध्ये सर्वोच्च नेता आणि अध्यक्ष यांच्यातील अधिकारांची विभागणी ही अशी आहे. १) आर्थिक धोरण निश्चित करणे हा अधिकार अध्यक्षाकडे आहे तर पोलिस दलावर त्यांना अंतिम अधिकार नसतील. हे अधिकार सर्वोच्च नेत्याकडे असतील. २) सेनादल आणि सैन्य दलाच्या पायाभूत विचारसरणी शाखेवर म्हणजे इस्लामिक रेव्होल्युशनरी गार्डबाबत अध्यक्षांना कोणतेही अधिकार नसतील. याबाबत सर्वाधिकार सर्वोच्च नेत्याकडेच असतील. ३) सर्वोच्च नेत्याने आखून दिलेली धोरणे अंमलात आणण्याची जबाबदारी अध्यक्षांची असेल. थोडक्यात, अध्यक्षाची भूमिका सांगकाम्याची असेल तर कामसांग्याची भूमिका सर्वोच्च नेत्याची असेल. असा असतो इराणचा अध्यक्ष! ▮

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म!

आजच्या आधुनिक युगामध्ये पारंपरिक सुग्रास पक्वान्नाची जागा फास्ट फूडने घेतली आहे. या फास्ट फूडपायी लहान मुले अक्षरशः वेडी झाली आहेत. पिझ्झा, बर्गर, नूडल्स, मोमोझ, केक, पेस्ट्री यांसारखे पदार्थ मुलांची प्रथम पसंती असते. त्यामुळे एकेकाळी भाजी, पोळी, वरण, भात यासारख्या पारंपरिक पदार्थांनी अडगळीत आपले स्थान निर्माण केले आहे. नैसर्गिक पदार्थावर प्रक्रिया करून निर्माण होणारे पदार्थ शरीरासाठी अतिशय हानिकारक असतात. तरीही या फास्ट फूडचा मोह आवरता आवरता आवरला जात नाही. त्यामुळे मानवाचे शरीर अनेक दुर्लभ रोगांचे माहेरघर झाले आहे. हे पदार्थ चव आणि खाण्यासाठी सोयीचे असल्याने फास्ट फूड खाण्याचे प्रमाण दरदिवशी वाढत आहे. अशा या प्रक्रिया केलेल्या अन्नामध्ये साखर, चरबी, कॅलरीज व मिठाचे प्रमाण अतिशय जास्त असते. या उलट शरीरास लागणारे पोषक द्रव्ये त्यामध्ये कमी प्रमाणात असतात. असे हे प्रक्रिया केलेले पदार्थ शरीरासाठी घातक असून, शरीराच्या अनेक भागांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. फास्ट फूडमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट फार अधिक प्रमाणामध्ये वापरले जाते. त्यामुळे डोकेदुखीचा त्रास होण्याची शक्यता वाढते. फास्ट फूडमध्ये ट्रान्सफॅटचे प्रमाणही अधिक असते; जे शरीरासाठी नुकसानकारक असते. जास्त साखर, चरबी व अतिरिक्त मिठामुळे फास्ट फूड अधिक चवदार बनतात. या तीन पदार्थांमुळे हृदयावर त्याचा गंभीर परिणाम होऊन लोक आजारी पडतात. फास्ट फूडबाबत जगातील अनेक देशांमध्ये संशोधन झाले असून, त्याचा निष्कर्ष भयावह असा आहे. या जंक फूडमधील ट्रान्सफॅटमुळे रक्तामधील वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढून चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. त्यामुळे टाईप-२ या प्रकारातील मधुमेह हा आजार बळावण्याचा धोका अधिक संभवतो आणि हृदयविकाराचा धोकाही अधिक वाढतो. आपल्या आहारामध्ये मिठाचे प्रमाण वाढल्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रासही होण्याचा धोका अधिक संभवतो. जंक फूडमध्ये कॅलरीजचे प्रमाण अधिक असल्याने लठ्ठपणा होण्याचा धोकाही अधिक असतो. लठ्ठपणा वाढला की, अस्थमा आणि श्वसनासंबंधी इतर अनेक आजार होण्याचा धोका वाढतो. असे हे प्रक्रिया केलेले जंक फूड खाऊन काही काळासाठी भूक भागत असली, तरी त्याचे होणारे दुष्परिणाम आम्ही कधीच विचारात घेत नाही. ज्या व्यक्तींना फास्ट फूड खाण्याची सवय आहे, अशा व्यक्तींना नैराश्याने बाधित होण्याची शक्यता ५१ टक्के अधिक असते. तर, दुसरीकडे शरीरातील हार्मोन्सवर त्याचा गंभीर परिणाम होऊन प्रजनन क्षमतेवरही त्याचे विपरीत परिणाम होत असल्याचा निष्कर्ष अभ्यासकांनी वर्तविला आहे. फास्ट फूड खाऊन होणारा मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा यांसारख्या आजारांचे प्रमाण सामान्यामध्ये वाढताना दिसत असले, तरी हे आजार होण्याचे वयही मागील दोन दशकामध्ये वयाच्या २५ ते ३० वर्षे एवढे खाली आले आहे. फास्ट फूड तयार करताना ते अधिक काळ टिकावे व पदार्थ ताजे दिसावे यासाठी त्यामध्ये रसायनांची भरमार असते. मनुष्याला या सर्व बाबींची कल्पना असूनही त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करून त्याची दिनचर्या रासायनिक होत चालली आहे, ही दुर्दैवाची बाब आहे. 'उदर भरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' हा श्लोक आम्ही पूर्णपणे विसरलो अन् आयुष्याच्या राखरांगोळीकडे आमची वाटचाल सुरू झाली. आधुनिकतेच्या हव्यासापायी आमच्या अनमोल अशा आयुर्वेदालाही आम्ही अडगळीत टाकले. १०० वर्षं निरोगी जगण्याची कला शिकविणारे आणि आजारच होऊ नये यासाठी दिनचर्येपासून तर ऋतूनुसार खानपानाची शास्त्रोक्त पद्धती त्यामध्ये विशद केली आहे. मुळात आजाराने शरीरामध्ये घरच करू नये हे आयुर्वेद शिकवितो. परंतु हल्ली आधुनिकतेने आम्ही बरबटलो असल्याने आयुर्वेद आम्हास हीन वाटू लागले आहे. फास्ट फूडचे सर्वाधिक गंभीर परिणाम अमेरिकेमध्ये दिसू लागले आहेत. लठ्ठपणाच्या आजारापायी त्रस्त असलेल्या लोकांपायी तेथील शासनही हतबल झाले आहे. परंतु, आम्ही अजूनही सीमारेषा ओलांडली नाही. वेळीच सावध झालो तर हा धोका आम्ही परतवू शकतो. ▮



९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# बेरोजगारी : कारण, राजकारण आणि निराकरण!

यंदाच्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार आणि निवडणुकीचे परिणाम या दोन्हींवर देशांतर्गत बेरोजगारीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून आला. निवडणूक प्रचारकाळात देशातील घटत्या रोजगार संधी, मर्यादित संख्येतील उद्योग व परिणामी वाढती बेरोजगारांची संख्या या मुद्यांवर विरोधी पक्षांनी सत्तारूढ पक्षाला घेरले; त्याचवेळी सत्तारूढ भाजपाने रोजगारवाढीच्या संदर्भात केलेले प्रयत्न व त्याचे देशातील रोजगार-स्वयंरोजगाराच्या संदर्भात केलेले १० वर्षांतील प्रयत्न, त्याचे विविध स्तरांवर झालेले फायदे सातत्याने जनतेसमोर मांडले. निवडणूक प्रचार संपून रालोआचे सरकार पुन्हा व सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आले, तरी उभयपक्षी देशातील बेरोजगारीची आपापल्यापरीने चर्चा सुरूच आहे.

बेरोजगारी व बेरोजगारांच्या जिव्हाळ्याच्या मुद्याला यावेळच्या केंद्रीय अर्थसंकल्पात महत्त्वाचा व मध्यवर्ती मुद्दा बनविण्यात आला आणि यातच बेरोजगारीच्या मुद्याचे कायमस्वरूपी महत्त्व स्पष्ट होते. निवडणूकपूर्व व निवडणूक निकालानंतरही देशातील बेरोजगारी या सामाजिक-आर्थिक विषयाशी निगडित चर्चेला राजकीय स्वरूप मिळणे अपरिहार्य होते. याचे मोठे व महत्त्वाचे कारण म्हणजे, बेरोजगारांच्या वाढत्या संख्येप्रमाणेच देशातील मोठ्या प्रमाणावर असणारी युवकांची, म्हणजेच युवा मतदारांची मोठी व वाढती संख्या. त्यामुळेच निवडणूक संपली, तरी प्रचारातील बेरोजगारी या मुद्यांचे कवित्व मात्र अद्याप कायमच आहे.

सकृतदर्शनी पाहता बेरोजगारीची समस्या ही राजकारणाच्या पलीकडची आहे. उद्योग-व्यवसाय व त्याद्वारे रोजगारसंधी उपलब्ध करून देणे ही राज्य व केंद्र या उभय सरकारांची जबाबदारी ठरते. अगदी संवैधानिक स्वरूपात उद्योग हा विषय संयुक्त सूचीत म्हणजेच केंद्र व राज्य या उभय सरकारांच्या अखत्यारीत ठेवण्यात आला. प्रत्यक्षात मोठ्या संख्येने रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या मोठ्या उद्योगांना केंद्र सरकारतर्फे धोरणात्मक स्वरूपात सहकार्य केले जाते; प्रत्यक्षात या उद्योगांची स्थापना संबंधित उद्योगाच्या व्यावसायिक गरजा व उपलब्ध सुविधांनुरूप त्या त्या राज्यात उद्योग सुरू होतात. परिणामी, नोकरी-रोजगार वा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

त्यामुळे विशेषतः निवडणूक प्रचारकाळात तद्दन राजकीय दृष्टिकोनातून देशातील बेरोजगारीला केवळ केंद्रातील भाजपा सरकारलाच जबाबदार धरणे, हा राजकारण वा निवडणूक प्रचाराचा मुद्दा भलेही राहो; मात्र प्रत्यक्ष ते एक अर्धसत्य ठरते. याचेच प्रत्यंतर आले ते म्हणजे, निवडणूक प्रचार वा त्यानंतरच्या काळात नरेंद्र मोदी त्यांचे सहकारी व भाजपातर्फे देशातील उपलब्ध रोजगार व स्वयंरोजगाराच्या संदर्भात होणारी देशपातळीवर व सार्वत्रिक स्वरूपातील वाढ अधोरेखित करीत होते. त्याचवेळी विरोधी पक्ष सोयीस्करपणे संपूर्ण देशातील बेरोजगारीला केवळ भाजपा व केंद्र सरकारलाच जबाबदार ठरवत होते. अर्थात, त्यादरम्यान विरोधी पक्ष एक बाब राजकीयदृष्ट्या विसरले होते की, आजही देशात बऱ्याच राज्यांत गैरभाजपा वा विरोधी पक्षांचे शासन आहे. परिणामी आपापल्या राज्यात उद्योग-विकास व त्याद्वारा नोकरी व रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य सरकार म्हणून या राज्य सरकारांची आहे. याचेच विशेष प्रत्यंतर तेव्हा आले, जेव्हा राहुल गांधी यांनी गुजरातमध्ये एका ठिकाणी नोकरीच्या मुलाखतीसाठी मोठ्या संख्येने जमलेल्या उमेदवारांचा व्हिडीओ शेअर केला. त्यावरून सध्या सर्वाधिक बेरोजगारी भाजपाशासित राज्यांमध्ये असल्याचे जाहीर राजकीय विधान त्यांनी केले. राहुल गांधी यांनी बेरोजगारीला महामारी तर म्हटले; मात्र बेरोजगारीची ही कथित महामारी विरोधी पक्षशासित नव्हे, तर प्रामुख्याने भाजपाच्या सरकारांच्या राज्यातच अस्तित्वात आहे, अशी टीका केली. अशा प्रकारचे राजकीय आकलन व संभाषण निवडणूक प्रचारात चालत असले, तरी सत्यापासून ते कोसो दूरच म्हणावे लागेल. निवडणूक प्रचारादरम्यान राजकीय अभिनिवेशापोटी बेरोजगारीच्या संदर्भात गोरखपूर येथील एका युवकाच्या आत्महत्येच्या घटनेचा पुरेपूर उपयोग विरोधी पक्षांनी करून घेतला. गोरखपूर हा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा परंपरागत मतदारसंघ असून उत्तरप्रदेशात भाजपाची सत्ता आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय. या पृष्ठभूमीवर गोरखपूरच्या त्या युवकाने बेकारीमुळे आत्महत्या केली, असा मोठा राजकीय गाजावाजा करण्यात आला. प्रत्यक्षात या तरुणाने कौटुंबिक कारणे व नैराश्यापोटी आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. मात्र, तोपर्यंत लोकसभा निवडणूक होऊन गेली होती.

राहुल गांधी व त्यांच्या समर्थकांना देशातील बेरोजगारवाढीच्या संदर्भातील खोट्या आरोपांना व प्रचाराला यापूर्वी भाजपातर्फे आपल्या प्रचारयंत्रणेद्वारा उत्तर दिले जात होते. आता मात्र भाजपातर्फे प्रचलित व अद्ययावत तथ्य आणि आकडेवारीसह हे प्रत्युत्तर दिले जात आहे. यासंदर्भातील ताज्या आकडेवारीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नव्यानेच प्रकाशित केलेल्या अभ्यास व आकडेवारीनुसार, काँग्रेसच्या डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या तुलनेत गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने अधिक रोजगारसंधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

भारतातील बेरोजगार आणि बेरोजगारीच्या या प्रचारतंत्रात विदेशी प्रचारसंस्था मोठ्या हिरिरीने सामील झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे. निवडणूक काळात या संस्था अधिक सक्रिय झाल्या होत्या. प्रत्यक्षात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या रोजगारसंधींमध्ये ४.६७ कोटींची भर पडली आहे. रिझर्व्ह बँकेच्या याच अहवालानुसार, गेल्या वर्षीपर्यंत देशातील रोजगारांमुळे कामकरी-नोकरदारांची संख्या ६४ कोटी झाली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, त्यापूर्वी देशांतर्गत रोजगारांची नोंदणीकृत संख्या होती ६० कोटी. याचाच अर्थ, गेल्या एका वर्षात चार कोटींहून अधिक नोकरी-रोजगारसंधी देशांतर्गत तरुण व युवावर्गाला उपलब्ध झाल्या आहेत. नव्यानेच संसदेत सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात कौशल्य विकासाला मोठी गती देण्यात आली आहे. आधीच्या पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य विकास योजना, उद्योजकता विकास योजना, स्वयंरोजगारांसाठी मुद्रा वा तत्सम योजना यांच्याच जोडीला आता नव्या व व्यापक स्वरूपात इंटर्नशिप-उमेदवारी योजना, एक हजार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या विकासासह अद्ययावत बनविणे, नोकरी-रोजगार क्षेत्रात प्रथमच पदार्पण करणाऱ्या नव्या कर्मचाऱ्यांना केंद्रीय भविष्य निर्वाह निधी योजनेद्वारे १ हजार ५०० रुपयांच्या राशीचा लाभ इत्यादीमुळे कौशल्य विकासासह उमेदवारांना नोकरी-रोजगाराचा तर उद्योग-व्यवसायाला कौशल्यप्राप्त उमेदवार मिळण्याचा दुहेरी फायदा होत आहे. दरम्यान, बेरोजगारीसह नोकरी-रोजगाराच्या मुद्यांवर सरकार व सत्तारूढ पक्षाला घेरण्यासाठी विरोधी पक्ष टीका करताना काही असंबद्ध व प्रसंगी खोट्या गृहीतकांचा आधार घेत असतात. यामध्ये सोयीस्कर राजकारणाचा समावेश ठरवून व नियोजनबद्ध स्वरूपात केला जातो. निवडणूकपूर्व काळ, निवडणूक प्रचार व निकालच नव्हे, तर आता नव्या व्यावहारिक आणि रोजगार-स्वयंरोजगारप्रवण अर्थसंकल्पानंतर हाच राजकीय क्रम सुरू आहे. बेरोजगारीवर मुद्देहीन चर्चा व टीका करण्यामागे हेच निवडणूक प्रवण कारण व राजकारण आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### सत्य समोर यायला हवं!

आदरणीय राहुल सोनिया राजीव गांधीजी, सप्रेम नमस्कार विनंती विशेष!




आपण आम्हाला आमची जात विचारत आहात त्याबद्दल आमच्या मनात आपल्याविषयी कुठलाही राग नाही; उलट कुणीतरी मोठ्ठं माणूस आम्हाला आमची जात विचारतंय्, याचा आनंदच होत आहे! विनंती एकच आहे राहुलजी, आधी आपणही आपली ओळख आम्हाला सांगा ना? राहुलजी, आमच्या सनातन भारतीय परंपरेत आम्ही आधी स्वतःची ओळख करून देतो आणि मग समोरच्याची ओळख विचारतो! राहुलजी, आमच्या भारतीय सनातनी परंपरेत अपत्याची जात ही त्याच्या जन्मदात्या पित्याच्या जातीवरून ठरत असते! जी जात पित्याची, तीच जात अपत्याची! आपोआप! म्हणून, राजीव गांधी यांची जी जात असेल तीच जात राहुल गांधी यांचीही असली पाहिजे! राजीव गांधी यांचे पिताश्री फिरोज खान गांधी हे पारसी होते. त्यामुळे राजीव गांधीही पारसी आणि त्यामुळे राहुल गांधीही पारसीच आहेत/असले पाहिजेत! बरोबर ना राहुलजी? पण राहुलजी, तुम्ही हे सगळं जाहीरपणे का सांगत नाहीत? 'मी पारसी आहे' असं तुम्ही सांगितलं तर तुमच्याविषयी आमच्या मनात असलेला आदर आणखी वाढेल. कारण पारसी समुदायाविषयी सनातनी भारतीयांच्या मनात प्रचंड आदर आहे. मागे एकदा कोटावर जानवं धारण करायला लावून राहुल हे दत्तात्रेय गोत्री ब्राह्मण असल्याचे सांगितले गेले होते. मान्य, असू शकतात, पण मग तुम्ही किंवा तुमच्या पिताश्रींनी किंवा तुमचे आजोबा फिरोज गांधी यांनी 'पारसी' धर्माचा त्याग करून 'सनातन धर्म' आणि 'ब्राह्मण' जात कधी धारण केलीत ते सांगितले पाहिजे ना? 'गोत्रधारी ब्राह्मण' ही जात फक्त सनातन धर्मातच असू शकते! असं तर नाही की, आपण किंवा आपल्या पिताश्रींनी दुसऱ्?या कुठल्या धर्माची दीक्षा घेतली होती/घेतली आहे, जिथे 'जात' अस्तित्वातच नसते? तसं असेल तर आपण तसं स्पष्टपणे सांगायला हवं राहुलजी? आम्ही सनातनी भारतीय शेकडो वर्षांपासून अन्य धर्मावलंबीयांचा मोठ्या मनाने स्वीकार करत आलो आहोत. आपण भारताचे पंतप्रधान व्हायची स्वप्नं बघत आहात राहुलजी. जरूर व्हा, पण मग आपण हा संशय दूर केला पाहिजे राहुलजी? खरं म्हणजे सत्य काय आहे ते आतापर्यंत जनतेसमोर यायला हवं होतं ना राहुलजी? धन्यवाद!

**सोमनाथ देशमाने**/९४२१६३६२९१

●● ●●

### आला पावसाळा; बाहेरचे खाणे टाळा



आज बहुतांश तरुणाई रस्त्यावरील फरसाणच्या ठेल्यावरील गुपचूप, समोसा, कचोरी, शेवचिवडा खाऊन आपले पोट भरीत असतात. हे ठेले गावातील, शहरातील रस्त्याला लागून असलेल्या नाल्यांवर उभारलेले असतात. यामुळे ठेल्यावरील पदार्थ हे हायजेनिक आणि सुरक्षित नसतात. श्रावण मास सुरू झाल्याने जिकडे तिकडे माश्यांचे अस्तित्व नजरेस येत आहे. यामुळे कॉलरा, पटकी, विषमज्वरसारखे आजार जोर धरू शकतात. याबाबत अन्न प्रशासनसुद्धा जागरूक नसते. एखादी घटना घडल्यानंतरच आपल्याकडे कारवाई करण्याचा प्रघात पडलेला आहे. पावसाळ्यात शिळे अन्न पदार्थ खाऊ नये. यामुळे पोटाचे विकार जडू शकतात. पावसाळ्यात पिण्याचे पाणी गढूळ होत असल्याने ते गाळून व उकळून प्यावे, असे आरोग्य विभागाकडून सांगितले जाते. याचा गांभीर्यपूर्वक विचार व्हायला हवा. तशी कृती हातून घडावयास हवी. असे होत नसल्याने दवाखान्यातील पेशंटमध्ये वाढ होताना दिसून येते आहे. या पावसाळी वातावरणाचा परिणाम लहान मुलांवर, ज्येष्ठ नागरिकांवर लवकर होत असतो. त्यांची पाचनशक्ती ही पावसाळ्यात कमजोर झालेली असते. आजकाल जो तो नोकरी करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी धडपडतो आहे. यात स्त्रिया आघाडीवर दिसत आहेत. त्यांची आर्थिक बाजू भक्कम दिसून येते आहे. नोकरीतील स्त्री वर्गाचे प्रमाण हे वाढते आहे. परंतु त्यांना आता घर आणि मुलं एवढेच करून भागणारे नाही तर त्या आपले अधिकार गाजवू पाहात आहेत. याच कारणाने त्यांना स्वयंपाक करण्याची सवय राहिलेली नाही. ते झोमॅटोसारख्या ॲपचा वापर करून घरपोच वाटेल ते खाद्यपदार्थ मागवताहेत. याचा परिणाम स्वास्थ्यावर होतो आहे. या खाद्यपदार्थाने पोट तर भरते; परंतु ते आरोग्यविषयक समस्या निर्माण करत आहे. आज इंस्टंट फूडचा जमाना आहे. बर्गर, बटाटा पाव, समोसा, पाणीपुरी, मसाला दोसा, गोली वडापाव इ.सारखे मैदायुक्त आणि मसालेदार तेलयुक्त पदार्थ खाण्याने शरीर स्वास्थ्य बिघडते आहे. या पदार्थात कुठलेही जीवनसत्त्व आढळून येत नाही. यामुळे जीवनसत्त्वांची कमतरता जाणवते. यासाठी जीवनसत्त्वाचे इंजेक्शन घ्यावे लागते आहे. ही आजची जीवनशैली झाली आहे. ▮

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com



# रखडलेली कामे आता तात्काळ पूर्ण करा : खा. धैर्यशील मोहिते-पाटील

### टेंभू उपसा सिंचन योजनेच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

**सांगोला, दि. ५ ऑगस्ट-**

सिंचन भवन,पुणे येथे टेंभू उपसासिंचन योजनांच्या अनुषंगाने खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक व टेंभू उपसासिंचन योजनेचे अधिकारी यांच्या समवेत आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळी खा. धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी टेंभू विस्तारीत उपसा सिंचन योजनेचा आढावा घेऊन माण खटाव, सांगोला तालुक्यातील लाभक्षेत्राला लवकरात लवकर लाभ मिळावा, यासाठी रखडलेले कामे पूर्ण करण्याच्या तसेच कृष्णा नदीचे पुराचे पाणी तात्काळ उचलण्यात येऊन सांगोला तालुक्यातील माण नदीला पाणी सोडावे त्याचबरोबर ० ते ५० किमी पर्यंत सांगोला कालव्यात पाणी सोडण्याच्या सूचना केल्या. निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन काही इतर लोक दबावाचे राजकारण करतील त्याला बळी पडून मनमानी पद्धतीने पाणी सोडू नये तसेच पाणी बंद करून नये. शेतकऱ्यांचा विचार करून पाणी वाटपाचे वर्षिक नियोजन करावे अशी देखील मागणी केली.

या बैठकीस बाबुराव गायकवाड, प्रभाकर देशमुख, डॉ. बाबासाहेब देशमुख, अनिल देसाई, अभयसिंह जगताप, रणजितसिंह देशमुख, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, प्रा. पी. सी. झपके, डॉ. अनिकेत देशमुख, सुरेंद्र गुदगे, कविताताई म्हेत्रे, मनोज पोळ, सुभाष नरळे, महेश नलवडे,अरविंद पाटील, हरिभाऊ पाटील,नारायण पाटील,गजेंद्र कोळेकर, विशालदीप बाबर, दादा शिनगारे, मुख्य अभियंता गुणाले, कार्यकारी अभियंता राजन रेडीय्यार, रासनकर, हरगुडे व लाभक्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

# व्यापाऱ्यांचा मोहोळ बंद ठेवण्याचा निर्धार

### अनगरमधील अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याची मागणी

### बेमुदत धरणे आंदोलनाला सुरुवात





**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ५ ऑगस्ट-**

अनगर येथील मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय तात्काळ रद्द करावे या मागणीसाठी मोहोळ येथे सर्व पक्षाच्या वतीने बेमुदत नगरपरिषदेसमोर धरणे आंदोलन रविवारपासून सुरू करण्यात आले आहे. यातच मोहोळ येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये समर्थनार्थ बैठक झाली. मोहोळ शहर बंद ठेवून व्यापाऱ्यांनी निषेध व्यक्त केला. यापुढेही जोपर्यंत अप्पर तहसील कार्यालय रद्द होत नाही. तोपर्यत मोहोळ शहर बंदच ठेवणार असल्याचा निर्णय मोहोळ शहरातील व्यापाऱ्यांनी घेतल्याचे समजते.

आ. यशवंत माने व माजी आ. राजन पाटील यांच्या प्रयत्नाने अनगर येथे अप्पर तहसिल कार्यालय मंजूर करण्यात आले. या कार्यालयाला अनगरसह शेटफळ, पेनूर आणि नरखेड ही सर्कल जोडण्यात आले. त्यामुळे निषेधात शेटफळ, पेनूर, नरखेड या गावांनीही बंद ठेवून निषेध व्यक्त केला. यापूर्वीच मोहोळ बंद ठेवून निषेध केला होता. अनगरचे मंजूर झालेले अप्पर तहसिल कार्यालय तात्काळ रद्द करावे यासाठी सर्व पक्षीय शिष्टमंडळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटलेही व त्यांना वास्तव परिस्थिती निदर्शनाखाली आनून दिली. यावेळी त्यांनी तातडीने त्यावर तातपुरती स्थगिती, फेरसर्व्हेक्षणासाठी सादर असा शेरा मारल्याचे सांगत सोशल मिडीवर व्हायरल करून प्रसार माध्यमांनाही देण्यात आले. मात्र याबाबत कोणताही आदेश प्राप्त झाला नाही. त्यामुळे शिष्टमंडळाने धरणे आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील, मानाजी माने, शिवसेना (शिंदे)चे जिल्हा प्रमुख चरणराज चवरे, युवा नेते सोमेश क्षीरसागर, दादासाहेब पवार, सचिन सुरवसे, उबाठा सेनेचे दीपक गायकवाड, सीमा पाटील, महेश देशमुख, सत्यवान देशमुख, बाळासाहेब गायकवाड, विक्रम देशमुख, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. पवन गायकवाड, संजय क्षीरसागर, तालुकाध्यक्ष विनय पाटील, राजू रसाळ, भाजपाचे सुनिल चव्हाण, रमेश माने, सुशील क्षीरसागर, अविनाश पांढरे, महेश सोवनी सहभागी झाले आहेत.

#### आंदोलनात रोज एका गावाचा सहभाग

रोज एक गाव या धरणे आंदोलनात सहभाग घेईल व मोहोळ शहरातील व्यापाऱ्यांनीही हा निर्णय रद्द करण्यात येईपर्यंत दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, असेही सांगण्यात आले. अनगरच्या अप्पर तहसील कार्यालयामुळे सध्या मोहोळमधील वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. आता शासन काय निर्णय घेणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



# राज ठाकरे यांनी घेतले स्वामी समर्थांचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ ऑगस्ट**

श्री स्वामी समर्थांचे दर्शन म्हणजे माझ्यासारख्या स्वामी भक्तांसाठी अत्यंत आनंददायी बाब आहे. स्वामी दर्शनानंतर मंदिर समितीकडून विश्वस्त अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार होणं म्हणजे आपल्या आत्मसन्मनाचे गौरव असल्याचे मनोगत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास मनसेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांनी भेट दिली. दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी राज ठाकरे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी प्रथमेश इंगळे, माजी आ. बाळा नांदगावकर, मनसेचे नेते अविनाश अभ्यंकर, मनसे नेते दिलीप धोत्रे, सचिन मोरे, तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील, राम मातोळे, नागेश कुंभार, बाबू वागस्कर, प्रशांत गिड्डे, प्रशांत इंगळे, जैनुद्दीन शेख, श्रीकांत पाटील, देवेंद्र शिंदे, तम्मा आळवेकर, आदर्श अंकलगी, समर्थ नरगे, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, एपीआय बागव, पीएसआय खापरे, मंदार महाराज पुजारी, व्यंकटेश पुजारी, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, संजय पवार, खाजप्पा झंपले, ऋषिकेश लोणारी, सागर गोंडाळ, अविनाश क्षीरसागर, महेश मस्कले, जयप्रकाश तोळणुरे, विश्वास शिंदे उपस्थित होते.

# अटी व शर्तींवर जरांगे-पाटलांच्या शांतता रॅलीला पोलिसांची परवानगी

## संयोजन समितीतील १५ जणांना पोलिसांकडून कलम १६८ नुसार नोटीस

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि ५ ऑगस्ट**

मराठ्यांना आरक्षण मिळवून देण्याच्या लढ्यासाठी जरांगे पाटील हे ७ ऑगस्ट रोजी सोलापूरला येत असून शांतता रॅली काढणार आहेत. त्यांच्या रॅलीस शहर पोलिसांनी विविध अटी व शर्तीवर परवानगी दिली आहे. दरम्यान सोमवारी सायंकाळी पोलिस आयुक्त व पोलीस प्रशासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शांतता रॅलीच्या सभेच्या ठिकाणाची पाहणी करण्यात येऊन संयोजकांना सूचना देण्यात आल्या. तसेच संयोजन समितीतील १५ जणांना पोलीस उपायुक्त कार्यालयाकडूनकलम १६८ नुसार नोटीस बजावण्यात आलेली आहे.

शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉक्टर आंबेडकर चौक या प्रमुख मार्गावर शांतता रॅली काढण्यात येणार आहे. या शांतता रॅलीस शहर व जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मराठा समाजाची महिला लहान मुले पुरुष एकत्र सहभागी होणार आहेत. त्यामुळे या रॅली लाखोंचा जनसमुदाय असण्याची शक्यता संयोजकाकडून तसेचपोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. या रॅलीसाठी सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने पोलीस आयुक्तांकडे निवेदन देऊन परवानगी मागण्यात आली होती. शहर पोलिसांनी या रॅलीस विविध अटी व शर्ती टाकून संयोजकांना रॅलीला परवानगी दिली आहे.

यामध्ये रॅलीमध्ये कोणत्याही प्रकारच्या गोंधळ निर्माण होणार नाही चेंगराचेंगरी होणार नाही यासाठी जागोजागी स्वयंसेवक नेमावेत, रॅलीतील नागरिकांसाठी अत्यावश्यक वैद्यकीय सेवेची पूर्तता करावी, रॅलीतील मान्यवरांचे भाषण ऐकण्यासाठी स्पीकर ची व्यवस्था करावी, दिव्यांग -महिला- मुलं -ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, रॅलीत सर्व बाजूंनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, मान्यवरांच्या सुरक्षिततेसाठी सक्षम माहितगार स्वयंसेवकांची नेमणूक करावी, रॅलीतील मार्गांवर ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून पार्किंग मध्ये पीए सिस्टीम बसविण्यात यावी, रॅलीसाठी आचारसंहिता तयार करावी, रॅलीच्या ठिकाणी जनरेटरची सोय करावी, रॅलीतील सहभागी नागरिकांकडून कोणत्याही प्रकारची हुल्लडबाजी होणार नाही याची काळजी घ्यावी, रॅलीत सहभागी होणाऱ्या नागरिकांकडून कोणत्याही प्रकारची शस्त्र किंवा ज्वालाशील पदार्थ बाळगली जाणार नाही याबाबत काळजी घ्यावी, जात सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्यावी, रॅलीतील सहभागी वाहनांचे चालक हे मद्य प्राशन करणार नाही तसेच मान्यवरांच्या स्वागतासाठी हार घालण्यासाठी क्रेन अथवा जेसीबीचा वापर करू नये अशा अटी प्रशासनाकडून घालण्यात आलेल्या असून याबाबत संयोजन समितीला नोटीस देऊन अटी व शर्तीचा भंग झाल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिलेला आहे.

#### यांना बजावली नोटीस

संयोजन समितीतील अमोल शिंदे, माऊली पवार, रवी मोहिते, योगेश पवार, गणेश शिंदे, गणेश देशमुख, दास शेळके, महेश धाराशिवकर, श्रीकांत घाडगे, प्रताप चव्हाण, दिलीप कोल्हे, संजय घाडगे, तुकाराम मस्के, सुनील रसाळे, जयवंत थोरात यांना पोलीस उपयुक्त कार्यालयाकडून कलम १६८ नुसार नोटीस बजावण्यात आलेली आहे.



# नागनाथ मूकबधिर निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्नेहभोजन

### विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटलांच्या वाढदिनी वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीतआबा पाटील यांच्या ४१ व्या वाढदिवसानिमित्त कारखाना येथे रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, शालेय मुलांना खाऊ, गणवेश व शालेय साहित्य वाटप असे विविध समाजपयोगी कार्यक्रम राबवून साजरा करण्यात आला. श्री नागनाथ मुक बधीर निवासी विद्यालय, बाभुळगांव येथील विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले.

कार्यक्रम कारखान्याचे संचालक अंगद चिखलकर, प्रविण कोळेकर, सिध्देश्वर बंडगर उपस्थित होते. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. प्रास्ताविकात मुकबधीर शाळेचे शिक्षक राजेंद्र बाबर म्हणाले की, आपण मागील वर्षापासून अभिजीतआबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात येत आहे. याप्रसंगी कारखान्याचे संचालक अंगद उध्दव चिखलकर, अभिजीत पाटील, तेजस इंग्लिश मिडीयम बाभुळगांवचे संस्थापक महेश कथले, शिवप्रेमी दूध संकलन या संस्थेचे चेअरमन गणेश गांडुळे, कारखान्याचे सेल्स ऑफिसर महेश घाडगे, कार्यालयीन अधीक्षक आबासाहेब कथले, संगणक विभाग प्रमुख सुधीर गुंड, बागल, सुरक्षा अधिकारी माळी उपस्थित होते. अर्जुन नंदुरे यांनी आभार मानले.

## निधन वार्ता

### अनुसयाबाई अन्नलदास



**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

जुना विडी घरकुल, प्रगती चौक येथील रहिवासी श्रीमती अनुसयाबाई केशव अन्नलदास (वय ७५)यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने ५ ऑगस्ट रोजी निधन झालेले आहे. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार, ६ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजता त्यांच्या जुन्या विडी घरकुल येथील घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले व तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे. ते लायन्स क्लब सोलापूर सेंट्रलचे अध्यक्ष व पदमशाली ज्ञाती संस्थाचे संचालक चक्रधर अन्नलदास व जनदर्पण न्यूज चॅनेलचे उपसंपादक रमेश अन्नलदास यांचे मातोश्री होत.

### मच्छिंद्र शिंदे



**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

मच्छिंद्र लक्ष्मण शिंदे (वय ९०) रा.खेड यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रा. उमाकांत शिंदे, दुग्ध व्यवसायीक श्रीकांत शिंदे यांचे ते वडील तर पीएसआय संकेत शिंदे यांचे ते आजोबा होते.

### आप्पासाहेब काशीद



**वैराग, दि. ५ ऑगस्ट-**

दहिटणे (ता. बार्शी) येथील आप्पासाहेब निवृती काशीद (वय ९६) यांचे सोमवारी सकाळी वृद्धापकाळे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बार्शी पंचायत समितीचे माजी सभापती भाऊसाहेब काशीद व दहिटणेचे माजी सरपंच कृष्णात काशीद यांचे ते वडील होत.

# नवीन माने, दयानंद नवले उत्कृष्ट क्रिकेट पंच

### गेनबा सुरवसे गुणलेखक; जिल्हा क्रिकेट पंच संघटनेचे पुरस्कार वितरण




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट,**

सोलापूर जिल्हा क्रिकेट पंच संघटनेचा २०२३-२४ या वर्षीचा उत्कृष्ट पंच पुरस्कार नवीन माने यांना सलग दुसऱ्यांदा मिळाला. तसेच उत्कृष्ट उदयोन्मुख पंच म्हणून दयानंद नवले तर उत्कृष्ट गुणलेखक म्हणून गेनबा सूरवसे यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सोलापूर जिल्हा क्रिकेट पंच संघटनेच्या २०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा पुरस्कार महाराष्ट्र रणजी क्रिकेट संघाचे प्रशिक्षक सुलक्षण कुलकर्णी व सोलापूर जिल्हा क्रिकेट पंच संघटनेचे अध्यक्ष नंदकुमार टेळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच महाराष्ट्र रणजी क्रिकेट संघ निवड समितीमध्ये सलग दुसऱ्यांदा रोहित जाधव यांची निवड झाल्याबद्दल व संघटनेचे अध्यक्ष नंदकुमार टेळे यांची महाराष्ट्र क्रिकेट पंच संघटनेमध्ये कार्यकारणी सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा पंच संघटनेकडून सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा क्रिकेट पंच संघटनेचे उपाध्यक्ष मंजुनाथ बिराजदार, सचिव अतिक शेख , खजिनदार सुर्यकांत खंडेलवाल, ज्येष्ठ पंच सोहेल मुन्शी, चंद्रकांत मंजेली आदी उपस्थीत होते. सूत्रसंचालन योगेश कोंपल यांनी केले.

**नावात बदल**

माझे जुने नाव **परविन बाशा पटेल** असे होते. ते नाव बदलून **परविनबानू बाशा पटेल** असे झालेले आहे. वरील दोन्ही पण नावाची व्यक्ती एकच असून त्यांचा पत्ता : ६१ सहारा नगर, मजरेवाडी, सोलापूर

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **Kazi Abdulkhadir Shirajoddin** has been changed my new name **Kazi Abdul khadir Shirajoddin**
- Address -
Near datt nagar, govind nagar udgir tq-udgir dist-latur Pin-413517



# नेहरु नगर शासकीय क्रीडागणांवर जॉगिंग ट्रॅक करा

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

नेहरुनगर शासकीय क्रीडागणांवर जॉगिंग ट्रॅक करा आणि विजापूर रस्त्यावरील सुंदरम नगर येथील बंद पडलेला शासकीय जलतरण तलाव सुरू करावी, अशी मागणी नेहरूनगर शासकीय मैदानावरील न्यू जॉगर्स फाउंडेशनने खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, जॉगिग ट्रॅक खराब झाला असून तो नव्याने करणे आवश्यक आहे. तसेच जलतरण तलाव जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय आणि महापालिका यांच्या टोलवा टोलवीमुळे बंद आहे. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष सुहास साळुंके, उपाध्यक्ष हेमंत जाधव, कार्याध्यक्ष उन्मेष कमलापुरे, कोषाध्यक्ष दिलीप कदम, सहसचिव विजय झाकणे, माजी अध्यक्ष दिपक नलावडे, ॲड. सुनील सुतार, अविनाश म्हेत्रे, अंबादास यादव, शशी कोळेकर आदी उपस्थित होते.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी कि. अर्ज नं.२१/२०२४
नि.७

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क. स्तर यांचे कोर्टात**

**१) सुमन वसंतराव खराडे**
रा. खराडे गल्ली, मेन रोड, अक्कलकोट ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**२) संजय वसंतराव खराडे**
रा. मेन रोड, समर्थ चौक, अक्कलकोट ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**३) सुदर्शन वसंतराव खराडे**
रा. दिपक ज्योती नगर, लातूर तालुका जिल्हा लातूर
**४) संगीता राजेश कोरडे**
रा. आर. पी. कॉलेज, उस्मानाबाद जि. उस्मानाबाद
- **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** - **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दि. कि. अर्ज नं. २१ /२०२४ हा द. बॉम्बे रेग्युलेशन कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीताचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे पिता वसंतराव उर्फ वसंत तुळशीराम खराडे यांचे दि. १२/०८/२०१९ रोजी निधन झाले आहेत. अर्जदार हेच मयत वसंतराव उर्फ वसंत तुळशीराम खराडे यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे पश्चात अर्जदार यांचे नांवे वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी याबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. २१/०९/२०२४ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपली हरकत दाखल करावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**येणेप्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. ०५/०८/२०२४**

**सही/-**
**आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले.**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**सहा. अधिक्षक दिवाणी न्यायाधिश क. स्तर अक्कलकोट**

**दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर**
**शाखा : बार्शी**
**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार रुक्मिणी भिमराव अंधारे राहणार माणकेश्वर, ता. भूम या नावावर सेव्हींग खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नाव दाखल करणेबद्दल मयताचे वारसा पैकी त्यांचा अर्जदार बापूसाहेब भिमराव अंधारे- मुलगा यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नाव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसांचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमूद केलेल्या सेव्हींग खात्यास अर्जदार बापूसाहेब भिमराव अंधारे याचे नाव वारस हक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे.

पंढरपूर
तारीख : २९/०७/२०२४

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर

**महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)**
**ACDEMY OF MAHARASHTRA RESEARCH, UPLIFTMENT& TRINING (AMRUT)**
**महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, पाचवा मजला, औंध, पुणे ४११००७**
**www.mahaamrut.org.in Mail :- amrut.gom@gmail.com**
**Ph. +91-9730151450 Mo. 020-29999096**

**जाहीरात**

महाराष्ट्र राज्यातील ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कुठल्याही शासकीय विभाग, संस्था, महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील अर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लक्षीत गटातील युवक/युवती यांना महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), द्वारा प्रायोजित व COEP पुणे येथील BHU INTITUTE यांचे माध्यमातून अमृत संस्थेच्या उपरोल्लेखित लक्षित गटातील उमेदवारांना बिझनेस इनक्युबेशन सेंटर योजना सुरु करण्यात आलेली आहे.

योजनेच्या लाभार्थी निकषांबाबत सविस्तर माहिती अमृत, पुणे च्या https://www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर दिलेली आहे.

इच्छुक अर्जदारांनी दिनांक: २७ ऑगस्ट २०२४, सायंकाळी ५.०० पर्यंत खालील संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत.

अर्जाची हार्ड कॉपी कागदपत्रांसह अमृत कार्यालयास सादर करण्याचा अंतिम दिनांक: ३०.०८ २०२४.

या कार्यक्रमाविषयी भविष्यात सर्व माहिती / सूचना वरील लिंकवरच दिली जाईल. त्यासाठी इच्छुक उमेदवारांनी उपरोक्त संकेतस्थळावर सुचनाफलक पहावे.

**सही/-**
**(विजय जोशी)**
**व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, (अमृत), पुणे**



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोलापूर : मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दुखापत झाल्याने निशा दहिया पराभूत



**पॅरिस :** भारतीय कुस्तीपटू निशा दहिया उजव्या हाताला झालेल्या दुखापतीमुळे सुरुवातीची आघाडी कायम राखू शकली नाही आणि सोमवारी महिलांच्या ६८ किलो वजनी गटाच्या कुस्तीच्या उपांत्यपूर्व फेरीत उत्तर कोरियाच्या पाक सोल गमकडून तिला पराभव पत्करावा लागला. सोल गमने निशाचा १०-८ असा पराभव केला. आशियाई चॅम्पियनशिपची रौप्यपदक विजेती कुस्तीपटू निशाने पहिल्या काही सेकंदात उत्तर कोरियाच्या कुस्तीपटूविरुद्ध ४-० अशी आघाडी घेतली. यानंतर तिने सुरुवातीच्या तीन मिनिटांच्या कालावधीत बचावात्मक वृत्ती स्वीकारून उत्तर कोरियाच्या कुस्तीपटूला कोणतीही संधी दिली नाही. सोल गमने दुसऱ्या कालावधीची आक्रमक सुरुवात केली आणि एक गुण मिळवला पण निशाने तिची आघाडी ६-१ अशी केली. तिने आणखी दोन गुणांसह आपली आघाडी भक्कम केली पण यादरम्यान त्याच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. सामन्याला अजून एक मिनिट बाकी होता आणि निशा वेदनेने ओरडू लागली. उपचारानंतर तिने खेळ पुन्हा सुरू केला पण उत्तर कोरियाच्या कुस्तीपटूला रोखण्यात तिला यश आले नाही.

### बांगलादेशातील टी-२० महिला विश्वचषकाबाबत साशंकता

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचा (आयसीसी) अंतर्गत सुरक्षा संघ बांगलादेशमध्ये पसरत असलेल्या अराजकतेवर लक्ष ठेवून आहे. येथे ऑक्टोबरमध्ये महिला टी-२० विश्वचषक आयोजित केला जाणार आहे. आधीच ठरलेल्या वेळापत्रकानुसार, बांगलादेश ३ ते २० ऑक्टोबर दरम्यान महिला टी-२० विश्वचषकाचे आयोजन करणार आहे. बांगलादेशात पसरलेल्या हिंसाचारामुळे पंतप्रधान शेख हसीना यांना राजीनामा देऊन देश सोडून जावे लागले. ढाका येथे हसीना यांच्या सरकारच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने होत असताना लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-झामा यांनी सोमवारी सांगितले की, बांगलादेशमध्ये अंतरिम सरकार सत्तेवर येईल. बांगलादेशातील विश्वचषक स्पर्धा ढाका आणि सिल्हेत येथे होणार आहे. आयसीसीकडे अपरिहार्य परिस्थितींसाठी आकस्मिक योजना आहेत आणि या प्रकरणात श्रीलंका हा पर्याय असू शकतो. श्रीलंकेने २०१२ च्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाचे आयोजन सप्टेंबर ते ऑक्टोबर दरम्यान केले होते.

### ‘गोल्डन बॉय’ नीरज चोप्रा आज मैदानात उतरणार

**पॅरिस :** येत्या काही दिवसांत भारतासाठी आणखी काही पदके येऊ शकतात. यावेळी सुवर्णाची सर्वाधिक आशा भालाफेकपटू नीरज चोप्राकडून आहे. नीरज मंगळवारपासून कारवाईत येणार आहे. त्याला मंगळवारी पात्रता सामना



खेळायचा आहे. यानंतर, तो पात्र ठरल्यास, ८ ऑगस्ट रोजी अंतिम सामना खेळेल. भारतीय ॲथ्लेटिक्ससाठी अनेक विक्रम रचणाऱ्या नीरजला त्याच्या दुसऱ्या ऑलिम्पिकमध्ये भालाफेकीसह पुन्हा एकदा इतिहास घडवायचा आहे. १४० कोटी भारतीय त्याच्याकडून पुन्हा एकदा सुवर्णाची अपेक्षा करत आहेत. यासह, नीरजच्या अविश्वसनीय सातत्याची पुन्हा एकदा चाचणी होईल कारण तो संपूर्ण हंगामात स्नायूंच्या समस्येने त्रस्त आहे. चोप्राने सुवर्णपदक जिंकले तर ऑलिम्पिक इतिहासात जेतेपद राखणारा तो पाचवा खेळाडू ठरेल. यासह तो ऑलिम्पिक वैयक्तिक गटात दोन सुवर्णपदके जिंकणारा पहिला भारतीय ठरणार आहे. ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत आतापर्यंत एरिक लेमिंग (स्वीडन १९०८ आणि १९१२), जॉनी मायरा (फिनलंड १९२० आणि १९२४), चोप्राचा आदर्श जॅन झेलेंजी (चेक प्रजासत्ताक १९९२ आणि १९९६) आणि ॲड्रियास टी (नॉर्वे २००४ आणि २००८) ऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत विजेतेपद राखू शकले.

# मनिका बत्राच्या नेतृत्वात घडविला इतिहास

**भारत प्रथमच टेबल टेनिसच्या उपांत्यपूर्व फेरीत**

### रोमानियाचा ३-२ पराभव

**◆ पॅरिस, ५ ऑगस्ट**

स्टार खेळाडू मनिका बत्राच्या नेतृत्वाखाली भारताने सोमवारी येथे पॅरिस ऑलिम्पिकच्या महिला टेबल टेनिस सांघिक स्पर्धेत एका रोमांचक लढतीत अव्वल मानांकित रोमानियाचा ३-२ असा पराभव करून प्रथमच उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.


भारत २-० ने आघाडीवर होता पण रोमानियाने २-२ अशी बरोबरी साधली पण निर्णायक सामन्यात मनिकाने संघाला विजयाकडे नेले.

श्रीजा अकुला आणि अर्चना कामथ यांनी दुहेरीच्या सामन्यात एडिना डायकोनू आणि एलिझाबेथ समारा यांच्यावर ११-९, १२-१०, ११-७ असा विजय मिळवून स्पर्धेला सुरुवात केली.

मनिकाने प्रतिस्पर्धी बर्नाडिट झॉक्सचा ११-५, ११-७, ११-७ असा पराभव केल्याने भारताने चौथ्या मानांकित प्रतिस्पर्ध्याविरुद्ध २-० अशी



अर्चना कामथ



मनिका बत्रा

आघाडी घेतली. भारताला स्पर्धेत ११वे मानांकन मिळाले आहे.

दुसऱ्या एकेरीत पहिला गेम जिंकल्यानंतर श्रीजाने युरोपियन चॅम्पियन समाराकडून २-३ असा पराभव पत्करला.

श्रीजाच्या पराभवानंतर अर्चना आणि बर्नाडिट यांच्यात लढत झाली. बर्नाडिटने पहिला गेम ११-५ असा जिंकला पण दुसरा गेम ११-८ असा जिंकून भारतीय खेळाडूने बरोबरी साधली. बर्नाडिटने पुढील दोन गेम ११-७, ११-९ असा जिंकून सामना २-२ असा बरोबरीत सोडवला.

यानंतर मनिकाने एडिनाचा ३-० (११-५, ११-९, ११-९) असा पराभव करत भारताला अंतिम आठमध्ये स्थान मिळवून दिले. उपांत्यपूर्व फेरीत भारताचा सामना अमेरिका किंवा जर्मनीशी होईल. गेल्या आठवड्यात, मनिका आणि श्रीजा या दोघांनीही ऑलिम्पिकमधील वैयक्तिक स्पर्धेत १६ च्या फेरीत पोहोचणारे पहिले भारतीय खेळाडू बनून टेबल टेनिसमध्ये इतिहास रचला. मात्र, यानंतर दोन्ही खेळाडूंना प्रगती करता आली नाही आणि त्यांना चांगल्या मानांकित खेळाडूंकडून पराभव पत्करावा लागला. ◂(वृत्तसंस्था)

# ४४ वर्षांनंतर भारताला सुवर्ण पदकाची संधी

### आज उपांत्य फेरीत जर्मनीचे आव्हान मोडणार

**◆ पॅरिस, ५ ऑगस्ट**

ब्रिटनविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात १० खेळाडूंसह खेळूनही चांगली कामगिरी करणाऱ्या भारतीय हॉकी संघाचा मंगळवारी पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्य फेरीत जर्मनीशी सामना होणार आहे. या सामन्याकडे सर्व भारतीयांचे लक्ष लागले आहे.

टोकियो ऑलिम्पिकच्या कांस्यपदकासाठीच्या सामन्यात भारतीय संघाने जर्मनीचा पराभव केला होता. विश्वविजेत्या जर्मनीचे आव्हान संघासाठी सोपे नसले तरी तब्बल ४४ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याच्या मार्गावर असलेला भारतीय संघ हा अडथळा सहज पार करेल, असा विश्वास आहे.

हा सामना भारतीय संघासाठी खूप महत्त्वाचा आहे. भारतीय संघ टोकियोमध्ये सुवर्णपदकाच्या जवळ पोहोचला होता. परंतु यावेळी हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील संघ विजेता बनण्याचा प्रयत्न करेल. उपांत्य सामना जिंकल्यास भारताचे रौप्यपदक निश्चित आहे. भारताने शेवटचे पदक १९६० मध्ये रोममध्ये जिंकले होते. भारताने आठ ऑलिम्पिक सुवर्ण पदकांपैकी १९८० मध्ये मॉस्को येथे शेवटचे सुवर्णपदक जिंकले होते आणि आता पॅरिसमध्ये ४४ वर्षांनंतर इतिहास घडविण्याची संधी आहे.



**दोन्ही संघांचे बलाबल**

जागतिक क्रमवारी आणि एकमेकांविरुद्धचे रेकॉर्ड बघितले तर सध्याचा विश्वविजेता आणि चार वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता जर्मनी आणि भारत यांच्यात फारसा फरक नाही. जागतिक क्रमवारीत जर्मनी चौथ्या तर भारत पाचव्या स्थानावर आहे. उपांत्यपूर्व फेरीत अर्जेंटिनाचा पराभव करणाऱ्या जर्मनीने टोकियो ऑलिम्पिकच्या कांस्यपदकाच्या लढतीत भारताचा सामना केला. ज्यात भारताने ५-४ असा विजय मिळवला. यावर्षी जूनमध्ये एफआयएच प्रो लीगच्या लंडन लेगमध्ये भारताने जर्मनीचा ३-० ने पराभव केला, परंतु परतीच्या सामन्यात २-३ ने पराभूत झाला. भारताची जर्मनीविरुद्ध चांगली कामगिरी आहे आणि त्याने १८ पैकी आठ सामने जिंकले आहेत. या कालावधीत भारताने या संघाविरुद्ध ४१ गोल केले आहेत, तर जर्मनीला केवळ ३७ गोल करता आले आहेत. ◂(वृत्तसंस्था)


# लक्ष्य सेनचे कांस्य पदकाचे स्वप्न भंगले

**मलेशियाच्या ली जी जियाकडून पराभव**

**◆ पॅरिस, ५ ऑगस्ट**

भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनचे ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकण्याचे स्वप्न भंगले. मलेशियाच्या ली जी जियाविरुद्ध त्याला तीन गेममध्ये पराभव पत्करावा लागला.

लक्ष्य सेनने पहिला गेम जिंकून दुसऱ्या गेममध्ये आघाडी



सामना हरल्यानंतर निराश झालेला लक्ष्य सेन

घेतली होती तरी सोमवारी येथे पॅरिस ऑलिम्पिकच्या बॅडमिंटन पुरुष एकेरीच्या कांस्य पदक प्ले-ऑफ सामन्यात मलेशियाच्या ली जी जियाविरुद्ध तीन गेममध्ये पराभव पत्करावा लागला. या स्पर्धेत पदक जिंकणारा पहिला भारतीय खेळाडू होण्याचे स्वप्न भंगले.

उपांत्य फेरीप्रमाणेच कांस्यपदकाच्या प्ले-ऑफमध्येही जागतिक क्रमवारीत २२व्या स्थानी असलेल्या लक्ष्यला ७१ मिनिटे चाललेल्या लढतीत २१-१३, १६-२१, ११-२१ असे पराभूत व्हावे लागले.

या पराभवामुळे लक्ष्यने सायना नेहवाल (लंडन ऑलिम्पिक २०१२ मध्ये कांस्य) आणि पी. व्ही. सिंधू (रिओ ऑलिम्पिक २०१६ मध्ये रौप्य आणि २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य) यांच्यानंतर ऑलिम्पिक पदक जिंकणारा तिसरा भारतीय बॅडमिंटनपटू होण्याचा मानही गमावला.

राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या लक्ष्यचा लीविरुद्ध सहा सामन्यांतील हा दुसरा पराभव आहे.

ऑलिम्पिक उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला भारतीय पुरुष बॅडमिंटनपटू लक्ष्यला रविवारी शेवटच्या चार लढतीत रिओ ऑलिम्पिक कांस्यपदक आणि टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या एक्सेलसेनविरुद्ध २०-२२, १४-२१ असा पराभव स्वीकारावा लागला. ◂(वृत्तसंस्था)

# मनू भाकरचे स्वप्न होणार पूर्ण

### ऑलिम्पिक सांगता समारंभात ध्वजवाहक



**◆ पॅरिस, ५ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकच्या सांगता समारंभात स्टार महिला नेमबाज मनू भाकर भारताची ध्वजवाहक राहणार आहे. हा भव्य दिव्य सोहळा ११ ऑगस्ट रोजी होणार आहे. तिने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन कांस्यपदके जिंकून इतिहास घडवला आहे. मनूने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदक जिंकून या खेळांमध्ये देशाच्या पदकाचे खाते उघडले होते. यानंतर तिने सरबज्योत सिंगसह १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले.


भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) अधिकाऱ्याने सांगितले, ध्वजवाहक म्हणून मनूची निवड झाली आहे. तिने चमकदार कामगिरी केली आणि ती त्यास पात्र आहे. हरयाणाच्या २२ वर्षीय नेमबाज मनूने यापूर्वी भारताचा ध्वजवाहक होणे हा गौरव असल्याचे म्हटले होते. मनू व्यतिरिक्त, स्वप्निल कुसळेने पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशनमध्ये भारतासाठी कांस्यपदक जिंकले होते. आयओएने अद्याप पुरुष ध्वजवाहकांची घोषणा केलेली नाही, मात्र येत्या काही दिवसांत ही घोषणा होण्याची शक्यता आहे.

एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी मनू ही भारतातील पहिली ॲथ्लिट आहे. त्याच वेळी, मनू ऑलिम्पिकमधील भारतातील सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक आहे. मनू व्यतिरिक्त, आतापर्यंत एकाही ऑलिम्पिकमध्ये कोणत्याही भारतीय खेळाडूने दोन पदके जिंकलेली नाहीत. ◂(वृत्तसंस्था)

### इंग्लंडचा माजी फलंदाज ग्रॅहम थॉर्पचे निधन

**◆ लंडन, ५ ऑगस्ट**

इंग्लंड आणि सरेचा माजी फलंदाज ग्रॅहम थॉर्पचे गंभीर आजाराशी झुंज दिल्यानंतर निधन झाले. तो ५५ वर्षांचा होता. २०२२ पासून तो दुर्धर आजाराने ग्रस्त होता, असे इंग्लंड क्रिकेट बोर्डाने सोमवारी सांगितले. १९९३ ते २००५ दरम्यान इंग्लंडकडून १०० कसोटी सामने खेळलेल्या आणि १६ शतकांसह ४४.६६ च्या सरासरीने धावा काढणाऱ्या थॉर्पला २०२२ मध्ये अफगाणिस्तानचा मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आल्यानंतर लगेचच रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु त्यांच्या वैद्यकीय स्थितीचे तपशील जाहीर करण्यात आला नाही. ◂(वृत्तसंस्था)



# हॉकीपटू अमित रोहिदासवर एका सामन्याची बंदी

### उपांत्य फेरीच्या सामन्यातून बाहेर

**◆ पॅरिस, ५ ऑगस्ट**

आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) भारताच्या अमित रोहिदासवर एका सामन्याची बंदी घातली आहे. त्यामुळे तो मंगळवारी जर्मनीविरुद्ध होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात खेळू शकणार नाही. रविवारी ब्रिटनविरुद्ध झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात रोहिदासला रेड कार्ड दाखवण्यात आले. त्यामुळे तो दुसऱ्या क्वार्टरपासूनच मैदानात दिसला नाही. रविवारी भारतीय हॉकी संघाने ब्रिटनचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ ने पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली आहे.



सामन्याच्या १७व्या मिनिटाला रोहिदासची हॉकी स्टिक प्रतिस्पर्धी खेळाडूच्या डोक्याला लागली. परंतु रेफ्रींनी हे जाणूनबुजून केलेले कृत्य मानले आणि त्याला संपूर्ण सामन्यातून बाहेर काढले. त्यामुळे भारतीय संघ १० खेळाडूंसह सुमारे ४२ मिनिटे खेळला. मात्र, हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील संघाने हार न मानता पेनल्टी शूटआऊटमध्ये ब्रिटनचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. रविवारी भारत आणि ब्रिटन यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्यादरम्यान एफआयएच आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल अमित रोहिदासला एका सामन्यासाठी निलंबित करण्यात आले होते, असे एफआयएचने अधिकृत निवेदनात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

**निर्णयाला भारतीय हॉकी महासंघाचे आव्हान**

एफआयएचने रोहिदासवर एका सामन्याच्या बंदीची पुष्टी करणारे निवेदन जारी केले. महासंघाच्या निर्णयाला भारतीय हॉकी महासंघाने आव्हान दिले असले तरी सध्याच्या परिस्थितीत रोहिदासच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात खेळण्याबाबत साशंकता आहे. एफआयएच सोमवारी या अपिलावर सुनावणी करून उत्तर देऊ शकते.

# नोआ लायल्स १०० मीटर शर्यतीत अव्वल

### गॅटलिननंतर पहिला अमेरिकन ॲथ्लिट ● जमैकाच्या किशाने थॉम्पसनला रौप्य

**◆ पॅरिस, ५ ऑगस्ट**

अमेरिकन धावपटू नोआ लायल्सने पुरुषांची १०० मीटर शर्यत जिंकून सुवर्णपदकावर नाव कोरले. लायल्सने जमैकाच्या किशाने थॉम्पसनला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले. अमेरिकेच्याच फ्रेड केर्लीने कांस्यपदक जिंकले. टोकियो ऑलिम्पिक विजेता इटलीचा जेकब लोमंट मार्सेल पाचव्या स्थानावर राहिल्यामुळे त्याला आपले विजेतेपद कायम राखता आले नाही.

पुरुषांच्या १०० मीटरमध्ये सुवर्णपदक जिंकणारा जस्टिन गॅटलिननंतर लायल्स हा पहिला अमेरिकन ॲथ्लिट आहे. गॅटलिनने २००४ अथेन्स ऑलिम्पिकमध्ये स्प्रिंटमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. लायल्सने वैयक्तिक सर्वोत्तम वेळ ९.७८४ सेकंदांसह सुवर्णपदक जिंकले, तर दुसऱ्या क्रमांकावर



डावीकडून लेटसिल टेबोगो (बोत्स्वाना), नोआ लायल्स (अमेरिका) आणि ऑब्लिक सेव्हिल (जमैका) विजेतेपदासाठी कडवी झुंज देताना

असलेल्या थॉम्पसनने ९.७८९ सेकंद वेळ नोंदवत रौप्यपदक जिंकले. लायल्स आणि थॉम्पसन यांच्यात केवळ ०.५ सेकंदाचे अंतर होते. कांस्यपदक जिंकणाऱ्या केर्लीने ९.८१० सेकंदात शर्यत पूर्ण केली आणि तिसरे स्थान पटकावले.

धावपटूंना निकाल जाणून घेण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त वेळ थांबावे लागले कारण शर्यत पूर्ण करणारे पहिले सात खेळाडू मोठ्या स्क्रीनवर दाखवले गेले ज्यामुळे ते अगदी जवळचे दिसत होते. मात्र, लायल्सला विजयी घोषित करण्यात आले. रिओ आणि टोकियो ऑलिम्पिकमध्ये पदक हुकलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या अकाने सिम्बाइनला पॅरिसमधील स्पर्धेतही स्थान मिळवता आले नाही आणि चौथ्या स्थानावर राहिला.

लायल्सने गेल्या वर्षी जागतिक चॅम्पियनशिपमध्ये पुरुषांच्या १०० मीटर आणि २०० मीटर अजिंक्यपद स्पर्धा जिंकल्या. त्याने गतवर्षी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी सांगितले होते की, तो उसेन बोल्टचा २०० मीटरचा विश्वविक्रम मोडणार आहे. मात्र, सुवर्णपदक जिंकूनही तो बोल्टचा विक्रम मोडू शकला नाही. लायल्सने त्यावेळी १९.५२ सेकंदाची वेळ घेतली होती, तर बोल्टच्या नावावर १९.१९ सेकंदांचा विक्रम आहे. ◂(वृत्तसंस्था)

# माहेश्वरी-नारुकाचे कांस्यपदक एका गुणाने हुकले

### चीनकडून पराभव

**◆ पॅरिस, ५ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिक स्कीट मिश्र सांघिक स्पर्धेतील भारताचे नेमबाज माहेश्वरी चौहान आणि अनंतजित सिंग नारुका यांना सोमवारी येथे झालेल्या कांस्यपदकाच्या लढतीत चीनच्या यितिंग जियांग आणि लीऊ जियानलिन यांच्याकडून एका गुणाने पराभव पत्करावा लागला. ४८ लक्ष्यांच्या अंतिम सामन्यात भारतीय जोडीला ४४-४३ असा पराभव पत्करावा लागला. माहेश्वरीने २४ पैकी तीन तर नारुकाचे दोन लक्ष्य चुकले. चीनच्या यितिंगचे चार लक्ष्य चुकले, परंतु तिचा सहकारी पुरुष खेळाडू जियानलिनने त्याचे सर्व लक्ष्य अचूक मारून ते पूर्ण केले.

एकूण सहा फेऱ्यांचे सामने झाले. एका फेरीत एका संघाला आठ लक्ष्य साधावे लागले. मिश्र संघातील पुरुष आणि महिला नेमबाजांना प्रत्येकी चार शॉट्स घ्यावे लागले. चीनने अचूक आठसह सुरुवात केली. त्याचवेळी भारताच्या माहेश्वरीने चारही लक्ष्य गाठले. नारुका चारपैकी तीन शॉट लक्ष्यावर मारू शकला.

दुसऱ्या फेरीत चीनच्या जियांगचे चारपैकी तीन शॉट्स चुकले, पण लीऊने चारही शॉट लक्ष्यावर मारले. तर, भारताच्या बाजूने, माहेश्वरी आणि नारुका या दोघांनीही प्रत्येकी एक शॉट चुकवला.

तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या फेरीत चीनच्या मिश्र संघाने चमकदार खेळ केला. प्रत्येक फेरीत अचूक आठ गुण मिळवले. त्याचवेळी चौथ्या फेरीत भारताच्या माहेश्वरीचा एक शॉट चुकला आणि तो निर्णायक ठरला. भारतीय संघाने पाचव्या आणि सहाव्या फेरीतही अचूक आठ गुण केले. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बंगालच्या विभाजनाविरोधात तृणमूल, भाजपा 'साथ साथ'

## विधानसभेत एकमताने पारित केला ठराव


◆ **कोलकाता, ५ ऑगस्ट**

आतापर्यंत एकमेकांना पाण्यात पाहणारे सत्तारूढ तृणमूल काँग्रेस आणि प्रमुख विरोधी पक्ष भाजपा पश्चिम बंगालच्या विभाजनाविरोधात एकत्र आले. राज्याचे कुठल्याही स्थितीत विभाजन होऊ देणार नाही, असा एकमुखी ठराव सोमवारी विधानसभेत पारित करण्यात आला.

बंगालचे विभाजन करण्याच्या केंद्राच्या प्रस्तावाला भाजपाच हवा देत आहे, असा आरोप आतापर्यंत केला जात होता. मात्र, आज प्रत्यक्ष भाजपाने आपण विभाजनाच्या विरोधात आहोत, हे दाखवून दिले. बंगालचे विभाजन आम्ही कदापि होऊ देणार नाही. त्यापेक्षा राज्याच्या उत्तर भागाचा विकास व्हावा, असे आम्हाला वाटते आणि त्यासाठी राज्य सरकारला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची आमची तयारी आहे, असे भाजपाने स्पष्ट केले.

संघीय सहकार्यावर आमचा विश्वास आहे. राज्याचे विभाजन करण्याचा प्रयत्न आम्ही मान्य करणार नाही, असे यावरील प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सांगितले. विभाजनाविरोधातील एक ओळीचा प्रस्ताव विरोधी पक्षनेते शुवेंदू अधिकारी यांनी सादर केला होता. बंगालचे विभाजन होऊ नये. संयुक्त बंगालचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

शुवेंदू अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव ममता बॅनर्जी यांनी स्वीकारला आणि तो सभागृहात मतदानासाठी ठेवला. त्यावर चर्चा होऊन तो सर्वानुमते पारित करण्यात आला. बंगालचे विभाजन करून उत्तरेकडील भागाला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी मागील काही काळापासून सातत्याने होत आली आहे, हे विशेष. ◂(वृत्तसंस्था)



श्रावण सोमवारनिमित्त हजारो भाविकांनी वाराणसी येथील काशी विश्वनाथ मंदिरात महादेवाचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या

# दिल्लीतील कोचिंग सेंटर्स बनले 'डेथ चेंबर्स'

## केंद्रासह दिल्ली सरकारला सुप्रीम कोर्टाने बजावली नोटीस

◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

दिल्लीच्या जुन्या राजिंदर नगरमधील कोचिंग सेंटरच्या तळघरात पुरामुळे नागरी सेवा परीक्षांची तयारी करणाऱ्या तिघांच्या मृत्यूची सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी स्वतःहून दखल घेतली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्या. उज्ज्वल भुयान यांच्या न्यायासनाने केंद्र आणि दिल्ली सरकारला नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. दिल्लीतील कोचिंग सेंटर्स डेथ चेंबरर्स बनली आहेत, असे निरीक्षणही यावेळी न्यायासनाने नोंदविले.

न्यायालयाने नमूद केले की, दिल्लीतील कोचिंग सेंटर्स हे सुरक्षिततेच्या नियमांचे आणि जीवनासाठी मूलभूत मानकांचे पूर्णपणे पालन करत नाहीत तोपर्यंत ते ऑनलाईन काम शकतात. या संस्था देशाच्या विविध भागांतून आलेल्या इच्छुकांचा जीव धोक्यात घालत आहेत. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने



केंद्रासह दिल्ली सरकार आणि दिल्ली महानगरपालिकेला सध्या अस्तित्वात असलेल्या सुरक्षेच्या नियमांचे तपशीलवार उत्तरे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायासनाने कोचिंग सेंटर्समधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबद्दल आणि आरोग्याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

दिल्लीच्या जुन्या राजिंदर नगरच्या कोचिंग सेंटरच्या तळघरात पुराचे पाणी घुसल्याने उत्तरप्रदेशातील श्रेया यादव, बिहारमधील तान्या सोनी आणि केरळमधील नेविन डेल्विन यांचा बुडून मृत्यू झाला होता. या दुर्घटनेच्या पृष्ठभूमीवर विविध कोचिंग संस्थांमधील विद्यार्थ्यांनी वाढीव सुरक्षा उपायांची मागणी करत निदर्शने सुरू आहेत. दरम्यान, तीस हजारी न्यायालयाने जुन्या राजेंद्र नगर येथील तळघराच्या सहमालकांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# विजेच्या धक्क्याने नऊ शिवभक्तांचा मृत्यू

◆ **हाजिपूर, ५ ऑगस्ट**

कावड यात्रेसाठी निघालेल्या वाहनाचा उच्च दाबाच्या विद्युत तारेला स्पर्श झाल्याने नऊ कावडधारींचा (शिवभक्त) जागीचा मृत्यू झाला. यात दोन जण गंभीररीत्या भाजल्या गेले. बिहारच्या वैशाली नगर जिल्ह्यात रविवारी रात्री उशिरा ही घटना घडली.

हे शिवभक्त गंगा नदीचे पाणी कावडमध्ये घेऊन सोनेपूर येथील बाबा हरिहरनाथ मंदिरात जलाभिषेक करण्यासाठी जात होते. सुल्तानपूर गावाजवळून जात असताना, त्यांचे वाहन उच्च दाबाच्या विजेच्या ताराच्या संपर्कात आले, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली.

या प्रकरणाचा तपास सुरू असून या घटनेसाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. या दुर्घटनेत गंभीररीत्या जखमी झालेल्या दोन शिवभक्तांवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# यूपीएससीविरोधात पूजा खेडकर हायकोर्टात

**नवी दिल्ली :** भारतीय लोकसेवा आयोगाकडून कारवाई करण्यात आलेल्या पूजा खेडकरने यूपीएससीच्या निर्णयाविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दरम्यान, यूपीएससीने पूजा खेडकरची उमेदवारी रद्द केली होती. तसेच त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. यूपीएससीच्या याच निर्णयाविरोधात पूजा खेडकर यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यूपीएससीने पूजा खेडकरला दोषी ठरवले असून पूजा मनोरमा दिलीप खेडकरची उमेदवारी रद्द केली. तसेच, यूपीएससीने भविष्यातील सर्व परीक्षा/निवडींमधून पूजा खेडकरला कायमचे काढून टाकले. पूजा खेडकरला ३० जुलैपर्यंत उत्तर देण्यासाठी वेळ देण्यात आला होता. ■

# तुम्ही आपल्या नावासमोर पत्नीचे नाव लावा

## जया बच्चन यांची मनोहरलाल यांना सूचना

◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

आपल्या नावासमोर अमिताभ बच्चन यांचे नाव लावण्यावरून राज्यसभेत आज पुन्हा एकदा सपाच्या खासदार जया बच्चन भडकल्या. शाब्दिक वादावादीत त्यांनी केंद्रीय मंत्री मनोहरलाल यांना आपल्या नावासमोर पत्नीचे नाव लावण्याचा अफलातून सल्ला देऊन टाकला.

आज प्रश्नोत्तराच्या तासात या मुद्यावरून वादंग माजले. अध्यक्ष जगदीप धनकड यांनी जया अमिताभ बच्चन असे नाव पुकारताच जया बच्चन यांनी त्यावर आक्षेप घेतला. निवडणुकीत विजयाचे प्रमाणपत्र ज्या नावाने असते, त्याच नावाने तुम्हाला संसदेत पुकारले जाते, असे धनकड म्हणाले. तुम्हाला या प्रमाणपत्रातील नाव मान्य नसेल तर, तुम्ही आपल्या नावात बदल करून घेऊ शकता, असे धनकड म्हणाले. मात्र, या नावबदलाचा फायदा एकदा जया बच्चन यांनी उचलला आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले आणि जया बच्चन यांना पुरवणी प्रश्न विचारण्याची अनुमती दिली. शहरी आवास मंत्री मनोहरलाल खट्टर यांना प्रश्न विचारताना जया बच्चन यांनी त्यांना आपल्या नावासमोर पत्नीचे नाव लावण्याची सूचना केली. बच्चन यांनी या मुद्यावर त्यांना वारंवार टोकले. यावर मी स्वत:ही माझा परिचय एकदा डॉ. सुदेश पती असा करून दिला होता, याकडे धनकड यांनी लक्ष वेधले.

माझ्या नावासमोर पत्नीचे नाव लावण्याची सूचना जया बच्चन यांनी केली आहे, पण मला असे करायची इच्छा झाली. त्यासाठी पुढचा जन्म घ्यावा लागेल, असे मनोहरलाल म्हणाले. यावर चुटकी घेताना धनकड म्हणाले की, या ठिकाणी आश्वासन समिती आहे. तुम्ही सभागृहात पुढल्या जन्मात पत्नीचे नाव लावण्याचे आश्वासन दिले आहे. अर्थात तुम्ही पुढच्या जन्मातही संसदेत येण्याची हमी दिली. यावर जया बच्चन यांनाही हसू आवरले नाही. मनोहरलाल हे अविवाहित आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

# कागदपत्र आणा, न्यायालयातून पैसे घेऊन जा

◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

सहारा समूहाच्या ज्या गुंतवणूकदारांजवळ सर्व कागदपत्र आहेत, त्यांना पैसे देण्यात कोणतीही अडचण नाही. त्यांनी गुंतवणुकीची कागदपत्र घेऊन यावे आणि पैसे घेऊन जावे, असा निर्वाळा अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी आज दिला.

लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात सीतारामन् म्हणाल्या की, सरकार हात जोडून उभे आहे, तुम्ही सगळी कागदपत्र घेऊन या आणि पैसे घेऊन जा. पण कोणी येतच नाही. सरकार पैसे द्यायला तयार नाही, असे बाहेर जाऊन कृपा करून सांगू नका; कारण या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालय देखरेख ठेऊन आहे, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला.

सहारा समूहात किती लोकांनी पैसे गुंतवले होते आणि किती लोकांचे किती पैसे परत केले, या माकपचे अमरा राम यांच्या प्रश्नावर अर्थराज्यमंत्री



## सहाराच्या गुंतवणूकदारांना सीतारामन् यांचा दिलासा

पंकज चौधरी म्हणाले की, १७ हजार लोकांनी पैसे परत मागितले आहेत आणि १३८ कोटी रुपये आतापर्यंत परत करण्यात आले आहेत. गुंतवणूकदारांनी न्यायालयात जाऊन पैसे परत मागण्यासाठी अर्ज करावा, असे आवाहनही वारंवार सरकारतर्फे करण्यात आले.

सहाराच्या गुंतवणूकदारांना न्यायालयाच्या माध्यमातूनच पैसे परत मिळणार आहेत. कारण, संपूर्ण प्रकरणावर न्यायालयाची देखरेख आहे. त्यामुळे सरकारवर आरोप-प्रत्यारोप करून काही होणार नाही. सरकार आपल्या स्तरावर कोणताही निर्णय घेऊ शकत नाही, त्यामुळे कृपा करून सरकार पैसे द्यायला तयार नाही, असे संभ्रमाचे वातावरण जनतेत निर्माण करू नका. आम्ही तर पैसे द्यायला कधीपासून तयार आहे. तुम्ही लोकांना घेऊन या आणि पैसे घेऊन जा, असे आवाहनही सीतारामन् यांनी केले. ◂(तभा वृत्तसेवा)


## चित्रपट वार्ता

### 'नवरा माझा नवसाचा २'चे पोस्टर लाँच



**मुंबई :** १९ वर्षांपूर्वी सुपरहिट ठरलेल्या 'नवरा माझा नवसाचा' या चित्रपटाचा सिक्वल येणार आहे. 'नवरा माझा नवसाचा २' या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांमध्ये याविषयी प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर समाज माध्यमांवर लाँच करण्यात आले आहे. चित्रपटाची कथा, पटकथा आणि दिग्दर्शन सचिन पिळगावकरांचे असून यात सचिनसह सुप्रिया, अशोक सराफ, स्वप्निल जोशी, वैभव मांगले, निर्मिती सावंत आणि सिद्धार्थ जाधव अशी तगडी स्टारकास्ट असणार आहे. येत्या २० सप्टेंबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. ■

### समर्थ रामदासांचे चरित्र प्रथमच मोठ्या पडद्यावर



**मुंबई :** आतापर्यंत अनेक संतांच्या आणि थोर व्यक्तींच्या जीवनावर चित्रपट तयार झाले आहेत. मात्र, प्रथमच समर्थ रामदास स्वामींवर चित्रपट तयार होतो आहे. 'रघुवीर' असे या चित्रपटाचे नाव असून याचे दिग्दर्शन नीलेश कुंजीर करीत आहेत. समर्थांच्या भूमिकेत अभिनेता विक्रम गायकवाड दिसणार आहे. चित्रपटाची पटकथा नीलेश कुंजीर आणि अभिराम भडकमकर यांनी लिहिली असून, यात विक्रमसोबत ऋतुजा देशमुख, नवीन प्रभाकर, शैलेश दातार, राहुल मेहेंदळे आदी कलाकार दिसतील. २३ ऑगस्ट रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. ■

### जेनेलियाला मुलगी मानायचे विलासराव

**मुंबई :** जेनेलिया देशमुख हिने आपल्या अभिनयाने चाहत्यांच्या मनावर छाप सोडली आहे. सोबतच एक उत्तम बायको, आदर्श सून आणि उत्तम आई म्हणूनही तिच्याविषयी चर्चा होते. नुकतेच रितेशने जेनेलिया आणि विलासरावांच्या पहिल्या भेटीविषयी सांगितले. तो म्हणाला की, पहिल्यांदा तिला मी घरी बाबांच्या भेटीसाठी आणले तेव्हा ते लॉनवर एक बैठक घेत होते. जेनेलिया आली, तिने त्यांच्याकडे पाहिले आणि म्हणाली, हाय पप्पा...! आणि असे बोलून आता निघून आली. तिचा हा मोकळेपणाच बाबांना खूप आवडायचा. त्यांचा जेनेलियावर खूप जीव होता. ते तिला मुलगी मानायचे. तिचा हाच स्वभाव त्यांना आवडायचा. आमच्या लग्नानंतर काही महिन्यातच बाबांचे निधन झाले. मात्र, त्यांनी शेवटपर्यंत सर्वांवर प्रेमच केले. ■



### ऐश्वर्याची नणंद सलमानची जबरी फॅन

**मुंबई :** ऐश्वर्या राय बच्चन हिची नणंद श्वेता नंदा सलमान खानची जबरदस्त फॅन असल्याचे नुकतेच उघड झाले. एका मुलाखतीत खुद्द श्वेताने ही माहिती दिली. ती म्हणाली की, मी सलमानचा 'मैंने प्यार किया' कितीतरी वेळा पाहिला. त्याच्यावर इतका जीव जडला होता ती त्याची 'फ्रेण्ड' लिहिलेली टोपी घालूनच झोपत असे. विशेष म्हणजे, सलमान आणि ऐश्वर्या दोन वर्षे नात्यात होते. अतिशय वाईट पद्धतीने त्यांचे नाते संपुष्टात आले. नंतर ऐश्वर्याच्या जीवनात अभिषेक आला आणि त्यांचे लग्न झाले. सध्या ऐश्वर्या आणि श्वेता यांच्यातही बिनसल्याची चर्चा आहे. ■

# शेजारी पेटले; आरक्षणविरोधी हिंसाचाराचा कडेलोट

◆ **ढाका, ५ ऑगस्ट**

बांगलादेश आरक्षणाच्या मुद्यावरून मोठ्या प्रमाणात हिंसाचार उफाळून आला आहे. या आंदोलनाला हिंसक वळण लागले असून, यात आतापर्यंत ३०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे. यानंतर बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान यांनी याला दुजोरा दिला. त्यांनी लष्कर अंतरिम सरकार स्थापन करणार असल्याचेही जाहीर केले.

प्राप्त माहितीनुसार, शेख हसीना भारताच्या आश्रयाला आल्या असून, येथून त्या लंडनला बहिणीसह रवाना होणार आहेत. बांगलादेशात आरक्षणाच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनाचे रूपांतर हिंसाचारात झाले. यानंतर तेथे अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली. मात्र, येथील परिस्थिती नियंत्रणात आलेली नाही. सुमारे चार लाख लोक रस्त्यावर उतरले. राजधानीत ठिकठिकाणी हिंसाचार आणि तोडफोडीच्या घटना घडल्या. आंदोलनकर्त्यांनी थेट पंतप्रधान निवासस्थानाला घेराव घालत जाळपोळ सुरू केली. हिंसक आंदोलनकर्त्यांना संबोधित करण्याच्या तयारीत असतानाच शेख हसीना यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ताबडतोब आपले निवासस्थान सोडावे लागले. ◂(वृत्तसंस्था)



लाखो आंदोलकांनी ढाका शहरात प्रवेश केला. शेख हसीना यांच्या विरोधात त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली

## देशाच्या निर्मात्याचाच पुतळा तोडला

आरक्षणाच्या मुद्यावरून बांगलादेश पेटला असून, तेथील परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. आंदोलकांनी असंतोषाच्या भरात देशाच्या निर्मितमध्ये मोलाची भूमिका बजावणारे शेख हसीनांचे वडील वंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांच्या पुतळ्याची मोडतोड केली. याबाबतचा एक व्हिडीओ व्हायरल झाला असून, त्यात काही आंदोलक बांगलादेशचे राष्ट्रपिता म्हटल्या जाणाऱ्या वंगबंधूंच्या पुतळ्यावर चढून हातोड्याने प्रहार करताना दिसत आहेत.


## इतिहासाची पुनरावृत्ती होणार?

सत्तेतून पायउतार झाल्यानंतर शेख हसीना भारतात येणार, अशी चर्चा सुरू होताच त्यांच्याविषयीच्या ऐतिहासिक आठवणींना उजाळा मिळाला. १९७५ सालीदेखील हसीना याचप्रकारे भारतात वास्तव्यासाठी आल्या होत्या. त्यांचे वडील शेख मुजीबूर रेहमान यांची हत्या झाल्यानंतर त्या काही वर्षे भारतात वास्तव्यासाठी होत्या. साधारणपणे १९७९ पर्यंत शेख हसीना भारतात होत्या. त्यानंतर त्या बांगलादेशमध्ये परतल्या. आता याच इतिहासाची पुनरावृत्ती होणार का, शेख हसीना भारतात किती काळ वास्तव्यास राहणार, या सर्व प्रश्नांची उत्तरे आगामी काळात मिळतील.



## शेख हसीनांना पायउतार का व्हावे लागले?

- विरोधी पक्षाविरोधात आक्रमक भूमिका
- निवडणूक प्रक्रियेत फेरफार केल्याचा आरोप
- मानवी हक्कांचे उल्लंघन
- अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर विपरीत परिणाम
- आरक्षण आंदोलनानंतर उफाळलेला हिंसाचार



जाळपोळ करणाऱ्या आंदोलकांना पांगविण्यासाठी सुरक्षा दलाचे जवान ठिकठिकाणी तैनात करण्यात आले होते

## प्रणव मुखर्जींनी हसीनांसाठी पाठवले होते विमान

२००९ मध्ये जेव्हा बांगलादेश रायफल्सने बंडखोरी केली होती, त्यावेळी मोठ्या संख्येत लष्करी अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबीयांची हत्या करण्यात आली. या भीषण नरसंहाराच्या दोन महिन्यांपूर्वीच हसीना देशाच्या पंतप्रधान झाल्या होत्या. जेव्हा बंडखोरी वाढली, तेव्हा संभाव्य धोका ओळखून हसीना यांनी भारताकडे मदत मागितली. तेव्हा तत्कालीन परराष्ट्र व्यवहार मंत्री प्रणव मुखर्जींनी त्यांना मदतीचे आश्वासन दिले आणि त्यांच्यासाठी विमान तयार ठेवले. त्यावेळी भारतीय जवानांना ढाका विमानतळावर शेख हसीनांच्या सुरक्षेची जबाबदारी देण्यात आली होती. भारताने तेव्हा बांगलादेशी लष्करी नेतृत्वाला कठोर शब्दांत संदेश पाठवला की, हसीनांविरोधात कोणत्याही बळाचा वापर झाला तर भारत तत्काळ हस्तक्षेप करेल.



## शेख हसीना-डोवाल भेट

भारतात आल्यानंतर शेख हसीना यांनी भारतीय उच्चाधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि विदेश सचिवांचा समावेश होता. या सर्वांनी हसीना यांच्याकडून बांगलादेशातील स्थितीविषयी माहिती जाणून घेतली.

## सीमेवर हायअलर्ट

बांगलादेशातील घडामोडींमुळे भारताला लागून असलेल्या बांगलादेश सीमेवर हायअलर्ट जारी करण्यात आला असून, सीमा सुरक्षा दलाच्या काही अतिरिक्त तुकड्या स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी पाठविण्यात आल्या आहेत. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बीएसएफचे महासंचालक दलजितसिंग चौधरी आणि अन्य वरिष्ठ कमांडर्स कोलकात्यात दाखल झाले आहेत. सर्व फिल्ड कमांडर्सनी सीमा भागात जावे आणि आपापल्या पोझिशन्स घ्यावा, असा आदेशही देण्यात आला आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील सीमा ४०९६ किलोमीटर लांब आहे.

## दिल्लीतील उच्चायोगाची सुरक्षा वाढवली

अन्य एका घडामोडीत राजधानी दिल्लीत असलेल्या बांगलादेश उच्चायोगाच्या सुरक्षेतही वाढ करण्यात आली. उच्चायोगाच्या परिसरात बॅरिकेड्स लावण्यात आले असून, अतिरिक्त पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

## कोलकाता-ढाका मैत्री एक्सप्रेस रद्द

कोलकाता-ढाका मैत्री एक्सप्रेस रद्द करण्यात आली, असे पूर्व रेल्वेने सांगितले. मैत्री एक्सप्रेसची सेवा मंगळवारपासून सुरू होणार होती, पण बांगलादेशातील हिंसाचारामुळे ती तूर्तास रद्द करण्यात आली, असे निवेदनात म्हटले आहे.

# श्री सिद्धरामेश्वर मंदिरात भाविकांची मांदियाळी

## अभिषेक, पूजा, विधीने श्रावणमासाला प्रारंभ; शहर परिसरातील शिव मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

### श्रावणातील पहिल्या सोमवारी अबाल वृद्धांनी घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या मंदिरात श्रावण मासातील पहिल्या सोमवार निमित्त आभार वृद्ध भाविकांची श्रींचे दर्शन घेण्यासाठी पहाटेपासूनच मांदियाळी दिसून आली. दर्शन रांगा तसेच मंदिर परिसर भाविकांनी गजबजून गेलेले दिसून आले. हिंदू धर्मामध्ये श्रावण महिन्याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या पवित्र महिन्यात अबालवृद्ध आणि म हिला भाविक उपवास व्रतव्यकल्य करतात. श्रावणामध्ये अनेक नियमांचे पालन करून धार्मिक विधी विधान संपन्न केले जातात.

दरम्यान याच पार्श्वभूमीवर सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या मंदिरात सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील विविध धार्मिक विधी आणि कार्यक्रम मोठ्या धार्मिक वातावरणात संपन्न करण्यात आले. पहाटे श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात महाअभिषेक,महाआरती,महापूजा त्यानंतर अक्कीपूजा संपन्न करण्यात आली. यावेळी श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात दर्शन घेण्यासाठी सोलापूर शहर जिल्ह्यातून आणि कर्नाटक,आंध्र प्रदेशातून भाविक दाखल झाले होते.त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांच्या लांबच लांब दर्शन रांगा लागल्या होत्या.



दर्शन घेताना कोणताही गोंधळ निर्माण होऊ नये यासाठी महिला आणि पुरुष अशा दोन वेगवेगळ्या दर्शन रांगाचे नियोजन मंदिर देवस्थान पंचकमिटीच्या वतीने केले आहे.

तत्पूर्वी मध्यरात्री शिवयोग समाधीस मेघडंबरीस महादेव आणि त्यांचे शिष्य यांची प्रतिमा असलेले आकर्षक असे विविध फ ुलांची सजावट भक्त सोमनाथ केंगाळकर परिवाराकडून श्रींच्यासेवा रुपात अर्पण करण्यात आली. पहाटे मंदिरात धार्मिक विधी करण्यात आले त्यानंतर समाधीवर बिल्वपत्र अर्पण आणि ओम नमः शिवाय जप करून म हाआरती करण्यात आली. सकाळी साडेआठ वाजता शिवयोग समाधीस्थळी महाआरती करण्यात आली. यावेळी समाधी परिसरात अबालवृद्ध आणि महिला भाविकांची मांदियाळी दिसून आली. प्रत्येक आरतीच्या माध्यमातून श्रींची कृपादृष्टी आपल्या परिवारावर रहावी याच उद्देशाने भाविक भक्त असुसलेले दिसून आले.

शहर व जिल्ह्यातील विविध शिव मंदिरांमध्ये पहाटे अभिषेक, पूजा, विधी, बिल्व अर्पण करुन पुरोहितांच्या मंत्रोच्चारात धार्मिक विधी पार पडले. त्यानंतर भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले.

#### श्रींचे दर्शन घेऊन पवित्र श्रावण महिन्याची सुरुवात

श्रावणातील पहिल्या सोमवारी सकाळी सकाळी श्रींचे दर्शन घेऊन पवित्र श्रावण महिन्याची सुरुवात करावी, या उद्देशाने मंदिरात पहाटेच आले होते. सकाळी मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होती. दर्शनरांगा मधून श्रींचे दर्शन घेऊन मन आनंदी आणि तृप्त झाले. या पवित्र महिन्यातील प्रत्येक सोमावारी आणि शुक्रवारी मंदिरात दर्शन घेण्यासाठी आम्ही येत असतो.

**- पूजा बिराजदार, भाविक**

#### बिल्वपत्र अर्पण करून संपन्न झाली श्रींची महापूजा

श्रावण महिन्याला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. या पवित्र महिन्यात असंख्य भाविक श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिरात श्रींच्या दर्शनास येतात. सकाळी विविध धार्मिक विधी संपन्न झाले. त्यानंतर शिवयोग सम ाधीस बिल्वपत्र अर्पण करून ओम नमः शिवाय जप करण्यात आला. सकाळी ठीक साडेआठ वाजण्याच्या सुमारास समाधीस केंगनाळकर परिवाराकडून प्रथम महापूजा संपन्न करण्यात आली.

**-शिवशंकर हब्बू,**
**पुजारी, श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर देवस्थान, सोलापूर**



# उजनीचे पाणी इंगळगी-शिरवळ तलावात सोडा

### इंगळगी ग्रामपंचायतीतर्फे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी-शिरवळ धुबधुबी तलाव प्रकल्पामध्ये उजनीचे पाणी सोडण्याची मागणी इंगळगी ग्राम पंचायतीच्यावतीने आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे करण्यात आली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील इंगळगी, शिरवळ, कणबस, आलेगाव तसेच अक्कलकोट तालुक्यातील जेऊर, हंजगी या गावातील पाण्याची समस्या मिटण्यासाठी इंगळगी-शिरवळ धुबधुबी तलाव प्रकल्पाची निर्मिती झाली आहे. गेल्या वर्षी तसेच यंदाच्या वर्षी देखील या भागात पाऊसमान न झाल्याने तलाव कोरडे पडले आहे. त्यामुळे सध्या शासनाकडून इंगळगी तसेच कणबसला टँकरद्वारे पाणीपुरवठा चालू आहे. तलाव भरल्यानंतर पंचक्रोशीतील पाच-सहा गावांना पाणीपुरवठा होतो. तसेच आजूबाजूच्या शेतकऱ्यांना देखील त्याचा फायदा होतो. सध्या उजनी शंभर टक्के भरत आहे. त्यामुळे उजनी धरणातून इंगळगी शिरवळ तलावात पाणी सोडण्याची मागणी इंगळगी ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच विनोद बनसोडे, पत्रकार राहुल वंजारे आणि सागर धुळवे यांनी केली आहे.

आमदार सुभाष देशमुख यांनी निवेदन स्वीकारल्यानंतर उजनीच्या प्रकल्प अभियंतांना यांसंदर्भात पत्र देऊन लवकरात लवकर पाणी सोडण्याबाबत बोलणार असल्याचे सांगितले.

# मार्कंडेय मंदिराच्या स्थापनेस १०० वर्षे पूर्ण

### शताब्दी वर्षानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

पदमशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय मंदिराच्या स्थापनेस १०० वर्षे पूर्ण होत असून मंदिराच्या शताब्दी महोत्सव निमित्त शुक्रवार दि. ९ ते १२ ऑगस्ट या कालावधीत मंदिरात श्री मार्कंडेय महामुनीचे पुर्नप्रतिष्ठापना कार्यक्रम आयोजित केले आहेत, अशी माहिती पदमशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दि. ११ ऑगस्ट रोजी श्री मार्कंडेय महामुनींचे प्रतिष्ठापना विधी आणि १२ ऑगस्ट रोजी श्री. मार्कंडेय महामुनीच्या मुळमुर्तीस ''शतघटाभिषेक'' कार्यक्रम व महाप्रसाद कार्यक्रम



आयोजित करण्यात आले आहे. व तसेच यंदाच्या शतक महोत्सव निमित्त स्मरणीका काढण्यात येत असून त्याचे संपुर्ण काम प्रविण पोटाबत्ती हे पहात आहे.


या पत्रकार परिषदेस माजी महापौर जनार्दन कारमपुरी,रामचंद्र जन्नू,नरसप्पा इप्पाकायल,मुलीधर आरकाल,संतोष सोमा,म हांकाळ येलदी,रमेश कैरमकोंडा,राकेश पुंजाल, शेखर कटकम, नागेश बंडी आदी उपस्थित होते.

# जुनी पोलिस लाईन येथील स्वामी समर्थ मंदिरात ८ ऑगस्टपासून प्रवचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

मुरारजी पेठेतील जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात श्रावण महिन्यानिमित्त श्रावणमास प्रवचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रावण महिन्यातील दर गुरुवारी ही सायंकाळी प्रवचन सेवा होणार आहे. ८ ऑगस्ट रोजी डोणगाव येथील हभप पंकज गुंड महाराज, १५ ऑगस्ट रोजी हभप संतोष माळवदकर महाराज, २२ ऑगस्ट रोजी कोंडी येथील हभप भाग्यश्री शिंदे, २९ ऑगस्ट रोजी हभप नामदेव महाराज कवठेकर, ५ सप्टेंबर रोजी हभप सुरेखा सांगळे या आध्यात्मिक प्रवचन देणार आहे. तरी



या प्रवचन सेवेचा भाविकांना लाभ घेण्याचे आवाहन श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासाचे संस्थापक गोरख डोंगरे व अध्यक्ष प्रमोद डोंगरे यांनी केले आहे.

# भाजपाकडून ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान 'हर घर तिरंगा अभियान'

**मुंबई, दि. ५ ऑगस्ट-**

भारतीय जनता पक्षातर्फे ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान साजरे करण्यात येणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार हे अभियान राबविण्यात येत आहे, अशी माहिती अभियानाच्या प्रत्येक संयोजक आम दार उमा खापरे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली या अभियानातर्गत एक कोटी नागरिकापर्यंत पोहोचून त्यांना घरावर तिरंगा लावण्यासाठी प्रेरित करण्यात येणार आहे लोकसभागातून तिरंगा यात्रा महापुरुषांच्या स्मारक पुतळ्याची स्वच्छता ,फाळणी विभिषिका स्मृतिदिन आदी विविध कार्यक्रम या कालावधीत घेण्यात येणार आहे. त्यासाठी विभागनिहाय नियोजन करण्यात आल्याचे ही त्यांनीं सांगितले.

# केएलई स्कूलला तिहेरी मुकुट

### शालेय टेबल टेनिस स्पधा; एस.आर. चंडक, आयएम, बेगम कमरून्निसा विजेते

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

शालेय शहर टेबल टेनिस स्पर्धेत के.एल.ई.स्कूलने १४ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित तिहेरी मुकूट संपादिला. १४ मुलींच्या गटात आय.एम. इंटरनॅशनल स्कूल, १९ मुलांच्या गटात एस. आर. चंडक तर मुलींच्या गटात बेगम कमरून्नीसा स्कूलने बाजी मारली.

येथील इंदिरा गांधी स्टेडियम वरील मुळे हॉलमध्ये झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेच्या क्रीडा विभागाचे लिपीक मोहनीश क्षीरसागर यांच्या हस्ते झाले.



**सोलापूर : १४ वर्षांखालील गटाचे विजेते केएलई स्कूलचे पृथ्वीराज पाटील, यश खानापुरे, विहान कोठारी, प्रशिक्षक सौरव व टेबल टेनिस संघटनेचे झेड. एम. पुणेकर.**

यावेळी जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे झेड.एम. पुणेकर, सिद्रामप्पा मुनोळी, मुज्जमिल पुणेकर, गोवर्धन अवाशंक, क्रीडशिक्षक संतोष खेंडे, धर्मराज कट्टीमनी, सईदा दारूवाले आदी उपस्थित होते.

**अंतिम निकाल : १४ वर्षांखालील :** मुले : के.एल.ई. स्कूल वि. वि. इंडियन मॉडेल स्कूल ३-०. मुली : आय.एम. इंटरनॅशनल स्कूल वि.वि. एस.आर. चंडक ३-२. **१७ वर्षांखालील :** मुले :के.एल.ई. स्कूल वि. वि. एस.आर. चंडक ३-०. मुली :के. एल.ई. स्कूल वि. वि. एस.आर. चंडक ३-१.

**१९ वर्षांखालील :** मुले : एस.आर. चंडक वि.वि. के. एल.ई. स्कूल ३-१. मुली : बेगम कमरून्नीसा स्कूल वि.वि. संगमेश्वर ३-०.



# डिसीसी बँकेच्या बोरामणी शाखेला प्रथम पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

मागील वर्षभरात विविध उपक्रम राबवून उत्कृष्ट बँकींग व्यवस्था निर्माण केल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेस तालुकास्तरीय प्रथम पुरस्काराचे वितरण नुकतेच करण्यात आले. अक्कलकोट येथील टिनवाला सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांच्या हस्ते यावेळी बोराम णी शाखेच्या अधिकार्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. वर्षभरात बिझनेस प्लॅन आराखडानुसार केलेल्या कामगिरीची दखल या पुरस्कारासाठी घेण्यात आली. याप्रसंगी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोटे यांची उपस्थिती होती. यावेळी बोरामणी शाखेचे रामपूरे, रफिक शेख, रोहिणी वाघमारे, अख्तर पटेल यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बोरामणी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन भारत कवडे, सचिव रमेश मोहिते, मुनुरोद्दिन पठाण, मल्लीनाथ पटणे, बाबुराव खोबरे, लक्ष्मण सुतार, पंडित मस्के, वजीर मुजावर, बंडू मस्के यांनी बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

# २३ लाखाची 'हार्ट ट्रान्सप्लांट' यशस्वी

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वैद्यकीय कक्षाकडून रामेश्वरभाऊ नाईकांच्या माध्यमातून मदत

सामान्यातल्या सामान्य माणसाला दिलासा देणारी बातमी हाती लागलीय. महाराष्ट्र शासनाच्या जनकल्याणाच्या अनेक योजना आहेत. त्याचा लाभ सामान्य जनतेला झाला पाहिजे, यासाठी शासन प्रयत्नशील असतंच ... अशाच प्रयत्नातून नगर जिल्ह्यातील रूग्णाला नवजीवन मिळालंय. या रूग्णाच्या हार्ट ट्रान्सप्लांट नंतर त्याच्या कुटुंबियानी व्यक्त केलेल्या भावना शब्दात व्यक्त करण्यापलिकडंच्या होत्या.





राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्य सरकारने एक महत्वाचा वैद्यकीय उपक्रम सुरू केला. या उपक्रमात गरीब रुग्णांना राज्यातील खासगी तसेच धर्मदाय रुग्णालयात १० टक्के आरक्षित खाटा उपलब्ध होणार आहेत. यासाठी तातडीने मंत्रालयातील मुख्य इमारतीच्या ५ व्या मजल्यावर विशेष वैद्यकीय मदत कक्ष सुरू केल्याने विजय निवृत्ती धुमाळ या रूग्णाला नवजीवन मिळालंय.

अहमदनगर जिल्ह्यातील विजय धुमाळ याला हृदयाचा त्रास असल्याचे स्थानिक रुग्णालयात निदान झाले होते, त्याचं हृदय निकामी झाल्याने पुण्यातील नामवंत रूबी हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर हृदय प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया झाली, रुग्ण प्रकृतीत सुधारणा होऊ लागली, उरला होता तो प्रश्न, लाखो रुपयांच्या बिलाचा... !

गेल्या २०-२२ दिवसापासून संबधित हॉस्पिटलकडून बिल भरण्यासाठी तगादा असताना, सामान्य कुटुंबाकडं इतकी मोठी रक्कम येणार कुठून ? हाही सवाल होताचं. त्यांनी मदतीसाठी खुलं आवाहन देखील केलं होते, मात्र मदत मिळू शकली नाही. धुमाळ कुटुंबाची समस्या रूग्णसेवक आनंद गोसकी यांच्यापर्यंत आली अन् रुग्णसेवक गोसकी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या दूरदर्शी संकल्पनेतून निर्धन व दुर्बल घटकातील गरजू रूग्णांकरीता राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख आरोग्यदूत रामेश्वर



भाऊ नाईक यांना गोसकी यांनी रूग्णाची अत्यंत बिखट परीस्थिती असल्याचे सांगितले.

आरोग्यदूत म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जाणारे रामेश्वर भाऊ नाईक यांनी संवेदनशीलतेने विजय धुमाळ या रुग्णाच्या तब्बल २३ लाख रूपये बिलाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावला. रामेश्वर भाऊंच्या कार्य तत्परतेचाआलेला अनुभव रुग्ण विजय धुमाळ यांच्याच शब्दात.... त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, राज्यस्तरीय वैद्यकीय कक्षाचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक आणि रूग्णसेवक आनंद गोसकी यांनी केलेली मदत यांच्या त्रिवेणी संगम ावर धुमाळ कुटुंबियांनी आनंदाश्रूनं आभार मानले. गोरगरीबांसाठी कार्यतत्परआणि गतिशील सरकारचं हे सहकार्य आयुष्यभर विसरणार नाही, असंही धुमाळ कुटुंबियांनी म्हटलंय.

# मोफत फिजिओथेरपी सेंटरचा सिध्देश्वर मंदिरामध्ये शुभारंभ

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

श्रावणमासाचे औचित्य साधून पहिल्या श्रावण सोमवारी श्री सिध्देश्वर देवस्थान संचलित श्री सिध्देश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या वतीने श्री सिध्देश्वर मंदिरात मोफत कम्युनिटी फिजिओथेरपी सेंटरचा शुभारंभ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते व श्री सिध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

याप्रसंगी विश्वस्त डॉ. राजेंद्र घुली, नीलकंठप्पा कोनापुरे, गुरुराज माळगे, शिवकुमार पाटील, बाळासाहेब भोगडे, विश्वनाथ लब्बा, विलास कारभारी, म ल्लिनाथ मसरे, रतन रिक्के, प्रभुराज मैंदर्गीकर आदींची उपस्थिती होती. यावेळी काडादी



यांनी फिजिओथेरपी कॉलेज व देवस्थानच्या उपक्रमाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली.

देवस्थानच्या विविध उपक्रमांचे जिल्हाधिकाऱ्यांनी कौतुक केले. येथील कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मंदिरात 'श्रीं'चे दर्शन घेतले. त्यानंतर देवस्थानच्या कार्यालयात काडादी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. टी. सुरेशकुमार, प्रा. डॉ. प्रतीक्षा राहणे, प्रा. डॉ. सचिन काजळे, म हाविद्यायलयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी आदी उपस्थित होते.

#### ४१ रुग्णांवर उपचार

मोफत कम्युनिटी फिजिओथेरपी सेंटरच्या शिबिरामध्ये ४१ रुग्णांवर उपचार सुरू केले आहे. या शिबिरामध्ये नोंदविलेल्या रुग्णांचे पुढील उपचार श्री सिध्देश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पंचकट्टा या ठिकाणी मोफत होणार आहे. या सेंटरमध्ये दर सोमवारी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मोफत फिजिओथेरपी तपासणी आणि उपचार होणार आहे. इतर दिवशी रोज सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत कॉलेजमध्ये ५ सप्टेंबरपर्यंत मोफत उपचार करण्यात येणार असून त्याचा गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. टी. सुरेशकुमार यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## मराठा आरक्षणाला कुल जमात-ए-तंजीमचा पाठिंबा

### शांतता यात्रेचे सोलापुरात करणार स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

मराठा आरक्षणाला कुल जमात-ए-तंजीमचा जाहीर पाठिंबा आहे. सोलापुरात येणाऱ्या मनोज जरांगे-पाटील यांच्या शांतता यात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे, अशी माहिती मौलाना ताहेर बेग यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सकल मराठा समाज आरक्षणाच्या मुद्द्यावर एकवटला आहे. जरांगे-पाटील हे धडाडीने आरक्षणाच्या मुद्द्यांवर लढत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाज एकवटला आहे. जरागे पाटील यांनी मुस्लिम समाजालासुद्धा आरक्षण मिळावे, अशी मागणी केली आहे. त्यामुळे त्यांचे मुस्लिम समाज आभार व्यक्त करत आहे. मुस्लिम समाजाने इतर समाजाच्या न्याय मागण्याला नेहमीच खुल्या मनाने पाठिंबा दिला आहे. सोलापुरात दि. ७ ऑगस्ट रोजी येणाऱ्या जरांगे पाटील यांच्या शांतता यात्रेचे मुस्लिम समाज बांधवा तर्फे स्वागत करण्यात येणार आहे. विजापूर वेस येथून पदाधिकारी व कार्यकर्ते समूहाने येऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शांतता यात्रेचे स्वागत करणार आहेत. कुल जमात-ए- तंजीम आणि छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड च्या वतीने हे स्वागत करण्यात येणार आहे, असे मतीन बागवान यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस माजी महापौर आरिफ शेख, जावीर बद्दी, शफीक काझी, अल्ताफ लिंबूवाले, म. शफीक रचभरे, अलीम सैय्यद आदी उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### श्री कालिका गणपती मंडळाच्या अध्यक्षपदी महेश पोतदार

**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

मसरे गल्ली येथील श्री कालिका गणपती गणेशोत्सव मंडळाची सर्वसाधारण सभा नुकतीच होऊन त्यामध्ये यंदाच्या उत्सव अध्यक्षपदी महेश पोतदार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मंडळाचे नूतन पदाधिकारी पुढील प्रमाणे : उपाध्यक्ष : प्रथमेश पाथरीकर, दीपक जाधव,खजिनदार : अजित पाटील, रितेश पाथरीकर, कार्याध्यक्ष : जगदीश कोण्हेरीकर, सचिव : महेश पंडित, मिरवणूक प्रमुख : शुभम उळागड्डे, रोहन गाबणे, महेश शिवशेट्टी, वर्गणी प्रमुख : रोहित सुतार, निखिल शिशोदा आदी.





### अंकशास्त्र, टैरो कार्ड यावर दोन दिवसीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

स्पिरीच्युअल मास्टस्ट्रो संस्थेतर्फे १० व ११ ऑगस्ट रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संयोजक श्रेयांश पंडित आणि डॉ. जयेश रामावत यांनी पत्रकार परिषदेत दिली. डॉ. जयेश रामावत यांना वास्तुचा १८ वर्षांचा व अंक शास्त्रांचा ६ वर्षांचा अनुभव असून त्यांनी 'स्पिरिचुअल माइस्ट्रो' या कंसल्टिंग व ट्रेनिंग संस्थाची दोन वर्षापूर्वी सुरुवात केली होती. आता ही संस्था वैज्ञानिक पद्धतीने वास्तुचे निराकरण करतात आणि अंक शास्त्र शिकवण्याचे उपक्रम राबवतात. 'स्पिरिचुअल माइस्ट्रो' या संस्थाची 'अंकशास्त्र' व 'टैरो कार्ड' असे दोन विषयाची कार्यशाळा दि. १० व ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजे पर्यंत हॉटेल श्री भोज येथे (एस. टी. स्टैन्ड चा समोर, क्रोमा शोरूम वर) ठेवण्यात आली आहे. वास्तु, अंक शास्त्री व ऑरा ऐनलिस्ट डॉ. जयेश रामावत आणि मुंबईच्या डॉ. रेखा गोसावी हे मार्गदर्शन देणार आहेत.

### एनएएसजे ट्रस्टच्यावतीने २२ सप्टेंबर रोजी परीक्षा

**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

एनएएसजे ट्रस्टच्या वतीने रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी, सिरत-ए- मुस्तफा सल्लालाहू आलीही व सल्लम परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मुफ्ती अब्दुल कादिर मरकजी यांनी पत्रकार परिषदेत दिली. परीक्षेसाठी किमान वयाची अट बारा वर्षाहून अधिक आहे. ही परीक्षा हिंदी, उर्दू किंवा इंग्लिश भाषेमध्ये देता येईल. सर्वसामान्यांसाठी फॉर्म, पुस्तक सहित ३५० रुपये शुल्क आकारण्यात आले आहे. शाळा व कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी फॉर्म फी पुस्तका सहित तीनशे रुपये राहणार आहे. या परीक्षेतील प्रथम तीन विजेत्यांना उमरह, बैतुलमुकद्दस , बगदाद यात्रा असे पारितोषिकाचे स्वरूप आहे. यावेळी मौलाना इसराफिल, मौलाना हाफिज तनवीर नक्शबंदी, मौलाना मसूद रजा, मौलाना तौफिर अमानी, सुहेल सौदागर, अशफाक शेख आदी उपस्थित होते.

### हिट्स ऑफ स्व. दादा कोंडके कार्यक्रमाचे गुरुवारी आयोजन

**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**



स्व.अभिनेते शाहीर दादा कोंडके यांच्या ८२ व्या जयंती निमीत्त हिट्स ऑफ दादा कोंडके कार्यक्रम 'नक्षत्र कराओके सिंगिंग ॲकॅडमी'च्यावतीने मराठी गाण्यांची धमाल हा कार्यक्रम गुरूवार दि. ८ ऑगस्ट रोजी डफरिन चौकातील सारस्वत ब्राह्मण मंगल कार्यालय, सोलापूर येथे सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. तरी सर्व संगीत रसिक प्रेमींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन नक्षत्र कराओके सिंगिंग अकॅडमी' संयोजिका सुनंदा शेंडगे यांनी दिली.

# महाराष्ट्रात आरक्षणाची गरजच नाही : राज ठाकरे

### महाराष्ट्रात सगळ्या गोष्टी मुबलक प्रमाणात
### स्थानिकांना नोकरी मिळाव्यात
### बाहेरचे लोंढे थांबवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

मतांसाठी दुसऱ्यांच्या खांद्यावर बंदुक ठेवून राजकारण चालू आहे. आपल्याला मूर्ख बनवण्यात येत आहे. हे लोकांनी हे समजून घ्यावं. महाराष्ट्र सर्वाधिक प्रगत राष्ट्र आहे. दिशाला दिशा देणारं राज्य आहे. महाराष्ट्रात सगळ्या गोष्टी मुबलक प्रमाणात आहेत. यामुळे आरक्षणाची गरजच नाही, असे स्पष्ट मत मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी व्यक्त केले.

नवनिर्माण यात्रेनिमित्त सोलापुरात आले असताना ते बोलत होते. यावेळी मनसेचे नेते दिलीप धोत्रे, माजी आ. बाळा नांदगावकर, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, प्रशांत गिड्डे, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनोद्दीन शेख, मनविसेचे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, बाबू आगसकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

राज ठाकरे म्हणाले, स्थानिक लोकांसाठी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर येथे उड्डाण पूल होत नाहीत तर बाहेरून येणाऱ्यांसाठी होत आहेत. ठाणे जिल्ह्यात सात ते आठ महानगरपालिका आहेत. ग्रामपंचायत, नगरपरिषद, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि मग महानगरपालिका हे स्तर लोकसंख्येनुसार वाढत जातात. एका जिल्ह्यात सात ते आठ महानगरपालिका असतील तर ही लोकसंख्या ठाण्यातील लोकांनी वाढवली का? बाहेरून येणाऱ्या लोकांचा लोंढा मोठ्या प्रमाणात आहे. मग त्या शहरांत आल्यानंतर त्यांची व्यवस्था लावण्यासाठी सरकारचा पैसा खर्च होतो. पुढे बोलताना राज ठाकरे यांनी आरक्षणासह राज्यातील जातीपातीच्या राजकारणावरही भाष्य केलं. महाराष्ट्रातील मुलांना शिक्षण आणि नोकरी मिळाली पाहिजे, यात जात येते कुठे? महाराष्ट्रात सर्वाधिक नोकऱ्या निर्माण होतात. खासगी शिक्षण संस्था आणि नोकऱ्यात आरक्षण नाही. मग किती जागांवर आरक्षण आहे? हे बघणंही गरजेचं आहे. मूळात सध्या माथी भडकवून राजकारण करण्याचा प्रयत्न काही लोकांकडून सुरू आहे. हे फक्त मतांचं राजकारण आहे. प्रत्येकाने ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. यातून हाताला काहीही लागणार नाही, असे ते म्हणाले. आज जातीपातीचं प्रकरण शाळा-महाविद्यालयांपर्यंत पोहोचलं आहे. यापूर्वी अशी परिस्थिती राज्यात कधीही नव्हती. उत्तर प्रदेशात अशा गोष्टी होतात, असं ऐकलं होतं. आता हे लोण महाराष्ट्रात पोहोचलं आहे, महाराष्ट्रात जातीपातीचं राजकारण करणाऱ्यांना जनतेने या निवडणुकीत दूर ठेवलं पाहिजे, असेही ते म्हणाले.



**सोलापूर : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोमवारी सकाळी सोलापूर विश्रामगृह येथे बाळ नांदगावकर व दिलीप धोत्रे यांची विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर केली.**
**(छायाचित्र : केवल तिवारी)**

### महाराष्ट्राचं मणिपूर; पवारांनी काळजी घ्यावी

शरद पवारांनी जे केले तेच आता सुरु आहे. त्यांनी यावर बोलायला हवे होते. महाराष्ट्राचं मणिपूर होऊ नये, म्हणून त्यांनी काळजी घ्यावी, असे म्हणत अजित पवारांचं काय खरं आहें, असे म्हणत त्यांच्या बंडावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### बाळा नांदगावकर, दिलीप धोत्रेंना उमेदवारी जाहीर

विधानसभा निवडणुका जाहीर व्हायला बराच काळ असताना राज ठाकरे यांनी सोलापूरच्या नवनिर्माण यात्रेत मनसेचे दोन उमेदवार जाहीर करुन भाजपाच्याच मतदारसंघात पहिला धमका उडवून दिला आहे. पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातून मनसेचे नेते दिलीप धोत्रे तर शिवडी मतदारसंघातून माजी आ. बाळा नांदगावकर यांची नावे जाहीर केली. दिलीप धोत्रे हे २००९ मध्ये याच मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. शिवडीमधून २००९ ला नांदगावकर हे निवडून आले होते.

### फक्त लोकसभेसाठी मोदींना पाठिंबा

मी कायमस्वरुपी भाजपाला पाठिंबा दिला नव्हता. केवळ लोकसभेसाठी आणि तेही नरेंद्र मोदींना पाठिंबा दिला होता, असे सांगत राज्यात विधानसभेसाठी २२५ ते २५० जागा लढविणार आहे. ६५ वर्षे राज्य केलेल्या काँग्रेसच्या वाट्याला वाताहात आली. आता कुठे तरी पक्षाला १८ वर्षे झाली आहेत. पुढे काळ फार मोठा आहे, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

### संविधान बदलण्याचे भाष्य भाजपचेच!

लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसल्यानंतर भाजपा फेक नेरेटिव्हचा मुद्दा उपस्थित करत आहे, यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले सर्वात आधी आयोध्येतील भाजपाच्या उमेदवारांनी ४०० पार झाल्यानंतर संविधान बदलणार असल्याचे भाष्य केले होते. यात कुठे फेक नेरेटिव्ह आहे, याची आठवण राज ठाकरे यांनी करुन दिली.

### लाडका मतदार योजना सुरु करा

लोकसभा निवडणुकीनंतर सगळेच जमिनीवर आले आहेत. आता रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, असे सांगत राज्य सरकार मते मिळविण्यासाठी अनेक योजनांचा पाऊस पाडत आहे. आता मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. हा लाडका, तो लाडका म्हणत न बसता लाडका मतदार योजनाच काढावी, असा सल्ला राज ठाकरे यांनी राज्य सरकारला दिला.

### शास्त्री नगरमधून मोबाईल लंपास

**सांगोला, दि.५ ऑगस्ट -**

शास्त्री नगरमधील २ नं. एस टी स्टॅन्ड च्या आतील मैदानात झोपलेल्या तरूणाचा ६ हजार रुपयांचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत बाळूसिंग हरिसिंग चव्हाण (वय ३८, रा. निलम नगर, आशा मराठी शाळेजवळ, भारत चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



२९ जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास बाळूसिंग चव्हाण हे २ नं. एस टी स्टॅन्डच्या आवारातील मैदानात झोपले होते. त्यावेळी चोरट्याने त्यांचा ६ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार मोरे पुढील तपास करीत आहेत.

### वंचित बहुजनचे नेते भाऊसाहेब आंधळकर यांचा राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

मराठा समाजाच्या आरक्षण विरोधात प्रकाश आंबेडकर यांनी काढलेल्या मोहिमेला विरोध करत बार्शी वंचित बहुजन आघाडीचे नेते भाऊसाहेब आंधळकर यांनी पक्षाचा राजीनामा देऊन मराठा समाजाच्या भावनांचा आदर केला आहे. भाऊसाहेब आंधळकर यांनी वंचित बहुजन आघाडीतर्फे धाराशिव लोकसभेची निवडणूक लढवली होती.

## पळशी ते शेळवे दरम्यानचे बंधारे भरुन द्यावेत

### आ.शहाजीबापू पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.५ ऑगस्ट -**

उजनी धरण क्षेत्रात मागील आठवड्याभरापासून जोरदार पाऊस पडत असल्यामुळे उजनीत पाणीसाठा उपलब्ध झाला आहे.त्यामुळे उजनी धरणाच्या मुख्य कालवा, उजवा आणि डावा कालवा यामधून शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सुरू करून सांगोला विधानसभा मतदारसंघातील पंढरपूर तालुक्यातील पळशी ते शेळवे दरम्यानचे बंधारे, साठवण तलाव भरून देण्याची मागणी आ.शहाजीबापू पाटील यांनी केली आहे.



जिल्ह्यातील काही भागांमध्ये पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत तसेच आणि गावांमधील पाणीपुरवठ्याच्या योजना बंद पडल्या आहेत. उजनी धरणाच्या उजव्या कालव्यातून पाणी सोडून सांगोला विधानसभा मतदारसंघातील पंढरपूर तालुक्यातील पळशी, सूपली उपरी, भंडीशेगाव, वाडीकुरोली, शेळवे, केसकरवाडी बंधारे भरून द्यावेत. तसेच अनेक गावांमधील पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी तलाव साठवण तलाव भरून देण्याची मागणी त्यांनी केली आहे. लाभक्षेत्रातील कोल्हापूर पध्दतीच्या बहुतांशी बंधाऱ्यांनी तळ गाठला आहे.त्यामुळे सध्या जरी पाणी पातळी बर्यापैकी असली तरी काही दिवसातच पाणी पातळी खालावून पाणीटंचाई जाणवणार आहे.त्यामुळे उजनी धरण उजवा कालवा लाभक्षेत्रातील बंधार्यात पाणी सोडून ते भरल्यास पाणी टंचाई जाणवणार नाही व शेतीचा प्रश्नही सुटेल. नदीकाठावरील बागायती पट्टाही पाण्याअभावी होरपळला असून पाण्याअभावी ऊस पिकांचेही क्षेत्र मोठ्या प्रमाणात घटले. पाण्याअभावी उभी पिके जळून गेल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यामुळे पुढील काही दिवसात पाणी टंचाईची झळ बसण्याअगोदरच उजनी धरणाच्या मुख्य कालवा, उजवा आणि डावा कालवा यामधून शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडून बंधारे, साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरुन द्यावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८५२

**तुका म्हणे मुक्ताफळ शिंपी पोटीं ।
नाही त्याची भेटी भोग तिये ।।**

कांही लोक रात्रंदिन स्वत:साठी कष्ट करीत असतात किंवा झटत असतात. तर कांही लोक इतरांसाठी कष्ट करतात, तसेच झटत असतात. इतरांसाठी झटणाऱ्यांची किंवा कष्ट करणाऱ्यांची संख्या नगण्य आहे. हे सत्य असले तरीही समाजाची सुस्थिती अशा नगण्य संख्येवरच अवलंबून आहे, हे ही सत्यच आहे. इतरांसाठी झटायचे किंवा इतरांसाठी निर्माण करायचे आणि निर्माण झालेल्याचा भोग आपण घ्यायचा नाही, त्याचबरोबर त्या फलात मी ला अडकू द्यायचे नाही, ही साधी गोष्ट नाही. चांगल्यातल्या चांगल्या गोष्टी या जगात मानवाने निर्माण केल्या आहेत. अशा निर्मितीमागे आपण आहोत, असेही कांही लोक



म्हणत नाहीत. अर्थात स्वत:कडे त्याचे श्रेय घेत नाहीत. उलट आपणच त्यांचा शोध घेऊन हे त्यांनी केले, असे म्हणतो. पण कांही लोक स्वत: न करताही आपणच केले असे दाखविण्याचा खूप प्रयत्न करतात. माणसाने कर्तृत्वाचा अभिमान बाळगू नये. तसेच फलात स्वत:ला अडकू देऊ नये. मोत्याची निर्मिती करणारे शिंपले मोत्याला समाजाच्या उपभोगासाठी सोडून कायमचे मुक्त होते. शिंपले स्वत: मोत्याचा उपभोगही घेत नाही आणि मी केले असेही म्हणत नाही. त्याप्रमाणे माणसाने वागायला हवे. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे मुक्ताफळ शिंपी पोटीं । नाहीं त्याची भेटी भोग तिये ।।

चांगल्याच्या निर्मितीसाठी आपणही सौंदर्यवान, धनवान असावेच लागते असे नाही. शिंपले मोत्याच्या तुलनेत निश्चितच सौंदर्यवान नसते. तरीपण त्याने केलेली मोत्याची निर्मिती सर्व सौंदर्याला मागे टाकते. त्याप्रमाणे आपण दिसायला कसे आहोत किंवा कोण आहोत याचा विचार न करता मनाचे सौंदर्य वाढवून म्हणजेच सकारात्मक वृत्तीने कार्य करू गेल्यास आपल्या हातून समाजासाठी निश्चितच चांगले असे कांहीतरी निर्माण होऊ शकते. मला समाजाशी काही देणे घेणे नाही, असे म्हणून चालत नाही. कारण आपल्यावर समाजाचे कळत नकळत कांही ऋण हे आहेतच. त्या ऋणाची कांही प्रमाणात का होईना पण परतफेड करण्याचा प्रयत्न आपण करायलाच हवा. संत, महात्म्यांना समाजाने खूप छळले तरीही त्यांनी सुंदर अशा ग्रंथांची निर्मिती सामाजासाठी केली. त्यांचे ग्रंथ, मार्गदर्शन आपल्यासाठी उपलब्ध नसते तर कदाचित आमच्यात आहे तेवढी मानवता, सकारात्मकता, शांतता दिसली नसती. संसारात अडकलेल्या जीवाला मी तून बाहेर पडणे तसे कठीण आहे. पण प्रयत्नाअंती हे ही साध्य होऊ शकते. समाजासाठी नाही तर किमान आपण आपल्या स्वत:साठी, कुटुंबासाठी तरी नीतीनियमपूर्वक कांही चांगले निर्माण करतो का? याचा विचार करून वागले तरी पुरेसे आहे. कारण आपण व कुटुंब समाजाचा एक घटक आहोत. नितीनियमपूर्वक झालेली आपली व आपल्या कुटुंबाची प्रगती समाजाच्या प्रगतीला हातभार लावू शकते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार**
**दि. ६ ऑगस्ट २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - श्रावण**
**शु. द्वितीया (१९.५१)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- मघा (१७.४३)**
**योग - वरियन (१०.५८)**
**करण - बालव (०६.५४)**

**दिनविशेष -**
**मंगलागौरी पूजन, सफर मु.१**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

**वृषभ** : व्यापार व्यवसाय मध्यम राहील. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन** : सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल.

**कर्क** : घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह** : हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या** : मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ** : व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे.

**धनु** : व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. प्रितिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे.

**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन** : मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# पालिका कामगार संघटना कृती समितीची निदर्शने

**शासनाप्रमाणे महापालिका कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू करण्याची मागणी**

**विविध प्रलंबित मागण्यांकडे वेधले लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

शासनाप्रमाणे महापालिका कर्मचाऱ्यांना ५० टक्के महागाई भत्ता लागू करावा यासह विविध लक्ष वेधण्यासाठी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने आज महापालिका आवारात

जोरदार निदर्शने करण्यात आली. स्वातंत्र्यदिनी याबाबत घोषणा करावी अन्यथा धरणे, संप करण्यात येईल , असा इशारा कामगार नेते अशोक जानराव यांनी दिला आहे.

विविध मागण्यांसाठी महापालिका आयुक्तांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र बहुतांश मागण्या या प्रलंबित आहेत. त्याकडे प्रशासन गांभीर्याने पाहत नाही. कामगार हितासाठी स्वातंत्र्य दिनी कृती समितीच्या मागण्यांची घोषणा करावी. याकडे लक्ष वेधण्यासाठी आज कौन्सिल हॉल समोर निदर्शने करण्यात आली. विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडला. दरम्यान, महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी कार्याध्यक्ष शेषराव शिरसट, बाबासाहेब क्षिरसागर, अजय क्षिरसागर, लिंबराज जेटीथोर, अनिल जगझाप, विठोबा शिंदीबंदी, अनिल बनसोडे, उमेश गायकवाड, दत्ता तुळसे, प्रकाश सोनवणे, विद्यासागर मस्के, सतीश नागटिळक, राहुल बनसोडे, अंबादास डावरे आदींसह पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अन्यथा धरणे, संप आंदोलन करावे लागेल : जानराव

महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने विविध मागण्यांसाठी पाठपुरावा करण्यात येतो मात्र महापालिका प्रशासनाकडून म्हणावा असा प्रतिसाद मिळत नाही. कामगार संघटनेच्या मागण्यांवर महापालिका आयुक्त बैठक घेत नाहीत. केवळ सोमवार आणि गुरुवारी जनता दरबारात भेटण्याचे नियोजन ठेवले आहे. हे योग्य नाही. १५ ऑगस्ट पूर्वी महापालिका आयुक्तांनी बैठक घेऊन या मागण्यांची अंमलबजावणी करावी अन्यथा धरणे व संप आंदोलन करण्यात येईल. प्रसंगी आयुक्तांना घेराव घालण्यात येईल, असा इशारा कामगार नेते अशोक जानराव यांनी दिला आहे.

# शिवस्मारकतर्फे देशभक्तीगीत समूहगान स्पर्धा

**शाळांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळातर्फे (शिवस्मारक) सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी देशभक्तीगीत समूहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी नवी पेठ येथील शिवस्मारक सभागृहात सकाळी १० वाजता स्पर्धेस प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश नि:शुल्क आहे. शालेय स्तरावरील ही स्पर्धा इयता पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा तीन गटांमध्ये होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पारितोषिक पाच हजार रुपये आणि सन्मानचिन्ह, द्वितीय पारितोषिक तीन हजार रुपये आणि सन्मानचिन्ह तर तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये, सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तर सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र आणि जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. शिरिष महाराज मोरे लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना' हे पुस्तक देण्यात येणार आहे. प्रत्येक गटासाठी स्वतंत्र पारितोषिक दिले जाणार आहे. स्पर्धेसाठी नाव नोंदणी शनिवार दिनांक १० ऑगस्टपर्यंत दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नवी पेठ येथील शिवस्मारक कार्यालयात करता येईल. नोंदणीसाठी शिवस्मारकचे व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर यांच्याशी ९८२२४९८३७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. या पत्रकार परिषदेस सचिव गंगाधर गवसने, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, संचालिका आणि स्पर्धा प्रमुख माधवी कुलकर्णी, संचालक प्रा. देवानंद चिलवंत, प्रसाद जीरांकलगीकर, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर आदी उपस्थित होते.

# 'कासिद विकली'ने शंभर वर्ष पूर्ण करावे

**जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के**

**'कासिद'चा ५१ वा वर्धापनदिनाच्या विशेषाकांचे प्रकाशन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

वृतपत्र क्षेत्रात अर्ध शतक पूर्ण करणारे 'कासिद विकली' चा ५१ वा वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांच्या हस्ते व जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव प्रा. पी.पी. कुलकर्णी, सपादक अय्यूब नल्लामंदू यांच्या प्रमुख उपस्थित जिल्हा माहिती कार्यालयात पार पडले.

पत्रकार अय्यूब नल्लामंदू यांनी आपल्या प्रस्ताविकेत कासिद चे ५० वर्षाचे इतिहास सांगत सर्व



उप स्थितिनां 'अ लतीफ नल्लामंदू व्यकित्व व कर्तूत्व' ही गौरव पुस्तीका व बुके देऊन स्वागत केले. यावेळी पत्रकार प्रा.कुलकर्णी, दशरथ वडतिले , इलियास सिद्दीकी यांनी आपले विचार मांडत शुभेच्छा व्यक्त केल्या. शेवटी जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांनी म्हणाले, स्वर्गीय लतीफ नल्लामंदू यांनी सुरु केलेल्या 'कासिद' वृत्तपत्र अर्धशतक पूर्ण केले आणि आता त्यांचे सुपुत्र अय्यूब नल्लामंदू हे वृतपत्र पुढे चालू ठेवले आहे. वर्धापन विशेषांकाचे कौतुक करत हा वृतपत्र शंभर वर्ष पूर्ण करावे अशी इच्छा व्यक्त केली. यावेळी पत्रकार रणजित जोशी, दशरथ वडतिले, नरुटे, नागेश दंतकाळे, दिलीप शिंदे, विश्वनाथ व्हनकोरे, विजय कुमार जुंजा, श्रीशैल चिंचोळकर, बाळा साहेब वाघमोडे, राजकुमार पवार, महादेव जंबगी, अशोक ढोणे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन कुलकर्णी यांनी तर मजहर अल्लोळी यांनी आभार मानले.

# लोकमंगल पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**११ शिक्षक आणि २ शाळांना सन्मानित करणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

लोकमंगल फाउंडेशन आणि लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या शिक्षक रत्न पुरस्कारांसाठी गुणवत्तावान शिक्षकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत,अशी माहिती माजी प्राचार्य ह. ना. जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.


सोलापूर जिल्ह्यात प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या पुरस्कार योजनेत प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयीन आणि वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना शिक्षक रत्न पुरस्कार दिले जातात. त्याशिवाय क्रीडा शिक्षक व कला शिक्षक यांनाही सन्मानित केले जाते. अध्यापन सेवेमध्ये विशेष उल्लेखनीय सेवा बजावत विविध उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकाला पुरस्कार दिला जातो. सोलापूर जिल्ह्याची कीर्ती जगभरात पसरवणाऱ्या गुणवत्तावान विद्यार्थ्याला प्रेरणा देणाऱ्या शिक्षकाला डॉ. अब्दुल कलाम पुरस्कार दिला जातो. अशा अकरा शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या दोन प्राथमिक शाळांना आदर्श शाळा पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. या पुरस्काराचे स्वरूप प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह आणि अडीच हजार रुपयांची पुस्तके असे आहे. बारा वर्षापेक्षा अधिक सेवा बजावलेल्या कोणत्याही शिक्षकाला या पुरस्कारासाठी अर्ज करता येईल. त्यासाठी विहित नमुन्यातील अर्जावर माहिती भरून संबंधित शिक्षकांना प्राप्त झालेली प्रमाणपत्रे जोडून प्रस्ताव सादर करावा लागेल. विहित नमुन्यातील अर्ज लोकमंगल पतसंस्था किंवा लोकमंगल मल्टीस्टेट सहकारी संस्था यांच्या कोणत्याही शाखेत आणि लोकमंगल फाउंडेशनच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध आहेत. हे प्रस्ताव अन्नपूर्णा, १३/अ सह्याद्री सोसायटी, इ एस आय हॉस्पिटलच्या मागे, विकास नगर, होटगी रोड सोलापूर याच पत्त्यावर दि. २० ऑगस्टपर्यंत आणून द्यावे. अधिक माहितीसाठी ०२१७-०६०६०७० किंवा ७७२२०३९६१७ येथे संपर्क साधावा, असे आवाहन निवड समितीने केले आहे. या पत्रकार परिषदेस अरविंद जोशी, आशालता जगताप, मारुती तोडकर, प्राचार्य तानाजी माने, गुरण्णा तेली, दिपाली कोठारी आदी उपस्थित होते.

# कुमारस्वामीजी यांच्या जयंतीनिमित्त उद्यापासून व्याख्यानमाला

**आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळातर्फे पुस्तक प्रकाशानासह विविध कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

परमपूज्य महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांच्या ११५ व्या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळाच्या वतीने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.



जयंती महोत्सवाच्या निमित्ताने विचारवंताचे, साहित्यीकांचे विविध विषयावर समाजोपयोगी व्याख्याने आयोजित करण्यात आलेली आहेत. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम व रक्तदान शिबीर याचे आयोजन आहे. या जयंती महोत्सव निमित्ताने राजेंद्र मायनाळ लिखित महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांचे जीवन व कार्य या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन समारंभ दि.१५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता म.नि.प्र. बसवलिंगेश्वर महास्वामीजी (मठाधिपती विरक्तमठ, अक्कलकोट) यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी उद्योजक एन.आय. जामगुंडी अध्यक्षस्थानी राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार विश्वनाथ चाकोते, उद्योजक महादेव कोगनुरे हे उपस्थित राहणार आहेत.

बुधवार, दि.७ ते मंगळवार दि. १३ ऑगस्ट या कालावधीत रोज सायंकाळी ५.३० ते सायंकाळी ७ या वेळेत मान्यवरांचे व्याख्यान व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सात ऑगस्टला पहिले पुष्प डॉ. व्यंकटेश मेतन गुंफणार असून 'प्राचीन भारतीय मंदिरे व त्यांची वैशिष्ट्ये' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. प्रा. विलास बेत हे ८ ऑगस्टला 'अस्वस्थ पिढीसाठी जबाबदार पालकत्व' या विषयावर तसेच ९ ऑगस्टला डॉ. श्रीकांत येळेगावकर हे '१९४२ च्या चले जाव चळवळीत सोलापूरचे योगदान' तर १० ऑगस्टला डॉ. अंजली शिवपुजे या 'बदलती कुटुंब व्यवस्था आणि बदलता समाज' या विषयावर आपले व्याख्यान करणार आहेत. रविवार दि.११ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. डॉ. व्यंकटेश यजुर्वेदी यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी ज्योतिषाचार्य माधव कुलकर्णी यांचे आपली राशी आणि उपासना या विषयावर व्याख्यान होणार आहे. मंगळवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी संगीत रजनी कार्यक्रम नागनाथ नागेशी व सहकारी सादर करणार आहेत.

या पत्रकार परिषदेस संस्थेचे सचिव बाबासाहेब कुलकर्णी, विश्वनाथ म्हेत्रे, नीलकंठप्पा कोनापुरे, नागनाथ चौगुले आदी उपस्थित होते.

# ग्लोबल व्हिलेजमध्ये बीसीए कोर्सला मान्यता

**एआयसीटीईकडून मान्यता मिळविणारे जिल्ह्यातील प्रथम महाविद्यालय**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

ग्लोबल व्हिलेज महाविद्यालय, बोरामणी येथे बॅचलर इन कॉम्प्युटर अँप्लिकेशन (BCA) या अभ्यासक्रमासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता मिळालेली आहे. या अभ्यासक्रमासाठी एआयसीटीई, नवी दिल्ली कडून मान्यता मिळविणारे हे सोलापूर जिल्ह्यातील सर्वप्रथम महाविद्यालय ठरले आहे.

कॉम्प्युटर क्षेत्रातील नवनवीन संधी आणि संशोधन विद्यार्थ्यांना करता येते तसेच सध्याच्या जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या व त्याचे निराकरण करण्यासाठी प्रयत्नशील व उत्तम व्यावसायिक निर्माण करण्याच्या अनुषंगाने बीसीए या अभ्यासक्रमाचे धडे ग्लोबल व्हिलेजमध्ये मिळावेत या उद्देशाने याची मुहूर्तमेढ रोवत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी सांगितले. बीसीए पूर्ण केल्यानंतर नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड करुन २ लाख ते १० लाख पॅकेज मिळविण्याचे प्रयत्न महाविद्यालयाकडून केले जाणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. यशवंत डोके यांनी दिली. सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपले भविष्य घडवावे, अशी अपेक्षा संस्थेच्या सचिवा संगिता शहा यांनी व्यक्त केली आहे.

# सोलापुरात गुरुवारपासून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह अंतर्गत दि. ८ ते १७ ऑगस्ट दरम्यान विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे ,अशी माहिती सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गुरुवार दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह येथे समारोहाचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी श्री स्वामी समर्थ सूतगिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे हे राहणार आहे. यावेळी सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता युनिक इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेज ऑफ फार्मसी सभागृह ,विजापूर रोड येथे वैज्ञानिक प्रात्यक्षिके कार्यक्रम होणार आहे. शनिवारी १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी घाऊक व किरकोळ ग्राहक भांडार, सिद्धसंग प्रतिष्ठान व महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेज ऑफ फार्मसी सभागृह विजापूर रोड येथे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८.४५ वाजता शिवदारे शैक्षणिक संकुल जुळे सोलापूर येथे युनिक इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या वतीने आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे. सकाळी १० वाजता व्ही. जी. शिवदारे आर्ट, कॉमर्स व सायन्स कॉलेज विजापूर रोड येथे जिल्हास्तरीय रोप स्किपिंग स्पर्धा होणार आहे. दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता युनिक इंग्लिश मीडियम स्कूल फार्मसी कॉलेज कॅम्पस जुळे सोलापूर येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय केगाव, रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ आणि कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने दंत आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. मंगळवारी १३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता जुळे सोलापुरातील कॉलेज ऑफ फार्मसी सभागृह येथे विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर आयोजित केले आहे. १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता कॉलेज विजापूर रोड येथे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. गुरुवारी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७.४५ वाजता व्ही. जी. शिवदारे कॉमर्स व सायन्स कॉलेज विजापूर रोड येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण व विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. शुक्रवार दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शिवदारे शैक्षणिक संकुल जुळे सोलापूर येथे विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. शनिवार दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात या स्मृती समारोहाचा सांगता समारंभ होणार असल्याचे यावेळी चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी सांगितले या पत्रकार परिषदेस बी. व्ही. शेटे, सिद्धाराम जोडभावी, डॉ. आर. वाय. पाटील, रामलाल शर्मा, प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे आदी उपस्थित होते.

### मुग्धा वैशंपायन, प्रथमेश लघाटे यांची हजेरी

शनिवार दि. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री सिद्धेश्वर सहकारी बँक , कै. वि. गु. शिवदारे प्रतिष्ठान आणि सिद्धेश्वर बँक सेवक सांस्कृतिक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा स्मृती मंदिरात मर्मबंधातील ठेव या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी झी लिटल चॅम्प फेम मुग्धा वैशंपायन आणि प्रथमेश लगाटे हे उपस्थित राहणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### दफ्तराविना शाळा उपक्रमात नाविन्यावर भर

**अक्कलकोट, दि. ५ ऑगस्ट-**

शनिवारी दप्तराविना शाळा हा उपक्रम राबविला जातो. अभ्यासक्रमावर आधारित पण दप्तराविना बऱ्याच गोष्टी शिकवल्या जातात. गाणी, गोष्टी, कविता, पाढे, प्रश्नोत्तरे याबरोबरच वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नाविन्यपूर्ण विविध उपक्रम घेतले जातात. टेलिव्हिजनवर अभ्यासक्रम दाखवला जातो. तोंडी गणित, शब्दवाचन, पाठांतर स्पर्धा, खेळ, योगासन, कवायत अशा गोष्टींमुळे विद्यार्थ्यांना नवचैतन्य मिळत. झाडांची पाने, दगड-गोट्या यातून गणिती क्रिया घेतली जाते. चिखलापासून वेगवेगळ्या वस्तू बनवण्याचा आनंद काही निराळाच असतो. कागदापासून टोपी, पिशवी, होडी बनवून कार्यानुभवाचे धडे दिले जात आहे. यासाठी मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी पुढाकार घेऊन विविध उपक्रम राबवत आहेत. याला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसादही मिळत आहे. नारळाच्या झावळ्यापासून खराटा बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. यात काही विद्यार्थ्यांनी गुच्छ, फुलांचा हार बनवला. २२ ते २८ जुलैदरम्यान झालेल्या शिक्षण सप्ताहात दररोज विविध उपक्रमावर भर देऊन प्रात्यक्षिक शिक्षण देण्यात आले. अध्ययन-अध्यापनावर आधारित शैक्षणिक साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यानुभव, कागदकाम, चिखलकाम, कारागीरभेट, कारखाना भेट, चर्चा, मुलाखत, खेळ, स्पर्धा, सभा, गोड भोजन आणि समारोप अशा पद्धतीने हा सप्ताह पार पडला.

### वैद्यकीय मदत कक्षाच्या राज्य सरचिटणीसपदी सचिन सरवदे यांची निवड

**करकंब, दि. ५ ऑगस्ट-**

नजीक पिंपरी (ता. मोहोळ) येथील सचिन सरवदे यांची राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टी (अजित पवार) वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र राज्य सरचिटणीसपदी निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य प्रदेश अध्यक्ष जितेंद्र सातव यांनी दिले. राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य अध्यक्ष जितेंद्र सातव यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांना व्यापक स्वरूपात न्याय देण्यासाठी सदैव कटिबद्ध राहणार असल्याच्या भावना सचिन सरवदे यांनी यावेळी व्यक्त केल्या. या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्षाच्या म. आ. सोलापूर जिल्हा कार्याध्यक्षा प्रीती घाडगे, सांगोला वैद्यकीय कक्षाचे तालुका समन्वयक बापूसाहेब देवकते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष सोलापूर शहर अध्यक्ष तथा समन्वयक बसवराज कोळी, मोहोळ तालुका समन्वयक राहुल कुर्डे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



### वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळासाठी मुख्यमंत्र्यांकडे प्रयत्न करु : आ. पाटील

**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**

वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ करावे यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करू असे आश्वासन आमदार शहाजी बापू पाटील यांनी दिले. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्यकारणी सदस्य गोरख भिलारे व सांगोला तालुका सचिव रविराज शेटे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आमदार पाटील यांची भेट घेऊन कल्याणकारी मंडळाबाबत पाठपुरावा करावा अशी मागणी केली, त्यावेळी ते बोलत होते. पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्राचे धडाडीचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी वृत्तपत्र विक्रेत्याचे स्वतंत्र कल्याणकारी मंडळ करण्याचे आश्वासन दिले आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष राजेंद्र टिकार, पश्चिम महाराष्ट्राचे ज्येष्ठ सल्लागार शिव गोंडा खोत यांच्या मार्गदर्शनाखाली कोषाध्यक्ष गोरख भिलारे, सांगोला तालुका अध्यक्ष रविराज शेटे, सचिव उत्तम काका चौगुले, उपाध्यक्ष अमोल बोत्रे, सौ संगीता चौगुले, दत्तात्रय पवार आदी शिष्ट मंडळ आ. पाटील यांची भेट घेऊन स्वतंत्र कल्याणकारी मंडळासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करा असे सांगून त्यांना निवेदन देण्यात आले. मुख्यमंत्र्यांकडे यापूर्वी ही आपण बोललो आहे व निश्चितपणे पाठपुरावा करू, असे आश्वासन आमदार शहाजी बापू पाटील यांनी सदर शिष्टमंडळास दिले. यावेळी शिष्टमंडळातर्फे आमदार शहाजी बापू पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

### पांगरी परिसरात साठे यांना अभिवादन

**पांगरी, दि.५ ऑगस्ट-**

पांगरी पोलीस स्टेशन अंतर्गत असणाऱ्या विविध गावांमध्ये अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. त्यामध्ये चिंचोली युवराज बापू काटे, माजी पंचायत समिती सभापती व पांगरी पोलीस स्टेशन पी.ए. आय. यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. पांगरी-बाजारपेठ लहुजी वस्ताद मित्र मंडळ पांगरीचे सरपंच काकडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पांगरी - बाजारपेठ अण्णासाहेब साठे मित्रमंडळ युवराज काटे पी.एस. आय. जाधव यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पिंपळगाव सरपंच चांदणे व पोलीस पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रबुद्ध प्रतिष्ठान यांच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला. घारी-जनस्वराज्य फाउंडेशन महाराष्ट्र राज्य संचालक दशरथ उकीरडे यांनी हा कार्यक्रम आयोजित केले होते. भाजप पंचायत राज व ग्रामविकास जिल्हा अध्यक्ष विद्यान निळाखे सरपंच नंदकुमार काशीद यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी काही कार्यकर्त्यांना कार्य गौरव सन्मान पत्र देण्यात आले. प्रफुल्ल भालशंकर, मिलिंद बनसोडे, वहिद् शेख, अजित शिंदे, हनुमंत कसबे, भारत कसबे, निखील चांदणे यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. चिंचोली, घारी, पांगरी या ठिकाणी जोशाबा संस्थचे अध्यक्ष अनिले खुने यांचे व्याख्यान झाले.

# मराठा भवनला मिळणार आणखी १० कोटी

## शिवसेनेचे महेश साठे यांच्या मागणीला पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची सकारात्मकता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा नियोजन समितीची बैठक शनिवारी सोलापूर येथे पार पडली. या बैठकीमध्ये पंढरपूर तालुक्यातील विविध प्रश्नावर भडीमार करीत, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे यांनी विविध प्रश्नांची उकल केली आहे.



जिल्हा नियोजनासाठी पार पडलेल्या बैठकीमध्ये शिवसेना संपर्क प्रमुख आणि जिल्हा नियोजन समिती सदस्य महेश साठे यांनी महाराष्ट्रातील पहिले मराठा भवन पंढरपूर येथे मंजूर झाले व त्यास डीपीडीसीमधून पाच कोटी रुपये निधी मिळाला आहे. त्याबद्दल अभिनंदनचा ठराव मांडला. याच मराठा भवनासाठी अधिकच्या दहा कोटीच्या निधीची मागणी मुख्यमंत्र्यांकडे आषाढी वारीच्या निमित्ताने केली होती. तो निधी मंजूर होणार का? असा प्रश्न पालकमंत्री यांना विचारला असता पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी अधिकच्या निधीसाठी होकार दर्शविला आहे.

पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरती कर्मवीरायन सिनेमा रिलीज झाला आहे. तो सिनेमा टॅक्स फ्री करून सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना मोफत दाखविण्यात यावा.अशी मागणी केली. गाडगे महाराज, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकांसाठी निधीची मागणी केली.त्याच्यावर देखील पालकमंत्री ना. पाटील यांनी सकारात्मकता दर्शवली आहे. याबाबतची महेश साठे यांनी पूर्वीच मुख्यमंत्री शिंदे यांचेकडे केलेल्या पाठपुरावा बाबतची निवेदन पत्र दिल्याचे दाखविले. त्याच्यावर देखील कार्यवाही करण्याचे आदेश पालकमंत्री यांनी दिले आहेत.

### वाळू धोरणावर उठविला आवाज

आजच्या या धोरणामुळे शासकीय महसुलावर खूप मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होतो. वाळू धोरण हे त्या ठिकाणी मर्यादित असल्यामुळे वाळू चोरीचे प्रमाण वाढीस लागलेला आहे. त्याच्यामुळे गौण खनिजाची चोरी होऊन शासनाचे महसूल बुडत आहे आणि त्यातून गुन्हेगारीदेखील जन्माला येऊन पोलीस प्रशासनावर देखील अधिक ताण निर्माण होत आहे. त्याच्यामुळे खुले वाळू धरण केले, तर त्या ठिकाणी स्वस्तात वाळू मिळून गरजवंतांना त्या ठिकाणी त्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. त्याच्यामुळे वाळू धोरणातदेखील बदल करणे गरजेचे आहे, असा देखील प्रश्न यावेळेस मी उपस्थित केला. अशा प्रकारचे अनेक लोकहिताचे प्रश्न मांडत महेश साठे यांनी ही सभा गाजवली आहे.

एमआरईजीएस रोजगार हमीतून ९५ ५ ही ग्रामविकासच्या बरोबरीने योजना ग्रामीण भागासाठी क्रांतिकारी व व्रदयांनी ठरली आहे. या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्हा सोडला तर इतर जिल्ह्यांमध्ये, या योजनेच्या अंतर्गत हजारो कोटीची कामे झालेली आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना या योजनेच्या बाबतीमध्ये नेमकेपणाने अडचण काय आहे? आणि ती सोलापूर जिल्ह्यामध्ये का प्रभावीपणे राबवली जात नाही? याबाबत देखील प्रश्न उपस्थित केला. त्याचबरोबर डीपीडीसीच्या माध्यमातून वितरित होणारा निधी हा ग्रामीण भागासाठी गावनिहाय निकष न लावता लोकसंख्येच्या आधारावरती निकष लावून, त्या ठिकाणी निधीची असलेली मर्यादा उठविण्यात यावी. त्याचबरोबर लक्ष्मी टाकळी ही पंढरपूर शहराच्या लगत असणारे उपनगर असून, त्याठिकाणी तीस हजार लोकसंख्याची ग्रामपंचायत आहे. ग्रामपंचायत असली तरी, खऱ्या अर्थाने याचे शहरीकरण झालेले आहे. लोकसंख्या अधिक असल्याने येथील मूलभूत सुविधाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याच्यामुळे या भागातील विकासासाठी देखील अधिकचे निधीची तरतूद करावी. त्याचबरोबर यात्रा अनुदानाच्या काळामध्ये पंढरपूरला जर का त्या ठिकाणी यात्रा अनुदान दिले जात असेल. तर टाकळी भागात देखील २० ते २५ टक्के यात्रा भरत आहे.त्याच्यामुळे या गावाला भरीव असे यात्रा अनुदान मंजूर करण्यात यावे. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

वाळू धोरणाविषयी देखील प्रश्न उपस्थित केला. सध्या वाळू धोरण खुले करणे गरजेचे आहे. घरकुला सारख्या योजना असतील किंवा नागरिकांच्या बांधकामांचे प्रश्न असतील, यांना सध्या वाळूच्या धोरणामुळे नाहक जास्तीचे पैसे देऊन त्या ठिकाणी वाळू खरेदी करावी लागत आहे. त्याच्यामुळे हे वाळू बाबतचे धोरण खुले केले तर महसूल वरचा ताण आणि पोलीस प्रशासनावरचा कायदा व सुव्यवस्थेचा ताण कमी होणार आहे.

# रेशन दुकानांच्या सर्व लॉगिन आयडी सुरु कराव्यात

### स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ ऑगस्ट-**

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेकडून जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना जिल्ह्यामधील सर्व लॉगिन आयडी चालू करण्यात यावेत याबाबत निवेदन देण्यात आले.

गेल्या एक महिन्यापासून लॉगिन आयडी बंद असल्याने रेशन कार्डधारक व दुकानदारांचे काम ठप्प आहेत. डिलीट झालेले रेशनकार्ड, नवीन तयार होणारे रेशनकार्ड, नाव वाढविणे, नाव कमी करणे, तसेच शासनाकडून मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठीसुद्धा लॉगिन आयडी बंद असल्याने रेशनकार्डधारकांची अडचण होत आहे. वास्तविक पाहता सर्व कामे ही तहसील कार्यालयामधूनच झाली पाहिजेत. परंतु पब्लिक लॉगिन चालू आहे. तुम्ही ऑनलाइन करा अशा प्रकारे जिल्ह्यामधील सर्व तहसील स्तरावरून सांगितले जाते. परतु ग्रामीण भागामध्ये ५० ते ६० टक्के रेशन कार्डधारकांना पब्लिक लॉगिन विषयी काहीही समजत नाही. जरी बाहेर कोणी माहिती भरून दिली तर त्यापैकी अपवादात्मक लोक योग्य रितीने पैसे घेतात व काही ठिकाणी भरमसाठ पैसे घेतात. यामुळे रेशनकार्डधारकांना नाहक त्रास होत आहे. शासनाकडुन डिलिट झालेले रेशनकार्ड धारकांची आधार सिडिग कसा पद्धतीने करावे व कोणी करावे हा सुद्धा दुकानदारांचा प्रश्न प्रलंबित आहे. या मागणी साठी अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटने कडुन जिल्हा मधील सर्व लॉगिन आयडी सुरु करून तालुकास्तरावर व इतर लॉगिन आयडी तालुक्यामधील मंडळ अधिकाऱ्यांकडे द्यावे. यामुळे तालुक्याच्या ठिकाणी होणारी भरमसाठ गर्दी कमी होईल व ग्रामीण भागातील मोल मजूर करणाऱ्या लोकांना कामधंदा सोडून दिवस तिथं घालवण्याची वेळ येणार नाही. तसेच रेशन दुकानदारांना सुद्धा याविषयी नाहक त्रास होणार नाही. महासंघ जिल्हा संघटनेचा जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांना निवेदन दिले.

# अक्कलकोटमध्ये थंडी यात्रा भक्तिभावात

### चौडेश्वरी, लक्ष्मी, मरिआई मंदिरात विधीसाठी गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ ऑगस्ट**

आषाढ महिन्यातील शेवटच्या शुक्रवारी आणि रविवारी अमावास्या दिवशी नदीचे नवे पाणी भरलेले कलश घेऊन महिलांनी चौडेश्वरी, लक्ष्मी व मरीआई देवीला अर्पण केले. हलगी वाद्याच्या तालावर काढण्यात आलेल्या नव्या पाण्याच्या कलशाच्या मिरवणुका काढण्यात आल्या. पुरणपोळी व खिरीच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दर्शनासाठी मंदिरात एकच झुंबड उडाली होती.

बासलेगांव रस्त्यावरील साई समर्थ नगरमधील श्री लक्ष्मी मंदिरात उत्साहाचे वातावरण होते. जुन्या काळातील लक्ष्मी मंदिरात विधिवत पूजा व आरती करुन मिरवणुकीची सांगता करण्यात आली. मिरवणुकीत हलगी वाद्य, फटाक्यांची आतिषबाजी व श्री लक्ष्मी माता की जयच्या जयजयकाराने सारे वातावरण मंगलमय झाले होते. या सोहळ्यास श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, देवस्थानचे प्रमुख बाबुराव विभूते, अनिल विभूते, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, केरबा होटकर, नागराज कुंभार, नन्नू कोरबू, मनोज निकम, अभिषेक लोकापुरे, माजी सैनिक अनिल हत्ते, चंद्रकांत दसले, दिगंबर साळुंके, बसवराज आगरखेड, चंद्रकांत पाटील, विजयकुमार हौदे, प्रशांत गुरव, रमेश शिंदे, मल्लिकार्जुन सोमेश्वर, दिलीप कुंभार, गुरु दुर्गे, शेखर उंबराणीकर, बसवराज शिवगुंडे, विरुपाक्ष कुंभार, विष्णुदास सांगळे आदी मान्यवर उपस्थित होते.



### पोतराजांच्या खेळाचे आकर्षण

आषाढी यात्रेनिमित्त रविवारी अमावास्या दिवशी श्री लक्ष्मी देवीची विधिवत पूजा करण्यात आली. सकाळी देवीला अभिषेक करण्यात आला. यावेळी पोतराजांनी चाबकाने विविध प्रकारचे खेळ सादर करून उपस्थितांची मने जिंकून घेतली.

# बार्शीत रविवारी शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. त्याच अनुषंगाने रविवार दि. ११ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे बार्शी दौऱ्यावर येणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते विश्वास बारबोले म्हणाले की, रविवारी सकाळी सकाळी १० वा. जुना गांधी पुतळा या ठिकाणी शरद शेतकरी संवाद मेळावा होणार असून स्वतः शरद पवार यावेळी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, आ. रोहित पवार, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख उपस्थित राहणार आहेत. खा. धैर्यशील मोहिते-पाटील आणि ओमराजे निंबाळकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. बारबोले म्हणाले की, आम्ही महाविकास आघाडी म्हणून पक्षाचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो मान्य करणार आहोत. याशिवाय आगामी बाजार समितीच्या निवडणुकीत आम्ही महाविकास आघाडी एकत्र ताकतीने लढून बाजार समितीवर सत्ता आणणार असल्याचा निर्धार बोलून दाखवला.



याप्रसंगी तालुकाध्यक्ष महेश चव्हाण, शहराध्यक्ष किरण देशमुख, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सुवर्णा शिवपुरे, कृष्णराज बारबोले, भारत देशमुख, जॉन चोप्रा, जाधवर उपस्थित होते.

# साडेतेरा लाखांची फसवणूक; व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

साडेतेरा लाख रुपयांच्या फसवणुकप्रकरणी सुपारी व्यापाऱ्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मुसा कमालशाह मुर्शद (वय ६५, रा. शास्त्री नगर, बाळासाहेब ठाकरे हॉस्पीटलच्या मागे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इक्बाल महमद हुसेन शेख (वय ३८, रा. महात्मा फुले नगर, मजरेवाडी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुसा मुर्शद व इक्बाल शेख हे एकमेकांच्या परिचयाचे असून मुसा मुर्शद यांचे शास्त्री नगर परिसरातील मौलाली चौकात एस एम ट्रेडर्स नावाचे दुकान आहे. एप्रिल २०२४ मध्ये इक्बाल शेख याने मुसा मुर्शद यांचा विश्वास संपादन करून त्यांच्या एस एम ट्रेडर्स या सुपारी मालाच्या दुकानातून १३ लाख ४२ हजार ९२७ रुपयांचा सुपारीचा माल खरेदी केला होता. या मालाचे पैसे शेख याने मुर्शद यांना दिलेले नव्हते. मुर्शद यांनी मालाचे पैसे मागितले असता शेख यांनी पैसे न देता पळून जाऊन मुर्शद यांची फसवणुक केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बनकर पुढील तपास करीत आहेत. सोलापुरात फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत.

# कासेगावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

### कासेगावला जिल्हास्तरीय क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत पुरस्कार प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा क्षयरोग केंद्राच्या वतीने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबवण्यात येतो. त्याअंतर्गत क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हे अभियान चांगल्या पद्धतीने राबवून क्षयरोगाबद्दल जनजागृती व रुग्णांवर प्रभावी उपचार केल्याबद्दल कासेगाव ग्रामपंचायतीला जिल्हाधिकारी डॉ. कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

११ तालुक्यांतून ५६ ग्रामपंचायती यासाठी निवडण्यात आल्या आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातून एकमेव कासेगाव ग्रामपंचायतची निवड झाली. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात कासेगाव ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच यशपाल श्रीकांत वाडकर, ग्रामसेवक बाळासाहेब चौगुले यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी जिल्हा क्षयरोग नियंत्रण अधिकारी मीनाक्षी बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शेळकंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले उपस्थित होते. क्षयरोग निर्मूलनाच्या गोळ्यांची तीस हजार पाकिटे पुरवल्याबद्दल प्रिसिजन फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख माधव देशपांडे, संदीप पिसके यांचाही सत्कार करण्यात आला. ही मोहीम राबवण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी घोगरे, आरोग्य पर्यवेक्षक अमोल मोरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कासेगाव आरोग्य उपकेंद्राच्या डॉ. सायली चांदेकर, परिचारिका चौगुले आशा सेविका यांनी यासाठी अथक परिश्रम घेतले.

# ऐन पावसाळ्यात अक्कलकोटला दहा दिवसाआड पाणी

### पाण्याचा वनवास संपेना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ ऑगस्ट-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीस ऐन पावसाळ्यात नगरपरिषदेकडून दहा दिवसात पाणीपुरवठा होत असून पाणी असो अथवा नसो अक्कलकोटकरांचा पाण्याचा वनवास मात्र अद्याप पर्यंत संपण्यास तयार नाही . नगरपरिषदेत मुख्याधिकारी नव्याने रुजू होतात आणि आपला कार्यकाळ संपला की निघून जातात. केवळ आश्वासनांच्या खैराती आता नको असा आवाज जनतेतून येत आहे.





तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीचा नावलौकिक हा अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांच्या वास्तव्यामुळे व समाधीमुळे जगभर पसरला आहे. या समर्थांच्या नगरीला पाणी असो अथवा नसो नगरपरिषदेकडून दहा दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात आला आहे. सध्या पावसाळा सुरू असून कुरनूर धरणात २८ ते ३० टक्के पाणी आहे. इतके मुबलक पाणी असताना नगरपरिषद प्रशासनाकडून अक्कलकोटकरांना दहा-बारा दिवसाआड पाणीपुरवठा करून त्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहण्याचा प्रकार होत आहे. पाणी जर मुबलक नसताना टंचाईच्या काळात जर पाणीपुरवठ्यास विलंब झाला तर त्यास कोणतीच हरकत नाही. पण सध्या कुरनूर धरणात मोठा जलसाठा असताना नगरपरिषेकडून दहा दिवसाआड पाणीपुरवठा करून नागरिकांवर अन्याय करण्याचा प्रकार सुरू आहे. याबाबत नगर परिषदेच्या मागील काळातील मुख्याधिकारी यांना विचारल्यास निधी नाही काम चालू आहे स्टोरेज टाक्या नाहीत ही गुळगुळीत उत्तरे आजपर्यंत अनेक वर्षांपासून मिळत आले आहेत. कुरनूर धरणातून सध्या अक्कलकोटातील नागरिकांना पाणीपुरवठा होत आहे .पूर्वी हिळ्ळी जलाशयातून पाणी उपसा करून अक्कलकोटला पाणीपुरवठा करण्यात आला होता, हिळ्ळी अक्कलकोट जलवाहिनीची पाईपलाईन नादुरुस्त झाल्याने ही पाणीपुरवठा योजना बंद करण्यात आली.सध्या हिळ्ळी बंधार्यात वीर धरणातून पाणी सोडल्याने हा बंधारा ओवर फ्लो झाला आहे. याठिकाणचे पाणी कर्नाटकात जात आहे. सर्वत्र मुबलक पाणी असताना नगरपरिषद प्रशासनाने निदान अक्कलकोटकरांना तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

### टाकी बांधण्याचे काम संथगतीने

अक्कलकोट शहरात अनेक ठिकाणी नवीन पाण्याच्या टाक्या उभारणीचे काम सुरू आहे. पण ठेकेदारांकडून सदरचे काम संथगतीने सुरू आहे. या कामाची चौकशी नूतन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी करावी. सध्या कुरनूर धरणातील पाणीसाठा पाहता नगर परिषदेने तीन चार दिवसाआड अक्कलकोट शहरास पाणीपुरवठा करावा जेणेकरून अक्कलकोटकरांना पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येणार नाही. नगर परिषदेचे नूतन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हजरत पीर शेख मदारशाह कादरी (रहे) यांचा उद्यापासून उरुस

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ ऑगस्ट -**

सालाबादाप्रमाणे यंदाही जेऊर (ता.अक्कलकोट) येथील हजरत पीर शेख मदारशाह कादरी, अतिकी, अलकदिरी (रहे.) यांचा २४ वा उरुस बुधवारपासून प्रारंभ होत आहे. हलकट्टा शरीफ येथील जानशीने हजरत साहेब कदिरी, ख्वाजा सय्यद अबुतुराबशाह कादरी, चिश्ती, यमनी, बंदानवाजी, तुराब कदरी यांच्या असिम कृपाशिर्वादाने जेऊर (अक्कलकोट स्टेशन रोड) येथील हजरत पीर शेख मदारशाह कादरी, अतिकी, अलकदिरी (रहे.) यांचा उरुस बुधवार, दि. ७ ऑगस्टपासून प्रारंभ होत आहे. सायंकाळी ७ वा. गावातील लहान मशिदीपासून संदल शरीफ (गंध)ची मिरवणूक निघणार असून प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत संदलचा कार्यक्रम पार पडणार आहे. गुरुवार, दि. ८ ऑगस्ट रोजी चिरागाँ (दिपोत्सव) व महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता



जियारत व फातेहाखानी होऊन महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भाविकांनी वरील कार्यक्रमास उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जानशीन हजरत महिबुबशाह कादरी खलिफाये हजरत साहेब कदिर यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### स्वेरीच्या प्रा. मीनल भोरे यांना पीएच. डी पदवी प्रदान

**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

पुणे येथील एआयएसएसएमएस व्यवस्थापन संस्थेमध्ये स्वेरीच्या एमबीए विभागात कार्यरत असलेल्या प्रा. मीनल मारुती भोरे यांनी पुणे जिल्ह्यातील 'फास्ट मूव्हिंग हेल्थ गुड्स (एफएमएचजी) कंपन्यांनी अवलंबलेल्या विपणन रणनीतींचा अभ्यास' या विषयावर शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च असणारी पीएच. डी. पदवी संपादन केली. प्रा. मिनल भोरे यांना एआयएसएसएमएस या व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. अभिजित आर. मंचरकर यांनी मार्गदर्शन केल. त्यांचे संशोधन हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेतून झाले असून त्यांचा 'विपणन व्यवस्थापन' हा मुख्य विषय होता. त्यांनी ३५ परिषदांमध्ये शोध पेपर सादर केले आहेत. तसेच ५ पेपर प्रकाशित झाले आहेत. त्यांचे संस्थापक सचिव प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, ॲड. धनश्री किरण घाडगे, अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. एम.एम. पवार, प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे यांनी अभिनंदन केले.



### मुख्याधिकारी रमाकांत डाके यांचा सत्कार

**मैंदर्गी, दि. ५ ऑगस्ट-**

दुधनी नगरपालिकेचे नूतन मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी पदभार घेतला. यावेळी भाजयुमोचे माजी उपाध्यक्ष बसवराज हौदे, बसवराज गुरुभेट्टी यांनी त्यांचा सत्कार केला. १५ हजार लोकसंख्या असलेल्या दुधनीत स्वच्छता, पाणी, आरोग्य, शिक्षण या सोयीसुविधा देण्याची म ागणी केली. मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याबरोबरच आवश्यक बाबींची तात्काळ पूर्तता करण्यात येईल, असे मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले.

### मोबाईलद्वारे ई-पीक पाहणी नोंद करा : शेख

**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

१ ऑगस्टपासून खरीप हंगाम २०२४ करिता शेतकरी स्तरावरुन मोबाईल व्दारे ई - पिक पाहणी नोंद सुरु करण्यात आली आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी कृपया ई पीक पाहणी व्हर्जन ३.०.२ प आपल्या मोबाईल हँडसेटमध्ये अदयावत करुन घ्यावे. आपल्या शेतातील पिकाची नोंद लवकरात लवकर पूर्ण करुन घ्यावी. शासनाकडून पीक विमा योजना मदत, नैसर्गीक आपत्तीचे अनुग्रह अनुदान जाहीर झालेनंतर पीक पेराची नोंद पीक पाहणी पव्दारे झालेली नसल्यास अनुदान बाधीत शेतकरी यांना अनुदान मिळण्यास अडचण निर्माण होऊ शकते. तरी तालुका प्रशासनाकडून जाहीर अवाहन करण्यात येत आहे की, सर्व शेतकरी बंधू भगिनींनी आपआपल्या शेतातील पीक पेराची नोंद तात्काळ ई-पीक पाहणी पमधून करावी. याकामी अडचण उद्भवल्यास संबंधीत गावचे तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक, मंडळ कृषी अधिकारी, मंडळ अधिकारी महसूल, तालुका कृषी अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय बार्शी यांचेशी संपर्क साधावा, असे तहसीलदार एफ.आर. शेख यांनी कळविले आहे.

# माढा तालुक्यात आताही तुतारीचीच हवा!

### आता कोण हवे रणजितसिंह की धनराज?

### आ. बबनराव शिंदेंनी पुण्यात शरद पवारांची तर रमेश शिंदेंनी दिल्लीत घेतली खा. सुप्रिया सुळेंची भेट











**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ५ ऑगस्ट-**

माढा लोकसभेच्या निवडणुकीत अकलूजच्या धैर्यशिल मोहिते-पाटलाकडून फलटणकर रणजितसिंह नाईक-निंबाळकरांचा झालेल्या दारूण पराभवाने संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात शरद पवारांच्या तुतारीचीच जोरदार हवा आहे.

माढा विधानसभा मतदारसंघामध्येही सुरूवातीपासूत शरद पवार व मोहिते-पाटील यांना माननारा मोठा वर्ग आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला असून विद्यमान आ. बबनराव शिंदे यांचे जेष्ठ सुपुत्र रणजितसिंह शिंदे व पुतण्या धनराज रमेश शिंदे यांच्या आमदारकीच्या प्रचंड ईच्छाशक्तीने परस्पर विरोधी भूमिका घेऊन निवडणुका लढवण्याचे संकेत मिळत आहेत. यातच शिंदे घराण्याचे २५ वर्षांचे राजकीय विरोधक मोहिते-पाटील यांच्या बंगल्यावर जात धनराज शिंदे यांनी खा. धैर्यशिल मोहिते-पाटील यांची भेट घेतली तर आ. बबनराव शिंदे व रणजितसिंह शिंदे यांनीही पुणे येथे शरद पवार यांची भेट घेतली.दोन्ही ठीकाणच्या भेटीचा तपसील अद्याप बाहेर आला नसला तरी सस्पेन्स मात्र कायम राहीला आहे. आ. बबनराव शिंदे हे राष्ट्रवादी काँग्रेस फुटीनंतर अजित पवार गटात सामील झाले. मात्र लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांची संपूर्ण महाराष्ट्रातच नाचक्की झाली अन् शरद पवार यांना सहानभूती मिळत राज्यात शरद पवार यांच्या पक्षाची ताकद वाढली.त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षात येणाऱ्यांची संख्या वाढली. मागील आठवड्यात आ. शिंदे यांचे बंधू रमेश शिंदे यांनी दिल्ली येथे खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेतली तर आ. रोहित पवार यांच्या मध्यस्थीने धनराज शिंदे यांनीही पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतल्याचे सांगण्यात येते. दोनच दिवसापुर्वी राजेंद्र पवार यांनी धनराज शिंदे यांच्या घरी येऊन भेट घेतली. या भेटींचा तपसील भाहेर आला नसला तरी धनराज शिंदे यांच्या उमेदवारीवर चर्चा झाली असावी असे म्हटले जाते. तसे पाहिले तर कुर्डूवाडी पं. स. मधील कै.आ. विठ्ठलराव शिंदे यांच्या पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी शरद पवार आले असता त्यांनी धनराज शिंदे यांना बोलावून पंधरा मिनटे चर्चा केली होती. त्यांनी धनराज यांचे कार्याचे कौतुकही केले होते.

आ. बबनराव शिंदे यांनी तीस वर्ष माढा तालुक्यावर अधिराज्य गाजवले व तालुक्याचा कायपालट केला, हे कोणीही विसरू शकणार नाही. तालुक्याचा जो विकास झाला आहे तो केवळ आ. बबनराव शिंदे यांनीच केला आहे हे त्रिवार सत्य आहे. त्याबाबत कोणाचेही दुमत नाही. शरद पवार यांच्याबरोबर आ. बबनराव शिंदे, रणजितसिंह शिंदे यांची झालेल्या बैठकीत काय चर्चा झाली. हे अद्याप स्पस्ठ झालेले नाही. मात्र रणजितसिंह यांना तुतारीकडून तिकीट मिळावे, यासाठी बैठकीत चर्चा नक्कीच झाली असावी. असे असले तरी येणाऱ्या निवडणुकीत आ. बबनराव शिंदे निवडणूक लढवणार नसल्याने यावेळेला मात्र तरुणांमध्ये क्रेझ असलेले धनराज शिंदे यांनीच निवडणूक लढवावी असा तरूण वर्गाचा वाढता दबाव धनराज शिंदे यांच्यावर आहे.

#### बेंद ओढ्याची संकल्पना पूर्ण

धनराज शिंदे यांनीही माढा वेल्फेअर फौउंडेशनच्या माध्यमातून ३५ किलोमीटर लांब असलेल्या बेंद ओढ्याची संकल्पना प्रत्यक्षात राबवली आहे. याचा फायदा तालुक्यातील ६५ हजार एकर क्षेत्रावर होणार आहे. विठ्ठल-गंगा फार्मस प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या माध्यमातून शेतकऱ्यांना भरीव योगदान दिले आहे तर माढा वेल्फेअर फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटपासह विविध सामाजिक उपक्रम त्यांनी राबवले आहेत.

#### तरुणाईचे जाळे अन् गावागावात गट

माढा तालुका पंचायत समिती सदस्य म्हणून राजकीय आखाड्यात कमी वयात उतरलेले धनराज शिंदे यांच्या मित्रमंडळांसह कार्यकर्त्यांचा गट, जाळेही तालुकाभर पसरले आहे. त्यातच भर म्हणून की काय माढा मतदारसंघात तरूणांचा वाढलेला मतदानाचा टक्का पाहता या तरूणाईला भावी आमदार म्हणून धनराज शिंदेंची भुरळ पडली असल्याचे सर्रास चित्र दिसून येत आहे.

## स्वीकृत नगरसेवक अरविंद खरात यांनी स्वखर्चातून केला रस्ता

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ५ ऑगस्ट-**

स्वीकृत नगरसेवकपदी निवड झालेले माढा नगरपंचायतीचे नूतन नगरसेवक अरविंद खरात यांनी १ लाख रुपये स्वखर्चातून हॉटेल अभिराज ते बोधले वस्ती येथील रस्ता केला आहे.

माढा नगरपंचायत हद्दीतील बोधले वस्ती इकडे जाणाऱ्या रस्ता पावसाने खराब होऊन पाऊस पडल्यानंतर चिखलामुळे शाळकरी मुले व शेतकऱ्यांचे त्या रस्त्याने जाणे अवघड झाले होते. यामुळे नगरसेवक अरविंद खरात यांनी स्वखर्चातून हा रस्ता करून विद्यार्थी व नागरिकांचे जाण्या-येण्याची सोय केल्याने त्यांचे कौतुक केले जात आहे. विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन नगरसेवक अरविंद खरात यांनी स्वखर्चातून रस्त्यावर मुरुमीकरण करून नागरिकांची सोय केली असल्याने नगरसेवक अरविंद खरात यांचे शंभुराजे चवरे, माढा युवा सेना प्रमुख स्वप्निल खरात, महेश खरात, बबलू माने, नवनाथ गोटे, श्रीकांत गिरी, विपुल कदम, शुभम चव्हाण, बाबा गोटे, दत्तात्रय राऊत, नागेश बोधले यांनी कौतुक करून आभार मानले. अरविंद खरात बोलताना म्हणाले, मला माढा शहर विकास आघाडीने माझ्यावर विश्वास ठेवून माढा नगरपंचायत मध्ये स्वीकृत नगरसेवक पदी निवड करुन या पदावर काम करण्याची संधी दिली आहे. त्याचा मी योग्य वापर करून तळागाळातील नागरिकांसाठी



व गरजूंसाठी काम करणार आहे. हॉटेल अभिराज ते बोधले वस्ती हा रस्ता पावसामुळे चिखलमय झाला होता, त्यामुळे शाळकरी मुले व शेतकऱ्यांची गैरसोय दिसून येत असल्याने मी हा रस्ता तत्काळ स्वखर्चातून करून त्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा रस्ता केला आहे.

## जनसंवाद यात्रेतून जनतेचा कौल घेऊन दिशा ठरवणार : ॲड. धनाजीराव साठे

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ५ ऑगस्ट-**



माढा विधानसभा म तदारसंघात काँग्रेस, साठे गटाकडून १५ ऑगस्टनंतर जनसंवाद यात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेतून जनतेचा कौल घेऊन राजकारणातील पुढील दिशा ठरवणार असल्याचे माजी आ. ॲड. धनाजीराव साठे यांनी सांगितले.

जगदाळे मंगल कार्यालय येथे माढा तालुक्यातील काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. ॲड. मीनल साठे या आमदार व्हाव्या अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे, तशीच माझी इच्छा आहे. माढा लोकसभा मतदारसंघात आत्तापर्यंत साठे गटाने महाविकास आघाडीचे प्रामाणिकपणे काम केले आहे. परंतु फक्त गरजेच्या वेळेसच साठे कुटुंबाचा विचार केला जातो. मागील ३० वर्षांहून अधिक काळ सत्ताधाऱ्यांचे निर्विवाद वर्चस्व म ाढा मतदारसंघावर असतानादेखील तालुक्यातील पाणी शैक्षणिक आरोग्य औद्योगिक क्षेत्रातील विकासाचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे येणारी विधानसभा निवडणूक मी लढवणार आहे. त्यासाठी जनतेशी संवाद साधण्यासाठी १५ ऑगस्टनंतर माढा मतदारसंघातून जनसंवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे ॲड. मीनल साठे यांनी आवाहन केले आहे. यावेळी उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, सचिन कापसे, वाकावकर, सौरभ कदम, नवनाथ इंगळे, हरिभाऊ खताळ, बाळासाहेब पवार, सुनील मोरे, राहुल पाटील, भाऊ वाघ, नारायण गायकवाड, अनिल काटे, विजयसिंह पाटील, बाबूराव मोहिते यांनी विचार व्यक्त केले. प्रास्ताविक युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शाहुराजे जगताप यांनी केले. सूत्रसंचालन समाधान लटके यांनी केले.

#### साठे गट संपवण्याचा घाट

आतापर्यंत राजकारणात ज्यांना सहकार्य केले, त्यांनीच साठे गट संपवण्याचा आटोकाट प्रयत्न केल्याची टीका संत कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे यांनी केली.

## करकंबमध्ये यात्रेनंतर स्वच्छता मोहीम



### रामभाऊ जोशी हायस्कूल, जागर स्वच्छता अभियान टीमचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ५ ऑगस्ट-**

करकंब येथे झालेल्या मगदूम बाबांच्या ऊरुसानिमित्त मोठ्या प्रमाणात यात्रा भरली होती.या यात्रेनंतर या परिसरात मोठ्या प्रम ाणात कचरा निर्माण झाला होता त्यातच पाऊस पडल्याने सगळीकडे दुर्गंधी पसरली. या कचऱ्याचे निर्मूलन व्हावे म्हणून जागर स्वच्छता अभियान टीम व रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब यांच्यावतीने दोन दिवस त्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण कचरा एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

यात्रा कालावधीत जेव्हढी काळजी घेतली जाते त्यापेक्षा दुप्पट काळजी यात्रा झाल्यानंतर घेणे आवश्यक आहे.याच भुमिकेतून जागर स्वच्छता अभियान टीमच्यावतीने गेल्या ३ वर्षांपासून सातत्याने प्रत्येक रविवारी २तास एका भागाची स्वच्छता केली जाते.यावेळी रामभाऊ जोशी हायस्कूलचे प्राचार्य हेमंत कदम,महादेव पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली या स्वच्छता उपक्रमात शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनींचा सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. प्रत्येक शाळेने महिन्यातून ३ तास वेळ दिला तर निश्चितच करकंब गाव स्वच्छ होण्यास महत्वाचा हातभार लागनार आहे.स्वच्छता हा खुप मोठा व निरंतर चालणारा विषय असला तरी तो प्रत्येक व्यक्तींने मनावर घेऊन आपापला परिसर स्वच्छ ठेवल्यास स्वच्छता विषय सोपा होईल.यासाठी सर्व करकंबमधील नागरिकांनी स्वच्छतेविषयी जबाबदारी पार पाडावी असे जागर स्वच्छता अभियान टीमच्यावतीने आवाहन करण्यात आले. जागर टीमचे ज्ञानेश्वर दुधाणे, रमेश खारे, अंजली टकले, वृषाली बोधे, सविता दुधाणे, कविता शेटे, पूजा रणदिवे, बापू खारे, सुधीर रणे, शार्दुल रणे, आशा टकले उपस्थित होते.

जागर स्वच्छता अभियान टीमच्या वतीने गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने प्रत्येक रविवारी दोन तास एका भागाची स्वच्छता केली जाते. परंतु लोकांमध्ये जनजागृती करुनसुध्दा लोक रस्त्यावर कचरा टाकत आहेत. हॉटेल, टपरीधारकांनी रस्त्यावर खरकटा कचरा टाकू नये. सध्या पावसाळी वातावरण असल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरते आहे. त्यामुळे कचरा घंटागाडीतच टाकून सहकार्य करावे.

**-बापू खारे, स्वच्छता दूत**

## स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनतर्फे प्रसाद वाटपाचा शुभारंभ

### हत्तरसंग कुडल येथील संगमेश्वर मंदिरात उपक्रमाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ ऑगस्ट-**

पवित्र श्रावण मासानिमित्त स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनच्या वतीने दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध मंदिरात दर सोमवार आणि शनिवारी ११ हजार भक्तांना प्रसाद वाटप उपक्रमाचा शुभारंभ सोमवारी हत्तरसंग कुडल येथील श्री संगमेश्वर मंदिरात संस्थापक सोमनाथ वैद्य यांच्या हस्ते करण्यात आला.

स्वयंम् शिक्षा फाऊंडेशनच्या वतीने श्रावणमासानिमित्त दर सोमवार आणि शनिवारी पहाटे ५ ते ७ वाजण्याच्या दरम्यान दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध मंदिरात ११ हजार भक्तांना प्रसाद वाटप करण्यात येणार आहे. हत्तरसंग कुडल येथील श्री संगमेश्वर मंदिरात महापूजा आणि अभिषेक करुन सोमनाथ वैद्य यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी सोमनाथ वैद्य यांनी श्रावण मासानिमित्त शुभेच्छा दिल्या. या स्तुत्य उपक्रमाचे उपस्थित महिला व पुरुष भक्तांनी कौतुक केले. या उपक्रमांतर्गत प्रसाद म्हणून शाबु खिचडी, शेंगा लाडू, राजगिरा लाडू, सेंद्रिय केळींचे वाटप करण्यात आले. यावेळी महिलांना पर्सचे वाटपही करण्यात आले. याप्रसंगी काशिनाथ भतगुणकी उपस्थित होते.



#### दक्षिण सोलापूर तालुक्याच्या विकासासाठी कटिबद्ध : वैद्य

पवित्र श्रावण मासानिमित्त मोठ्या संख्येने भक्तगण उपवास करतात. यानिमित्ताने तालुक्यातील सर्व मंदिरात दर सोमवार व शनिवारी प्रसाद वाटप करण्यात येत आहे. ११ हजार भक्तांना हा प्रसाद वाटप करण्यात येत आहे . दक्षिण सोलापूर तालुक्याच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे. स्वयंम शिक्षा फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून मदत करण्याचा प्रयत्न आहे, असे स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक सोमनाथ वैद्य यांनी सांगितले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## जि.प.कन्या प्रशालेत बाल संसदसाठी निवडणूकीत शाळा गुणवत्ता विकास पॅनल विजयी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.५ ऑगस्ट -**



धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत बाल संसदसाठी ३ ऑगष्टला निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीत शाळा गुणवत्ता पॅनल विजयी झाले.

निर्णय क्षमता वाढविणे, नेतृत्व क्षमता वाढविणे, स्वयं विकास करणे, सहकार्य भावना रुजवणे, वैयक्तिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव होणे यासह लोकशाहीची रुजवणूकीचा बालसंस्कार व्हावा या हेतूने बाल संसद निवडणुकीत घेण्यात आली. या निवडणुक प्रक्रियेत इयत्ता पहिली ते सातवी वर्गातील विद्यार्थीनींनी मतदानाचा हक्क बजावला आहे. या निवडणुकीत शाळा गुणवत्ता विकास पॅनलचे चिन्ह पुस्तक होते तर शाळा परिवर्तन विकास पॅनलचे चिन्ह पेन होते. बाल संसद निवडणुकीत शाळा गुणवत्ता विकास पॅनल (पुस्तक) विजयी झाले. ही संकल्पना मुख्याध्यापिका सुरेखा कदम यांची होती. निवडणूक अधिकारी म्हणून सुशिल क्षिरसागर यांनी काम पाहिले. तर बाल संसद निवडणुकीसाठी प्रतिभा जोगदंड, पल्लवी पवार, ज्योती गाढवे, रामहरी पसारे, मालोजी वाघमारे, काशीनाथ नरसाळे, सरोजिनी वाघमरे यांनी परिश्रम घेतले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### संभाजीनगर शाळेत शालेय मंत्रिमंडळ

**जळकोट, दि.५ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, संभाजीनगर भाग शाळेत शालेय मंत्रिमंडळ स्थापन करण्यासाठी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पार पडली. यात विद्यार्थ्यांनी मतदान केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, संभाजीनगर, जळकोट या ठिकाणी शालेय मंत्रिमंडळ निवडणूक संपन्न झाली.निवडणुकीमध्ये विजय उमेदवाराचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची निवड करून खाते वाटप करण्यात आले. मुख्यमंत्रीपदी राम सोनटक्के तर उपमुख्यमंत्रीपदी कावेरी कलशेट्टी यांची निवड करण्यात आली. निवडणूक मुख्याध्यापक धनराज रेणुके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शालेय मंडळ निवडणूक कामकाज यशस्वी होण्यासाठी नीलकंठ इटकरी, भोसले, अभिवंत, आहेरकर, वणवे, रेणुके व महामुनी यांनी सहकार्य केले.

### कलदेव निंबाळा येथे बाल संरक्षण कक्षाची जनजागृती

**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील कलदेव निंबाळा येथील शहीद भगतसिंग हायस्कुलमध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाकडून नुकताच जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम प्रभारी जिल्हा महिला बालविकास ए.बी. कांबळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात बाल हक्क,मुलांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. महिला व बाल विकास विभागाच्या बालकांसंबंधीच्या विविध योजनांची, १०८९ बाबतची माहिती देण्यात आली. मुलांना होणारा चांगला स्पर्श-वाईट स्पर्श याबददल जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या जयश्री पाटील यांनी माहिती दिली. यावेळी जि.प.प्रा.शाळेच्या मुख्याध्यापिका आर.आर.पाटील, सहशिक्षक बदिमे, के.के.गायवाड, पी.डी.पावशेरी, सतीश गायकवाड, मसलगे, शालेय समिती अध्यक्ष वसंत कारभारी, माजी शालेय समिती सदस्य सिध्दार्थ गायकवाड उपस्थित होते. शहीद भगतसिंग हायस्कुलचे सहशिक्षक रेवरे, मते, बाळेकर, सरपंच, सदस्य यांनी सहकार्य केले.

### १ सप्टेंबरपासून होणार २१ वी पशुगणना


**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

पशुपालनास चालना देण्यासाठी व पशुधनविषयक कार्यक्रमांच्या आर्थिक व भौतिक नियोजन आराखडे आणि अंदाजपत्रके तयार करण्यासाठी दर पाच वर्षांनी पशुगणना कार्यक्रम राबविण्यात येतो.आतापर्यंत २० पशुगणना कार्यक्रम राबविण्यात आले. जिल्हयात ०१ सप्टेंबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत २१ वी पशुगणना सन २०२४ कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.पशुगणना कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्ह्यातून शहरी व नागरी विभाग मिळून १११ प्रगणक आणि २६ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु आहे. पशुगणना कार्यक्रमाकरीता मोबाईल ॲपचा वापर होणार आहे.जिल्हयात पशुगणना कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची कार्यशाळा २५ जुलै रोजी यशदा पुणे येथे घेण्यात आली.याच कालावधीत धाराशिव जिल्ह्यात ही पशुगणना कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील शेतकरी-पशुपालकांनी पशुधनाची माहिती देऊन सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे.

### आर्थिक फसवणूकीपासून सावध राहण्याचे डाक विभागाचे आवाहन

**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

इंडिया पोस्ट ऑफिसच्या नावे मोबाइलवर फसवणुकीचे / फ्रॉड संदेश,कॉल आणि वेब लिंक येत आहेत.ज्यामध्ये पत्ता अपडेट करणे किंवा बँक खाते अपडेट करण्यासंदर्भात चौकशी करण्यासह वेबलिंक पाठवली जात आहे.त्याव्दारे ओ.टी.पी.विचारला जाउन जनतेची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे प्रकार समोर येत असून यापासून जनतेने सावध राहावे. असे आवाहन भारतीय डाक विभागाने केले आहे. मात्र अशा कुठल्याही प्रकारचे एसएमएस,कॉल किंवा वेबलिंक भारतीय डाक विभागाकडून पाठवले जात नसून कुठल्याही प्रकारचा ओटीपी भारतीय डाक विभाग मागत नाही.यामुळे जनतेने यापासून सावधान राहून आर्थिक फसवणूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे इंडिया पोस्ट ऑफिससंदर्भातील असे मोबाइलवर खोटे,फसवणुकीचे/फ्रॉड संदेश,कॉल आणि वेब लिंकला जनतेने प्रतिसाद देऊ नये.असे आवाहन धाराशिव डाक विभाग अधीक्षक संजय अंबेकर यांनी केले आहे.



मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे दि. ६ ऑगस्ट रोजी तुळजापुरच्या पुण्य पावण नगरीत येऊन आई तुळजाभवानीचे दर्शन घेतल्यानंतर तुळजापूर शहरात मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने सकल मराठा समाजाच्या वतीने सर्व जाती धर्माच्या वतीने ठिकठिकाणी सत्कार होणार आहे. त्यानंतर लोहिया मंगल कार्यालय येथे मुक्कामी असुन दि.७ ऑगस्ट रोजी पश्चिम महाराष्ट्रात शांतता रॅलीसाठी सकाळी प्रयाण करतील.

# भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष बसवराज पाटील यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**



आगामी विधानसभा निवडणुकी संदर्भात शासकीय विश्रागृह धाराशिव येथे भाजपा ओबीसी पदाधिकारी व कार्यकर्ता यांची जिल्हा बैठक संपन्न झाली.

या बैठकीला भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा प्रभारी बसवराज पाटील, लोकसभा निवडणूक प्रमुख नितीन काळे, भाजपा ओबीसी मोर्चा लोकसभा प्रमुख विजय शिंगाडे उपस्थित होते.

यावेळी विजय शिंगाडे यांनी ओबीसी मोर्चा लोकसभा प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल नितीन काळे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जोमाने कामास लागावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी पिराजी मंजुळे, गणेश सोनटक्के, आदेश कोळी, विलास राठोड, प्रमोद बचाटे, महेंद्र बिदरकर, दाजी आप्पा पवार,

रणजीत हापटे, सतीश वैद्य, राम जवान, राम लवटे, फिरोज मुजावर, पांडुरंग लाटे गुरुजी जिल्ह्यातील ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी घेतले श्रीतुळजाभवानी दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी सोमवार दि ५ रोजी दुपारी ३ सुमारास श्रीक्षेत्र तुळजापूर येथे येवुन श्रीतुळजाभवानी मातेची मनोभावे पुजा करुन यथासांग दर्शन घेतले.

यावेळी त्यांची पुजा त्यांचे पारंपारिक पुजारी कुमार दिंगबर इंगळे व त्यांचे पुत्र सागर इंगळे यांनी केले.यावेळी राज ठाकरे सुमारे हात जोडुन श्रीतुळजाभवानी मातेस प्रार्थना केली. यावेळी बाळा नांदगावकर, शाम जाधव, दिलीप धोत्रे, मंदीराचे विश्वास परमेश्वर, जिल्हा उपाध्यक्ष महेश जाधव, निलेश परमेश्वर, मयुर गाडवेसह जिल्ह्यातील मनसे पदाधिकारी उपस्थितीत होते.

## १५ ऑगस्टपर्यंत पशुसंवर्धन पंधरवाडा कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे

### जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**



पशुसंवर्धन विभागाचे काम लोकाभिमुख होण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून पशुपालकांना फायदा व्हावा यासाठी १ ऑगस्टपासून १५ ऑगस्टपर्यंत पशुसंवर्धन पंधरवाडाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील पशुपालकांच्या पशुपालनातून उत्पन्नात हातभार लावण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येतात.यामध्ये प्रामुख्याने पशुधनाचे कृत्रिम रेतन, वंध्यत्व निवारण, लसीकरण इ. प्रमुख योजना आहेत. यासोबतच पशुधनास ओळख प्रदान करण्यासाठी टॅगिंग व भारत पशुधन पवर नोंदणीचीही व्यवस्था करण्यात आली आहे. पशुधनासाठी दर्जेदार चारा निर्मिती होण्यासह चाऱ्याचा प्रश्नाची तीव्रता कमी व्हावी यासाठी चारा बियाण्यांचाही पुरवठा करण्यात येतो. जिल्ह्यात सध्या पशुसंवर्धन पंधरवाडा विविध कार्यक्रम मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहेत. यामध्ये राष्ट्रीय पशुधन अभियानातंर्गत असलेल्या विविध योजनांची माहिती देणे, वंध्यत्व तपासणी शिबीरांचे आयोजन करणे, पशुपालकास पशुधनासाठी देण्यात येणाऱ्या सकस आहाराचे महत्व सांगणे, पशुपालकांत जनजागृती करणे, दुध अनुदान योजनेत भारत पशुधन पवरील नोंदी अद्यायावत करण्यास मदत करणे आदी कार्यक्रमंचा समावेश आहे. तरी या पंधरवाडयातील विविध कार्यक्रमांचा पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त धाराशिव यांनी केले आहे.

## मौलाना आझाद (मार्टी) ची स्थापना करण्याची मागणी

**परंडा, दि.५ ऑगस्ट -**



मुस्लिम समाजाच्या विकासासाठी मौलाना आझाद (मार्टी) ची स्थापना करावी व त्यास निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी परांड्याचे तहसीलदार घनश्याम अडसूळ यांना दि.५ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, मुस्लिम समाज पुरोगामी महाराष्ट्रात मागासलेला आहे. हे मेहमदुर रहमान समितीच्या अहवालातून सिद्ध झाले आहे. मुस्लिम समाजाचा मगासलेपणा दूर करण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक विकास साठी आणि मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अल्पसंख्याक विभागाने मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मार्टी स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर केला होता, परंतु वित्त विभागाने ते नाकारले आहे. राज्यातील मुस्लिम समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मार्टी ही संस्था स्थापन करून त्यास निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश सचिव नशीर शहाबर्फीवाले, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, शहराध्यक्ष श्रीहरी नाईकवाडी, गनी हावरे, शहरे काजी जफर अली अश्फाक काझी, डॉ. नवनाथ वाघमोडे, घनश्याम शिंदे, नंदु शिंदे, विश्वनाथ खुळे, खय्युंम तुटके, झुल्फिकार काझी, सदातली काझी, जिशान शहाबर्फीवाले, जहीर शहाबर्फीवाले, एजाज शहाबर्फीवाले, रुपेश बनसोडे, सकलेन शहाबर्फीवाले, गौस चांद पाशा जिनेरी, नियामत हांनूरे, मोहम्मद अली जिनेरी, गणेश मदने ऋषिकेश फल्ले,आकीब तांबोळी, राहुल तांबे, प्रणव कांबळे, अभिजीत बनसोडे, सिद्धार्थ चव्हाण, अविनाश चव्हाण, दिनकर ताकमोडे यांच्या सह्या आहेत.

## पालिकेच्या तत्कालिन मुख्याधिकाऱ्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ ऑगस्ट -**

एका महिलेवर प्रेम करुन लग्नाचे आमिष दाखवुन फसवणूक केल्याप्रकरणी त्या महिलेच्या तक्रारीनुसार उमरगा पालिकेच्या तत्कालिन मुख्याधिकाऱ्यावर शुक्रवारी (दि. दोन) रात्री उशीरा उमरगा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.



याबाबत पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, उमरगा पालिकेचे तत्कालिन मुख्याधिकारी संतोष रामचंद्र टेंगळे रा.खेडगाव (ता.दौंड) यांच्याकडे मुरुम पालिकेचाही अतिरिक्त पदभार होता. त्यावेळी २०१५ ते २०२३ या कालावधीदरम्यान त्यांचे एका महिलेवर प्रेम जुळले, शहरातील पतंगे रोड वरील एका इमारतीमध्ये राहणाऱ्या महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी कर्नाटकातील खानापूर येथिल पॅराडाईन लॉज येथे नेले.

त्या महिलेकडे शारीरिक सुखाची मागणी केली. व त्या महिलेस फोनवर बोलुन लग्न करतो असे सांगून तिची फसवणूक केली. अशा आशयाच्या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून संतोष टेंगळे यांच्यावर विनयभंग व दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास तूळजापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख हे करीत आहेत.

## जनसामान्यांच्या प्रश्नासाठी छावा संघटनेचा आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**





धाराशिव जिल्ह्यातील विविध जनतेचे सामाजिक ३४ प्रश्नाबाबत छावा संघटनेने जनआक्रोश हलगी नाद मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला. छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा संपर्कप्रमुख राजाभाऊ साळुंके नेतृत्वाखाली धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयावर छत्रपती शिवराय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जनसामान्यांचे प्रश्न घेऊन आक्रोश मोर्चा शासनाच्या कंटोळ्या बसण्यासाठी काढण्यात आला.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या कागदपत्र पडताळणी लवकर करणे, धाराशिव नगरपालिका प्रशासन यांनी शहरात जो भोंगळ कारभार मांडलेला आहे. त्याबाबत रस्ते, खड्डे, अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन, तुंबलेल्या नाली, बाग बगीचे, शेतकऱ्यांचे पीक कर्ज, लाईट बिल माफी, धाराशिव शहरातील महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह, कष्टकरी कामगारांचे प्रश्न, बस स्टँड धाराशिव मधील अडचणी, दवाखान्यातील रुग्ण औषधोपचार बाबत, वडगाव येथील भूसंपादन झालेल्या एमआयडीसी बाबत, जिल्हाभरातील अवैध धंदे, जिल्ह्यातील प्रलंबित शेत रस्ते, धाराशिव जिल्ह्यात चोऱ्या दरोड्याचा प्रमाण वाढलेला आहे त्याबाबत, शेतकऱ्यांच्या लाईट बिल माफी-कर्जमाफी बाबत,तसेच प्रेम लहू शिंदे वानेवाडी येथील विद्यार्थ्यांचे संशयास्पद मृत्यू, अशा अनेक सामाजिक प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम संघटनेमार्फत जिल्हाध्यक्ष राजेभाऊ साळुंके यांनी जन आक्रोश हलगी नाद आंदोलन सभेतून केले. या आक्रोशी सभेत धाराशिव शहरातील, तसेच जिल्ह्यातील सामान्य जनता, बांधकाम मजूर,कामगार, मराठा समाजातील विद्यार्थी, शेतकरी, छावा पदाधिकारी संघटकअमोल गोरे, सचिव ज्योतीराम काळे, कार्याध्यक्ष रोहित पाटील, कळंब तालुकाध्यक्ष विठ्ठल यादव, तुळजापूर तालुकाध्यक्ष रवी साळुंके, वाहतूक आघाडी शिवहरी भोसले इतर ही सामाजिक संघटनेतील पदाधिकारी, छावा पदाधिकारी, तसेच शेकडोंच्या संख्येने जन सामान्य लोक उपस्थित होते. मागण्यांचा प्रशासनाने लवकरात लवकर निपटारा करा अन्यथा अन्यथा संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, अशा इशारा छावा संघटन जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके यांनी इशारा दिला.

## कदेर रस्त्याला ठिकठिकाणी भेगा पडल्या, दोन वर्षापूर्वीच बनविला होता; रस्ता नागरिकांतून संताप

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ ऑगस्ट -**



तालुक्यांतील कदेर येथील दीड ते दोन वर्षांपूर्वीच करण्यात आलेल्या रस्त्यांची पहिल्याच पावसात दुरावस्था झाली आहे. दर्जाहीन रस्ता करण्यात आल्यामुळे रस्ता उखडून खड्डे निर्माण होत आहेत. विकासकामांसाठी कोट्यावधींचा निधी खर्च करूनही दर्जाहीन कामे राबविली जात असल्याने लोकांकडून कामांबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

गेल्या दीड वर्षांमध्ये करण्यात आले असून पावसामुळे ठिकठिकाणी रस्ता उखडला गेला आहे. गेल्या आठ दिवसांपासून पावसाने जोरदार झोडपले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले आहे तर रस्त्यावरील पाण्याचा निचरा होण्यास योग्य नियोजन करण्यात आले नसल्याने रस्ता उखडला आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या रस्त्याची पहिल्याच पावसात धूळदान झाल्याने नागरिकांकडून ग्रामपंचायत विकासकामांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करून विकासकामे राबविली जात असली तरी दर्जा ठेवला जात नसल्याने जनतेचा निधी वाया गेल्याची प्रतिक्रीया व्यक्त केली जात आहे. रस्त्यांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊनही योग्य नियोजन, दर्जेदार कामे केली जात नसल्याने शिवबानगर वासियांना खड्डेमय रस्त्यातूनच प्रवास करावा लागत आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या सदर रस्त्याचे उखडून वापरण्यात आलेले रस्त्यावर विखुरले आहे. त्यामुळे रस्त्यावर खड्डे निर्माण होत आहेत. संबंधित रस्त्याचे काम केलेल्या कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी शिवबानगर वासियातून केली जात आहे.

> शिवबा नगर परिसरातील रस्त्यांची दुरावस्था झाली आणि एक दीड वर्षातच त्यांचा धुराळा, खडी उखडून पडली; मलई खाऊन चोथा उरला की काय असेच म्हणावे लागेल; रस्ता होण्यापेक्षा असा रस्ता नसलेला च बरा असे मला वाटते.
> **- विवेकानंद चौधरी, शिवबा नगर, कदेर**

## संक्षिप्त वृत्त...

### दुर्वास ऋषी नित्य पूजा करीत असलेले तेर येथील कालेश्वर मंदिर

**तेर, दि.५ ऑगस्ट -**



धाराशिव तालुक्यातील तेर येथे सहाव्या शतकातील पुरातन कालेश्वर मंदिर असून या मंदिरात दुर्वास ऋषी नित्य पूजा करीत होते. धाराशिव तालुक्यातील तेर येथे तेरणा नदीचे तिरी श्री संत गोरोबा काकांच्या समाधी मंदिराजवळ सहाव्या शतकातील द्राविडी पद्धतीचे विटांनी बांधलेले पूर्वाभिमुख कालेश्वराचे मंदिर असून या मंदिरातील शिवपिंडिची शाळूंका उत्तरेकडे आहे. गर्भगृह चौरसाकृती असून तो २४०२४० से.मी आहे. गर्भगृहाच्या विटाचे मोजमाप १३७.५३ से.मी.आहे. गर्भगृहाचा दरवाजा लहान आहे. दरवाजाच्या गणेशपट्टीवर गरुडाची प्रतिमा आहे. गर्भ गृहाच्या भिंतीची पिरॅमिड सारखी रचना आहे.. मंदिराचे शिखर द्राविडी पद्धतीचे असून वेरूळच्या कैलास लेण्याच्या शिखराची आठवण करून देते. मंदिराच्या शिखरावर विविध प्रकारची कलाकुसर केलेली आहे. याच मंदिरात दुर्वास ऋषी नित्य पूजा करीत असत. दररोज कालेश्वर मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भावीकभक्त येत असतात.



### माझा महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत शिराढोणच्या के.एन.प्राथमिक मराठी शाळेचे यश

**शिराढोण, दि.५ ऑगस्ट -**

माझा महाराष्ट्र प्रज्ञा शोध यांनी शैक्षणिक वर्ष २०२३/२४ मध्ये घेतलेल्या परीक्षेत कळंब तालुक्यातील शिराढोण येथील के. एन मराठी प्राथमिक शाळेच्या विध्यार्थी नी बाजी मारली आहे. भविष्यात नवोदय आणि स्कॉलरशिप परीक्षेच्या पूर्व तयारी साठी या परीक्षा महत्वाच्या ठरत आहेत. या परीक्षेत या शाळेच्या एकूण १० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. त्यामध्ये इयत्ता दुसरी च्या असद सलीम शेख हा धाराशिव जिल्ह्यात प्रथम तर हर्षवर्धन नितीन सुरवसे याने कळंब तालुक्यात प्रथम तर केंद्रातुन देवयानी सुरवसे, असद इम्रान बेग, श्रावणी सुरेश सत्वधर यांनी यश मिळविले. इयत्ता तिसरी वर्गात जोया सलीम शेख ही जिल्ह्यात प्रथम तर आयमन इरफान शेख तालुक्यात प्रथम तर केंद्रात राठोड विवेक परमेश्वर,मुळे शिवम दत्ता, उजेब शहनवाज दखनी यांनी यश मिळविले.याच कार्यक्रमात उपक्रम शील, नवोदय, स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेणारी जिल्हा तील चार शिक्षककान बेस्ट टीचर हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला त्या मध्ये के. एन. मराठी प्राथ.चे नाडे बालाजी, जि. प. कसबा तडवळाचे पुरी शहाजी, जिप. इटकूरचे अनिल क्षीरसागर आणि जि. प. तांदूळवाडी शाळेचे मगर संदीप या चौघांचा बेस्ट टीचर म्हणून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमा च्या अध्यक्ष स्थानी विठ्ठल माने अध्यक्ष जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस व्यापारी संघ तर प्रमुख पाहुणे म्हणून रामहरी चाटे पोलीस उपनिरीक्षक, प्रभा पुंडगे सहायक पोलीस निरीक्षक कळंब पोलीस स्टेशन शिवाजी गिड्डे भाजपा नेते, ओकार कुलकर्णी हे उपस्थित होते. या सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रवीण तांबडे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रियंका तांबडे आणि बालाजी सुरवसे यांनी परिश्रम घेतले.

# तामलवाडी ते वडगाव काटी रस्त्याला रू. ९ कोटीचा निधी मंजूर

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती... ७ कि. मी.च्या रस्त्याची १० वर्षासाठी देखभालीसह दुरुस्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट-**

तुळजापूर तालुक्यातील वडगाव काटी या गावातील ग्रामस्थांच्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला जिव्हाळ्याचा विषय मार्गी लागत असून तामलवाडी ते वडगाव काटी या ७ कि. मी.च्या रस्त्याला १० वर्षाच्या देखभाल दुरुस्तीसह ९ कोटी रुपये मंजूर झाले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी ग्रामस्थांशी संवाद साधताना दिली.



सोलापूर तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग ते वडगाव काटी या गावास जाणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून ग्रामस्थांना ये जा करणे अत्यंत अडचणीचे होत होते. हा रस्ता व्हावा ही येथील ग्रामस्थांची अनेक वर्षापासूनची मागणी होती.

रस्त्याची दुरवस्था व मागणी लक्षात घेता मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिल्या होत्या. सदर रस्ता हा सिमेंट कॉंक्रिट चा करण्यात येणार असून यासाठी रू. ९ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच आज शासनाच्या माध्यमातून महिला व युवकांसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ सर्व पात्र महिला भगिनींनी घ्यावा असे आवाहन देखील करण्यात आले.

मागील अनेक वर्षाच्या तामलवाडी ते वडगाव काटी या रस्त्याच्या मागणीला आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून मंजुरी मिळवून देण्यात आली आहे. ग्रामस्थांची अडचण सोडविण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, माजी जि.प.सदस्य राजकुमार पाटील, नरसिंग धावणे, धनाजी धावणे, लक्ष्मण शेंडगे, हनुमंत गवळी, नाना कदम, आप्पा धावणे, शाहू साखरे, मनोज धावणे, महेश धावणे, स्वप्नील सपाटे, योगेश धावणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. राज्यातील कला- विज्ञान- वाणिज्य बरोबरच वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी आदी व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये राज्य सरकारच्या केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि ज्या विद्यार्थिनींच्या पालकांचे आठ लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न असेल अशा सर्व विद्यार्थिनींच्या १०० टक्के शुल्काचा परतावा राज्य सरकार करणार आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून ही योजना लागू केली असून या आधी प्रवेशित विद्यार्थिनींना देखील याचा लाभ होणार आहे. राज्यातील उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मात्र आर्थिक अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागणाऱ्या विद्यार्थिनींना याचा मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी मत व्यक्त केले.

## विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांचे विशेष प्राविण्यासह नेत्रदीपक यश



### अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या गायन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ ऑगस्ट -**

मुंबई येथील अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या गायन या कलाप्रकारात श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह नेत्र दीपक यश संपादन केले आहे. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मुंबई यांच्या वतीने दरवर्षी गायन वादन सारख्या परीक्षा घेतल्या जातात. यावर्षी नुकत्याच झालेल्या परीक्षेत स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या चैत्राली गोविंद नागणे इयत्ता सातवी, श्रुती सोपान कुंभार इयत्ता चौथी, वेदिका उल्हास दुधभाते इयत्ता सातवी, फिजा सलीम शेख इयत्ता सातवी या विद्यार्थ्यांनी गायन या कलाप्रकारात विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर चंद्रकांत महाजन, संस्थेचे अध्यक्ष मल्लिनाथ आप्पा दंडगे, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, संचालक प्राध्यापक शिवाजीराव वडणे, राजा देशट्टि, प्रवीण अनुदुरकर, मुख्याध्यापिका सविता लोहार, ज्येष्ठ शिक्षक गोपाळ आष्टी गुरुजी यांच्या सह सर्व शिक्षक व शिक्षिकेंनी अभिनंदन केले आहे.

## दुधाळवाडी येथील गोविंद मुंढे यांचा आदर्शवत उपक्रमाने वाढदिवस साजरा

**येरमाळा, दि.५ ऑगस्ट -**

दुधाळवाडी ता.कळंब येथील ग्रामपंचायत सदस्य तथा शिवसेना नेते गोविंद मुंढे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम घेऊन उत्साहात साजरा करण्यात आला. दि.५ रोजी दुधाळवाडी येथे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे युवक नेते गोविंद मुंढे यांच्या वाढदिवसानिमीत्त गावातील प्रत्येक घरी एक नारळाचे झाड भेट देऊन कार्यकर्त्यांनी त्यांचा सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा केला. दुधाळवाडी गावातील रस्त्याच्या दुतर्फा १५१ नारळाची वृक्ष लागवड करण्यात आली. अवांतर खर्चाला बगल देत व सामाजिक बांधीलकी ठेवुन समाजापुढे एक



आदर्श वाढदिवस साजरा करण्यात आला याचा ग्रामस्थांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

यावेळी आ.कैलास पाटील, गोविंद मुंढे, सरपंच भिवाजी सिरसाट, विभाग प्रमुख राहुल पाटील, अनिल पवार, पांडुरंग जाधवर, मुन्ना मोरे, रणजीत कसबे, नदीम मुलानी, सुरज बांगर, बापुराव बांगर, संजय सानप, बालाजी मुंढे, बालाजी रामेश्वर लाटे, अमोल लाटे, बिभीषण बांगर, कैलास लुंगारे, सचीन घोंगडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते .

## भारत विद्यालयात पालक मेळावा संपन्न

**उमरगा, दि.५ ऑगस्ट-**

भारत विद्यालय उमरगा येथे दहावी वर्गाचा पालक मेळावा संपन्न झाला. प्रथमत कै. तात्यारावजी मोरे आबा यांच्या पुतळ्याचे पूजन प्रशालेचे मुख्याध्यापक शाहूराज जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक होते तर पर्यवेक्षक विक्रांत मोरे पर्यवेक्षक संजय देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

सध्याच्या काळात विद्यार्थी फार संवेदनशील आहेत.

त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांना समजून घेऊन वागले तरच विद्यार्थ्यांची प्रगती होईल असे मत कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये पर्यवेक्षक देशमुख यांनी मांडले.

पालकांमधून प्रतीक्षा खरोसे यांनी शाळेविषयी आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी अध्यक्षीय समारोप मध्ये विद्यार्थ्यांशी पालकाचा संवाद, कुटुंब व आरोग्य कसे सांभाळावे, पाल्यावर योग्य संस्कार कसे करावे, वैज्ञानिक दृष्टिकोन कसा बाळगावा अशा अनेक विषयावर प्रकाश टाकला पालकांच्या मनामध्ये असलेल्या अनेक शंकेचे निरसन यावेळी त्यांनी केले.

यावेळी इयत्ता दहावी वर्गातील अ ब क ड या चारही तुकडीतील सराव परीक्षेमध्ये प्रथम द्वितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकट गुंजोटे यांनी केले तर आभार सहशिक्षक क्षीरसागर यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांसह पालक उपस्थित होते.

## श्री उत्तरेश्वर महादेव मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ ऑगस्ट -**

हिंदु धार्मियांच्या पवित्र श्रावण महिन्यास सुरुवात झाली असुन यावेळी श्रावण महिन्याची सुरुवात श्रावण सोमवारने झाली असुन समाप्तीही श्रावण सोमवारनेच होणार आहे. हा योग अतिशय दुर्मिळ असुन हा योग तब्बल ७१ वर्षानंतर आला आहे. त्यामुळे यावर्षीच्या श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. दि. ५ ऑगस्ट रोजी पहिल्या श्रावण सोमवार निमित्त नळदुर्ग शहरातील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या श्री उत्तरेश्वर महादेव मंदिरात नवसाला पावणाऱ्या श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

नळदुर्ग येथील श्री उत्तरेश्वर महादेव मंदिराचा इतिहास हा ५२ वर्षाचा आहे. हे मंदिर सेवानिवृत्त कृषी अधिकारी तानाजीराव भाळे यांच्या अथक प्रयत्नातुन उभारले आहे. हा उत्तरेश्वर महादेव भक्तांच्या नवसाला पावणारा आहे त्यामुळे याठिकाणी श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची कायम गर्दी असते. शिवलिंग जमिनीतुन अवतरले असुन १९७१--७२ च्या दुष्काळात नळदुर्ग शहरातुन गेलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु होते त्यावेळी खोदकाम सुरु असताना जमिनीत हे शिवलिंग मजुरांना आढळुन आली. त्यावेळेस गावाकऱ्यांनी हे शिवलिंग व्यासनगर येथे असणाऱ्या ऑइल मिल समोरील कट्ट्यावर आणुन ठेवली.१९७७ साली तानाजीराव भाळे हे व्यासनगर येथे राहण्यासाठी आल्यानंतर त्यांनी या शिवलिंगाची पुजा करण्यास सुरुवात केली. मात्र पुढे १९७८ साली ऑईलमिलचा लिलाव झाला आणि ही ऑईलमिलची जागा एका मुस्लिम व्यक्तीने घेतली. त्यामुळे हे शिवलिंग कै. किसनराव गायकवाड व श्री तानाजीराव भाळे यांनी हे शिवलिंग भाळे यांच्या घराशेजारी राष्ट्रीय महामार्गालगत एका दगडावर टेकुण ठेवली. १९७८ ते १९८३ पर्यंत तानाजीराव भाळे यांनी याठिकाणी शिवलिंगाची पुजा केली.पुढे १६ ऑक्टोबर १९८३ रोजी विजयादशमीच्या शुभमहुर्तावर तानाजीराव भाळे यांनी या शिवलिंगाची प्रतिष्ठापणा केली. आज याठिकाणी भव्य असे श्री उत्तरेश्वर महादेव मंदिर उभे आहे याचे बरेचसे श्रेय हे तानाजीराव भाळे यांना जाते. शहर तसेच व्यासनगर मधील नागरीकांच्या सहकार्याने तानाजीराव भाळे यांनी हे मंदिर उभे केले आहे. आज या मंदिरात हजारो भाविक श्री उत्तरेश्वर महादेवाचे दर्शन घेत आहेत. सध्या श्रावण महिना सुरु झाल्याने पुढील महिनाभर या मंदिरात भाविकांची राहणार आहे. या मंदिरा बरोबरच शहरातील सर्वच महादेव मंदिर तसेच श्रीक्षेत्र रामतीर्थ येथील महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

# घराघरात शिवसैनिकांची फौज उभी करा : सुनील काटमोरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ ऑगस्ट -**

८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण करत शिवसेनेच्या माध्यमातून महाराष्ट्रावर उद्धव ठाकरे यांच्या रूपाने मुख्यमंत्री बनवण्यात आले व महाराष्ट्र विधानसभेवर भगवा फडकून जगात दाखवून दिले, शिवसेना काय आहे. मध्यंतरी काळात गद्दारांनी आपल्या शिवसेनेबरोबर गद्दारी करून पक्ष फोडण्याचे काम केले. त्यानंतर ही महाराष्ट्रामध्ये न खचता लोकसभेच्या निवडणुकीमध्ये हाबाडा दाखवून दिला आहे. आता यावेळी देखील येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनी प्रयत्नशील राहून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी घराघरात शिवसैनिकांची सदस्य नोंदणी करून फौज उभी करावी,असे आवाहन जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांनी केले आहे.



विधानसभानिहाय ठिकाणी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी ते बोलत होते.

पुढे सुनिल काटमोरे म्हणाले, कितीही लोक फुटून गेले तरी काहीही शिवसेना पक्षाला फरक पडलेला नाही. आता आपण येथील गद्दाराला धडा शिकवण्यासाठी घराघरांमध्ये शिवसैनिक तयार झाला पाहिजे, असे त्यांनी सांगून घराघरातील शिवसेना सदस्य नोंदणी करून जास्तीत जास्त शिवसैनिक तयार करावे असेही आव्हान करण्यात आले आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशावरून धाराशिव जिल्ह्यामध्ये भगवा सप्ताह राबवावे. यावेळी सहसंपर्कप्रमुख शंकरराव बोरकर, माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रंजीत पाटील, विधानसभा समन्वयक दिलीप शाळू, महिला आघाडी जिल्हा संघटक शामल वडणे, जिनत सय्यद, उपजिल्हाप्रमुख डॉ.चेतन बोराडे, भूम तालुकाप्रमुख ड श्रीनिवास जाधवर, वाशी तालुकाप्रमुख विकास मुळवणे, परंडा तालुकाप्रमुख मेघराज पाटील, उमरगा तालुकाप्रमुख शहापुरे, लोहारा तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, तुळजापूर तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी, विधानसभा प्रमुख युवासेना- प्रल्हाद आडागळे, माजी तालुकाप्रमुख अनिल शेंडगे, महिला आघाडी तालुका संघटक उमादेवी रणदीवे,

मा.शहर प्रमुख दीपक मुळे, शिवसेनेचे भगवान बांगर, कमलाकर चव्हाण, बसवराज वरनाळे, सुधीर कदम, प्रतीक रोजकरी, केशव पाटील, रईस मुजावर, ॲड.प्रकाश आखरे, अनिल गवारे, संतोष पुदाळे, तात्यासाहेब बहिर, तात्या गायकवाड, महिला आघाडी ताई लांडे, रोहिणी गपाट, उपतालुका प्रमुख रामभाऊ नाईकवाडी, श्रीमंत डोके, विभाग प्रमुख राजेनलवडे, उपतालुकाप्रमुख संग्राम लोखंडे, अविनाश गटकळ, रफिक तांबोळी,

अशोक वनवे, लक्ष्मण नागरगोजे, कृष्णा मिसाळ, लहू गोरे, भगवान बांगर, छोटू सराफ, दोपारे, महेश शिंदे, विलास वटकर, जितेंद्र पोद्दार, दादा चौधरी, स्वप्निल वाले, गोपाळ शिंदे, युवराज मंडले, आकाश कांबळे, दास जाधव, प्रशांत पोचापुरे, श्रीखर बिराजदार, विक्रम वटकर, विलास वटकर, संजय कांबळे, रजाक अत्तर, भगवान जाधव, अजिंक्य पाटील, सुरेश वाले, रणधीर पवार, श्याम पवार, बालाजी लाखे, शंकर इतापे, मैनु लटके यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

**नगर परिषद कार्यालय मुरूम**
**ता. उमरगा जि.धाराशिव**
दुरध्वनी क्रः ०२४७५-२५६१३५ ईमेलः mcmurum@gmail.com

दि.०५.०८.२०२४

याद्वारे सर्व इच्छुक एजन्सीज, ठेकेदार यांना कळविण्यात येते की, नगर परिषद मुरूम मार्फत बांधकाम विभागासाठी विविध विकास योजनेंतर्गत ०१ (एक) कामाकरिता जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे.
ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुकानी आपली ई-निविदा विहित वेळेत भरणा करावी.

-स्वाक्षरित-
मुख्याधिकारी
नगर परिषद, मुरूम

**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक ०१/०८/२०२४**

समस्त गावकरी मौजे. उमरगा ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार रेखा भीमन्ना घोडके रा. उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.
जन्म झालेल्याचे नावः रेखा भीमन्ना घोडके
सदरील व्यक्तीचा मौजे. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०८/१२/१९६९ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. २६/०७/२०२४ रोजी अर्ज केला आहे.
वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-२३७** **दिनांक २२/०३/२०२४**

समस्त गावकरी मौजे. मळगीवाडी ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार सुशांत शिवराज जाधव रा. मळगीवाडी ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.
जन्म झालेल्याचे नावः सुशांत शिवराज जाधव
सदरील व्यक्तीचा मौजे. मळगीवाडी ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. २८/०२/१९९९ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. १३/०२/२०२४ रोजी अर्ज केला आहे.
वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**



## श्री कनकालेश्वर मंदिर

श्रावण मास सुरू झाला असून दिनांक ५ जुलै रोजी श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी शिवालय भक्तांनी गजबजून गेल्याने दिसून येत आहे.
(छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक घोषित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी देखील बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक या महिन्यात घेण्यात येणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अँड. अजित एम. देशमुख यांनी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असून या कार्यक्रमानुसार दि. १३ ऑगस्ट रोजी मतदान घेण्यात येणार आहे. आणि त्याच दिवशी मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

मतदार यादी घोषित करण्यात आली असून मतदार यादीवर आक्षेप असेल तर तो आक्षेप घेण्याची दिनांक पाच ऑगस्ट रोजी सोमवारी संधी देण्यात येणार आहे. या आक्षेपांची सुनावणी घेऊन सहा ऑगस्ट रोजी आक्षेपांवर निर्णय जाहीर करण्यात येईल.

दि. सात ऑगस्ट रोजी उमेदवारी अर्ज वाटप केले जाणार असून त्याच दिवशी सायंकाळ पर्यंत हे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. आणि उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येणार आहे. तर दिनांक ८ ऑगस्ट रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख जाहीर केली असून या दिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल.यानंतर १३ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजेपर्यंत मतदान घेतले जाईल आणि त्याच दिवशी चार नंतर मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येईल. यावर्षी वकील संघाचे सातशे अंशी सभासद झाले आहेत.

### उपचारासाठी अनेकजण झटले पण यश आले नाही

# वृत्तपत्र विक्रेते रमेश देवळे यांचे अपघाती निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**



येथील वृत्तपत्र विक्रेते रमेश देवळे यांचा अपघात झाल्याने ते गंभीररित्या जखमी झाले होते. त्यांना पुण्यातील ससून हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतांना त्यांचे निधन झाले. देवळे हे अत्यंत गरीब कुटूंबातील होते. त्यांच्या डोक्याला मार लागल्यामुळे उपचार बीडमध्ये होऊ शकला नाही. बीडमधील संपादक, पत्रकार, पत्रकार संघाचे पदाधिकारी, न्युज पेपर एजन्सीचे मालक, वृत्तपत्र विक्रेते या सर्वांनी शर्थीचे प्रयत्न केले. परंतु अखेर देवळे यांची प्राणज्योत मावळली.

रमेश देवळे हे बीड शहरामध्ये विविध वृत्तपत्रे सकाळच्या वेळी घरोघरी टाकण्याचे काम करत होते. गुरूवारी सकाळी सहयोगनगर, जालना रोड येथील सर्वेश्वर गणपती मंदिर कमानीसमोर एका रिक्षाने त्यांना उडविले. गतीरोधकावर पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला होता. ते बेशुध्द झाले होते. प्रकृती गंभीर झाली होती. त्यांना बीड शहरातील काकु-नाना हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते.शहरातील तज्ञ डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथील ससून रूग्णालयात पाठविण्याचा निर्णय झाला.संपादक दिलीप खिस्ती, वृत्तपत्र विक्रेते अमित सासवडे व पत्रकार संघाचे पदाधिकारी, वृत्तपत्रे विक्रेते यांनी तातडीने देवळे यांना उपचारासाठी पुणे येथे पाठविण्यासाठी यंत्रणा कामाला लावली. उपचारासाठी लागणारा खर्चही देऊ असे सांगितले. परंतु पुणे येथे उपचार सुरू असतांना रमेश देवळेंचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.देवळे यांच्यावर पुणे अंत्यसंस्कार करण्यात आले. देवळे हे गरीब व अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते.

### भगवा सप्ताहात केज तालुक्यात पहिल्या दिवशी

# शिवसेना सदस्य नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.५ ऑगस्ट**

शिवसेना पक्षप्रमुख मा.उद्धव साहेब ठाकरे, युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशानुसार शिवसेना नेते सुनीलजी प्रभु साहेब, शिवसेना उपनेत्या सुषमा ताई अंधारे,मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर, शिवसेना संपर्कप्रमुख बीड परशुराम जाधव,बीड लोकसभाप्रमुख सुनिल धांडे सर, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या आदेशानुसार, शिवसेना बीड जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्यामार्गदर्शनाखाली उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज भगव्या सप्ताहाच्या प्रथम दिवशी केज



तालुक्यातील उत्तरेश्वर पिंपरी या ठिकाणी श्रीफळ फोडून चिंचोली माळी,वरपगाव येथे शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ करण्यात आला..!

या सदस्य नोंदणी अभियानात शिवसैनिकाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तसेच सर्वसामान्य गावकरी व शेतकरी यांनीही मोठ्या प्रमाणात शिवसेना सदस्य नोंदणी सहभाग घेतला , यावेळी बीड शिवसेना जिल्हा सचिव रोहित कसबे, युवा सेना विधानसभा प्रमुख ज्ञानेश्वर भैय्या बोबडे , उपशहर प्रमुख अशोक कोल्हे, तालुका संघटक लक्ष्मण तात्या गलांडे, शाखाप्रमुख चिंचोली माळी राजेभाऊ, शाखाप्रमुख वरपगाव प्रदीप देशमुख, शाखा सचिव आप्पा कांबळे, अण्णासाहेब देशमुख, जय रमेश देशमुख , अरुण देशमुख बाळासाहेब देशमुख ,दिनेश देशमुख विठ्ठल खंदारे ,सुंदर अण्णा देशमुख व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# भाई मोहन गुंड यांची शेकापच्या राज्य चिटणीस मंडळ सदस्यपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.५ ऑगस्ट**

पंढरपूर येथे शेतकरी कामगार पक्षाचे राज्य अधिवेशन संपन्न झाले.या अधिवेशनात शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर सातत्याने लाल झेंडा घेऊन आवाज उठवणारे,प्रचंड जनसंपर्क असणारे,शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काम कराणारा चेहरा म्हणून ओळखले जाते.केजचे भूमीपुत्र भाई मोहन गुंड यांची सर्वानुमते निवड झाल्यामुळे प्रमाणिक कार्यकर्त्याला काम करण्याची संधी पक्षाने दिली आहे.



केजचे भूमीपूत्र भाई मोहन गुंड हे शेकाप पक्षाचे २००४ पासुन पक्षात सक्रिय राहून त्यांनी आतापर्यंत शेतकऱ्याच्या विविध प्रश्नांवर सतत आवाज उठवूनत शेतक-यांचे अनेक प्रश्न तडीस लावले आहेत,भाईंच्या निवडी मुळे मराठवाड्यातील शेतकर्यांना एक लढवय्या युवा नेता मिळाला आहे.राज्य शेतकरी,कामगार, विद्यार्थी, अदिवाशी इतर सर्व समावावेशक अनेक ठराव घेण्यात आले,शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ व मध्यवर्ती समिती सदस्यांच्या निवडी ही करण्यात आल्या. पक्षाचे सरचिटणीस म्हणून पुन्हा भाई जयंत पाटील निवड झाली आहे.शेतकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर वीस वर्षांपासून सातत्याने शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून संघर्ष करणाऱ्या केजचे भूमिपुत्र भाई मोहन गुंड यांची राज्य चिटणीस मंडळात नव्याने संधी मिळाली आहे, यामुळे सर्व पक्षातील तळागाळातील कार्यकर्ते पक्षाचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.या झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात मला पक्षाने राज्य चिटणीस मंडळात घेऊन राज्यभर काम करण्याची संधी दिली,शेतकरी कामगारांची परिस्थिती खालावत चालली आहे. शेतकऱ्याच्या प्रश्नावर मराठवाड्यासह महाराष्ट्रामध्ये मोठी चळवळ उभी करून या लाल झेंड्याच्या माध्यमातून लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार,लोकांना आता खरी गरज शेकापक्षाच्या विचारची आहे.

**भाई मोहन गुंड**
राज्य चिटणीस मंडळ सदस्य शेकाप

# माजलगावला मिळणार तरूण आमदार

## आ.प्रकाश सोळंकेंची राजकीय निवृत्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी बीडच्या राजकीय वर्तुळात मोठी घडामोड घडली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे बीडमधील माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आगामी विधानसभा निवडणूक लढवणार नसल्याची घोषणा केली आहे. सध्या प्रकाश सोळंके आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील गावांचे दौरे करत आहेत. याचवेळी त्यांनी यंदाची विधानसभा लढवणार नसल्याची घोषणा केली. तसेच, आपले राजकीय वारसदार म्हणून जयसिंह सोळंके यांच्या नावाची घोषणा केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचील दिग्गज नेत्यांच्या फळीतील एक नाव म्हणजे, प्रकाश सोळंके. त्यांनी राष्ट्रवादीच्या काळात अनेक मंत्रीपदंही भूषवली आहेत. गेल्या निवडणुकीत एका सभेतील भाषणादरम्यान, २०२४ ची निवडणूक आपली शेवटची निवडणूक असल्याचं सांगितलं होतं. २०१९ ची विधानसभा निवडणूक पार पडली. महाविकास आघाडीचं सरकार स्थापन झालं. पण, त्यावेळी मंत्रीपदाची माळ मात्र प्रकाश सोळंकेंच्या गळ्यात पडली नाही. त्यामुळे पुढे अनेक दिवस सोळंकेंचं 'राजीनामा नाट्य' सुरू होतं. पण, त्यांना मंत्रीपद मिळालंच नाही. अखेर त्यांची समजूत काढल्यानंतर त्यांनी मतदारसंघात कामं करायला सुरुवात केली. प्रकाश सोळंकेंसोबत गेल्या अनेक वर्षांपासून जयसिंह सोळंके राजकारणात सक्रीय



आहेत. जयसिंह यांना जिल्हा परिषदेत बांधकाम सभापतीही बनवलं. मतदार संघातील माजलगाव, वडवणी आणि

### जयसिंह सोळंके राजकीय वारसदार

धारूर तालुक्यात ते सक्रीय आहेत. त्यामुळेच तेच भविष्यात राष्ट्रवादी पुढे नेणार, अशी चर्चा सुरू झाली होती. अशातच आता खुद्द प्रकाश सोळंके यांनीच जयसिंह सोळंके यांना आपला राजकीय वारसदार घोषित केल्यामुळे सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. जयसिंह यांना जिल्हा परिषदेत बांधकाम सभापती म्हणूनही काम पाहिलं आहे. मतदार संघातील माजलगाव, वडवणी आणि धारूर तालुक्यात ते सक्रिय आहेत. त्यामुळे तेच भविष्यात राष्ट्रवादी पुढे नेणार, अशी चर्चा सुरू झाली होती.

# बीड शहरात घरेलू कामगार महिलांच्या संवाद बैठकीचे आयोजन

### घरेलू महिला कामगारांच्या सन्मानासाठी ओमप्रकाश गिरी यांचे योगदान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

एम ट्रस्टच्या माध्यमातून बीड शहरातील घरेलू कामगारांच्या संवाद बैठकीचे आयोजन नीलकमल हॉटेल नगर रोड बीड येथे आज ०३ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते.

एम ट्रस्ट या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात गेल्या तीन वर्षापासून ऊसतोड कामगार महिला कामगार वीट भट्टी कामगार यांच्यासाठी कार्य करण्यात येत होते व आज घरेलू कामगारांचे विविध प्रश्न समजून घेऊन त्याच्यावर उपाययोजना करण्यासाठी एम ट्रस्टचे जिल्हा समन्वय ओमप्रकाश गिरी यांच्या संकल्पनेतून शहरात घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या हजारो महिलांच्या विकासासाठी घरेलू कामगार महिलांच्या संवाद बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते सदरील बैठकीसाठी एम ट्रस्ट लखनऊ उत्तर प्रदेश चे प्रमुख संजय राय व महाराष्ट्र राज्य प्रमुख प्रीतू उपाध्याय व एम ट्रस्टचे जिल्हा समन्वयक ओमप्रकाश गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

घरेलू महिला कामगार संवाद बैठकीसाठी बीड शहरातील कानाकोपऱ्यातून धुणे भांडी करणाऱ्या महिला भगिनी यांची उपस्थिती होती. सदरील बैठकीत महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारच्या घरेलू कामगार मंडळा अंतर्गत लागू असलेल्या योजनेबाबत माहिती देण्यात आली व महिलांनी शासकीय योजनेचा लाभ घेऊन मुलांचे शिक्षण आरोग्य व कौशल्य आधारित व्यवसायाकडे वळावे यासाठी एम



ट्रस्टच्या वतीने महिलांचे संघटन उभा करून त्यांना विविध विषयाबाबत कौशल्य ज्ञान देऊन त्यांना सक्षम करण्यासाठी घरेलू कामगार महिलांचे संघटन उभा करण्यात येत आहे.

बैठकीत बोलताना महिलांनी अनेक व्यथा मांडल्या घरकाम करताना छोट्या बालकांना घरी सोडून रोजगारासाठी दिवस दिवस भटकंती करावी लागत आहे. या कामामुळे आरोग्यावर सुद्धा परिणाम होतो मुलांच्या शैक्षणिक खर्च झेपत नसल्यामुळे अनेक बालकांना उच्च शिक्षण देता येत नाही, कौटुंबिक खर्च झेपत नसल्यामुळे घर काम करावे लागते वआम्ही यापुढे यापुढे संघटित होऊन विविध कौशल्य शिकून यावर मात करू असे मत व्यक्त केले.

संजय राय यांनी घरेलू कामगारांना मार्गदर्शन करताना आपल्यात असलेल्या छोट्या छोट्या कौशल्याच्या आधारे आपण सक्षम होऊ शकतो. त्यासाठी सामूहिक प्रयत्नाची गरज आहे शिक्षणाची गरज आहे घरेलू कामगारासाठी एम ट्रस्ट विविध उपक्रम जिल्ह्यात राबवून बीड जिल्ह्यातील घरेलू कामगारांचा आदर्श महाराष्ट्रात नव्हे तर देशात निर्माण झाला पाहिजे यासाठी काम करण्याची ग्वाही दिली.

एम ट्रस्टचे जिल्हा समन्वयक ओम प्रकाश गिरी यांच्या नेतृत्वात नेहा माळी मनीषा स्वामी यांनी घरेलू कामगारांचे सर्वेक्षण करून शहरातील १००० पेक्षा जास्त महिलांची नोंदणी करून त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यापुढे घरेलू कामगार महिलांचा आवाज म्हणून त्यांच्या न्याय हक्कासाठी सक्षम लढा उभा करण्यासाठी घरेलू कामगारांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व महिला कामगारांच्या सन्मानासाठी हे जे संघटन उभे केले आहे अत्यंत महत्त्वाचे आहे उपेक्षित वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हे मोठे पाऊल आहे असे प्रतिपादन संजय राय यांनी केले बैठकीच्या यशस्वीतेसाठी एम ट्रस्टचे बाजीराव गिरी महिला संघटक मनीषा स्वामी,सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब ननावरे, घरेलू कामगार मीडिया प्रमुख बालासाहेब सोलंकर, घरेलू कामगार मित्र नेहा माळी गीता काळे अंजली गिरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वाणिज्य विषयात करिअरच्या अनेक संधी- प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

अभ्यासात सातत्य ठेवून मेहनत करण्याची तयारी दर्शविली तर वाणिज्य विषयात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. आपले ध्येय निश्चित करून आपण वाटचाल केली तर या यश हमखास मिळते असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर यांनी केले.

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित कॉमर्स डे कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. राजेश ढेरे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. पोहेकर म्हणाल्या की आपण आपले ध्येय निश्चित करून कामाला लागलो तर प्रत्येक दिवसाचे जगणे प्रसन्न होते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मैदानी खेळ पण खेळणे गरजेचे आहे. शरीर निरोगी असेल तर मन शांत राहते. महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाकडून अनेक चांगले उपक्रम वर्षभर होत असतात असे त्या म्हणाल्या. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रमेश खंडागळे या प्रसंगी बोलताना म्हणाले की कॉमर्समध्ये अनेक संधी आहेत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध कोर्सेसचा ही लाभ घ्यावा. महाविद्यालयातील उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अरविंद रायलवार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. भावना देव यांनी केले.

या प्रसंगी कॉमर्स डे निमित्त विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे मान्यवरांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वतीने गौरव मते व राधिका लोळगे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार डॉ. स्वानंद बाहेगव्हाणकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## महेश पतसंस्थेच्या अध्यक्षपदी पाटील; उपाध्यक्षपदी सैदापुरे

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि.५ ऑगस्ट-**

येथील महेश पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या.शिरूर ताजबंद संस्थेच्या नवनिर्वाचित व्यवस्थापन समितीची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी आदिनाथ पालवे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीमध्ये पतसंस्थेच्या अध्यक्षपदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील व उपाध्यक्षपदी बाबुराव सैदापुरे यांची बिनविरोध निवड झाली.



निवडीबद्दल अहमदपूर चाकुर विधानसभा मतदार संघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी सभापती मंचकराव पाटील व बाबुराव सैदापूरे यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच संचालक सूर्यकांत उडतेवार, प्रल्हाद मिटकर, रामप्रसाद जाजू, शिवानंद भुरे, किशन तेलगाने, मच्छिंद्र वाघमारे, भाग्यश्री चव्हाण, शाबीयाबी पठाण यांचे देखील अभिनंदन करून सन्मान केला. याप्रसंगी प्रा.आर.एन. वलसे, शिवानंद हेंगणे, शिवाजीराव देशमुख, शिवाजीराव खांडेकर, उन्नी चेअरमन चंद्रकांत गंगथडे, भारत क्षिरसागर, मोहन खेडकर, सिसोदे हरिश, मोला शेख, मोनिका कदम, गणेश शिंदे, बालाजी तिडोळे, दिनेश लामतुरे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त



### लालबहाद्दूर शास्त्री प्राथ. शाळेत दप्तराविना उपक्रमाचे आयोजन

**उदगीर, दि.५ ऑगस्ट-**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादूर शास्त्री प्राथमिक विद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या निर्दे शानुसार मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली दप्तराविना शाळा,आनंददायी शनिवार या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत शाळेमध्ये चित्रकला, कथाकथन, समूहगीत गायन, संगीतमय पाढे पाठांतर व विविध देशी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी अतिशय आनंदामध्ये विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला होता. शिक्षक बंधू -भगिनींनीही खेळात भाग घेतला होता.



### शिरुर अनंतपाळ तालुक्यात मिनी सोलार हाय मस्ट कामाचा शुभारंभ

**शिरूर अनंतपाळ, दि. ५ ऑगस्ट-**

शिरुर अनंतपाळ शहरातील प्रभाग क्रमांक १३ मध्ये गरपंचायत अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसूचीत जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजने अंतर्गत आ.संभाजी पाटील निलंगेकर यांच्या प्रयत्नातुन मंजुर करण्यात आलेल्या सोलार मिनी हायमस्ट बसविण्याच्या कामाचा शुभारंभ भाजपाचे ज्येष्ठ नेते गोविंद आबा पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. शिरुर अनंतपाळ नगरपंचायतच्या वतीने विविध विकास कामांचे प्रस्ताव नगरविकास प्रशासनाकडे करण्यात आले होते त्यानुसार नगराध्यक्षा मायावती धुमाळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा करत लातुर जिल्हा नियोजन समीतीच्या माध्यमातुन शहरामध्ये ४७ लक्ष चौंसष्ट हजार रुपये किंमतीचे सोलार हायमस्ट दिवे मंजुर करुन आनले आहेत त्या कामाचा शुभारंभ सुमीत दुरुगकर यांच्या घराशेजारी करण्यात आले. यावेळी माजी कृषी सभापती गोविंदराव चिलकुरे,पाणीपुरवठा सभापती उमाकांत देवंगरे गुरुजी, धोंडीराम सांगवे, सिद्धलिंग शिवणे, गणेश धुमाळे, नगरसेवक विरभद्र मुदाळे, सुमतीनंदन दुरुगकर,अमर देवंगरे, भाजयुमो जिल्हाउपाध्यक्ष गणेश सलगरे, नगरसेवक प्र.माधव खरटमोल, शंभु एरंडे, प्रशांत यरमलवार, प्रकाश दुरुगकर, फेरोज मुजेवार विशाल दुरुगकर,परमानंद मठपती, सौरभ दुरुगकर उपस्थीत होते.



### शनि अमावास्या निमित्त दिपोत्सव, हनुमान चालीसा पठण

**शिरूर अनंतपाळ, दि. ५ ऑगस्ट-**

शिरुर अनंतपाळ येथील हनुमान मंदिर परिसरात शनि अमावस्या निमीत्त दीप उत्सव, हनुमान चालिसा पठण व महाप्रसादाचे आयोजन कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते. डॉ. शरदआण्णा शिवाजीराव पाटील-निलंगेकर (माजी चेअरमन किल्लारी स. साखर. कारखाना तथा चेअरमन. निलंगा तालुका खरेदी व्रिकी संघ ) यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी देवस्थान कमिटीचे पदाधिकारी, पंचक्रोशीतील हजारो महिला भगिनी, ग्रामस्थ उपस्थित होते.



### शिवाजी महाविद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

**उदगीर, दि.५ ऑगस्ट-**

शिवाजी महाविद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एम. नवले यांनी प्रतिमा पूजन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे, ग्रंथपाल डॉ. विष्णू पवार, डॉ.ए. एच तिरपुडे, डॉ. आर. बी. एडतकर, एस. एम. पठाण, अधिक्षक व्ही. डी. गुरुनाळे, आर.एम. लाडके आदींनी अभिवादन केले. कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. सूत्रसंचालन व प्रास्ताविक जयंती समिती सदस्य डॉ. डी.बी. मुळे यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ.ए.एस. टेकाळे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## खातेदारांना मिनीमम बॅलन्स, बेबाकी प्रमाणपत्राला आकारलेले शुल्क रद्द करावे

### शेतकरी संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.५ ऑगस्ट-**

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने त्यांच्या खातेदारांना मिनीमम बॅलन्स दोन हजार रुपये ठेवणे बंधनकारक केले आहे. तसेच शेतकऱ्यांना बेबाकी प्रमाणपत्र देण्यासाठी शुल्क आकारणी करण्याचे परिपत्रकही काढले आहे. यामुळे शेतकऱ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड बसत आहे. या विरोधात शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाने बँकेचे कार्यकारी संचालकांची भेट घेऊन हे निर्णय शेतकऱ्यांचे नुकसान करणारे असल्याने ते रद्द करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखली जाते. आणी बँकेचे चेअरमनही तसेच सांगतात. परंतु हलाखीची आर्थिक परिस्थिती असणाऱ्या शेतकऱ्यांना दोन हजार रुपये खात्यात जमा ठेवण्याचा निर्णय घेऊन, शेतकऱ्यांचे पैसे अडकवून ठेवले जात आहेत. एकीकडे केंद्र सरकार शेतकऱ्यांना सन्मान निधी म्हणून चार महिन्याला एकदा दोन हजार रुपये तुटपुंजी रक्कम देत आहे.तर दुसरीकडे जिल्हा बँक चार महिन्याला एकदा मिळणारे दोन हजार खात्यात जमा ठेवण्याची सक्ती करत आहे.यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे असल्याचे शेतकरी संघटनेने म्हटले आहे.

तसेच शेतकऱ्यांना कर्ज प्रकरणासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बेबाकी प्रमाणपत्राची आवश्यकता असते, ते मिळवण्यासाठी शेतकरी बँकेकडे गेले असता बँकेचे शाखा व्यवस्थापक एक परिपत्रक दाखवून शेतकऱ्यांना सुमारे दोनशे ते अडीचशे रुपयांचे चलन भरल्यानंतरच बेबाकी प्रमाणपत्र मिळेल असं सांगत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांची बँक म्हणून सांगायचे आणि त्याच शेतकऱ्यांना देणे बाकी नसल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी शेकडो रुपयांचा भुर्दंड लावायचा हे अत्यंत चुकीचे असल्याचेही संघटनेचे म्हणणे आहे.त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने हे दोन्ही निर्णय रद्द करण्याची मागणी शेतकरी संघटनेच्या वतीने कार्यकारी संचालक यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक पाटील, युवा जिल्हाध्यक्ष रुपेश शंके, कार्याध्यक्ष बालाजी जाधव, उपाध्यक्ष वसंत कंदगुळे, तालुकाध्यक्ष समाधान क्षीरसागर,जेष्ठ नेते राजाराम पाटील, मलकु पाटील, रामदास गिरी, युवा नेते नितेश झांबरे, दत्ता मुगळे आदींची उपस्थिती होती.

## किनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालय म्हणून मान्यता

### आ. बाबासाहेब पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि.५ ऑगस्ट-**

किनगावकरांच्या बऱ्याच वर्षाचा मागणीला न्याय मिळाला असून किनगाव प्राथमिक आरोग्य केंद्रा बाबत आ. बाबासाहेब पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे आता या प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रामीण रूग्णालय म्हणून राज्य सरकारने परवानगी दिली आहे.

३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास राज्य शासनाची मान्यता मिळाली असून, लवकरच हे रुग्णालय प्रत्यक्षात सुरू होऊन नागरिकांना देखील याचा लाभ होणार असून ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाला 'एक विशेष बाब' म्हणून श्रेणीवर्धन करण्यास मान्यता मिळाली आहे. तसे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अव्वर सचिव कविता पिसे यांच्या पत्रान्वये मान्यता मिळाली असून या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे किनगाव व परिसरातील नागरिकांना अधिक चांगली व सुलभ आरोग्यसेवा मिळेल.या रुग्णालयात आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आणि विशेष वैद्यकीय तज्ञांची

विविध आजारांचे निदान आणि उपचार अधिक प्रभावीपणे करता येतील. ग्रामीण भागात आरोग्यसेवा सुधारण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळे गर्भवती महिला, लहान मुले, वृद्ध नागरिक, तसेच इतर सर्वसामान्य रुग्णांना स्थानिक स्तरावर अधिक चांगल्या व तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध होतील. याबद्दल राज्य शासनाचे आभार व्यक्त करतो या रुग्णालयाच्या नवीन सुसज्ज इमारतीसाठी देखील पाठपुरावा करणार असल्याचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. तसेच यासाठी सहकार्य केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व आरोग्यमंत्री तानाजी सावंत, पालकमंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहे.

## उमरगा येथे विद्यार्थ्यांसाठी बससेवा सुरु

### आमदार पाटील-निलंगेकर यांनी दिल्या होत्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. ५ ऑगस्ट-**

तालुक्यातील उमरगा (हा.) येथून अनेक विद्यार्थी निलंगा येथे विविध शाळा महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी जात असतात. पण गेल्या अनेक दिवसांपासून शाळा कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना लातूरहून तुपडी, शिवणी कोतल तसेच मसलगा, राठोडामार्गे येणाऱ्या बस गाड्या तिकडूनच भरून येत असल्यामुळे उमरगा (हा.) येथे बस थांबत नव्हत्या. विद्यार्थ्यांसाठी गाडी थांबत नाही ही रोजचीच अडचण होती. यामुळे पालक व विद्यार्थी यांची बसचालक यांच्यासोबत अनेक वेळा बाचाबाची व्हायची. ही बाब लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टीच्या वतीने तालुकाध्यक्ष कुमोद लोभे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आगार प्रमुख अनिल बिडवे व माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर यांना निवेदन देऊन विद्यार्थ्यांची अडचण सांगितली. आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर यांनी तात्काळ आगार प्रमुखांना बोलून बससेवा सुरू करण्याची सूचना केली. विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन आगार प्रमुख अनिल बिडवे यांनी खास उमरगा (हा.) गावातील विद्यार्थ्यांसाठी स्पेशल बससेवा सुरू केली.



गावात बस आल्यानंतर बसची पूजा करून चालक लोंढे व वाहक भिंगोले यांचा विद्यार्थी, पालक व गावकऱ्यांच्यावतीने स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, उपाध्यक्ष विनायक गोमसाळे, चेअरमन आत्माराम लोभे, माधव लोभे, दगडू लोभे, बालाजी दिवे, राम दिगंबर दिवे, श्रीधर लोभे, आदिनाथ लोभे, उमाकांत लोभे, शिवाजी दिवे, परमेश्वर स्वामी, सोपान लोभे, व्यंकट रणखांब , शशिकांत स्वामी, व्यंकट थोरमोठे, घुडूसाब शेख, शरद भदरगे, तुळशीराम थोरमोठे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## वृक्ष प्रतिष्ठानतर्फे लातुरात सामुहिक बीज तुला

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.५ ऑगस्ट-**

वृक्ष प्रतिष्ठानच्या क्रियाशील संचालिका सुनंदा जगताप व वृक्ष प्रतिष्ठानचे संचालक मंडळ लातूर यांच्यावतीने सामुहिक बीज तुला आयोजित केली गेली.

या बीजतुलेसाठी ८०० किलो दुर्मिळ होत चाललेल्या वेगवेगळ्या झाडांच्या बिया संकलीत केल्या होत्या. या कार्यक्रमासाठी सह्याद्री देवराईचे प्रमुख सिने अभिनेते सयाजी शिंदे व सह्याद्री देवराईचे उपाध्यक्ष सुप्रसिद्ध लेखक अरविंद जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्ष स्थानी बकुळ वृक्ष विराजमान होते. वृक्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्ष सौ.सुनंदाताई जगताप यांनी प्रास्ताविकात वृक्ष प्रतिष्ठानच्या कामाचा व बीज संकलन कार्याचा आढावा घेतला.



यावेळी सुमन जगताप, रुक्मिणबाई माळी, कांताबाई सावंत, प्रा. प्रभू वारद, तुळशीराम आण्णा कराड,चनप्पा मुदगडे, प्रा. सूर्यनारायण रणसुभे, प्रा.नागनाथ कनामे व एन.एल. कुलकर्णी या जेष्ठ वृक्ष प्रतिष्ठान सदस्यांच्या पालकांची बीज तुला करण्यात आली. या कार्यक्रमात सुरवातीला बीज दिंडी काढण्यात आली. यामध्ये श्री.सरस्वती विद्यालय रामेश्वर, मुकुंदराज विद्यालय नांदगाव या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्ञान प्रकाश शैक्षणिक प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. सेवालय येथील विद्यार्थ्यांनी व सनराईज शाळेच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. सूत्रसंचालन प्रा.पंचशील डावखर व अरुणा दिवेगावकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी वृक्ष प्रतिष्ठानचे सदस्य अरिहंत किवडे, प्रसाद कदम, अक्षय कुलकर्णी, अक्षय जाधव, अक्षय मस्के,शाम शेटे, सिद्धेश्वर बोराळे, ओम ठोबळे, अनिता देशपांडे, बिराजदार, कविता सावंत, डॉ.संध्या वारद, प्रतिभा गोमसाळे, प्रिया सावंत आदींनी परिश्रम घेतले.

## इस्त्रो-अंतरीक्ष हॅकाथॉन २४ साठी चैतन्य क्षीरसागरची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि.५ ऑगस्ट-**

इस्त्रोच्या भारतीय अंतरीक्ष हॅकाथॉन २०२४ मधील ग्रँड फिनालेसाठी चैतन्य क्षिरसागर याची निवड झाली असून दि १३ व १४ ऑगस्ट रोजी हैदराबाद येथे होणाऱ्या ग्रँड फायनलमध्ये पुण्याच्या पीसीसीओई इंजिनीरिंग कॉलेजची ही टीम चैतन्यच्या नेतृत्वात देशभरातील NIT, IIT यासारख्या नामांकित कॉलेजेस मधून आलेल्या टीम्स सोबत ग्रँड फिनाले मध्ये आपले प्रोजेक्ट्स सादर करणार आहेत. या निवडी बद्दल त्याचा अहमदपूर येथे सत्कार करण्यात आला



इस्त्रो ने राष्ट्रीय अंतराळ दिन २०२४ साठी भारतीय अंतरीक्ष भू-स्थानिक डोमेन, अंतराळ विज्ञान, प्रतिमा प्रक्रिया आणि एआय/एमएल क्षेत्रातील १२ समस्या हॅकाथॉनसाठी निवडल्या आहेत. ज्यामध्ये जिओ-स्पेशियल ॲप्लिकेशन्सवर १२ समस्या विधाने आहेत.

या समस्या सोडवण्यासाठी, ॲप्लिकेशन-चालित इकोसिस्टम तयार करण्यासाठी इस्त्रोने भारतीय अंतरीक्ष हॅकाथॉन २०२४ नुकतीच आयोजित केली होती.

हॅकाथॉनच्या रचनेमुळे समाज आणि देश दोघांनाही फायदा होणार असून यामध्ये पदवीपूर्व, पदव्युत्तर आणि पीएचडी प्रोग्राममधील भारतीय विद्यार्थ्यांच्या संघांना हॅकाथॉनमध्ये सहभागी होता येते ज्यामध्ये प्रत्येक संघात एक टीम लीडर आणि इतर तीन विद्यार्थ्यांचा समावेश असतो. त्यामधून इस्त्रोकडून प्रत्येक विषयाच्या ९ टीमची निवड द्विस्तरीय स्क्रीनिंग प्रक्रियेद्वारे झाली होती. ज्यामध्ये लातूर येथील गुलबर्गा येथील केंद्र शासनाच्या ईएसआयसी मेडिकल कॉलजचे कुलगुरू डॉ. संतोषराव क्षीरसागर यांचा मुलगा चैतन्य क्षिरसागरने यश संपादन केले. यशाबद्दल क्षीरसागर याचा पत्रकार विरेंद्र पवार यांच्या वतीने अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुराव पवार, प्रा.गोविंद शेळके, मनोरमा पवार, राहुल कावळे,जयश्री पवार, केतकी पाटील, सौरभ पाटील, आदित्य पवार, पत्रकार चंद्रकांत शिंदे, सलीम सय्यद, गोविंद काळे, बालाजी काळे आदींची उपस्थिती होती.

## रयत क्रांती संघटनेच्या वतीने आ. सदाभाऊ खोत यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**येरोळ, दि.५ ऑगस्ट-**

लातूर जिल्हा रयत क्रांती संघटनेच्या वतीने विधान परिषदेचे आमदार सदाभाऊ खोत यांच्या निवडीबद्दल शिरूर अनंतपाळ, निलंगा,देवणी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ता यांनी त्यांच्या इस्लामपूर ता (वाळवा) गावी प्रत्यक्ष भेट घेऊन सत्कार, सन्मान केला.

सध्या विधानसभा निवडणूका तोंडावर आल्याने यावेळी निलंगा विधानसभा मतदारसंघातून लातूर जिल्हा रयत क्रांती संघटना, निलंगा विधानसभानिवडणुकलढविण्यासाठी इच्छूक असून याप्रसंगी रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सदाभाऊ खोत यांच्याकडे रयत क्रांती संघटना लातूर जिल्हा अध्यक्ष शिवाजी पेठे यांच्या सर्मथकांनी



निलंगा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी अधिकत तिकीटाची मागणी केली. यावेळी सदाभाऊ खोत यांनी सांगितले की, तुम्ही आगोदर गावा गावातील लोकांना भेटा त्यांच्या आडचणी समजून घ्या लोकांशी चर्चा करा मतदारांनी तुम्हाला निवडणुक लढविण्यासाठी होकार दिला तर मी पण तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. यावेळी रयत क्रांती संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे, ओबीसी सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा प्रभाकर चोचंडे, निलंगा पंचायत समिती माजी सदस्य राजकुमार सोमवंशी, शिरूर अनंतपाळ तालुका संरपच संघटना अध्यक्ष खंडेराव चव्हाण, संरपच ज्ञानोबा मोगले, बिबीशन भोसले, विनोद कुंभार, तुकाराम काळे, प्रवीण जाधव, श्रीकांत कांबळे, राम नलवाडे, माजी चेअरमन उमाकांत बोळेगावे,भागवत ऐकुरगे, दिलीप भदरगे, विवेक वाडीकर, हरिणंदन मोगरे, अरविंद गोरपटले उपस्थित होते.

## उदगीरमध्ये गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि.५ ऑगस्ट-**

लालबहाद्दूर शास्त्री मा.विद्यालयातील सहशिक्षिका अनिता यलमटे यांनी सुरू केलेल्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दत्तक पालक योजनेतंर्गत गणवेश खरेदीसाठी महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री संजयजी बनसोडे साहेबांनी दहा हजार रूपयांचे योगदान दिले.

या निधीतून विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे वितरण करण्यात आले. तसेच मागील दोन वर्षापासून डॉ. संदीप सोनटक्के यांनी दहावीच्या गरजू व होतकरू अशा दोन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्विकारले आहे तर हूजूर कलेक्शन चे संचालक प्रेम राजपाल यांनी गरजूंना गणवेश दिले व इंजिनीयर विश्वजीत गायकवाड फाउंडेशन या सामाजिक संस्थेतर्फे ३०० गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी संकुलाचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार , कार्यवाह शंकरराव लासुणे ,मुख्याध्यापक अनंतराम कोपले ,उपमुख्याध्यापक अरुण पत्की ,पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट , माधव मठवाले,अनिता यलमटे उपस्थित होते.


दै.तरुण भारतच्या वर्धापन दिना निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!
मा.सुरेशजी हसापुरे साहेब
शुभेच्छुक-
तपस्वी कन्स्ट्रक्शन,
सोलापूर

# सोलापूर जिल्ह्यातील संत कवयित्रींच्या प्रतिभेचा सुंदर आविष्कार

**दळिता कंडिता तुज गाईन अनंता श्र म्हणत विठूरायाच्या भक्तीशी समरस झालेल्या संत कवयित्री म्हणजे संत जनाबाई होय.मूळ गाव गंगाखेड जरी असले तरी त्यांचे संपूर्ण आयुष्य पंढरपूर येथे विठ्ठल भक्तीत गेले. त्या संत नामदेवांकडे रहात होत्या. त्यांच्याकडे जनाबाई आश्रित म्हणून राहिल्या तेव्हा त्यांच्या मुखातून अभंग निर्मिती झाली....**



**वंदना कुलकर्णी**
**मो. ९६५७०९५८६२**



**आई मेली बाप मेला श्र मज सांभाळी विठ्ठला**
**हरी रे मज कोणी नाही श्र माझी खात असे डोई**

ती विठ्ठलाला सांगत आहे. जनाबाई यांच्या भक्तीत नितळ श्रद्धा आहे. त्यांच्यावर आध्यात्मिक संस्कार झाले होते. कारण नामदेवांचे घर भक्तीत दंग झाले होते. त्याचप्रमाणे जनाबाई देखील अंतरबाह्य त्या विठ्ठलाशी एकरूप झाल्या होत्या. त्यांची भावकविता जणू परमात्म्याच्या प्रेमानी काठोकाठ भरली होती. त्यांची निष्काम निरपेक्ष भक्ती. त्यांच्या अभंगात ती भक्ती ओतप्रोत भरली होती.

संत जनाबाई यांनी अनेक अभंग लिहिले त्यामध्ये कितीतरी विठ्ठल भक्तीचे आहेत. त्या म्हणतात

**झाडलोट करी जनी**
**केरभरी चक्रपाणी**
**पाटी घेऊनिया शिरी**
**नेऊनिया टाकी दुरी**

मनातील भावना जनाबाई व्यक्त करतात. त्यांच्या मनात वात्सल्य, कोमलता, ऋजुता, सहनशीलता, त्यागी वृत्ती आणि स्त्री जाणिवांचा स्पर्श, त्यांच्या काव्यातून प्रकर्षाने जाणवतात. म्हणून जेष्ठ समीक्षक अभ्यासक रा. चि. ढेरे जनाबाई यांच्या काव्याचे रसग्रहण करताना म्हणतात तत्कालीन संत नामदेव, संत सोपान, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत सेना महाराज आदी सत्पुरुषांच्या जीवनाचा सद्गुणांचा आढावा घेणारी पद्य रचना करून संत जनाबाई पुढील पिढ्यावर उपकार करून ठेवलेत, असे विधान केले होते. खरंच जनाबाई यांची भाषा काळजाला जाऊन भिडते.त्याचा प्रत्यय वाचकाला येतो.

संत जनाबाई यांचे एकूण ३५० अभंग उपलब्ध आहेत. ते अभंग अतिशय लोकप्रिय आहेत. तसेच कृष्णजन्म बालक्रीडा व काल्याचेही अभंग लिहिले असून ज्ञानेश्वरांच्या स्तुतीपर अभंग लिहिले आहेत. त्यांच्या अभंगातून पूराणाचे संदर्भ येतात. त्या म्हणतात पांडुरंगाचा जप हेच महातप आहे. आपण श्रद्धा आणि तळमळ जर ठेवली तर उद्धरून जातो. खरंच संत जनाबाई यांनी जनसामान्य जनतेला कळावे असेच मांडले आहे.

आध्यात्मिक क्षेत्रातील एक नाव म्हणजे संत सोयराबाई होय. त्यांची वाणी रसाळ होती. भागवत धर्माच्या मांदियाळीतील एक ठळक नाव म्हणजे संत सोयराबाई होय. संत चोखामेळा यांच्या त्या पत्नी होत्या आणि संत निर्मळा म्हणजे त्यांच्या नणंद बाई होय. संपुर्ण कुटुंबच विठ्ठलाच्या नामात गुंग झाले होते. संत सोयराबाई यांच्या जिभेवर सरस्वतीचा वास होता. संत सोयराबाई या स्वतःला चोख्याची महारी असे संबोधतात. त्यांची वाणी अतिशय मधुर होती. त्या एका अभंगात म्हणतात...

**येई गरुड ध्वजा।**
**विटेसहित करीन पुजा ।।**
**धुपदीप पुष्पमाळा।**
**तुज समर्पू गोपाळा ।।**

सोयराबाई यांची विठ्ठलावर निस्सीम भक्ती होती. डॉ भगवान कवठेकर यांनी आपल्या लेखात असे म्हटले आहे की, सोयराबाई यांनी प्रत्यक्ष पांडुरंगाकडे पाहून अभंगाची रचना केली आहे. त्यांनी थेट विठ्ठलाला प्रश्न केला आहे. त्यांचे एकूण ६२ अभंग गाथेत सापडले आहेत. कर्ममेळा याचा जन्म झाला तेव्हा देवाने बारसे केले असा उल्लेख आहे. कधी संकटात असताना देवाचा धावा करताना, देवाची करुणा भाकताना सोयराबाई म्हणते देहात विटाळ वसतो मग देह कोणी निर्माण केला? तेव्हा त्यांच्या भावना अनावर होतात. आणि म्हणतात...

**देहासी विटाळ म्हणतो सकळ**
**आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध**
**देहीचा विटाळ देहीच जन्मला**
**सोवळा तो झाला कवण धर्म**

विषमतावादी समाजात परिवर्तन घडवून आणले पाहिजे असे त्यांना वाटते कारण शरीर हे नश्वर आहे आणि आत्मा हाच शाश्वत आहे. म्हणून देवाला फक्त भक्ताची भक्ती प्रिय आहे.

सोलापूर जिल्ह्याला संत कवयित्रींची परंपरा लाभली आहे. त्यामध्ये संत निर्मळा यांचे नाव अगदी भक्ती भावनेने घेतले जाते. संत कवयित्रीने समाज मनावर संस्कार रुजविले. समाजाला विचार दिला. भक्तीचा मळा फुलविला.

संत निर्मळा १४व्या शतकातील असून त्या संत चोखामेळा यांच्या धाकट्या बहीण होत्या. त्यांनी संत बंका यांच्याशी विवाह केला. संत बंका हे सोयराबाई यांचे बंधू होते. हे संपूर्ण कुटुंबच विठ्ठलाशी तद्रूप झाले होते. भक्तीशी जोडले गेले होते. भक्ती रसात नखनिशिखांत न्हाले होते.

त्याकाळी समाजात वर्णव्यवस्था, जातीयता यामुळे लोकांची घुसमट, कोंडी दिन अवस्था होत होती. दलित गावकुसाबाहेरील लोकांना मंदिरात प्रवेश नव्हता हे वास्तव चित्रण संत मंडळी नजरेने पहात होती. अनुभवत होती.

त्याला वाचा फोडण्यासाठी ते पुढे सरसावले. कर्मकांड आणि अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेल्या समाजाला त्यांनी भगवंताचा महिमा सांगितला. नामाचा मार्ग सोपा दाखविला. त्यांच्या अभंगातून तितकीच आर्तता आणि भावव्याकुळता निर्मळाच्या मनी आहे. त्या आपल्या एका अभंगात म्हणतात...

**रात्रंदिवस मन करीत तळमळ**
**बहु हळहळ वाटे जीवा ।**
**काय करू आता पाऊले न दिसती**
**पडिलेसे गुंती न सुटे गळे।।**

त्यांना संसाराचा उबग आला होता. म्हणून ती हा फास तोडून टाक असे विठ्ठलाला सांगत होती की देवा आता हे दुजेपण सोडून द्या मला तुम्ही भेटा. तुम्हाला चोखोबांची शपथ आहे. किती ताकद होती निर्मळा च्या शब्दात ती थेट विठ्ठलाला प्रश्न करते. संत निर्मळा यांनी नामाचे महत्व अधोरेखित केले आहे. त्या संदर्भात त्यांचे बरेच अभंग आहेत. अतिशय विचारधन देणारे आहेत.त या म्हणतात.

**संसाराचे कोण कोड । नाही मज त्याची चाड ।।**
**एका नामेची विश्वास। दृढ घालोनिया कास ।।**
**जेथे न चले काळसत्ता । विठोबाचे नाम गाता ।।**
**शास्त्रे पुराणे वदती । नाम तारक म्हणती ।।**

परमार्थ कसा साधावा यासाठी कितीतरी गोष्टी सांगितल्या आहेत. आणि त्याचे आपण अवलोकन करणे गरजेचे आहे. आपल्या अतरंगी शुध्द भाव असला पाहिजे. निंदा करू नये, परस्त्रीकडे पाहू नये, त्याविषयी मनात अभिलाषा धरू नये. ही साधना सफल होण्यासाठी सतत सत्पुरुषांच्या सहवासात रहाणे गरजेचे असते.

अशा या वारकरी संत परंपरेच्या उदयकाळात या कवयित्रीने मराठी साहित्यात अनमोल भर घातली आहे.

संकटकाळी दुःखात असताना आर्ततेने हाक देणारी आणि त्याला आर्त साद देणारे पंढरीचे विठुराया होते मग ही संत कवयित्री कोण होती तर संत कान्होपात्रा...माणसाने कुठे जन्माला यावे हे काही त्याच्या हातात नसते. कारण पृथ्वीवर फक्त माणूस म्हणून जन्माला येतो नंतर ही समाजव्यवस्थेतील जात, पात, वर्ण व्यवस्था, शरीराला चिकटते.खरं तर ही वरवरची आवरण असतात. संत कान्होपात्रा वारकरी संप्रदायातील एक संत कवयित्री होय. एका नायकिणीच्या पोटी या कन्येचा जन्म झाला. कान्होपात्रा ही दिसायला अतिशय सुंदर होती. बुद्धिमान होती. पण तिच्या आईला ही वाटायचे तिनेही माझ्यासारखेच करावे पण कान्होपात्रा यांना मान्य नव्हते. तिचे लक्ष त्या पंढरीच्या विठ्ठल दर्शनाकडे जात होते.तिला पांडुरंगाला भेटावे असे वाटत होते. एकदा ती वारीतील लोकांच्या समवेत पंढरपूरला आली आणि त्या विठ्ठल चरणी आपली भक्ती समर्पित केली. एकाग्र झाली. सावळ्या श्रीहरीला डोळ्यात साठवू लागली.पंढरपूरला राहून ती सेवा करू लागली. हौसाबाई या आजींच्या समवेत राहू लागली.



तिथे राहून अभंग रचना करू लागली. ती जेव्हा अभंग म्हणत होती त्यावेळेस लोक त्या श्रवण भक्तीचा लाभ घेत असत. कारण तिचा आवाज ही गोड होता. ती विठ्ठलाच्या भक्तीत आकंठ बुडाली होती. तिचे कुठेच मन रमत नव्हते. पांडुरंग तिचा सखा होता आणि रुक्मिणी माता तिची आई होती. कारण हा दिनांचा कैवारी होता.म्हणून कान्होपात्रा म्हणते...

**अगा वैकुंठीच्या राया। ,अगा विठ्ठल सखया।।**
**अगा नारायणा । अगा वासुदेवानंदना ।।**
**अशी हृदयातून हाक देते.**

पण एकदा एका बिदरच्या बादशहाला तिच्या रूपाची खबर कळली. त्याने आपली माणसे पाठवली आणि मंगळवेढा येथून पकडून आणण्यास सांगितले. पण चारित्र्य, शील, अपवित्र होऊ नये म्हणून तिने विठ्ठलाचा धावा केला आणि ती पंढरपूरला गेली. मंदिरात गेली.,तिने हाक मारली तेव्हा या अभंगाची निर्मिती झाली...

**नको देवराया अंत आता पाहू ।**
**प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ।।**

असा आर्त टाहो फोडला आणि तिच्यावर कृपादृष्टी झाली. खरंच स्त्री पुरुषाच्या भक्तीला कधीच कोणते भेद नाहीत .गरीब असो,श्रीमंत असो,त्याची कृपादृष्टी सतत भक्तावर असते.कान्होपात्राला निर्गुण, निराकार अशा परमात्म्याची उत्कंठा लागली होती. देवाचे वेड, त्याची भक्ती, त्यातील असीम उत्कटता, हे कान्होपात्राच्या अभंगाचे वैशिष्ट्य आहे आणि दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ध्रुवपदाप्रमाणे पुन्ह, पुनः जाणवते., त्यामुळे अभंगाला एका विशिष्ट शैलीचे स्वरूप प्राप्त झाले आहे अशा ही कान्होपात्रा तरटी वृक्षाच्या रूपाने आजही जशीच्या तशी पांडुरंगाच्या मंदिरात काळ्या दगडावर उभी आहे. कान्होपात्राच्या अपूर्व भक्तीने तिला सर्वातून मुक्ती मिळाली. तिच्या अगाध भक्तीमुळे समाजही तिच्या पायाशी नतमस्तक झाला. या संत कवयित्रींनी सर्व स्त्रियांना भक्ती प्रेमाची ओढ लावली. स्त्री जीवनाचे दुःख वेदना यांच्या अभंगातून दिसल्या. संसारातील व्याप, ताप हे कायमच असतात. पण त्यातून परमेश्वराची भक्ती कशी करावी आणि समाजाप्रती आपल्या असलेले योगदान कसे द्यावे, हेही या संत स्त्रियांनी सांगितले. आजही बहुजन समाजातील स्त्रियांवर या संत कवयित्री स्त्रियांच्या अभंगाचा खूप मोठा परिणाम जाणवतो. जनाबाई त्यांना बहिण वाटते आई वाटते. मैत्रीण वाटते. तर सोयराबाई आणि निर्मळा या तळागाळातल्या संत स्त्रिया असूनही त्यांनी विठ्ठलाची भक्ती कशी केली त्यांना आदर्श वाटते. कान्होपात्रा तर सर्वांनाच प्रिय आहे या संत स्त्रियांनी सोलापूर जिल्ह्यातील नवे तर महाराष्ट्रातील स्त्रियांना एक आदर्श घालून दिला आहे.अशा या संत कवयित्रींना मी वंदन करते.



**अणदूर तालुका तुळजापूर हे गाव सोलापूर हैदराबाद हायवेवर सोलापूर पासून ४० की मी अंतरावर आहे, हे गाव मल्हार मार्तंड खंडेरायाच्या मंदिरामुळे उभ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. येथून तुळजापूर ४० किमी, अक्कलकोट ४० किमी अंतरावर प्रसिद्ध तिर्थस्थळ आहेत. या प्रसिद्ध मंदिराचा थोडक्यात इतिहास या ठिकाणी मी आपणासमोर ठेवत आहे.**

# नवसाला पावणारा अणदूरचा खंडोबा








**अविनाश मोकाशे**
**मो. ८२०८०८०४०७**



नळराजाने नळदुर्गमध्ये रण मंडल नावाचा किल्ला बांधला. याच नळदुर्ग किल्ल्यातील हे आहे श्री खंडोबाचे पहिले मंदिर इब्राहिम आदिलशहाने हे मंदिर पाडून येथे उपली बुरुज बांधला. त्यानंतर नळदुर्गापासून दोन किलोमीटर अंतरावर बोरी नदीच्या काठी मंदिर बांधण्यात आले. मात्र, या मंदिरात गायीची हत्या केल्यामुळे मंदिर चार किलोमीटर अंतरावर असलेल्या अणदूरमध्ये बांधण्यात आले. छत्रपती शाहू महाराज यांनी मंदिराच्या देखभालीसाठी ५०० एकर जमीन दान केली. नंतर अहिल्याबाई होळकर यांनी सभामंडप बांधला म्हणून अणदुरचे मंदिर तीन टप्प्यात झाल्याची दिसते. पुढे नळदुर्ग आणि अणदूर मध्ये देवाच्या मूर्तीसाठी वाद सुरू झाला. त्यानंतर अणदुर येथे सव्वा दहा महिने आणि नळदुर्गमध्ये पावणेदोन महिने देवाची मूर्ती ठेवण्याचा करार झाला. तो करार आजही पाळला जातो. महाराष्ट्रात ही खंडेरायाची चल मूर्ती आहे, की जिचे वास्तव्य पावणेदोन महिने मैलारपूर नळदुर्ग मंदिरात असते, त्या ठिकाणी फार मोठी यात्रा भरते. त्याला महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातून भक्त भाविक मोठ्या संख्येने सहभागी होतात. नळदुर्गचे नवे मंदिर बोरी नदीच्या काठावर जुन्या मंदिराच्या पाचशे मीटर दूर बांधण्यात आले. ते कोरपे नावाच्या भक्ताने बांधले असा दाखला मिळाला आहे. हे मंदिर बिनशिखराचे होते. सध्याच्या मंदिर समितीचे त्यावर शिखर बांधून रंगरंगोटी केली. अणदूर आणि नळदुर्ग या दोन्ही मंदिराची पुजारी एकच असून ट्रस्टसुद्धा एकच आहे. सदानंद आणि होनकळस मोकाशे हे खंडोबाचे मूळ पुजारी त्यांचे वंशज सध्या पुजारी आहेत मोकाशे नंतर ढेपे, ढोबळे, येळकोटे, हराळे ही पोट आडनाव पडली आहेत. अणदुरमध्ये दररोज एक पुजारी त्यांच्या हिश्याप्रमाणे बदलतात. नळदुर्ग मध्ये मात्र पावणे दोन महिने चार पुजारी एकच असतात. मात्र देव अणदुरला गेल्यानंतर तेथेही हिशाप्रमाणे रोज पुजारी बदलतात.

जेव्हा देवाची मूर्ती अणदुरला असते तेव्हा नळदुर्गच्या मंदिरात फक्त शिवलिंग दिसते तर मूर्ती नळदुर्गला असताना अणदूरच्या मंदिरात फक्त शिवलिंग दिसते.मूर्तीच्या खाली शिवलिंग दिसते.श्री खंडोबाची मूर्ती ही एक शिवलिंग असून त्यावर हळदीचा लेप लावून नाक, डोळे बसविले जातात. त्यावर चांदीचा किरीट चढवला जातो. सकाळ आणि रात्री दोन वेळा सोहळ्यात पूजा केली जाते. रात्री शेजारती म्हटली जाते. दोन्ही पूजेच्या वेळी नगारा वाजवला जातो. तो मान मुस्लिम भक्त याकुब शेखकडे आहे. पूर्वी अनेक वर्ष आणखी एक मुस्लिम भक्त बाबू पिंजारी दर रोज मंदिरात फुले आणून देत होते. श्री खंडोबाचे अणदुर आणि नळदुर्ग मध्ये वेगवेगळे मानकरी आहेत. यात्रा कमिटी वेगळी आहे. अणदुर यात्रेनिमित्त कुस्त्यांचा जंगी आखाडा भरवला जातो. नळदुर्ग यात्रेनंतर ही कुस्त्यांची स्पर्धा होते. देव नळदुर्गमध्ये आल्यानंतर दर रविवारी यात्रा तर पौष पौर्णिमेला महायात्रा असते. श्री खंडोबा आणि बाणाई विवाह स्थळ श्री खंडोबा हा महादेवाचा अवतार असून खंडोबाची महाराष्ट्रात आठ प्रमुख ठिकाणी आहेत.

नळदुर्ग, अणदूर महत्वाचे स्थान म्हणून ओळखले जाते. दमयंती राणीच्या भक्तीसाठी श्री खंडोबा नळदुर्ग येथे प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. श्री खंडोबा आणि बाणाई यांचा विवाह नळदुर्ग जिल्हा उस्मानाबाद येथे झाला होता. म्हणून या स्थानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अणदूर, मैलारपूर, नळदुर्ग या दोन्ही ठिकाणी खंडोबाची मंदिरे असून दोन्ही ठिकाणचे अंतर ४ किमी आहे. खंडोबाचे अणदुर येथे सव्वा दहा महिने व मैलारपूर नळदुर्ग येथे पावणे दोन महिने वास्तव्य असते.

मंदिरे दोन आणि मूर्ती एक अशी परंपरा शेकडो वर्षापासून सुरू आहे. तसेच अणदुरहुन नळदुर्ग आणि नळदुर्गहून आंदूरला देवाची मूर्ती नेताना दोन्ही गावातील मानकार्यामध्ये लेखी करार केला जातो, हे विशेष. हा खंडोबा नवसाला पावणारा आहे अनेक भक्त भाविक खंडोबाला नवस बोलतात तो हा देव त्यांच्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करतो.

**एस. एस. समर्थ अकॅडमीचे ॲथलेटिक्स कोचिंग सेंटर व भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रास ३० नोव्हेंबर २०२२ या दिवशी सुरुवात झाली. चारच मुलांना घेऊन अकॅडमीचे रोपटं रोवल. हे रोपट हळूहळू वाढत आहे.**

# एस. एस. समर्थ अकॅडमीचे रोपटं अल्पावधीतच नावारूपास आलं



नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर हे रोपटं अल्पावधीतच नावारूपास येण्यासाठी खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे असणारे माझे पती एनआयएस कोच व राष्ट्रीय खेळाडू सूर्याजी लिंगडे यांनी मला प्रोत्साहन दिले. दरम्यानच्या काळात मी ॲथलेटिक्समध्ये एनआयएस प्रशिक्षण घेतले. ही अकॅडमी उभा करण्यामागे उद्योजक यशवंत पाथरूट यांनी मला प्रोत्साहन दिले. सोलापूरचे माजी महापौर श्रीकांचना यन्नम व तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांच्या हस्ते अकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनावेळी त्यांनी तुम्हाला जे काही साहित्य लागेल ते देतो, असे आश्वासनही दिले अशाप्रकारे त्यांनी मदतीचा हात पुढे केला.

पहिल्या दिवशी चार मुले होती. त्यांचा घेतलेला सराव पाहून वॉकिंग ट्रॅकवर चालणारी माणसे आकर्षित होत गेली. त्यांच्यामुळे आमच्या अकॅडमीचा खूप प्रसार झाला. चारवरून ११० पर्यंत संख्या पोहोचली. मग त्यांना तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिल्यामुळे अकॅडमीला पहिल्याच वर्षी यश आले.

अकादमीच्या भक्ती थोरात हिने राज्य स्पर्धेत लांब उडी मध्ये कांस्य, विनीत दिनकर याने आंतर विद्यापीठ अश्वमेध स्पर्धेत १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्य व राज्य मैदानी स्पर्धेत कांस्य पटकावले. सुनील वराडेने कांस्य मिळविले. ओम वरवडकरने विभागीय स्पर्धेत ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्ण तर अस्मिता बिराजदार ही अडथळा शर्यतीत कांस्यची मानकरी ठरली. अरुण माने, यशवर्धन लिंगडे, शरयू क्षीरसागर व आदिती सपकाळ यांची जुनियर राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात २०२२-२३ या पहिल्याच वर्षी बारा मुलांची पोलीस दलात निवड झाली

एस.आर.पी.चे सहाय्यक समादेशक नानासाहेब माशाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र सिंह क्षीरसागर, प्रा. सुभाष माने, रेल्वेचे विभागीय अधिकारी निलेश वरवडकर, पोलीस हवालदार शिवानंद बिराजदार व हनुमंत सपकाळ यांनी वेळोवेळी सहकार्य केले. सर्व पालकांच्या सहकार्यातून ही अकादमी चालू आहे. या खेळाडूंना घडवण्याचा मी ध्यास घेतला आहे. यातील काही खेळाडू भारत देशाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचतील भारत देशाचे नाव असा मला विश्वास आहे.

## अदिती सपकाळ अकॅडमीची उत्कृष्ट खेळाडू



यामध्ये वारंवार चमकणारी गुणवंत खेळाडू आदित्य सपकाळ हिने २०२२- २३ ला सीबीएसई क्लस्टर राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक पटकाविले. त्यानंतर तिने राष्ट्रीय स्पर्धेत १०० मीटरमध्ये रौप्य व २०० मीटर मध्ये कांस्यपदक पटकावून अकादमीचे नाव भारत देशात पोहोचले. शालेय स्पर्धेतही आदितीने सुवर्ण पटकावून अकादमीच्या यशाची मूर्तमेढ रोवून तिने नावलौकिक केला.



**भारती लिंगडे**
**मो. ७७४३९०८२२९**





पंढरपूर हे दक्षिण भारतातील प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. त्यामुळे राज्यासह केंद्र सरकारही पंढरीच्या विकासासाठी विशेष लक्ष देत आहे. त्यातूनच पंढरपूरला जोडल्या जाणाऱ्या आळंदी-पंढरपूर, देहू-पंढरपूर प्रमुख पालखी मार्गासह सांगोला, टेंभुर्णी, सातारा, कराड, मंगळवेढा आदी सर्वच रस्त्यांची कामे जवळपास पूर्ण झाली आहेत. या नवीन मार्गांच्या कामामुळे पंढरपूर परिसरात नवनवीन उद्योग, व्यवसाय वाढत आहेत. रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. रेल्वे सेवेने पंढरपूर देशाला जोडले गेले असले तरी विमान सेवेअभावी जागतिक पर्यटक म्हणावे तसे पंढरपूरला येताना दिसत नाहीत. एकंदरीत पंढरपूरचे बदलते रूपडे पाहता भविष्यात पर्यटनाला चालना मिळत असल्याने पंढरपूरच्या विकासात मोठी भर पडत असल्याचे सुखद चित्र आहे.

# पंढरपूर पर्यटन स्थळ म्हणून विकसीत व्हावे

मागील १० वर्षांपर्यंत अस्वच्छ आणि बकाल म्हणून उल्लेख होत असलेले पंढरपूर शहराचा विकास वेगाने होत आहे. शहरात स्वच्छता, अंतर्गत रस्ते, स्वच्छ पिण्याचे पाणी, चांगली निवास व्यवस्था उभा राहत आहे. त्याचबरोबरीने शहराला सहज आणि जलद सर्व भागातून जोडणारे दर्जेदार रस्ते बनत आहेत. पंढरपूर शहर हे देशातील कोणत्याही भागाशी कनेक्ट होत आहे. पंढरपूर शहराला कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणासह कोकण, मुंबई, खान्देश आणि उत्तर भारताशी जोडणारे रस्ते वेगाने बनत आहेत. यामध्ये मोहोळ ते आळंदी राष्ट्रीय मार्ग क्र. ९६५ ला जवळपास पूर्ण झाला आहे.

पंढरपूर-सांगोला, पंढरपूर-मंगळवेढा, पंढरपूर-विजापूर, पंढरपूर-टेंभुर्णी, पंढरपूर-सातारा, पंढरपूर-मल्हारपेठ, पंढरपूर-शेटफळ-कुर्डूवाडी हे रस्ते दुपदरी सिमेंट कॉंक्रीटचे झाले आहेत. बहुतेक सर्वच रस्ते दर्जेदार झाले असल्याने पंढरपूरला येणाऱ्या रहदारीची मोठी समस्या दूर झाली आहे. केंद्र सरकारने यातील पाच मार्गाचा विकास केला असून सुमारे तीन हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक खर्च झाला आहे. पंढरपूर-मोहोळ, पंढरपूर-पुणे या मार्गास एक हजार कोटी रूपये भूसंपादन, मालमत्ता, झाडे नुकसान भरपाई म्हणून दिले आहेत. त्यामुळे या मार्गाच्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांच्या दारात विकास तर आलाच त्याचबरोबर आर्थिक समृद्धीही आल्याचे चित्र आहे.

शेतकऱ्यांना मिळालेल्या मोबदल्यातून जमीनी, भूखंड व्यवसाय, लहान मोठे उद्योग, वाहने यामध्ये गुंतवणूक होत असून मोठ्या प्रमाणात बांधकाम व्यवसायाला उर्जितावस्था आली आहे. पंढरपूर शहर देशाच्या सर्व भागांशी पक्क्या मार्गाने जोडले गेल्यामुळे एरव्ही रस्त्याअभावी न येणारे पर्यटक, भाविक पंढरीत येऊ लागले आहेत. रस्त्यांनी जोडल्या गेल्याने जमिनींचे मुल्यांकन वाढले आहे. रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात हॉटेल ते शेतीपूरक उद्योग, व्यवसाय उभा राहू लागले असल्याचे दिसून येते. रस्त्यांच्या विकासामुळे पंढरीच्या विकासाला गती मिळाली असून त्याचे रूपांतर आता पर्यटनात होऊ लागले आहे.



**महेश भंडारकवठेकर**

**मो. ७५८८०२०७६६**

### उद्योग वाढणार, रोजगार मिळणार...

पंढरपूर हे तीर्थक्षेत्राबरोबर प्रगत उसपट्टा, फळबाग शेती, मोठी साखर कारखानदारी व शिक्षण सुविधांमुळे ओळखले जात होते. मात्र आता त्यामध्ये आणखी भर पडणार असून पक्क्या, सुसाट रस्त्यांमुळे इतर शेतीपूरक उद्योग तालुक्यात येण्याची अपेक्षा आहे. रस्त्यांमुळे पंढरपूरच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळाली असून तरूणांना रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. याबरोबरच पंढरपूरला दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या व त्यांच्या आवडी निवडी लक्षात घेऊन परिसराचा विकास होताना दिसत असल्याने पर्यटकांचा कल हळूहळू वाढत आहे.



### बायपासमुळे महापुराच्या कचाट्यातून मुक्तता...

चंद्रभागा नदीला प्रत्येकवर्षी पावसाळ्यात महापूर आला की पंढरपूरला जोडणारा भीमा नदीवरील कमी उंचीच्या पुलावर पाणी येते. त्यामुळे बाहेरून येणारी सर्व वाहतूक बंद केली जाते. त्याशिवाय यात्रा कालावधीत पंढरपुरात होणारी भाविक व वाहनाची मोठी गर्दी अरूंद पुलामुळे डोकेदुखी ठरत असते. मात्र आता पंढरपूर-फलटण या मुख्य पालखी मार्गाला वाखरी-एमआयटी शिक्षण संस्थेपासून शिरढोण, गुरसाळे, पखालपूरमार्गे नवीन मोठा बायपास निर्माण झाला आहे. याशिवाय गुरसाळे येथे भीमा नदीवर सर्वात मोठा पूल उभारला आहे. या पुलाची उंची ही पंढरपूरमध्ये असलेल्या इतर पुलांच्या तुलनेत जास्त ठेवण्यात आली आहे. त्यामुळे महापुराच्या वेळी पंढरपूरची होणारी नाकाबंदी थांबेल व यात्रा कालावधीत वाहतूक सुरळीत होण्यासाठी फायदा होईल. शिवाय या बायपास पुलामुळे परिसराच्या विकासासाठी मोठा उपयोग व फायदे होणार आहेत.

### पर्यटनाला चालना मिळणार...

पंढरपूरचा विठोबा हा गरीबांचा देव म्हणून जगभर परिचित आहे. शिवाय याठिकाणी पर्यटकांसाठी आवश्यक असणारे हॉटेल, रेल्वे, रस्ते, विमान सेवा नव्हत्या. त्यामुळे शिर्डी, तिरूपतीसह देशातील इतर देवस्थानांच्या तुलनेत याठिकाणी गरीब, मध्यमवर्गीय भाविक येत असतात. मात्र आता हा कलंक पुसला जाणार असून रस्त्याच्या नवीन जाळ्यामुळे पंढरपूरमध्ये नवनवीन हॉटेल, मॉल, रेस्टॉरंटमध्ये मोठी गुंतवणूक होत आहे. त्यामुळे उच्चभ्रु पर्यटकांसाठी पोषक वातावरण तयार होत असून अशा पर्यटकांची वर्दळ पंढरपूरमध्ये दिवसेंदिवस वाढू लागली आहे. पंढरपूरमध्ये होत असलेल्या शेकडो देवदेवतांच्या प्राचिन मंदिरांच्या विकासाबरोबर तुळशीवन, गोपाळपूर, विष्णूपद, वाखरी पालखी तळ, ६५ एकर पालखी तळ, चंद्रभागा वाळवंट शेकडो कोटींचा निधी खर्च करून नव्याने विकसित होत आहे. शिवाय पंढरपूर तालुक्यात चिंचणी, पखालपूर, खर्डी, नारायण चिंचोली आदी ठिकाणीही पर्यटकांना पुरेसा वेळ घालविण्याची संधी या ग्रामस्थांनी लोकसहभागातून निर्माण करून दिली आहे. त्यामुळे पर्यटनाला मोठी चालना मिळत आहे.



### रेल्वेचा प्रश्न मार्गी लागतोय... विमान सेवेचं काय?

गेल्या अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर पंढरपूरला जोडणारे सर्वच रस्ते आता चकाचक झाले आहेत. त्यामुळे देशाच्या कोणत्याही राज्यातून पंढरपूरला येणे आता सोपे होत असताना गेल्या कित्येक वर्षापासून रेंगाळलेला लोणंद-पंढरपूर रेल्वे मार्गालाही मुर्त स्वरूप येत आहे. त्यासाठी भूसंपादन सुरू झाले असून हा मार्ग होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यापूर्वी पंढरपूरला मुंबई, कोल्हापूर, लातूर जोडले आहे. आता कोकणालाही रेल्वेने जोडण्यात येत असल्याने भाविकांसह पर्यटकांना त्याचा लाभ होणार आहे. मात्र परदेशी पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या विमान सेवेचं काय? असा सवाल पर्यटकांसमोर उभा राहत आहे.

---

श्री.बी.आर.गायकवाड यांचा ग्रामसेवक म्हणून सुरू झालेला जीवनप्रवास व्यवसाय, कृषी, शिक्षण, औद्योगिक, राजकीय आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान माणदेशातील सांगोला तालुक्यामध्ये विस्तारत गेला. या वर्णनाची प्रचिती म्हणजे मजूर सोसायटी, अंबिका पतसंस्था, यशोदीप कन्स्ट्रक्शन गुरुदत्त संघ, अध्यक्ष सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळ, संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, सांगोला यांच्या माध्यमातून मिळते. श्री. बी. आर. गायकवाड यांनी १९७८ पासून सुरू केलेला प्रवास अत्यंत कुशलतेने आज पर्यंत नाविन्याची जोड देत सक्षमपणे सांभाळत आहेत. नवीन कल्पनांची कास, द्रष्टेपणा व धाडसी निर्णय क्षमतेच्या आधारे विविध क्षेत्रांमध्ये आधुनिकतेची जोड देऊन जगाच्या स्पर्धेमध्ये आपल्या नेतृत्वाची छाप उमटवलेली आहे.

# कर्तव्यदक्ष शिक्षणमहर्षी: श्री.बी.आर. गायकवाड



उच्च व तंत्रशिक्षण या विभागामध्ये अनुक्रमे सांगोला महाविद्यालय व शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज या संस्थांच्या माध्यमातून तालुक्यातील मुला-मुलींना जागतिक दर्जाचे पदविका व पदवीधर उच्च व तंत्र कुशल विद्यार्थी घडवून अनेक पिढ्यांना घडविले. व्यवसाय व शिक्षण क्षेत्रामध्ये आजही गुणवत्ता, दर्जा, जिव्हाळा आणि विश्वासार्हता राखून आहेत. मराठी मातीतील या नेतृत्वाने तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. आपले संस्कार, परंपरा, प्रामाणिकपणा, स्पष्ट वक्तेपणा या मूल्यांची जपणूक केली व आपली पाळीमुळे विसरता कामा नये हा गुण ते आजही सांभाळत आहेत. दर्जा व गुणवत्तेशी कधीही तडजोड केली नाही. माणदेशी व्यक्तीने उद्योगात स्व-कौशल्य आणि कष्टाने इतकी उंच झेप घेणे आणि पुढील पिढीपर्यंत अखंडपणे वाढत जाणे हीच अनोखी गोष्ट ठरावी.

देशाच्या व राज्याच्या पटलावर अनिश्चितता व अस्थिरतेचे अनेक फेरबिदल होताना पाहिले. परंतु प्रत्येक संकटाला आव्हान समजून निडरपणे त्याचा सामना केला व तरुणांना आपल्या कर्तुत्वाने सर्व आव्हानांवर तोंड देऊन व्यवसाय, उद्योग व शेती नव्याने निर्माण करू शकतो असा आदर्श घालून दिला. अनेक मुला मुलींना शिक्षण क्षेत्रामध्ये मदतीचा हात देणारे त्यांचे समाज उपयोगी कार्य असामान्यच.गरजू विद्यार्थी व जनता यांचे प्रश्न



विना विलंब निकाली निघावेत ही संकल्पना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या समोर मांडली आणि त्यातून समाज उपयोगी धोरणांचा पाया रचला. या स्वरूपाचे प्रयत्न आणि पाठपुरावा आजही विविध क्षेत्रांमध्ये ते करत आहेत.अत्यंत उज्वल कारकीर्द निर्माण करत त्यांनी उद्योग, व्यवसाय, शेती व शिक्षण या क्षेत्रामध्ये अशीच सचोटी व तत्वनिष्ठेची कटिबद्धता प्रत्येकात दिसून यावी यासाठी सतत प्रयत्न करीत आहेत. अशा या कर्तव्यदक्ष व्यक्तीला शिक्षण क्षेत्रातील गेल्या पाच दशकातील योगदानाबद्दल शिक्षण महर्षी संबोधले तर ते वावगे ठरणार नाही.



**दिपक भाकरे**

**मो. ९४२१०७४६३०**



# श्रीक्षेत्र गौडगाव दक्षिणमुखी जागृत हनुमान देवस्थान

अक्कलकोट तालुक्यातील श्रीक्षेत्र गौडगाव बु. येथील दक्षिणमुखी जागृत हनुमान देवस्थान अक्कलकोट शहारापासून फक्त १२ किलोमीटर अंतरावर पश्चिम दिशेला आहे. येथे येण्यास एसटी महामंडळ बस, रेल्वे, जीपसह इतर खाजगी वाहने भरपूर आहेत. यामुळे भाविकांची उत्तम सोय झाली आहे. गौडगांव येथील पुरातन हेमांडपंती जागृत मारूती हे समर्थ रामदासस्वामी यांनी स्थापित केली आहे. भगवान शंकराचा मारुती हा अकरावा महारुद्र अवतार असल्याची आख्यिका आहे. नवसाला पावणारा दक्षिणमुखी म्हणून या मारुतीचे ओळख आहे. आकरा शनिवार व आकरा मंगळवार दर्शन केल्याने मनातील इच्छा व मनोकामना पूर्ण होतात, अशी रूढीपरंपरा आहे. म्हणून राज्य व पर राज्यातून भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. या ठिकाणी एकाच वेळेला हजारो भाविकांना महाप्रसाद घेणे सुलभ व्हावे म्हणून तात्पुरती पत्रा शेडमध्ये महाप्रसादालय सुरू करण्यात आली आहे. येथे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आशा विविध राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक सातत्याने भक्तीभावाने येत असतात. मंदिर समितीने भक्तांसाठी अन्नछत्राची तात्पुरती पत्रा शेडमध्ये निर्मित केली आहे. मुक्कामी राहण्यासाठी भाविक भक्तांना टोलेजंग असे तीन मजली सर्व सोयीयूक्त सुसज्ज इमारत उभी केली आहे. प्रत्येक आमवस्या, पौर्णिमा, शनी आमवस्या, दिवाळी पाडवा, गुढीपाडवा, दसरा, नारळी पौर्णिमा, उन्हाळी सुट्टी, आशा विविध प्रसंगी लाखों भाविकांची गर्दी होत असते. यामुळे स्थानिक रोजगारत मोठ्याप्रमाणात वाढ झाल्याने उलाढाल वाढली आहे. भाविकांच्या अडचणी लक्षात घेऊन अध्यक्ष श्रीकांत खानापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमी तत्परतेने भाविकांना विनम्र सेवा देण्यासाठी मंदिर समिती प्रयत्नशील असतात.

### दर्शनाबरोबर मिळतो येथे पोटभर महाप्रसाद

मागील २०-२५ वर्षापासून अन्नदान सेवा सुरू आहे. प्रत्येक शनिवारी अमावस्या, पौर्णिमा, मंगळवारी भाविकांसाठी अन्नदान सेवा सुरू असून २४ तास पोटभर महाप्रसाद दिला जातो. वर्षभरात येथे लाखो भाविक महाप्रसाद घेतात. महाप्रसाद वर्षभर चालू असून आतापर्यंत महाप्रसादाचा भार हे नेहमी दानशूर भाविकांनी उचललेले आहे. ज्या भक्तांची मनोकामना पूर्ण झाली आहे. अशा, भक्तांनी देणगी अथवा महाप्रसादाच्या स्वरूपात मदत करतात. राज्य व परराज्यातुन येणारे भक्तांनी श्री चे दर्शन व महाप्रसाद घेऊन तृप्त होतात.

### नियोजित भव्य असे महाप्रसादालय उभारण्याचा मंदिर समितीचा मानस

सध्या भाविकांना महाप्रसाद देण्याची व्यवस्था असून ती अपुरी पडत आहे. एकाच वेळी पाच हजार भाविक महाप्रसाद घेतील या उद्देशाने सुसज्ज अद्ययावत नियोजित दोन मजली इमारत उभी करण्यात येणार आहे. पहिल्या मजल्यावर किचन, महाप्रसाद तयार करणे आणि दुसऱ्याा मजल्यावर भाविकांना महाप्रसाद घेण्यासाठी व्यवस्था करण्यात येणार आहे. तरी दानशूर भक्तांनी सढळ हाताने मदत करण्याचे आव्हान मंदिर समितीने केले आहे.



**बसवराज बिराजदार**

**मो. ७३८५३४६१८५**



सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
मा.आ.सुभाष(बापू) देशमुख
मा.मनीष(भैय्या) देशमुख
शुभेच्छुक
श्री.सोमनाथ पुंडलिक केंगनाळकर
शहर उपाध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, सोलापूर शहर
के.के.प्रतिष्ठान, सोलापूर
मा.सोमनाथ केंगनाळकर





सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
मदत आणि मार्गदर्शन
महाग शस्त्रक्रिया, गोरगरीब रुग्णांना आर्थिक मदतीकरीता, धर्मादाय अंतर्गत पंतप्रधान वैद्यकीय मदत निधी, मुख्यमंत्री सहायत्ता निधी, विविध खाजगी ट्रस्टद्वारे समन्वयकाची भूमिका...
मा.जितेंद्र सातव
प्रदेश अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.) वैद्यकीय मदत कक्ष
मा.सचिन सरवदे
राज्य विस्तारक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.) वैद्यकीय मदत कक्ष
मा.सुनील गोरे
संस्थापक अध्यक्ष राष्ट्रभक्ती संघटना महाराष्ट्र राज्य विस्तार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.)
शुभेच्छुक : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.) वैद्यकीय मदत कक्ष




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
Hotel
Ambassador
Executive
95/1, Murarji Peth, Near Old Pune Naka,
S.T.Stand Road, Solapur
0217-2322388 M.: 9699066102
हॉटेल ॲम्बेसेडर
Hotel Ambassador Executive




श्री लक्ष्मी दुग्धालय नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थ व स्विट
अक्कलकोट-सोलापूर रोड, अक्कलकोट
श्री लक्ष्मी दुग्धालय नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थ व स्विट
नॅचरल मलईयुक्त दुग्धजन्य पदार्थ, स्विट व स्नॅक्स
मलईयुक्त
ताक, मठ्ठा, लस्सी, बासुंदी, दही, श्रीखंड, आम्रखंड, पनीर, खवा (गाईचे व म्हशीचे) लोणी (गाईचे व म्हशीचे), सुगंधी दुध, चक्का, मलईयुक्त कुल्फी
नॅचरल फळयुक्त
मँगो रबडी, अंजीर रबडी, पेरु रबडी, स्ट्रॉबेरी, रबडी, अंगूर रबडी, चिक्कू रबडी, सिताफळ, रबडी, काळाद्राक्ष रबडी, जांभूळ रबडी, गुलकंद रबडी व अमूल बटर, चीज, ग्रीनपीस, मिक्सर व्हेजिटेबल, स्विटकॉर्न (मका), पनीर मसाला, शेंगा चटणी, कडक भाकरी, बाकरवडी मिळेल.
स्वीट : पेढा, बर्फी, कुंदा, लाडू, जिलेबी, गुलाबजामून, बालुशा, काजुकतली
नाष्टा : समोसा, ढोकळा, मका, चिवडा, भडंग चिवडा, फरसाण
बेकरी पदार्थ : ब्रेड, टोस्ट, खारी, बटर, बनपाव, मस्कापाव, नानकटाई बिस्कीट, उपवासाचे शाबू पापड, शाबू व बटाटा चिवडा, डिंक लाडू, चिप्स
शाखा क्र.१ : मंगरुळे हायस्कूल चौक, बायपास रोड, जंगी प्लॉट, अक्कलकोट
शाखा क्र.२ : मंगरुळे हायस्कूल चौक, टोळ अंबाबाई मंदिराजवळ, अक्कलकोट
शाखा क्र.३ : भारत गॅस गोडाऊनशेजारी, स्टेशन रोड, अक्कलकोट
शाखा क्र.४ : अक्कलकोट-सोलापूर महामार्ग, ब्यागेहळ्ळी फाटाच्यापुढे, तोतला फार्म हाऊसशेजारी, अक्कलकोट, जि.सोलापूर
शाखा क्र.५ : एस.टी.स्टॅन्डसमोर, स्वामी कॉम्प्लेक्स, मादनहिप्परगा, ता.आळंद, जि.कलबुर्गी.
प्रो.रेवणसिद्ध नि. पाटील
8087249836
9673757477



सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
मा.श्री.ए.के.उर्फ यशवंत कटारे
प्रगतशील शेतकरी, कुंभारी




प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
मा.सदाभाऊ खोत
ओबीसी नेते
शुभेच्छुक
रयत क्रांती संघटना
जिल्हा लातूर
मो.७९७२३२८९२२
मा.शिवाजीराव पेटे
रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष
तथा ओबीसी नेते (लक्कड जवळगेकर)




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
RRIDDHIE AGENCY
ॲपे घरी घेऊन जा PIAGGIO
आता फक्त १ रुपया मध्ये
बुकिंग साठी संपर्क :
7447454501 / 9284868898
435 CC मेकॅनिकल इंजिन
पुलीची सुविधा
435 CC क्लासिक मेकॅनिकल इंजिन
फ्री फ्री फ्री
कार टेप
फॅन
२५000/- रुपये डिस्काऊंट
अधिकृत विक्रेते
रिध्दी एजन्सीज
९०/१ ब, शिवाजीनगर, सोलापूर - पुणे हायवे,
बाळे, सोलापूर - ४१३२५५
ईमेल : bhosalesumeet30@gmail.com.
मोबा.: ७५१७३१०३६९
Ape Auto CLASSIC




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
मा.सौ.रेखा लक्ष्मण सोनकवडे
मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद
प्राथमिक मराठी शाळा, वागदरी, ता.अक्कलकोट

# सोलापुरात अग्रेसर... मनोरमा बँक परिवार!

**सोलापुर, पुणे, धाराशिव व सांगली जिल्हा कार्यक्षेत्र सोलापूर शहर व जिल्हयातील आर्थिक विकासामध्ये योगदान देणारी मनोरमा बँक २६ वर्षे पूर्ण करून २७ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. बँकेची विशेषत: म्हणजे ही बँक गेली पाच वर्षे झिरो टक्के एनपीए देणारी ही एकमेव बँक आहे. याशिवाय मनोरमा परिवाराच्या सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, आर्थिक क्षेत्रातील कामकाजामुळे मनोरमा परिवाराने सोलापूर जिल्हा तसेच पश्चिम महाराष्ट्रामध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. यामुळे या बँकेने उत्तुंग भरारी घेतल्याने मनोरमा बँक परिवार सोलापुरात अग्रेसर ठरला असून या परिवाराच्या माध्यमातून आयुष्यभर समाजसेवा करणार असल्याचा निर्धार सोलापूरचे उद्योजक तथा मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना दिली.**



## मनोरमाच्या माध्यमातून आयुष्यभर समाजसेवा

### पंढरपूर व जोडभावी पेठ येथे नवीन शाखा कार्यरत

मनोरमा बँकेचे छोटेसे रोपटे आता वटवृक्षामध्ये रूपांतरित झाले असून, हा वटवृक्ष आता बहरत जात आहे, मनोरमा बँकेमार्फत दोन ते तीन हजार महिला बचत गटांना आर्थिक स्वावलंबनासाठी कर्ज दिले आहे तर अनेक महिलांना स्वयंरोजगारासाठी वैयक्तिक कर्ज देऊन स्वत: च्या पायावर ती उभा करण्याचे काम मनोरमा परिवाराने केले आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील आर्थिक विकासामध्ये योगदान देणारी मनोरमा मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीने ११ वर्षे पूर्ण करून १२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीच्या कामकाजाला १ ऑगस्ट २०११ रोजी शुभमुहूर्तावर ग्राहक सेवेस सुरुवात केली. मनोरमा बैंकेचे मार्गदर्शक श्रीकांत मोरे व शोभा श्रीकांत मोरे यांच्या सेवाभावी व अमूल्य मार्गदर्शनाखाली प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढत चाललेला दिसून येतो. मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीने ठेवी, कर्ज वाटप आदी आर्थिक व्यवहारात उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने 'जो जे वांछील तो ते लाहो' या उक्तीप्रमाणे सुरु झालेल्या आपल्या मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीची प्रगती उल्लेखनीय आहे. आज या संस्थेच्या महाराष्ट्र आणि कर्नाटकात ८० ते ९० शाखा आहेत. पुणे, सांगली, कोल्हापूर, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यांमध्ये त्यांनी आपल्या मनोरमा परिवाराचा विस्तार केला आहे. भविष्यामध्ये मनोरमा परिवाराची उलाढाल अथवा व्यवसाय ५००० कोटीपर्यंत घेऊन जाण्याचा मानस आहे.

मनोरमा परिवारातर्फे गेली पंचवीस वर्षे साहित्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या राज्यातील व जिल्ह्यातील साहित्यिकांना मनोरमा साहित्य पुरस्कार देऊन गौरव केला जातो. ९ मे १९९७ साली मनोरमा बँकेचे संस्थापक अध्यक्ष कै. सदाशिव रामचंद्र मोरे यांच्या सेवाभावी व अमूल्य मार्गदर्शनाखाली बँकेस भौतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. बँकेचा प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस वाढत चाललेला दिसून येतो. बँकेने ठेवी, कर्ज वाटप आदी व्यवहारात उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. आज २७ वर्षांनंतर बँकेने २६५ कोटी व्यवसायापर्यंत मजल मारली आहे. परिवारामध्ये केवळ बँकच नव्हे तर इतर १० आर्थिक संस्था कार्यरत आहेत.

मनोरमा परिवाराची एकूण वाटचाल २१०० कोटी व्यवसायापर्यंत आहे.मनोरमा परिवाराचे वैद्यकीय क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य मनोरमा सहकारी रुग्णालय तसेच डॉक्टर सुमित मोरे याचे प्राईड हॉस्पिटलद्वारे अत्यंत माफक व परिपूर्ण अशी आरोग्यसेवा उपलब्ध आहे. यामध्ये अत्यंत गरजू, व गरीब रुग्णांची मोफत आरोग्य सेवा पुरवली जाते. विशेष म्हणजे ज्यांच्याकडे पिवळे रेशनकार्ड आहे, त्यांना मोफत तपासणी करून औषधोपचार दिले जातात. मनोरमा रुग्णालय व प्राईड रुग्णालय यांच्यातर्फे अनेक जयंती, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, महिला दिन, यानिमित्त विविध आरोग्य शिबिरे, मोफत तपासणी शिबिरे यांचे आयोजन करण्यात येते. शिवाय या शिबिरामध्ये सहभाग घेतलेल्या रुग्णांना मोफत औषधोपचार दिले जातात. त्यांचे पुत्र सुमित आणि स्नुषा मिताली या डॉक्टर आहेत. जुळे सोलापूर भागात त्यांचे मनोरमा हॉस्पिटल आहे. त्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिरेही ते घेत असतात. श्रीकांत मोरे यांच्या पत्नी शोभाताई यांनी 'बँक ऑफ महाराष्ट्र' मध्ये दीर्घकाळ सेवा केली. 'मनोरमा सखी मंच'च्या माध्यमातून त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत.

### गोरगरिबांसाठी अविरत सेवा

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराच्या सुवर्णसिंहासन प्रकल्पासाठी त्यांनी सात किलो चादी भेट दिली आहे. मनोरमा परिवारातील पतसंस्थेमध्ये अनेकांना नोकऱ्या दिल्या आहेत. दिव्यांगांना ते आर्थिक मदत करतात, आत्महत्या केलेल्या नागरिकांच्या वारसांला रोख स्वरुपात आर्थिक मदत ते करतात, पाटील प्रशालेत मोफत पुस्तके, दिवाळीमध्ये गरीब कुटुबांना फराळाची भेट. अशी त्यांची अविरत सेवा चालू असते. अर्थकारणात, सहकार खात्यात श्रीकांत मोरे अर्थतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय जिल्हा उपनिबंधक सोलापूर रिजनल डेप्युटी डायरेक्टर तसेच पणन उपसंचालक पुणे येथे त्यांनी कामकाज केलेले आहे. आज मनोरमा परिवाराचा व्यवसाय दोन हजार कोटींचा झालेला आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांमध्ये होत असताना प्रत्येक आर्थिक निकष आरबीआयच्या नियमानुसार व निकषानुसार काटेकोरपणे पाळले जातात, म्हणूनच तर मनोरमा बैंक ही गेली पाच वर्षे शून्य टक्क्यामध्ये राज्यभरात अग्रेसर ठरत आहे.

### श्रीकांत मोरे यांना साहित्याचाही व्यासंग

२१ कवितासंग्रह, २ कथासंग्रह, ५ ललित लेखनसंग्रह आणि एका वैचारिक लेखाच्या पुस्तकासह त्यांच्या नावावर २९ पुस्तकांची नोंद आहे. २००२ साली त्यांनी पहिले साहित्य संमेलन भरविले. आजवर ६ साहित्य संमेलन व २४ कविसंमेलन भरविण्याचे योगदान त्यांनी दिले आहे. १६ जानेवारी २०२३ रोजी नवीन कविता संग्रहाचे प्रकाशन झाले आहे. आपल्या माता-पित्यांच्या स्मरणार्थही साहित्य पुरस्कार देण्याबरोबरच त्यांच्या कार्यात मोलाचा सहभाग नराखणारे चित्रकार स्व. नागेशराव सुरवसे यांच्या स्मरणार्थही साहित्य पुरस्कार देण्याचा उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे.

## डॉ. सुमित मोरे यांचेही वडिलांच्या पावलावर पाऊल



वैद्यकीय पेशाविषयी सध्या बरेच प्रतिकूल बोलले जात असताना, प्रथम निदान, उपचार व रुग्ण बरा झाला तरच पैसे, अशी सेवा देणारे डॉक्टरही आहेत. मात्र, मनोरमा परिवारातील डॉ. सुमित मोरे हे वडील श्रीकांत मोरे यांच्या मार्गदर्शनानुसार आणि वडिलांप्रमाणे सामाजिक भान ठेवून आज गरीब रुग्णांसाठी आरोग्य शिबिरे, गरजू व गरिबांसाठी अत्यल्प खर्चात उपचार करण्याचे ध्येय ठेवून रुग्णसेवा करत आहेत.

पिवळं रेशनकार्ड असणाऱ्या नागरिकांचे मोफत उपचार, महिलांसाठी खास आरोग्य सुविधा अशा अनेक सेवा ते देतात. काहीही असू दे 'प्रथम ट्रीटमेंट' देत काम करणारे डॉ. सुमित यांनी सामाजिक कार्यात अग्रणी असलेल्या मनोरमा परिवाराचे प्रतिनिधी म्हणून कार्य करणाऱ्या आई वडिलांकडून मिळालेला सामाजिक कार्याचा वारसा जपला आहे. २०१४ पासून दर महिन्याच्या ५ आणि २० तारखेला जुळे सोलापूर येथील मनोरमा हॉस्पिटल येथे सकाळी १०:३० ते १२:३० यावेळेत मोफत शिबिर आयोजित करतात. यात रुग्णांची थायरॉईड, शुगर, एनसीबी घेण्यात येते. रुग्ण बरा झाल्याचे समाधान सगळ्याच्या पलीकडले असते. रुग्णाची बरी झालेली प्रकृती, रुग्णांचा आणि नातेवाइकांचा आमच्यावरचा विश्वास यातच आमचे समाधान असते, असे डॉ. सुमित मोरे आवर्जून सांगतात.

सात रस्ता येथील प्राईड हॉस्पिटलमध्ये डायरेक्टर म्हणून ते काम पाहतात. प्राईड हॉस्पिटल हे ५० बेडचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल असून, येथे २० बेडचा अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज असा अतिदक्षता विभाग आहे. त्यामध्ये ०७ केबिन आयसीयू आहे, सीटी स्कॅन, २४ तास फिजिशियनची उपलब्धता तसेच येथील मोड्यूलर ऑपरेशन थिएटर ॲडव्हान्स ललॅप्रोस्कोपी युनिट, २ डी इको, एक्स-रे, व्हेंटिलेटर, सर्व प्रकारच्या कॅशलेस सुविधा, या सर्व सेवा तसेच प्राईड हॉस्पिटलमध्ये चांगल्या दर्जाची यंत्रणा सुसज्ज आहे. प्राईड हॉस्पिटलमधील चारपैकी एक तज्ज्ञ डॉक्टर २४ तास येथे उपलब्ध असतात.

> मनोरमा परिवाराच्या फायनान्समुळे रुग्णालय उभे करताना खूप मदत झाली. शिवाय हॉस्पिटलमधील नवनवीन मशीन घेतेवेळी मनोरमा बँकेचे सहकार्य लाभले आहे. पुढील काळात १०० बेड्सचे प्राईड आयसीयु ॲण्ड मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्याचा मानस आहे. आम्ही वाटचाल सुरू केल आहे. यासाठीदेखील मनोरमा बँकेने अनुकूलता दाखवावी.
>
> **- डॉ. सुमित श्रीकांत मोरे**

## आरोग्य शिबिरांतून डॉ. मिताली मोरे यांचेही कौतुकास्पद कार्य

**प्रत्येक व्यक्तीकडे पाहिल्यानंतर अगोदर दिसतो तो त्यांचा चेहरा. मात्र, अनेक जणांच्या चेहऱ्यावरचे वेगवेगळे वर्ण, जखम अथवा रंग बदललेला असतो. याच चेहऱ्यावर औषधोपचार करून त्यांच्या चेहऱ्यावरती हास्य उमलवणाऱ्या डॉक्टर म्हणजे त्वचारोग तज्ज्ञ डॉ. मिताली सुमित मोरे होय. मागील पाच वर्षांपासून विविध आरोग्य शिबिरे महिला मेळावा, मोफत तपासणी शिबिर अशा विविध कार्यक्रमांतून त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील अनेक त्वचारोग संबंधित रुग्णांवरती मोफत उपचार केले आहेत.**

मुळात त्या समृद्ध घराण्याच्या सून मात्र स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या त्वचारोग तज्ज्ञ डॉ. मिताली मोरे या मनोरमा क्लिनिकमधून रुग्णांची सेवा करीत आहेत. त्या आता अनेक रुग्णांसाठी देवदूत ठरल्या आहेत. मनोरमा को-ऑप बँकेचे संस्थापक श्रीकांत मोरे आणि शोभा श्रीकांत मोरे हे त्यांचे सासू-सासरे आहेत.

मूळच्या धाराशिवच्या असणाऱ्या परंतु आता मनोरमा परिवारातील स्नुषा असणाऱ्या डॉ. मिताली सुमित मोरे यांचे सात रस्ता परिसरात मनोरमा क्लिनिक हे सुसज्ज असे क्लिनिक आहे. आपल्या पतीसोबत ते येथे रुग्णांची सेवा करतात. दहावीपर्यंतचे शिक्षण धाराशिव येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल येथे झाले, तर ११ वी व १२ वी दयानंद कॉलेज, लातूर येथे झाले. त्यानंतर त्यांनी लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस केले. नंतर स्किन स्पेशलायझेशन या विषयावर सांगली येथे अभ्यास केला. तद्नंतर पुण्यात कॉस्मेटोलॉजी, हेअर, फेलोशिप पूर्ण केली. २०१८ पासून जुळे सोलापुरातील मनोरमा क्लिनिक येथे कार्यरत आहेत.

### मनोरमा रुग्णालयातील सुविधा

मनोरमा रुग्णालयामध्ये चेहऱ्यावरील काळे डाग, वांग, पिंपल्सवर उपचार करण्यासाठी अद्ययावत उपचारपद्धती अस्तित्वात आहेत. याबरोबरच नको असलेले अनावश्यक केस काढण्यासाठी लेडार ट्रीटमेंट आहे. अंगावर टॅटू काढायचे असतील तर लेझर मशीनच्या साहाय्याने काढता येतात. जे वेदनादायक नसतात. याबरोबरच त्वचेला हानिकारक नसते. पांढरे डाग समूळ नष्ट करण्यासाठी मनोरमा क्लिनिकमध्ये लेझर ट्रीटमेंट उपलब्ध करण्यात आली आहे. स्किन टॅग चामखीळ, मस मशीनद्वारे समूळ उच्चाटन करणारी यंत्रणा उपलब्ध करण्यात आली. याबरोबरच पातळ केस, हेअर लॉस, टक्कल पडू नये, तसेच डोळ्यांभोवतीच्या काळी वर्तुळे तसेच पिंपल नष्ट करण्यासाठी ॲडव्हान्स ट्रीटमेंट उपलब्ध केल्या आहेत.



> मी गेली पाच वर्षे रुग्णसेवेत कार्य करत असताना मनोरमा परिवारातर्फे आयोजित करण्यात आलेल्या महिला आरोग्य शिबिरात रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन करण्याचे काम करीत आहे. त्याचबरोबर त्वचेसंबंधित घ्यावयाची काळजीबाबत वेळोवेळी मार्गदर्शन, शिवाय गरजू व सामान्य रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार सुरू आहेत. याचा फायदा अनेक रूग्णांना झाला आहे.
>
> **- डॉ. मिताली सुमित मोरे**

## मनोरमा परिवाराकडून सभासद अन् खातेदारांचा खूप मोठा विश्वास संपादन : अस्मिता गायकवाड

**मनोरमा परिवार हा आईच्या मायेने भारलेला परिवार आहे. बँकेने आर्थिक क्षेत्रात तर देदीप्यमान प्रगती केलेलीच आहे. परंतु सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केलेली आहे. बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांच्या कार्यकुशल नेतृत्वामुळे व संचालकांनी एकजुटीने दिलेल्या साथीमुळे हा परिवार सोलापूर पुरता मर्यादित नसून पुणे, धाराशिव आणि सांगली मध्येही विस्तार झाला. सभासद व खातेदारांचा खूप मोठा विश्वास हेच यशाचे गमक असल्याची माहिती मनोरमा परिवाराच्या कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड यांनी दिली.**

बँकेच्या संचालिका, मार्गदर्शिका स्वतः चेअरमन सुद्धा कर्ज वसुलीसाठी प्रयत्नशील व दक्ष असतात. त्यामुळे गेल्या पाच वर्षात बँकेचा एनपीए शून्य टक्क्यावर आला आहे. परिवाराचे काम करत असताना बँकेच्या कारभाराबाबत कधी कोणाकडून दबाव, हस्तक्षेप झाला नाही. कार्याध्यक्षपदाची जबाबदारी विश्वासानं सोपवली आहे. या परिवारात बँकेचे अध्यक्ष श्रीकांत मोरे, मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे व मनोरमा परिवारातील अध्यक्षापासून ते खातेदार, गुंतवणूकदार, भांडवलदार, कर्जदार, ग्राहक, महिला आणि शहरातील नागरिकांचे मोठे योगदान आहे, असे मी समजते. कारण मनोरमा परिवारामध्ये संपूर्ण संचालक मंडळाचं काम काज एकजुटीने आणि सर्वांचे विचार लक्षात घेऊनच केल्यामुळेच आमच्या परिवाराचा असलेला वटवृक्ष सध्या बहरत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या आलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन केल्यामुळेच आम्ही अग्रेसर आहोत. महिला, पुरुष, भांडवलदार, कारखानदार, उद्योजक, सर्व ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक, सभासद यांच्या पाठीशी मनोरमा परिवार खंबीरपणे उभा आहे. त्यामुळेच आमची जबाबदारी आणखीन वाढली आहे. याशिवाय वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, व्याख्यान, लहान मुलांसाठी विविध कार्यक्रम, गरजूंना मदत अशी विविध सामाजिक कामे देखील केली जात आहेत. महिला बचत गटाच्या गध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी बँकेने मोठे पाऊल उचलले आहे. पिठाच्या गिरणीपासून ते साखर कारखान्यापर्यंत सर्वच क्षेत्रात कर्जपुरवठा केला आहे. या परिवाराची कार्याध्यक्ष असल्याचा सार्थ अभिमान आहे.



# सखी मंचच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण



**मनोरमा बँकेच्या माध्यमातून महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी सखी मंचच्या माध्यमातून महिला आर्थिक, सामाजिक, मानसिक, बौद्धिक, आरोग्यदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते. मनोरमा परिवाराने अर्थकारणाबरोबरच सामाजिक बांधिलकीही जपली आहे. साहित्य, कला, संस्कृती, खेळ, बौद्धिक क्षेत्रातही उल्लेखनीय काम आम्ही केले असल्याची माहिती मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे यांनी दिली.**

## मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे यांचा निर्वाळा

मनोरमा परिवाराची गरुडभरारी नैतिक अधिज्ञानावर, प्रामाणिकपणा, सचोटीवर आधारित वाटचाल सुरू झाली, जी आजतागायत गरुडभरारी घेत चालू आहे. आज, मनोरमा परिवारात, मनोरमा बँकेबरोबर, मल्टिस्टेट, अंकुर, डीन सिटी, इरोमा स्वयंसहायता, मनोरमा सखी मंच, महिला उद्योजक, सदाशिव संस्था कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक सक्षम करण्याकरिता मनोरमा सखी मंच काम करत आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक सक्षमतेची जाणीव करून देऊन चार पैसे कसे वाचतील, यासाठी त्यांना मार्गदर्शन दिले जाते. दर महिने पैसे वाचल्यानंतर काय फायदा होऊ शकेल, याची माहिती दिली जाते. पुरुषांपेक्षा महिलांना काटकसर आणि नियोजन करण्याचा अनुभव जास्त असतो, मात्र साठवणूक करण्याबद्दल त्यांना अधिक माहिती नसते, राहिलेले पैसे पतीकडे देतात. त्यामुळे पूर्णपणे महिलांना पुरुषांवर अवलंबून राहावे लागते, हे चित्र बदलण्यासाठी चार पैसे कसे वाचतील, याकडे आम्ही सखी मंचच्या माध्यमातून विविध मार्गदर्शन, शिबिरे व्याख्यान देऊन त्यांना प्रशिक्षण दिले जाते. शिवाय लहान, मोठे स्वयंरोजगार उभे करण्यासाठी त्यांना कर्ज दिले जाते. एखाद्या महिलेला शेळीपालन, कुक्कुटपालन, पिठाची गिरणी अथवा मिरची कांडप मशीन आदींसाठी कर्ज पाहिजे असेल, तर त्या महिलेस त्या व्यवसायाबाबत माहिती आहे की नाही, जर त्या महिलेस त्या व्यवसायाची माहिती नसेल तर त्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत संपूर्ण माहिती दिली जाते.

### सखी मंचच्या माध्यमातून महिलांचा चौफेर विकास

महिलांसाठी विविध उपक्रम सखी मंचच्या माध्यमातून महिला आर्थिक, सामाजिक, मानसिक, बौद्धिक, आरोग्यदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते. मनोरमा परिवाराने अर्थकारणाबरोबरच सामाजिक बांधिलकीही जपली आहे. साहित्य, कला, संस्कृती, खेळ, बौद्धिक क्षेत्रातही उल्लेखनीय काम केले आहे. मनोरमा परिवाराची गरुडभरारी नैतिक अधिज्ञानावर, प्रामाणिकपणा, सचोटीवर आधारित मनोरमा परिवाराची वाटचाल सुरू झाली, जी आजतागायत गरुडभरारी घेत चालू आहे. आज, मनोरमा परिवारात, मनोरमा बँकेबरोबर, मल्टिस्टेट, अंकुर, डीन सिटी, इरोमा स्वयंसहायता, मनोरमा सखी मंच, महिला उद्योजक, सदाशिव संस्था कार्यरत आहेत. यामुळे महिलांचा चौफेर विकास होत आहे.

मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे यांनी आज पश्चिम म हाराष्ट्रात महिलांना आदर्श श्रेणीत नेऊन बसविले आहे. स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात, महिला समाजात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि संपूर्ण कुटुंब दैनंदिन कामांसाठी महिलांवर अवलंबून असते. त्या एकाचवेळी आई, पत्नी, गृहिणी, स्वयंपाकी, शिक्षिका, मित्र, परिचारिका या सर्वांची भूमिका शरीराच्या प्रत्येक गरजा पूर्ण करतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इ. क्षेत्रांत काम करत असतात, परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे शोभा मोरे यांनी आज जे काम मनोरमा परिवाराच्या माध्यमातून चालू ठेवले आहे .



## भावी पिढी सदृढ अन् हुशार होण्यासाठी डॉ. ऋचा मोरे-पाटील यांचे योगदान

> सध्या मी बँकेचे संचालक म्हणून कार्य करीत आहे. बँकेची उलाढाल सध्या एखाद्या वटवृक्षाप्रमाणे वाढत आहे. तो वटवृक्ष आणखीन कसा बहरेल, त्याचा सुगंध चोहीकडे कसा दरवळेल यासाठी मी प्रयत्न करणार आणि हे माझे कर्तव्यही आहे.
>
> **-डॉ. ऋचा मोरे-पाटील**

सोलापुरातील प्राथमिक शिक्षण पूर्ण करून २०१८-१९ साली सांगलीत वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि तीन वर्षांपासून सोलापुरातील मनोरमा न्यूरो स्पाईन चिल्ड्रन क्लिनिकमध्ये कार्यरत आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे अनेक मुले वेगवेगळ्या मार्गावर लागतात; वेळीच मुलांवर लक्ष न दिल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही मुले डिप्रेशनमध्ये जातात. त्या मुलांना वेळीच मार्गदर्शन करून त्यांना बरे करण्याचे काम बालरोगतज्ञ डॉक्टर ऋचा मोरे-पाटील या करत आहेत. सोलापुरातील सहकार क्षेत्रातील नामवंत व्यक्ती श्रीकांत मोरे आणि शोभा मोरे यांच्या त्या कन्या आहेत.

ऋचा मोरे यांच्या मनोरमा न्यूरो स्पाईन चिल्ड्रन क्लिनिकम ध्ये मुलांसोबत पालकांना देखील मार्गदर्शन केले जाते. हसत-खेळत मुलांची तपासणी करून त्यांच्यात काय गुण-दोष आहेत ते शोधलं जातात. त्यानंतर संबंधित मुलांच्या पालकांना मुलांना हा हा आजार असल्याची कल्पना देऊन त्यावर त्वरित उपचार केले जातात. त्यामुळे पुढील येणारा धोका टाळला जाऊ शकतो. त्या मुलांसाठी मार्गदर्शन आणि समुपदेशन केंद्र चालवितात, प्रसुतीनंतर आई आणि बाळाची काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन व सल्ला देतात, सुदृढ बालक सल्ला, शिशु निदान व बालक लसीकरण केंद्र त्यांचे आहे. मनोरमा परिवारातील सदस्य म्हणूनच त्या महिलांसाठी विविध आरोग्य संबंधित शिबिरे घेत असतात. समाजातील मुलांच्या फिटनेसबाबत आणि आजारी मुलांच्या आरोग्याप्रति त्या जनजागृती करताहेत. अनेक लहान मुलांना मोफत आरोग्याची सेवा देताहेत. मुलांना चांगले घडवायचे असेल तर आधी त्यांच्या मातांना पूर्ण शिक्षण आणि स्वातंत्र्य देण्याची अपेक्षा व्यक्त करतात. मुलांना शारीरिक आणि मानसिकरीत्या सक्षम बनवण्याची गरज असल्याचे त्या सांगतात. मुलांना चांगले संस्कार देणे गरजेचे आहे, अशी सांगतात. एक बालरोगतज्ज्ञ म्हणून अपेक्षा व्यक्त करताना अडचणीच्या काळात कशाचीही कमतरता, उणीव भासू दिली नाही.

## डॉ. आदित्य पाटील यांचेही मनोरमा परिवारात उत्तुंग कार्य



**डॉ. आदित्य पाटील हे गेली दोन वर्षे सोलापुरातील विविध नामवंत रुग्णालयामध्ये आपली आरोग्य सेवा देताना रुग्णसेवा ही ईश्वर सेवा म्हणून कार्य करत आहेत. ते शहरातील मार्कण्डेय, प्राईड, सिटी व कुंभारी येथील अश्विनी हॉस्पिटलमध्ये मेंदू व मणक्याच्या आजारावर ते उपचार करतात. ग्रामीण भागातील अनेक रुग्ण पॅरालिसिस (लकवा) या आजाराने त्रस्त असून, या रुग्णांसाठी डॉ. आदित्य पाटील हे देवदूताप्रमाणे आहेत. सोलापूर शहरातील ५०० पेक्षा अधिक शस्त्रक्रिया त्यांनी केल्या आहेत. मुंबई येथून एमबीबीएस केल्यानंतर, एमएस चंदीगड तर एमसीए एम्समधून केले आहे.**

शहरात अनेक नामवंत डॉक्टर आहेत; मात्र डॉ. आदित्य पाटील हे सर्वांपेक्षा वेगळेच आहेत. कारण ते अश्विनी रुग्णालयामध्ये मोफत आरोग्य सेवा देतात. शिवाय गरजू व गरीब रुग्णांसाठी त्यांची शस्त्रक्रिया आजार नायनाट किंवा कमी आणि माफक दरामध्ये कशा होतील यासाठी ते प्रयत्न करत असतात. अनेक रुग्णांची महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत शस्त्रक्रिया केली आहे.

गंभीर अपघातात मान मोडून पॅरालिसिस झालेला पेशंट जेव्हा ऑपरेशन झाल्यानंतर स्वतःच्या पायावर चालून आभार व्यक्त केले, तो क्षण अद्वितीय असल्याचे डॉ. आदित्य पाटील सांगतात. सध्या अपघातामध्ये डोक्याला मार लागला असेल तर दुर्लक्ष केले जाते, त्वरित उपचार घेतले जात नाहीत. पुढे चालून तेच दुर्लक्ष आरोग्यासाठी भारी पडते, यामुळे अनेक रुग्णांच्या मेंदूवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा रुग्णांनी वेळ न घालवता त्वरित उपचार करून घ्यावे, असे डॉ. आदित्य पाटील सांगतात. भविष्यात मेंदूच्या आजारापासून उपचाराकरिता कोणीही रुग्ण वंचित राहू नये, म्हणून प्रयत्न करणार आहे. याशिवाय मोठ्या मेट्रो शहरातील उपचार आपल्या शहरात कसे उपलब्ध होतील, याचाही प्रयत्न करणार आहे. मणक्याचे आजार, त्याच्या चाचण्या व उपचारासंदर्भात रुग्णांच्या मनात अनेक शंका असतात. लोकांमध्ये मणक्याच्या व पाठीच्या आजारांबद्दल बरेच गैरसमज आहेत. असे गैरसमज असल्याने मणक्याचे आजार अजून वाढू शकतात. यामुळे कोणीही अशा आजाराबाबत गैरसमज करून घेवू नये. डॉक्टरांकडून प्रत्येक आजारावर नीट करण्याचा पर्याय असतो.




**मनोरमा परिवाराला अत्योच्च शिखरावर घेवून जाण्यासाठी मोरे दांमत्यांनी आयुष्यभर खूप कष्ट वेचले आहेत. सध्याही हे मोरे दांमत्य मनोरमा परिवाराबरोबर सर्व सामान्य नागरिकांना मदतीचा हात देण्यासाठी कायम सज्ज असते.**

# आई जगदंबेच्या दरबारात

# भाविकांना तीर्थक्षेत्राबरोबर पर्यटनाची सुखद अनुभूती

**आई जगदंबेचा आशिर्वाद आणि तळपती तलवार घेवून मोघलांना पळती भुई थोडी करून स्वराज्याची निर्मिती केलेल्या राजे शिव छत्रपती शिवाजी महाराजांची तुळजापूरची आई जगदंबा आता अवघ्या महाराष्ट्राचेच नाही तर अवघ्या देशाचे आराध्यदैवत झाली असल्याने आईच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र तुळजापूर येथे भाविकांची बारमाही रीघ लागलेली असते. या अगाध महिमा असलेल्या श्री क्षेत्र तुळजापूर नगरीत आता रेल्वे वाहतूक सेवाही चालू होणार असल्याने भाविकांच्या गर्दीत तुफान वाढ होणार आहे. हे तीर्थक्षेत्र देशातील इतर तीर्थक्षेत्राला रेल्वे मार्गाने जोडण्यात येणार असल्याने भविष्यात या तीर्थक्षेत्राची ख्याती जगभर पसरणार, यात शंकाच नाही.**



अविनाश गायकवाड
मो. ९४२१८७६३४०



भक्तांच्या हाकेला ओ देणाऱ्या आई तुळजाभवानी मातेच्या मुळ गंडकी पाषाणाच्या मुर्तीवर वस्त्र, अलंकार, मणीमंगळसूत्र याचबरोबर हातात शस्त्र अत्यंत बारकाईने कोरलेली आहेत. श्री तीर्थक्षेत्र तुळजापूर नगरीतील आई तुळजाभवानी मातेचे देशभरात भक्त आहेत. शारदीय नवरात्र महोत्सव, चैत्री पौर्णिमा, पौष महिन्यातील शाकंबरी महोत्सवात भाविकांची मांदियाळी श्री तुळजाभवानी मातेच्या दरबारात असते. इतर कालावधीतही असंख्य भाविकांची दर्शनासाठी गर्दी होताना दिसून येते. आई जगदंबेची पूजा करण्याची जबाबदारी तुळजापुरातील भोपे-पुजार्यांच्या १६ घरांकडे आणि पाळीकर समाज पुजाऱ्यांच्या १५३ घरांवर आहे. श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी राज्यासह इतर राज्यातूनही असंख्य भाविक हजारो किलोमीटरहून येतात. आई तुळजाभवानी म्हणजे महाराष्ट्राची कुलस्वामिनी व साडेतीन शक्तीपीठापैकी एक पूर्ण शक्तीपीठ आहे. तुळजाभवानी मातेला आजवर आपण विविध वस्त्रालंकार, सजवलेल्या रूपात पाहिले आहेत.

आई तुळजाभवानी मातेच्या स्वयंभू अष्टभूजा मुतीची अनेक वैशिष्ट्य आहेत. आई तुळजाभवानी मातेची मुळ अष्टभुजा मुर्ती आहे. तुळजाभवानी मातेची मुर्ती ही गंडकी पाषणाची बनलेली असून, तिच्या आठही हातात शस्त्रे आहेत. तर पायाखाली महिषासूर राक्षसाचा वध केल्याचे दिसते. मुर्तीच्या डोक्यावर मध्यभागी महादेवाची पिंड असून, डाव्या बाजूला चंद्र व उजव्या बाजूला सुर्य आहे. देवीची मुर्ती ही अलंकृत असून, अंगावर सर्व अलंकार आहेत. श्री तुळजाभवानी मातेच्या हाती त्रिशुळ, बिचवा, बाण, चक्र, शंख, धनुष्य, पानपात्र व महिषासूर राक्षसाची शेंडी आहे. पाठीवर भाता असून, देवीच्या एका पायाखाली महिषासुराचे वध केलेले शरीर आहे. देवीच्या या मुर्तीला दिवसातून दोन वेळेस सकाळ व संध्याकाळ दही, दूध, केळी व मधाने पंचामृत करून अभिषेक घातला जातो. भारतात कोणत्याही मुर्तीला दिवसातून दोन वेळेला अभिषेक केला जात नाही. मात्र तुळजाभवानी माता त्याला अपवाद आहे. चलाचल असलेल्या या मुर्तीला, चंद्र, सुर्य उगवताना अभिषेक घालतात, अशी माहिती काही पुजाऱ्यांनी दिली.

दूरदूरवरून भाविकांना चांगल्या प्रकारे दर्शन करता यावे यासाठी मंदिर प्रशासनाने चांगल्या सुविधा दिल्या आहेत. अभिषेकासाठी स्वतंत्र मंडप व्यवस्था असून, अनेक भक्तांना दररोज देवीचा अभिषेक करता येतो. श्री तुळजाभवानी मंदिर समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असून, तहसीलदार, स्थानिक आमदार, नगराध्यक्ष आदींकडे इतर पदांची जबाबदारी असते. यामुळे मंदिरात आलेल्या भाविकांना आता विविध प्रकारच्या सुविधा मिळत आहेत. मंदिराभोवतीचे अतिक्रमण काढल्याने या ठिकाणी उभारण्यात आलेली विविध प्रकारची प्रासादिक दुकाने, खेळणी व इतर दुकाने भाविकांना आकर्षित करतात. मंदिरात प्रवेश करतानाचे छत्रपती शहाजी राजे महाद्वार, गोमुख तीर्थ, कल्लोळ तीर्थ, भव्य मंदिर उभारणी आणि पाठीमागे छत्रपती शिवाजी राजे दरवाजा दिसून येतो. याचबरोबर या तीर्थक्षेत्रात विविध मठ असून, या मठांच्या महंतांकडेही मंदिराची विविध प्रकारची जबाबदारी देण्यात आली आहे. ऐतिहासिक असलेल्या या मठांमध्ये श्री देवींजीच्या ऐतिहासिक वस्तुंचा वस्तुंचा संग्रहही दिसून येतो. आता सोलापूर-धाराशिव लोहमार्ग होत असल्याने हे शक्तीपीठ देशातील सर्व तीर्थक्षेत्रांना जोडण्यात येत आहे. यामुळे भविष्यात तिरूपती बालाजीच्या धर्तीवर आई जगदंबेच्या दरबारातही भाविकांची मोठी गर्दी होणार आहे.

### घाटशिळावरील डोंगराचे मनमोहक दर्शक

आई जगदंबेच्या घाटशीळावर बालाघाटाच्या आकर्षक डोंगररांगा असून, श्रावणात बसरलेल्या पावसामुळे हा डोंगर हिरव्यागार वनश्रींनी नटला आहे. हे नयनरम्य दर्शन घडले की, भाविकांच्या डोळ्याचे पारणे फिटल्याशिवाय राहत नाही. यामुळे आई जगदंबेच्या दर्शनाबरोबर पर्यटनाचा आनंदही घेण्यासाठी या डोंगररांगावर भाविकांची गर्दी सध्या दिसून येत आहे. पावसाळी वातावरण असल्याने या डोंगररांगांवर अनेक वृक्षवेली, झाडांची रेलचेल आहे. यामुळे भाविकांना तीर्थक्षेत्राबरोबर पर्यटनही आपोआप घडते.

### ५५ कोटींची मंजुरी मिळाल्याने मुख्य मंदिराचा जीर्णोद्धार

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून अजून ५५ कोटींची शासनाकडून मंजुरी मिळाली आहे. यामुळे आई जगदंबेच्या मुख्य मंदिरात पंढरपूर येथील श्री विठ्ठलाच्या धर्तीवर भाविकांना मुखदर्शन देण्यासाठी या निधीतून इमारतीचे सुंदर असे काम करणार आहे. या निधीतून महाद्वार सुधारणा करून मंदिराचा मोकळा परिसर वाढविण्यात येणार आहे. इतकेच नाही तर भाविकांच्या सेवेसाठी मंदिर समितीच्या माध्यमातून पहिल्यांदाच ४० ते ५० कर्मचाऱ्यांची मेगाभरती आम्ही केली आहे. भाविकांनी दान केलेले सोने वितळवून त्या आलेल्या पैशातून भाविकांना विविध सोयी देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. गेल्या २ वर्षांपासून श्री तुळजाभवानी मंदिर समितीच्या माध्यमातून या मंदिरात नाविण्यपूर्ण प्रयोग करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत व करीत राहणार आहोत.

**- डॉ. सचिन ओम्बासे, धाराशिव जिल्हाधिकारी**
तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मंदिर समिती, तुळजापूर



**तंत्रशिक्षण क्षेत्रात सन १९९८ साली लावलेल्या'स्वेरी'नावाच्या रोपट्याचे आज एका वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गेल्या २६ वर्षाच्या काळात३९; स्वेरी३९; ने शैक्षणिक,सामाजिक व संशोधनात्मक क्षेत्रात केलेल्या बहुमोल कार्याचा घेतलेला हा लेखा जोखा. गोपाळपूर (ता.पंढरपूर) हे पंढरपूरच्या शेजारी वसलेले,अध्यात्मिक परंपरा असलेले छोटेसे गाव. या गावाच्या पूर्व बाजूला असलेल्या माळरानावर३९;श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट३९;हे शैक्षणिक नंदनवन फुलले असून राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या स्वप्नातील समृद्ध खेडे प्रत्यक्षात उभा राहिले आहे. पंढरपूर सारख्या ग्रामीण भागात उच्च व तंत्रशिक्षणाचा नवीन३९;पंढरपूर पॅटर्न३९;स्वेरीने निर्माण केला आहे.**

# श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर ची रौप्य महोत्सवी यशोगाथा



साधारणपणे १९९७च्या दरम्यान तालुक्यात व जिल्ह्यातही शिक्षणाच्या सुविधा खूप कमी प्रमाणात होत्या. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणे, सांगली, मुंबई अशा शहरात जावे लागत होते. सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना बाहेरगावी जाऊन शिक्षण घेणे हे अवाक्याबाहेरचे होते. त्यामुळे तंत्र आणि व्यावसायिक शिक्षणाची अपेक्षा सोडून पंढरपूर परिसरातील विद्यार्थी हे कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेची पदवी घेऊन शेती आणि जमेल तो छोटा मोठा व्यवसाय करीत होता. अशा पार्श्वभूमीवर खर्डी सारख्या ग्रामीण भागातून आलेल्या डॉ. बी. पी. रोंगे यांनी सर्वार्थाने संपन्न अशी उच्च शिक्षण सुविधा पंढरपूरमध्येच निर्माण करण्याचा ध्यास घेतला आणि मग स्वप्नवत असे तंत्रशिक्षण देणारे महाविद्यालय त्यांच्या अभियंता मित्रांच्या सहकार्याने उभा राहिले. अभियांत्रिकी, तांत्रिक, वैद्यकीय, व्यवस्थापन हे शिक्षण पुण्या-मुंबईची मक्तेदारी झाली होती. अशा पार्श्वभूमीवर डॉ. बी. पी. रोंगे यांनी आज तंत्रशिक्षणामुळे फक्त जिल्ह्यातच नव्हे, तर राज्याच्या नकाशात पंढरपुरचे नाव उज्वल केले आहे. सन १९९८मध्ये श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट नामक संस्थेची पायाभरणी करीत अभियांत्रिकी पदवीच्या प्रथम वर्षाला सुरवात केली. सुरवातीला अभियांत्रिकी पदवी व त्यानंतर २००६ साली बी. फार्मसी महाविद्यालय स्थापन केले. पुढे३९; पंढरपूर पॅटर्न३९च्या माध्यमातून शिक्षणाचे विविध उपक्रम राबवीत असताना स्वेरीच्या कार्याला यश मिळत राहिले.

२००८मध्ये डी. फार्मसी व डिप्लोमा अभियांत्रिकी ही महाविद्यालये स्थापन करण्यात आली. पदव्युत्तर पदवी असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम २००८ पासून सुरु करण्यात आला. सोबतीला एम.ई./एम.टेक.,एम. फार्मसी व त्यांचे पीएच.डी. अभ्यासक्रम देखील सुरु करण्यात आले. स्वेरीच्या उच्चतम गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लौकिक देशभर गेल्याने, एनबीए, नॅक या मानांकनामुळे उत्तरपूर्व, दक्षिण भारतासह जम्मू काश्मीर आणि मध्य भारतातूनही शेकडो विद्यार्थी स्वेरीमध्ये शिक्षणासाठी पंढरीत दाखल होऊ लागले आणि शिक्षण पूर्ण करून आपले उज्वल भविष्य घडवून बाहेर पडू लागले आणि पाहता पाहता स्वेरीच्या या रोपट्याचे रुपांतर एका वटवृक्षात झाले.

स्वेरीने इतर कंपन्या व संस्थांसोबत सामंजस्य करार करून शैक्षणिक कार्यात आणखी भर टाकण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबविला. त्यात सुरवातीला भाभा अणु संशोधन केंद्र मुंबई, राजीव गांधी सायन्स ॲण्ड टेक्नालॉजी कमीशन,महाराष्ट्र शासन,राजा रामण्णा सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड टेक्नालॉजी इंदौर, टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस यांच्या समवेत करार करण्यात आले. शिक्षण घेतानाच व्यवसाय आणि नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे हे स्वेरीचे वैशिष्ट्य होय. प्लेसमेंटच्या माध्यमातून यंदाच्या वर्षी (सन २०२२-२३) स्वेरीने ६००हून अधिक रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या तर प्रशासकीय क्षेत्रात आजपर्यंत जवळपास ८५हून अधिक विद्यार्थी कार्यरत आहेत. मागील ५ वर्षात २१०० हुन अधिक विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या माध्यमातून नामांकित कंपन्यात भरघोस पॅकेजवर नोकऱ्या मिळाल्या आहेत. अभियांत्रिकी महाविद्यालयाला राष्ट्रीय दर्जाच्या३९; नॅक३९ या मानांकनाने सन्मानित केले आहे. स्वेरीने प्रत्येक वर्षी विद्यापीठ परीक्षांमध्ये उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांना आदर्श आणि जबाबदार नागरिक बनवण्यासाठी वेळोवेळी विचारवंत, तज्ञ सन्माननीय व्यक्तींचे मार्गदर्शन आयोजित केले जाते. स्वेरीमध्ये पूर्णपणे रॅगिंग फ्री वातावरण असून, तंबाखूजन्य पदार्थ सेवनावर पूर्णपणे बंदी आहे. मुलींसाठी सुरक्षित कॅम्पस, वाय-फाय कॅम्पस, सर्वत्र सीसीटीव्हीची निगराणी, रात्र अभ्यासिका आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. गरीब व होतकरू विद्यार्थ्यासाठी३९; कमवा आणि शिका३९ योजना कार्यान्वित असून गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर सुमारे १५ लाखांची बक्षिसे दरवर्षी दिली जातात. स्वेरीमध्ये केवळ पदवी देऊन विद्यार्थ्यांना निरोप दिला जात नाही तर त्यांच्यामध्ये संशोधन संस्कृतीचे बीजारोपण केले जाते. स्वेरीच्या संशोधनातील विस्तार पाहता ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. अनिल काकोडकर, पंतप्रधान कार्यालयाचे माजी विशेष वैज्ञानिक सल्लागार पद्मविभूषण डॉ. आर. चिदंबरम, पद्मभूषण डॉ. जे.बी. जोशी, पद्मश्री डॉ. शरद काळे, डॉ. कोटा हरिनारायण यांच्या सारख्या सुमारे ६५ पेक्षा जास्त शास्त्रज्ञांनी महाविद्यालयास भेटी दिल्या आहेत. स्वेरीमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन परिषदा३९; टेक्नो सोसायटल३९ या आतापर्यंत चार वेळा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या परिषदांच्या माध्यमातून जगभरातील वैज्ञानिकांच्या चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. स्वेरीतील विद्यार्थ्यांना उद्योजकतेबाबत चालना देण्यासाठी 'सोबस सेंटर ऑफ एक्सलंस'सुरु करण्यात आलेले आहे.



संतोष हलकुडे
मो. ९८५०२४२१५५

महाविद्यालयातील प्राध्यापकांचे विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नियतकालिकांमधून सुमारे ८५० संशोधनात्मक लेख आणि ४६ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. संशोधनात ४७ पेटंटही महाविद्यालयाने फाईल केलेली आहेत. स्वेरीच्या अनेक प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्प्रिंजर्स, स्कोपस सारख्या अनेक आंतरराष्ट्रीय जर्नल्स मधून शोधनिबंध प्रसिद्ध केलेले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या मॅनेजमेंट कौन्सिल, सिनेट, अकॅडमीक कौन्सिल, बीओएसचे चेअरमन, समन्वयक तसेच अनेक समित्यांचे सदस्यत्व झालेले, अभ्यास व शोध प्रकल्पाच्या निमित्ताने फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड, दक्षिण कोरिया व चीन या देशात अभ्यास दौरा केलेले स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य म्हणून पदभार सांभाळत असलेले डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त यांच्या सहकार्याने स्वेरीच्या माध्यमातून राज्यभरातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिक, औषधनिर्माण शास्त्र, व्यवस्थापन आदी महाविद्यालयांतून ज्ञानदानाचे कार्य अविरतपणे सुरु आहे. अनेक शैक्षणिक संस्थांना आपले अनेक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांअभावी बंद करावे लागत असताना स्वेरीच्या सर्व जागांवर प्रवेश झाले आहेत.

### विशेष लक्षवेधी -

**१) स्वेरीचे एकूण कॅम्पस क्षेत्रफळ २७ एकर असून त्यामध्ये एकूण बांधकाम सुमारे ५.५ लाख चौ.फुट असून त्यामध्ये उच्च दर्जाचे क्लासरुम, प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय तसेच उच्च क्षमतेचे १ हजार हून अधिक संगणक उपलब्ध आहेत.**

**२) स्वेरीमध्ये ४२ शिक्षक पीएच.डी. पदवी धारक आहेत. तर साधारणपणे २५ शिक्षक पीएच. डी. पदवी धारण करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहेत.**

**३) संस्थेमध्ये चार सुसज्ज ग्रंथालये,फास्ट इंटरनेट सुविधा,मुलांची तीन तर मुलींची तीन अशी स्वतंत्र वसतिगृहे,ॲम्पी थिएटर,जवळपास एक हजार सीसी टीव्ही कॅमेरेद्वारे कॅम्पसमध्ये चौफेर नजर, दवाखाना,सुसज्ज जीम व भव्य क्रीडांगण इत्यादींचा समावेश आहे. स्वेरीमध्ये २४ तास वाचन कक्ष,१४ तास पुस्तके वाटप,६५ हजार ३२९ तंत्रज्ञान विषयक पुस्तके,५५०० व्यक्ती चरित्रे उपलब्ध आहेत तसेच स्वेरीच्या समृद्ध ग्रंथालयात ४ कोटी ९३ लाखांहून अधिक किंमतीची ग्रंथ संपदा आहे.**

**४) ४०० किलो वॅट सोलार वीज निर्मिती प्रकल्प आणि महावितरण कडून ११ केव्ही एक्सप्रेस फिडर द्वारे २४ तास वीज पुरवठा.**

स्वेरीची ही वाटचाल स्वेरीच्या गुणवत्तेचे,विश्वासार्हतेचे प्रतीक आहे. स्वेरीच्या रुपात पंढरपूर सारख्या ग्रामीण भागात उच्च व तंत्रशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून स्वेरीचा नावलौकिक देशपातळीवर गेला आहे. एकूणच उच्च शिक्षणातील३९; पंढरपूर पॅटर्न३९ हा ट्रेंड सेट झाला आहे. अत्यंत प्रेरणादायी संस्था, शिक्षण आणि विकास यांचा समन्वय साधत, त्यांना जोडत या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना समाविष्ट करून घेतले जाते. मला विश्वास आहे की, भविष्यात शाश्वत विकास घडवण्यात ही संस्था मोलाची कामगिरी बजावेल. येथे कार्यरत प्रत्येकाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

**-पद्मविभूषण डॉ.अनिल काकोडकर,जेष्ठ शास्त्रज्ञ,भारतीय अणू ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष.**

अतिशय सुंदर शैक्षणिक कार्य करीत असलेल्या स्वेरीला पहिल्यांदा भेट देत असताना मनस्वी अत्यंत आनंद झाला होता. त्यांच्या सोबत ग्रामीण भागात सर्वदूर शिक्षण प्रसाराचे होणारे कार्य, बीएआरसीच्या माध्यमातून ग्रामीण भागात तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचे निरंतर कार्य उल्लेखनीय आणि वाखाणण्याजोगे आहे.

**-पद्मविभूषण डॉ. आर. चिदम्बरम विशेष वैज्ञानिक सल्लागार,पंतप्रधान कार्यालय**

१९९८ साली आम्ही अभियंता मित्रांना सोबत घेऊन गोपाळपूरच्या माळावर ज्ञान सत्राची सुरुवात केली होती. या भूमीवर तंत्र शिक्षणातील ज्ञान प्रदान करणारे नंदनवन उभे करण्याचे स्वप्न आम्ही पाहिले होते. सर्वांच्या सदिच्छा आणि शुभेच्छा यामुळे स्वेरी स्वप्नवत वाटचाल करते आहे. स्वप्न सत्यात उतरवल्याचे समाधान आहे. ग्रामीण भागातील, सुविधा आणि संधीचा अभाव असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च आणि तंत्र शिक्षण उपलब्ध करून देण्यात, तंत्रज्ञान आणि संशोधनाला चालना देण्यात स्वेरीला यश मिळाले आहे.

**-प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, संस्थापक सचिव, स्वेरी.**